लोकलेखा समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या नागरी
अहवालामधील पर्यावरण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१),
नियोजन विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.२),
गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४, ४.२.२, ४.२.५),
सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१.३, ४.१.४, ४.२.७,
४.२.८, ४.३.४, ४.४.२, ४.४.३, ४.४.४, ४.४.५),
महसूल व वन (वन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१.५),
वैद्यकीय शिक्षण औषधी द्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.३),
ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाशी
संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.६),
आदिवासी विकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.९) यावरील

तेरावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक जुलै, २०१३ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
जुलै, २०१३

लोकलेखा समिती

२०१२-२०१३

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या नागरी अहवालामधील पर्यावरण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१), नियोजन विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.२), गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४, ४.२.२, ४.२.५), सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१.३, ४.१.४, ४.२.७, ४.२.८, ४.३.४, ४.४.२, ४.४.३, ४.४.४, ४.४.५), महसूल व वन (वन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१.५), वैद्यकीय शिक्षण औषधी द्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.३), ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.६), आदिवासी विकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.९) यावरील

तेरावा अहवाल

लोकलेखा समिती
२०१२-२०१३

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.

(५) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

(६) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.

* (७) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. (दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)

(७अ) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स. (दिनांक ११ जुलै, २०१३ रोजीपासून)

(८) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

** (९) श्री.संजय सावकारे, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)

*** (१०) श्री.दिलीप सोपल, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)

(११) श्री.ए.टी.पवार, वि.स.स. (दिनांक ५ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)

**** (११अ) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. (दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजीपासून)

(१२) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

(१३) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.

(१४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(१५) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

(१६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.

(१७) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

(१८) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(१९) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

(२०) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.

(२१) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

(२२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

(२३) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

(२४) श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

(२५) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

निमंत्रित

(२६) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.(दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजीपर्यंत)

***** (२६अ) श्री.विनायक राऊत, वि.प.स. (दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून)

(२७) श्री. मनिष जैन, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून, २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधामंडळ सचिवालय,

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री.उ.की.चव्हाण, अतिरिक्त सचिव.
(३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(५) श्री.दिलीप येवाला, अवर सचिव (समिती).
(६) श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

*** श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. यांचे दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजी निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.राहुल बोंद्रे , वि.स.स. यांची मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ११ जुलै, २०१३ रोजी नामनियुक्ती केली आहे.**

**** श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

***** श्री.दिलीप सोपल, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

****** श्री.ए.टी.पवार, वि.स.स. यांचे जागी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजी नामनियुक्ती केली.**

******* श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांची निमंत्रित म्हणून दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ नामनियुक्ती केली.**

लोकलेखा समिती
२०१०-२०११

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.कालिदास कोळंबकर - वि.स.स.
३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
४) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
५) श्री.अमित देशमुख - वि.स.स.
६) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर - वि.स.स.
७) श्री. रवि राणा - वि.स.स.
८) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स
९) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
१०) श्री.नवाब मलिक - वि.स.स.
११) श्री.विलास लांडे - वि.स.स.
१२) श्री.शिवेंद्रसिंह भोसले - वि.स.स.
१३) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
* १४) श्री.सुधीर मुनगंटीवार - वि.स.स.
१४ (अ) प्रा. राम शिंदे- वि.स.स.
१५) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.
१६) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
१७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
१८) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
१९) श्री.एकनाथ शिंदे - वि.स.स.
२०) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
२१) श्री. सुरेशदादा देशमुख - वि.प.स.
२२) श्री.भाई जगताप - वि.प.स.
** २३) श्री. राजेंद्र जैन - वि.प.स.
*** २४) श्री. विनोद तावडे - वि.प.स.
२४ (अ) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२५) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ फेब्रुवारी, २०१० रोजी विधानसभा व दिनांक २ मार्च, २०१० रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
४) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
५) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती).
६) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

*** श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रा. राम शिंदे, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

**** श्री.राजेंद्र जैन, वि.प.स. यांची दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपली.**

***** श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांची दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१२ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

( )

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ च्या नागरी अहवालामधील पर्यावरण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१), नियोजन विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.२), गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.४, ४.२.२, ४.२.५), सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१.३, ४.१.४, ४.२.७, ४.२.८, ४.३.४, ४.४.२, ४.४.३, ४.४.४, ४.४.५), महसूल व वन (वन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१.५), वैद्यकीय शिक्षण औषधी द्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३.३), ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.६), आदिवासी विकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.४.९) यावर विचार करून लोकलेखा समितीचा तेरावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २ फेब्रवारी, २०११, दिनांक १५ फेब्रुवारी, २०११, दिनांक २१ फेब्रुवारी, २०११, दिनांक १ जून, २०११, दिनांक २८ जून, २०११, दिनांक ६ जुलै, २०११, दिनांक १२ जुलै, २०११, दिनांक १३ जुलै, २०११, दिनांक ५ ऑक्टोबर, २०११, दिनांक ४ नोव्हेंबर, २०११ व दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजी प्रधान सचिव, आदिवासी, नियोजन, गृहनिर्माण, महसूल व वन (वन) व जलसंधारण विभाग तसेच सचिव, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २५ जुलै, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल विचारात घेतला व त्यास काही फेरफारासंह मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : २५ जुलै, २०१३

गिरीश बापट,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

( )

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	
(१)	**पर्यावरण विभाग**	
	(परिच्छेद क्र. ३.१.६, ३.१.७, ३.१.८, ३.१.११.२, ३.१.११.३, ३.१.११.४, ३.१.११.६, ३.१.१७)	
(२)	**नियोजन विभाग**	
	(परिच्छेद क्र. ३.२)	
(३)	**गृहनिर्माण विभाग**	
	(परिच्छेद क्र. ३.४, ४.२.२, ४.२.५)	
(४)	**सार्वजनिक बांधकाम विभाग**	
	(परिच्छेद क्र. ४.१.३, ४.१.४, ४.२.७, ४.२.८, ४.३.४, ४.४.२, ४.४.३, ४.४.४, ४.४.५)	
(५)	**महसूल व वन (वन) विभाग**	
	(परिच्छेद क्र. ४.१.५)	
(६)	**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**	
	(परिच्छेद क्र. ४.३.३)	
(७)	**ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग**	
	(परिच्छेद क्र. ४.४.६)	
(८)	**आदिवासी विकास विभाग**	
	(परिच्छेद क्र. ४.४.९)	

पर्यावरण विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील १) परिच्छेद क्र.३.१.६ "जैव वैद्यकीय कचरा निर्माण करणारी व्यवस्थापने आरोग्य सेवा व्यवस्थापने यांचा शोध", २) परिच्छेद क्र.३.१.७ "राज्यातील आरोग्य सेवा व्यवस्थापनाने प्राप्त करुन घ्यावयाचे प्राधिकार", ३) परिच्छेद क्र.३.१.८ "जैव वैद्यकीय कचऱ्याचा अंदाज व निर्मिती", ४) परिच्छेद क्र.३.१.११.२ "भस्म न होणाऱ्या वैद्यकीय कचऱ्याचे उच्च दाब/सुक्ष्मलहर निर्जंतुकीकरण आणि चिंधीकरण", ५) परिच्छेद क्र.३.१.११.३ "जैव वैद्यकीय कचऱ्याचे दफन पध्दतीने नष्टीकरण", ६) परिच्छेद क्र.३.१.११.४ "द्राव्य कचऱ्याची विल्हेवाट", ७) परिच्छेद क्र.३.१.११.५ "जैव वैद्यकीय कचऱ्याचे पालिका घन कचऱ्यामध्ये मिश्रण", ८) परिच्छेद क्र.३.१.१२ "प्रादेशिक अधिकाऱ्याकडून तपासणी" व ९) परिच्छेद क्र. ३.१.१७ "सल्लागार समिती" या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

"जैव वैद्यकीय कचरा निर्माण करणारी व्यवस्थापने/आरोग्य सेवा व्यवस्थापने यांचा शोध."

१.१ प्रति महा एक हजार रुग्णापेक्षा कमी रुग्णाची संपर्क येणाऱ्या आरोग्य सेवा व्यवस्थापनांना प्राधिकार मिळविण्याची आवश्यकता नसते परंतू त्यांच्याकडून निर्माण होणाऱ्या जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करणे आवश्यक असते तथापि असे लक्षात आले आहे की, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने राज्यातील अशा आरोग्य सेवा व्यवस्थापनांचे कोणत्याही प्रकारे सर्वेक्षण केलेले नव्हते आणि त्यांच्याकडून निर्माण केल्या गेलेल्या जैव वैद्यकीय कचऱ्यावरील प्रक्रियांच्या कार्यपध्दतीची खात्री करुन घेतली नव्हती. सुरुवातीच्या परिषदेमध्ये सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी असे सर्वेक्षण करण्याचे मान्य केले.

शेवटच्या परिषदेमध्ये सदस्यांनी असे म्हटले की, (ऑगस्ट, २००८) प्रादेशिक अधिकारी आणि वैद्यकीय संस्थांकडून काही माहिती घेण्यात आली होती परंतु त्याबाबतचा तपशिल त्यांच्याकडून देण्यात आला नव्हता.

पशुवैद्यकीय संस्थांमधील स्थिती

१.२ दिनांक ३१ मार्च, २००७ अखेर राज्यामध्ये असलेल्या ४,७१० पशुवैद्यकीय संस्थांना जैव वैद्यकीय कचरा नियमांतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राधिकार प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. आयुक्त पशुसंवर्धन यांनी हे मान्य केले की, कोणत्याही संस्थेने तसे प्राधिकार प्राप्त केले नव्हते (मे, २००८). विभागास सुध्दा ह्या संस्थांनी एकुण निर्माण केलेल्या जैव वैद्यकीय कचऱ्याविषयी तसेच त्याच्या विल्हेवाटीविषयी कोणतीही माहिती नव्हती.

शेवटच्या परिषदेमध्ये सदस्य सचिवांनी असे मान्य केले (ऑगस्ट, २००८) कि ही बाब पशुसंवर्धन विभागाकडे सुपुर्द करण्यात येईल.

राज्यातील पशुसंवर्धन विभागांतर्गत असलेल्या पशुवैद्यकीय संस्थापैकी कोणीही जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम, १९९८ च्या अंतर्गत असलेले प्राधिकार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त करुन घेतलेले नव्हते.

ज्ञापन:-

१.३ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खूलासा केला.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने सन २००९ दरम्यान सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेतले होते, सर्वेक्षणाचे काम मंडळाच्या ११ प्रादेशिक विभागाच्या अंतर्गत बाह्यसंस्थांमार्फत निविदा काढून सर्वेक्षण पुर्ण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणानुसार २६,५२५ नवीन वैद्यकीय आस्थापनांचा शोध घेण्यात आला असून, त्यांची जैव व वैद्यकीय (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९९८ च्या अन्वये पुर्तता करण्यात आली असून, सुमारे ९५% वैद्यकीय आस्थापनांनी अंमलबजावणी केल्याचे निदर्शनास आले आहे.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी दिनांक २.८.२००८ च्या पत्रान्वये सचिव, पशुसंवर्धन दुग्धविकास व मत्स्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांना त्यांच्या विभागाच्या अंतर्गत असलेल्या आस्थापनांची जैव वैद्यकीय नियम १९९८ च्या अंतर्गत पुर्तता करुन घेण्याबद्दल कळविले आहे व त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

वरील सर्वेक्षणामध्ये पशुसंवर्धन रुग्णालय ज्यांना प्राधिकारपत्र घेण्याचे बंधनकारक आहे, अशा रुग्णालयांचा समावेश करण्यात आला आहे.

"राज्यातील आरोग्य सेवा व्यवस्थापने प्राप्त करुन घ्यावयाचे प्राधिकार"

१.४ जैव वैद्यकीय कचरा नियमातील नियम ८ (१) नुसार अशा तऱ्हेचा कचरा निर्माण करणाऱ्या, गोळा करणाऱ्या, स्विकारणाऱ्या, साठविणाऱ्या वाहतूक करणाऱ्या, त्यावर प्रक्रिया करणाऱ्या त्याची विल्हेवाट लावणाऱ्या आणि किंवा कोणत्याही प्रकारे जैव वैद्यकीय कचरा हाताळणाऱ्या या प्रत्येक संस्थेच्या प्रत्येक भोगवटादारास एक हजार पेक्षा कमी रुग्णास सेवा उपचार देणाऱ्या रुग्णालय, दवाखाने, विकृती चित्कीत्सा प्रयोगशाळा आणि रक्तपेढ्यांचे भोगवटादारांव्यतिरिक्त जैव वैद्यकीय कचरा नियमांच्या अर्ज क्रमांक एक मधील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राधिकारास अर्ज करणे आवश्यक असते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या प्राधिकार पत्रात वैद्यकीय कचरा कोणत्या पध्दतीने नष्ट करावयाचा याबाबतचा उल्लेख असतो. संस्थातर्फे काम करणाऱ्या चालकांनासुध्दा अशा तऱ्हेचे प्राधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करुन घ्यावयाचे असते. नियम ८ (३) नुसार भोगवटादार आणि चालक यांना प्राधिकारपत्र देय असते.

लेखा परिक्षा झालेल्या कालावधीमध्ये जैव वैद्यकीय कचरा नियमांच्या अंमलबजावणी नुतनीकरण शुल्कासहित प्राधिकार शुल्क म्हणून मिळालेला महसूल खाली नमुद केलेला होता.

वर्ष	२००३-०४	२००४-०५	२००५-०६	२००६-०७	२००७-०८
महसूल	५१.९१	७३.८६	४३.९०	६९.९०	-

शेवटच्या परिषदेमध्ये सदस्य सचिव यांनी असे म्हटले की (ऑगस्ट २००८) सार्वजनिक सुचना, लोकजागृती नि प्रशिक्षण यासाठी खर्च केला होता. त्याबाबतचा तपशिल लेखापरिक्षेस देण्यात आला नव्हता.

मार्च, २००७ अखेर ८१६८ रुग्णालये आणि शुश्रुषागृहे यांचेकडे जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता व्यक्तीगत प्रक्रिया सुविधा नव्हती किंवा सामायिक प्रक्रिया सुविधेशी जोडले गेले नव्हते. त्यामुळे लेखा परिक्षणामध्ये ह्या रुग्णालयांकडून आणि शुश्रुषागृहांकडून निर्माण झालेला जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट कोणत्या प्रकारे लावली गेली होती का तो पालिकेच्या घन कचऱ्यामध्ये मिश्रित होता ह्याची खात्री करुन घेता आली नाही.

वैद्यकीय महाविद्यालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्र यांना जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाटीसाठी प्राधिकार मिळविणे आवश्यक होते. असे लक्षात आले होते की, जिल्ह्यांतील सर्व नऊ वैद्यकीय महाविद्यालयांनी आणि ७३ प्राथमिक आरोग्य केंद्रांनी प्राधिकारांकरीता अर्ज सादर केले नव्हते. प्रादेशिक अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील असे म्हटले आहे. (डिसेंबर २००७)

मुंबईमध्ये महापालिकेकडे नोंदणी झालेली २२५५ रुग्णालये आणि शुश्रुषागृहे होती (जून २००८). तथापी, जून, २००८ अखेर जैव वैद्यकीय कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी शासकीय आणि महापालिका रुग्णालयासहीत फक्त १,३५४ रुग्णालये व शुश्रुषागृहे यांना प्राधिकार देण्यात आले होते. ह्याप्रमाणे ९०१ रुग्णालये व शुश्रुषागृहे यांचेकडे जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्राधिकार नव्हते. म्हणून लेखापरिक्षणात ह्या ९०१ आरोग्य सेवा व्यवस्थापनाकडून निर्माण झालेल्या जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट त्यांचेकडून कोणत्या प्रकारे लावण्यात आली ह्याबाबतची खात्री करुन घेणे शक्य झाले नव्हते. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी असे म्हटले की, (जून, २००८) छोट्या आणि मध्यम स्तरावरील आरोग्य सेवा व्यवस्थापनांस स्वत:च्या परिपूर्ण प्रक्रिया आणि भस्मीकरण व खोल दफन खड्डे ह्यासारख्या सुविधा विल्हेवाटीसाठी पुरवणे आर्थिकदृष्ट्या शक्य होत नव्हते. त्यांनी पुढे असेही म्हटले की ज्या संस्थांनी प्राधिकारासाठी अर्ज केले नसतील अणि ज्या संस्था सामाईक प्रक्रिया सुविधेशी जोडल्या गेल्या नसतील त्यांचेवर खटले भरण्यात येतील.

शेवटच्या परिषदेमध्ये सदस्य सचिव यांनी असे म्हटले की (ऑगस्ट २००८) सार्वजनिक आरोग्य विभाग आणि स्थानिक संस्थांना, सर्व आरोग्य सेवा व्यवस्थापनांनी जैव वैद्यकीय कचरा नियमांतर्गत प्राधिकारांसाठी अर्ज केले असल्याची खात्री करुन घेण्यासाठी सूचना देण्यात आल्या होत्या.

ज्ञापन:-

१.५ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खूलासा केला.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळने जैव व वैद्यकीय नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठीच्या जनजागृतीसाठी रु.४,००,०००/- खर्च केले असून, All India Local Self Government या संस्थेकडे प्रशिक्षण व जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्याचे काम सोपविले

होते. तसेच मंडळातील सर्व प्रादेशिक अधिकाऱ्यांना प्रत्येकी रु.३०,०००/- या उपक्रमासाठी खर्च करण्यासाठी दिले आहे.

सर्वेक्षणा अगोदर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे १७,७२० वैद्यकीय आस्थापनांची नोंद होती. सदर सर्वेक्षणानंतर एकूण ४६,६७६ वैद्यकीय आस्थापनांची मंडळाकडे नोंद झाली असून, त्यापैकी ३६,९५९ वैद्यकीय आस्थापनांनी सामुहिक जैव व वैद्यकीय विल्हेवाट केंद्रांचे सभासदत्व घेतले आहे. उर्वरित ९३९२ वैद्यकीय आस्थापनांनी स्वत:चे विल्हेवाट व प्रक्रिया व्यवस्थापनाने पुरविली आहे व ही आस्थापने अशा ठिकाणी आहेत, ज्या ठिकाणांची लोकसंख्या ५,००,००० पेक्षा कमी आहे. तसेच ज्या आस्थापनांनी ३२५ वैद्यकीय आस्थापनांवर मंडळाने कारणे दाखवा नोटीस बजाविल्या जात आहेत.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने नमूद केलेल्या कोल्हापूरमधील सर्व ९ वैद्यकीय आस्थापना व प्राथमिक आरोग्य केंद्रांनी जैव वैद्यकीय नियमांच्या अंतर्गत मंडळाकडून प्राधिकारपत्र घेतले असून, नियमांची पुर्तता केली आहे.

मुंबईतील २२५५ वैद्यकीय आस्थापनांची आकडेवारी ही सर्वेक्षणाच्या पूर्वीची नोंद असून, सर्वेक्षणानंतर ८१२१ वैद्यकीय आस्थापनांची नोंद झाली असून, त्यामध्ये सर्व वैद्यकीय आस्थापनांचा समावेश आहे. ज्यामध्ये शासकीय, महानगरपालिकेच्या व खाजगी रुग्णालयांचा समावेश आहे. सदर नमुद केलेल्या रुग्णालयांनी सामुहिक जैव व वैद्यकीय विल्हेवाट केंद्रांचे सभासदत्व घेतले असून, सुमारे १० टन प्रतिदिन जैव वैद्यकीय कचरा गोळा करुन, त्याची विल्हेवाट लावली जाते.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ च्या अनुषंगाने २४ वैद्यकीय आस्थापनांवर जैव वैद्यकीय कचरा नियम, १९९८ चे उल्लंघन केल्यामुळे, त्यांच्यावर खटले दाखले केले आहेत.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने आरोग्य विभागास वैद्यकीय आस्थापनांची नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत नोंद घेताना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्राधिकारपत्र प्राप्त करुन घेतल्याची तपासणी करण्यास सांगितले आहे. तसेच आरोग्य विभागाने शासनाकडे या नियमांमध्ये बदल करण्यास कळविले असून, वरील अटी नमूद करण्यास सांगितले आहे.

यामुळे सर्व नर्सिंग होम्स्ना जैव वैद्यकीय नियमांच्या अंतर्गत प्राधिकारपत्र प्रदान करण्यात येईल.

" जैव वैद्यकीय कचऱ्याचा अंदाज व निर्मिती"

१.६ प्रत्येक भोगवटादारास जैव वैद्यकीय कचरा नियमाअंतर्गत करार निविष्ट केल्यानुसार जरी त्यास प्राधिकार बाळगणे आवश्यक नसले तरी प्रत्येक वर्षी त्याने निर्माण केलेल्या व विल्हेवाट लावलेल्या जैव वैद्यकीय कचऱ्याचा तपशिल अहवाल ३१ जानेवारीपर्यंत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास सादर करावयाचा असतो. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्रत्येक भोगवाटादारासंबंधीची ही माहिती केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळास प्रत्येक वर्षी ३१ मार्चपर्यंत पाठवावयाची असते, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे २००४-२००५ या कालावधीपुर्वी निर्माण झालेल्या व विल्हेवाट लावलेल्या जैव वैद्यकीय कचऱ्याविषयी माहिती उपलब्ध नव्हती. तसेच २००७-२००८ या वर्षाकरीता मंडळाकडून सदृश माहिती तयार करण्यात आली नव्हती (ऑगस्ट २००८). महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास पुरविलेल्या माहितीनुसार २००४-०५ ते २००६-०७ या दरम्यान निर्माण केलेल्या व विल्हेवाट लावल्या गेलेल्या जैव वैद्यकीय कचऱ्याची संख्यात्मक माहिती खालीलप्रमाणे होती:

(संख्या मे टन मध्ये)

वर्ष	आ.से.व्य.ची. संख्या	निर्मिती झालेला कचरा	प्रक्रिया केलेला कचरा	प्रक्रिया न झालेला कचरा
२००४-०५	११५०५	९२४५.४५	९२४५.४५	---
२००५-०६	१५२२३	२७७७१.७५	२७७७१.७५	---
२००६-०७	१७७२०	१८९६९.४२	१७९८५.३४	९८४.०८

विवरणाच्या छाननीतून असे लक्षात आले की निर्मित झालेला कचरा आणि प्रक्रिया वैद्यकीय कचरा, अहवालांमध्ये वर्गवारीसह देण्यात आला नव्हता. तसेच, मुंबईत झालेला व प्रक्रिया करण्यात आलेल्या जैव वैद्यकीय कचऱ्याची माहिती वरिल कालावधीमध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास पाठविलेल्या अहवालात समाविष्ट करण्यात आली. असेही लक्षात आले की

निर्मित झालेल्या आणि प्रक्रिया केलेल्या जैव वैद्यकीय संख्यात्मक माहिती भोगवटादार यांचेकडून मिळविलेल्या माहितीवर आधारीत आहे. प्रादेशिक अधिकाऱ्यांकडून सादर केलेल्या माहितीवर आधारित होती. प्रादेशिक अधिकारी फक्त सामाईक प्रक्रिया सुविधा असलेल्या चालकांनी प्रक्रिया केलेल्या जैव वैद्यकीय राशीविषयी माहिती दिली. १२ जिल्ह्यांमध्ये सामाईक प्रक्रिया सुविधा नसल्याने जिल्ह्यातील जैव वैद्यकीय कचऱ्याच्या राशीविषयी प्रक्रियेबद्दल कोणतीही माहिती आली नव्हती. ह्याप्रमाणे फक्त सामाईक प्रक्रिया सुविधेत प्रक्रिया झालेल्या वैद्यकीय कचऱ्याच्या माहितीवर अवलंबून राहिल्यामुळे आणि सामाईक प्रक्रिया नसलेल्या १२ जिल्ह्यातील माहितीचा समावेश त्यामध्ये नसल्यामुळे केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळास निर्मिती झालेल्या व प्रक्रिया झालेल्या जैव वैद्यकीय कचऱ्यासंबंधी पुरविलेली माहिती चुकीची होती.

ही वस्तुस्थिती सदस्य सचिव यांनी मान्य केली (जून २००८) आणि अशी खात्री वार्षिक अहवालात (२००६-०७) योग्य ती दुरुस्ती करुन सुधारीत अहवाल केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर करण्यात येतील. शेवटच्या परिषदेमध्ये सदस्य सचिवांनी म्हटले की, २००७-०८ या वर्षापासून पुढे वर्गवारीनुसार माहिती सादर करण्यात येईल व आरोग्य सेवा व्यवस्थापनांकडे व्यक्तिगत प्रक्रिया सुविधा नाहीत किंवा जी सामाईक सुविधेशी जोडली गेलेली नाहीत त्यांच्याकडूनही माहिती मिळविण्याचे प्रयत्न केले जातील.

ज्ञापन:-

१.७ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खूलासा केला.

केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने वार्षिक अहवालाचा नमुना तयार केला असून, त्यामध्ये प्रतवारीनुसार जैव वैद्यकीय कचऱ्याची निर्मिती व विल्हेवाटीबाबत उल्लेख नसल्यामुळे, अशा प्रकारची माहिती देण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ प्रादेशिक अधिकारी व सामुहिक वैद्यकीय आस्थापनांकडून जैव वैद्यकीय कचऱ्यांचा वार्षिक अहवाल गोळा करुन तो केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाला सादर करते. तसेच वैद्यकीय आस्थापनांना प्राधिकारपत्र प्रदान करताना वार्षिक अहवाल सादर केल्याची तपासणी करते, त्यामुळे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला वैद्यकीय आस्थापनांकडून वार्षिक अहवाल मिळत आहे.

नमूद केलेल्या १२ जिल्ह्यांमध्ये सामुहिक जैव वैद्यकीय विल्हेवाट केंद्रे उपलब्ध नसले तरी, सध्या कार्यरत असलेल्या सामुहिक जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट केंद्र चालक या १२ जिल्ह्यांमधील जैव वैद्यकीय कचरा गोळा करुन, त्याची विल्हेवाट निमयांनुसार लावतात. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सुमारे १५० कि.मी. त्रिजेच्या परिसरांमधून जैव वैद्यकीय कचरा गोळा करण्याची मुभा आहे. या सामुहिक विल्हेवाट केंद्रामध्ये विल्हेवाट केलेल्या जैव वैद्यकीय कचऱ्याची नोंद वार्षिक अहवालात केली जाते.

"भस्म न होणाऱ्या जैव वैद्यकीय कचऱ्याचे उच्च दाब/सूक्ष्मलहर निर्जंतुकीकरण आणि चिंधीकरण"

उच्च दाब तापमान निर्जंतुकीकरण व्यवस्था

१.८ जैव वैद्यकीय कचरा नियमाच्या अधिसूची १ नुसार सूक्ष्म जैव वैद्यकीय सूक्ष्म तांत्रिक धारदार कचरा आणि घनकचऱ्यावर उच्चदाब निर्जंतूकीकरण आणि घनकचऱ्यावर उच्चदाब निर्जंतुकीकरण पध्दतीने प्रक्रिया करायची असते. तसेच उच्चदाब/तपमान निर्जंतुकीकरण पध्दतीने प्रक्रिया, प्लास्टीक कचरा आणि धारदार कचरा, चिंधीकरण पध्दतीने आणि भूभरावात (Landfill) नष्ट करायचा असतो.

स्थळाच्या प्रत्यक्ष सह पडताळणीमध्ये असे दिसून आले की (डिसेंबर २००७) चंद्रपूरमध्ये उच्चदाब/तापमान निर्जंतुकीकरण यंत्रांची व्यवस्था करण्यात आली नव्हती. ज्यामुळे सर्व प्रकारचा जैव वैद्यकीय कचरा प्लास्टिक वस्तुंसह भस्मीकरण पध्दतीने उच्चदाब/तापमान निर्जंतुकीकरण न करता नष्ट करण्यात येत होता. उप-प्रादेशिक अधिकारी चंद्रपूर ह्यांनी वस्तुस्थिती स्विकारली आणि चालकाला नोटीस देण्याचे मान्य केले.

प्रत्येक उच्चदाब/तापमान निर्जंतुकीकरण यंत्रास एक आलेखी किंवा संगणकीय मुद्रण साधन कि जे स्वयंचलित व सातत्याने वेळ, तारीख व भरणा ह्या बाबीचे तसेच चालू मोजमापाचे संनियंत्रण व मुद्रण ह्या संपूर्ण निर्जंतुकीकरण पध्दतीमध्ये होत राहील. जैव वैद्यकीय कचरा जोपर्यंत त्यास आवश्यक तो वेळ, तापमान आणि दाब ह्या कार्यपध्दतीमध्ये दिला जात नाही तोपर्यंत तो योग्य तऱ्हेने प्रक्रिया झालेला आहे असे समजावयाचे नसते.

नऊ जिल्ह्यातील सामाईक प्रक्रिया सुविधा असलेल्या स्थळांना दिलेल्या सह भेटीतून (ऑक्टोबर २००७ ते फेब्रुवारी २००८) असे निष्पन्न झाले की, सामाईक प्रक्रिया सुविधेच्या

चालकांनी सदर यंत्रणेस मुद्रण सुविधा पुरविलेली नव्हती. ह्या सुविधेच्या अभावामुळे हे निश्चित करता येऊ शकले नव्हते की उच्च दाब/सुक्ष्मलहर निर्जंतुकीकरण प्रक्रिया होत असताना जैव वैद्यकीय कचऱ्यावर योग्य तऱ्हेने प्रक्रिया केली जात होती की नव्हती. ही बाब महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांकडून ते ह्या सामाईक प्रक्रिया सुविधांना नियतकालीक भेटी देत असतांनासुध्दा लक्षात आणून देण्यात आली नव्हती. परंतू असेही दिसून आले होते की, नवी मुंबई येथील सामाईक प्रक्रिया सुविधेकडून मोजमापे मुद्रीत करण्याची कार्यपध्दती अनुसरली जात होती.

शेवटच्या परिषदेमध्ये सदस्य सचिव यांनी असे म्हटले की (ऑगस्ट २००८) सर्व प्रादेशिक अधिकाऱ्यांना परिस्थितीचे सर्व्हेक्षण करुन त्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्याविषयी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

वैद्यकीय महाविद्यालयात उच्चदाब साधने व चिंधी यंत्रे उपलब्ध करुन घेणे.

१.९ आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने केंद्र शासन (के.शा.) तीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना प्रत्येकी उच्चदाब साधने व चिंधी यंत्रे ह्या सुविधा त्यांचेकडे नसल्यामुळे खरेदी करण्यासाठी किंवा निर्जंतुकीकरण यंत्र चालकांना प्रशिक्षण देण्यासाठी रु.१.४६ कोटी इतके केंद्रिय सहाय्य मुक्त केले होते (मे २००४). परंतू असे लक्षात आले होते की महाविद्यालयांनी सदरहू निधी वैयक्तिक लेखा खात्यामध्ये ठेवला होता. ही महाविद्यालये त्यांचा प्लास्टिकचा कचरा खाजगी व्यक्तिना विकत होती.

ह्या महाविद्यालयांनी त्यांच्या कचरा व्यवस्थापनांच्या कर्मचारी वर्गाला प्रशिक्षण देण्याकरीता रु.१२ लाख इतकी रक्कम खर्च केली होती. जी केंद्र शासनाने प्रसृत केलेल्या आदेशामध्ये निविष्ट नव्हती. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांनी लेखापरिक्षण निरिक्षणे स्विकारताना असे म्हटले की सदरहू यंत्रे शासकीय स्तरावर खरेदी समितीने ही यंत्रे मिळविण्याकरीता कोणती ही एजन्सी निवडली नसल्याने जून २००८ अखेर पर्यंत खरेदी करण्यात आली नव्हती. निधीचा वापर न केला गेल्यामुळे केंद्रिय निधी अडकून पडला होता. शिवाय प्रदूषित प्लास्टिक कचऱ्याची अयोग्य पध्दतीने विल्हेवाट लावल्याने

सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले होते. केंद्र शासनसुध्दा त्यांच्याकडून दिल्या गेलेल्या निधीचे संनियंत्रण करण्यात अपयशी ठरले होते.

रुग्णालयांकडून विल्हेवाट लावण्यात आलेल्या प्लॉस्टिक कचरा

१.१० शिरांअंतर्गत औषधी द्रव्याकरीता वापरलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या प्रथम उच्चदाब/सुक्ष्मदाब निर्जंतुकीकरण पध्दतीने निर्जंतुक करावयाच्या असतात. त्यानंतर, त्यांचे चिंधीकरण केल्यानंतरच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून मान्यता असलेल्या पुनर्निर्माण कर्त्याने पुनर्निर्माणाकरीता त्याचा वापर करावयाचा असतो. तरी सुध्दा असे दिसून आले होते की एकुण ३८ चाचणी परिक्षा झालेल्या रुग्णालयांपैकी १७ रुग्णालयांनी त्यांचा प्लास्टिक कचरा निर्जंतूकीकरणाशिवाय लिलाव पध्दतीने पुनर्निर्माणाकरीता खाजगी संस्थांना सुपूर्द केला व त्याची विल्हेवाट लावली. प्रादेशिक आणि उप-प्रादेशिक अधिकाऱ्यांनी (सप्टेंबर २००७ ते जून २००८) संबंधित रुग्णालयांना सूचना देण्याचे मान्य केले.

शेवटच्या परिषदेमध्ये सदस्य सचिवांनी असे म्हटले की (ऑगस्ट २००८) सर्व प्रादेशिक अधिकाऱ्यांना, आरोग्य सेवा व्यवस्थापनाने त्यांच्या प्लास्टिक कचरा सामाईक प्रक्रिया सुविधेकडे प्रक्रियेसाठी सुपूर्द करत आहेत आणि त्याच्या चिंध्या अधिकृत प्लास्टिक पुनर्निर्माण करणाऱ्यांना विकल्या जात आहेत ह्याची खात्री करुन घेण्याविषयी सूचना देण्यात येतील.

ज्ञापन:-

१.११ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

मंडळाने दिलेल्या आदेशानुसार सुपरब हायजेनिक डिस्पोजल चंद्रपूर या सामुहिक जैव वैद्यकीय केंद्राने ॲटोकेल्व बसविले असून, तो नियमाप्रमाणे चालविला जातो.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नमूद केलेल्या ९ जिल्ह्यातील सामुहिक जैव वैद्यकीय केंद्रामध्ये उपलब्ध असलेल्या उपकरणातील तापमान व दाब यांचे मोजमाप यंत्रणा उपलब्ध असून, ती नियमाप्रमाणे कार्यान्वित आहे.

ही बाब आरोग्य मंत्रालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्याशी निगडित आहे. सचिव, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, यांना मंडळाने २८/०८/२००८ रोजी जैव वैद्यकीय कचऱ्याची अंमलबजावणी करण्याबद्दल सूचित केले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ही बाब संबंधित रुग्णालयांच्या निदर्शनास आणली असून, त्यांना त्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना दिली आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने नमुद केलेल्या १७ रुग्णालयांत निर्माण होणारा प्लास्टिक वेस्ट सामुहिक जैव वैद्यकीय विल्हेवाट केंद्रात किंवा अधिकृत प्लास्टिक पुनर्वापर करणाऱ्यांना देण्याचे आदेश दिले असून, ते देत असल्याचे खातरजमा केली आहे.

"जैव वैद्यकीय कचऱ्याचे दफन पध्दतीने नष्टीकरण"

१.१२ जैव वैद्यकीय कचरा नियम, १९९८ च्या सूची १ नुसार शरीरसंबंधी व पशुकचऱ्याचे ५ लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नगरामध्ये किंवा खेड्यामध्ये भस्म किंवा दफन करायचे असते. सदर भूनियमाच्या पाचव्या अनुसूचीमध्ये दफन पध्दतीने मानके देण्यात आली आहेत. २ मीटर खोलीचा खड्डा किंवा खंदक खोदायचा असतो. खोल खणलेला खड्डा चिरेबंदी कामाने अभेद्य करायचा असतो जेणेकरुन प्रवाही पदार्थ जमिनीमध्ये मुरणार नाहीत. असे खड्डे जैव वैद्यकीय कचऱ्याने निम्म्याने भरायचे असतात. आणि नंतर पृष्ठभागाच्या ५० से.मी. आत चुन्याने भरुन उरलेला भाग मातीने भरुन टाकायचा असतो. खोल दफनाच्या छाननीत खालील बाबी लक्षात आल्या :

नियमांमध्ये खड्डे भरुन बंद केल्यानंतर त्या स्थितीमध्ये कचरा किती काळ ठेवावयाचा असतो आणि कुजलेल्या कचऱ्याची विल्हेवाट कोठे लावावयाची असते ह्याबाबतची तरतुद करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या प्राधिकारात उच्चदाब सुक्ष्म लहर निर्जंतुकीकरण आणि भस्मीकरण पध्दतीने जैव वैद्यकीय कचऱ्याच्या विल्हेवाटीबद्दलची मानके व कार्यपध्दती स्पष्ट केली होती तरी दफन केलेला कचरा कोणत्या पध्दतीने नष्ट करावयाचा ही बाब स्पष्ट करण्यात आली नाही.

संचालक, आरोग्य सेवा मुंबई यांनी असे म्हटले की खराब झालेला जैव वैद्यकीय कचरा दोन महिन्यांतर रुग्णांलयातील बाग बगिच्यांकरीता खत म्हणून वापरता येऊ शकतो

आणि उघडलेले खड्डे एक महिन्यानंतर पुनः वापरात आणणे शक्य असते. तथापि, ह्याकरिता संचालक नियम/कायद्यातील कोणतीही तरतूद उधृत करु शकले नाहीत.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या चमूबरोबर स्थळांस दिलेल्या सहभेटीदरम्यान असे दिसून आले की, गडहिंग्लज, कोल्हापूर येथे ५८ आरोग्य सेवा व्यवस्थापनांनी ज्यांच्याकडे समाईक खोल दफन प्रक्रिया सुविधा उपलब्ध होती आणि उप जिल्हा रुग्णालय, कामटी, जिल्हा सामान्य रुग्णालय, वर्धा व जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर ज्यांच्याकडे व्यक्तिगत प्रक्रिया सुविधा उपलब्ध होती त्यांनी खोल दफन खड्डे आवश्यक त्या चुन्याच्या स्तराशिवाय जैव वैद्यकीय कचऱ्याने पूर्ण भरले होते. लेखापरिक्षणासाठी निवडलेल्या कालावधीमध्ये महात्मा गांधी इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, सेवाग्राम, वर्धा येथे चिरेबंदी कामाशिवाय खणलेल्या ६० उघड्या कच्च्या खड्डयांपैकी ३० खड्डे जैव वैद्यकीय कच-याने काठोकाठ भरण्यात आले होते. खड्डयांचे बांधकाम कच्चे असल्यामुळे आणि त्यामध्ये अर्ध्या खोलीपर्यंत जैव वैद्यकीय कचरा भरुन वरिल बाजूस चुन्याचा थर न दिल्यामुळे तेथे पृष्ठभागावरील वाहते पाणी व भूजल दुषित होण्याचा धोका दिसून येत होता.

खोल दफन सुविधा फक्त नागरी भागात आणि शहरात ज्या ठिकाणी लोकसंख्या ५ लाखापेक्षा कमी होती तेथेच मान्य केलेली होती. तथापी, असे दिसून आले की गांधी मेमोरीयल रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद व छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर या संस्था त्यांच्याच परिसरात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या परवानगीशिवाय मानवी शरीर संबंधित कचरा दफन करीत होते. प्रादेशिक अधिकाऱ्याने ही वस्तूस्थिती मान्य केली (जून, २००८) आणि सदरहू रुग्णालयांना सूचना देण्याचे मान्य केले.

शासनाने प्रादेशिक अधिकाऱ्यांकडून सद्यस्थिती समजवून घेण्याचे मान्य केले. सहभेटीतून असेही लक्षात आले होते की सामान्य रुग्णालय, वर्धा येथे अधिकाऱ्यांनी काठोकाठ भरलेले खोल दफन खड्डे उघडून त्यातील जैव वैद्यकीय कचरा नगरपालिका/परिषदेच्या पालिका घनकचरा राशीपातन भूमीकडे स्थलांतरीत केले होते. याविषयासंबंधी सदस्य सचिवांकडून कोणतेही भाष्य करण्यात आलेले नाही.

शेवटच्या परिषदेमध्ये सदस्य सचिवांनी असे म्हटले की, (ऑगस्ट २००८) जैव वैद्यकीय कचरा खोल दफन खड्डयांचा पुनः वापर आणि उघडण्याविषयी नियमांमध्ये कोणती तरतूद

नाही. पुढे असेही म्हटले की, ह्या बाबीसाठी एक तज्ञ समिती नेमण्यात येईल आणि केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळास पाठविण्यात येईल.

ज्ञापन:-

१.१३ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी रुग्णालयांना भेटी देत असतांना संबंधित रुग्णालसास त्रुटी आढळल्यास त्यांना नियमांची अंमलबजावणी करण्याचे आदेश देतात किंवा त्यांना सामुहिक जैव वैद्यकीय केंद्राचे सभासदत्व घेण्याचे सूचित करतात. भू-भराव पध्दतीमध्ये गोळा केलेला जैव वैद्यकीय कचऱ्याचे खत म्हणून पुनर्वापर करण्याचा सल्ला देणे सद्य:स्थितीमध्ये योग्य नाही.

गडहिंग्लज येथील सामुहिक जैव वैद्यकीय विल्हेवाट केंद्रांची मंडळाने तपासणी केली असता, त्यात काही त्रुटी आढळल्यामुळे सुधारणा करुन घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सामान्य रुग्णालय, वर्धा व उप जिल्हा रुग्णालय, कामठी या रुग्णालयांमध्ये भू-भराव खड्डे पुरविले असून, त्यांच्या व्यवस्थापनांमध्ये सुधारणा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सामान्य रुग्णालय, चंद्रपूर यांनी सामुहिक जैव वैद्यकीय केंद्र चंद्रपूर यांचे सभासदत्व घेतले असल्यामुळे, तेथे जैव वैद्यकीय कचरा पाठविण्यात येत आहे.

महात्मा गांधी इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स सेवाग्राम, वर्धा यांनी भस्मीकरण यंत्रणा सुरु केली असून, भू-भराव पध्दत बंद केली आहे.

महात्मा गांधी मेमोरियल रुग्णालय व महाविद्यालय, औरंगाबाद यांनी सामुहिक जैव वैद्यकीय केंद्र, औरंगाबाद यांचे सभासदत्व घेतले असल्यामुळे, तेथे जैव वैद्यकीय कचरा पाठविण्यात येत आहे.

छत्रपती शाहू वैद्यकीय महाविद्यालय यांनी सामुहिक जैव वैद्यकीय केंद्र, कोल्हापूर यांचे सभासदत्व घेतले असल्यामुळे, तेथे जैव वैद्यकीय कचरा पाठविण्यात येत आहे.

सामान्य रुग्णालय, वर्धा यांनी पुर्नजिवित केलेल्या भू-भराव खड्डयांमध्ये असलेला जैव वैद्यकीय कचरा, वर्धा येथील नागरी घनकचरा डंपिग साईटमध्ये पाठविण्यात आला आहे. तसेच त्यांना नियमांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

क्षेत्रिय स्थळावर वैयक्तिक भू-भराव पध्दतीवर आधारित असलेल्या विल्हेवाट करणाऱ्या रुग्णालयाबाबत येणाऱ्या अडचणींचे मंत्रालयीन स्तरावर तसेच केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाला ही बाब लक्षात आणून दिली असून, त्यांना सदर लोकसंख्येची अट ५ लाखाहून १ लाखावर आणण्याचे सूचित करण्यात आले आहे. जेणे करुन जास्तीत-जास्त जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने केली जाईल.

"द्राव्य कचऱ्याची विल्हेवाट"

१.१४ जैव वैद्यकीय कचरा नियमांच्या अनुसूची V नुसार रुग्णालयातून निर्मित झालेले आणि वाहून जाणारे द्राव्य पदार्थ गंधक, घनकचरा, तेल आणि वंगण मिश्रण, जैव रासायनिक प्राणवायू आवश्यकता, रासायनिक प्राणवायु आवश्यकता आणि जैव-पारख परीक्षा या बाबतच्या ठरवून दिलेल्या मानकांशी जुळणारे असणे आवश्यक असते. ही मानके त्या रुग्णालयांस लागू होतात जी एक तर सार्वजनिक मलप्रणाल व्यवस्थेशी जोडलेली नाहीत किंवा अंतिम मलप्रणाल प्रक्रिया संयंत्राशी न जोडलेल्या सार्वजनिक मलप्रणाल व्यवस्थेशी जोडलेली आहेत.

अभिलेख्यांची छाननी आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कर्मचारी वर्गाबरोबर स्थळांना दिलेल्या भेटीतून (ऑक्टोबर २००७ ते जून २००८) असे उघडकीस आले की एकुण ३८ चाचणी झालेल्या रुग्णालयांपैकी ३१ रुग्णालयात निसृत होणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करण्यात टाकाऊ द्राव्य पदार्थावर प्रक्रिया करण्याकरीता बसविलेली नव्हती आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून टाकाऊ द्राव्य पदार्थाचे नमुने प्रयोगशाळेतील तपासणीसाठी आणि मर्यादाची खात्री करुन घेण्यासाठी घेतले जात नव्हते.

सदस्य सचिव यांनी असे म्हटले की (ऑगस्ट २००८) सुरुवातीला मोठ्या रुग्णालयातून निसृत द्राव्य कचऱ्याचे नमुने गोळा करण्यात येतील.

ज्ञापन:-

१.१५ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खूलासा केला.

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या प्रस्तावित मार्गदर्शक तत्त्वानुसार ज्या वैद्यकीय आस्थापनांच्या खाटांची संख्या १०० पेक्षा जास्त आहे अशा वैद्यकीय आस्थापनांमध्ये द्रव रुपन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी वाहक प्रक्रिया प्रकल्प (Effluent Treatment plant)

उभारण्याचे प्राधिकार पत्रात नमूद केलेले आहे. त्यानुसार काही मोठ्या रुग्णालयांनी सदर यंत्रणा बसविण्याचे काम हाती घेतले आहे.

नमुद केलेल्या ३८ रुग्णालयांपैकी ३१ रुग्णालयांनी वाहक प्रक्रिया यंत्रणा बसविली नसल्याचे आढळून आले आहे. मंडळाने प्रादेशिक अधिकाऱ्यांना त्यांची प्रत्यक्ष पाहाणी करुन, त्या रुग्णालयांना पाण्याचे नमुने तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले असून, सदर तपासणीचे काम चालू आहे.

मंडळाने असे ठरविले आहे की, सदर रुग्णालयांना ३ वर्षाकरिता प्राधिकारपत्र प्रदान केले असून, पुढील ३ वर्षात सर्व रुग्णालयांमध्ये वाहक प्रक्रिया यंत्रणा बसविण्यात येईल.

जैव वैद्यकीय कचऱ्याचे पालिका घन कचऱ्यामध्ये मिश्रण

१.१६ जैव वैद्यकीय कचरा नियमांच्या नियम ६ (१) मधील तरतुदीनुसार जैव वैद्यकीय कचरा इतर कचऱ्याशी एकत्र होऊ द्यावयाचा नसतो. तसेच जैव वैद्यकीय नियमांच्या अनुसूची १ नुसार भस्मीकृत राख आणि चिंधी कचरा ह्यांची विल्हेवाट पालिका भूभरावात करावयाची असते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अभिलेख्यांच्या छाननीतून असे दिसून आले की, सामाईक प्रक्रिया सुविधा प्रस्थापित करण्यामध्ये १० ते ५७ महिन्यांचा विलंब झाल्यामुळे २२ जिल्ह्यांतील एप्रिल २००३ ते सप्टेंबर २००७ या दरम्यान निर्माण झालेला ३,३८८ मे.ट. (परिशिष्ट ३.३) इतक्या (अंदाजित) जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात आली नव्हती आणि तो कचरा पालिका घन कचऱ्यामध्ये मिश्रित झाला होता. सामाईक प्रक्रिया सुविधा इतर १२ जिल्ह्यांमध्ये ही स्थापित करण्यात आल्या नव्हत्या. ह्या जिल्ह्यांमध्ये जैव वैद्यकीय कचरा पालिका घन कचऱ्यामध्ये मिश्रित झाल्याची माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास नव्हती (जुलै २००८). सामाईक प्रक्रिया सुविधाकरिता योग्य अशी जागा त्यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये पुरविण्याची जबाबदारी नागरी स्थानिक मंडळाकडे असते.

अभिलेख्यांच्या छाननीतून असे दाखवून दिले की, कोल्हापूर जिल्ह्यांतील चाचणी परिक्षा झालेल्या तीन रुग्णालयांपैकी ६६५ बिछान्यांची व्यवस्था असलेले छत्रपती प्रमिला राजे रुग्णालय, कोल्हापूर, धारदार साधने, सुया इ. कचरा, जरी सामाईक प्रक्रिया सुविधा जिल्हा मुख्यालयात होती तरी पालिका घन कचऱ्यामध्ये मिसळत होते. असेही लक्षात आले होते की, कोल्हापूर महापालिकेने घनकचरा, त्यामध्ये जैव वैद्यकीय कचरा मिसळला आहे हे कारण

दाखवून उचलण्यास नकार दिला होता. ही बाब कोल्हापूर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास कळविली नव्हती.

सन २००३-२००८ या दरम्यान मुंबई येथील देवनार येथील उघड्या राशीपालन जागेत ४५७५ मे.टन इतक्या वजनाचा जैव वैद्यकीय प्लास्टिक चिंधी कचरा, जरी हा कचरा पालिका भराव जमिनीमध्ये नष्ट करावयाचा होता तरी नागरी घनकचऱ्यासह नष्ट केला.

शेवटच्या परिषदेमध्ये सदस्य सचिवांनी असे म्हटले की (ऑगस्ट २००८) पालिका घन कचऱ्याच्या प्रक्रिया आणि भूभरावाकरीता योग्य अशी जागा पुरविण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगपालिकेची होती.

ज्ञापन:-

१.१७ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सामुहिक जैव वैद्यकीय केंद्रांना १५० कि.मी. त्रिजेच्या पसिरातून जैव वैद्यकीय कचरा गोळा करण्याची परवानगी आहे. त्यानुसार कार्यरत असलेले सामुहिक जैव वैद्यकीय प्रकल्प केंद्र नमूद केलेल्या लगतच्या १२ जिल्ह्यांमधून जैव वैद्यकीय कचरा गोळा करुन त्याची विल्हेवाट लावतात. सदर माहिती खालीलप्रमाणे :

महाराष्ट्र बायो हायजिनिक मॅनेजमेन्ट, चिपळूण हे सामुहिक जैव वैद्यकीय विल्हेवाट केंद्र, रत्नागिरी जिल्हा व सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या काही भागाला सेवा पुरविते.

सिंधुदूर्ग जिल्ह्यातील उर्वरित भागात श्री.गोविंद बायोमेडिकल वेस्ट कॉर्पोरेशन, कुडाळ हे सेवा पुरवितात.

धुळे व नंदूरबार जिल्ह्याला स्वामी समर्थ एंटरप्राइजेस हे सामुहिक केंद्र सेवा पुरवितात.

मे.ग्लोबल इको सेव्ह सिस्टम्स, अमरावती केंद्र अकोला, वाशिम, यवतमाळ व हिंगोली या जिल्ह्यांना सेवा पुरवितात.

मे.अतुल एनव्हायरमेन्टल सर्व्हिसेस, जालना ही केंद्रे परभणी जिल्ह्याला सेवा पुरवितात.

गडचिरोली जिल्ह्याला मे.क्रिस्तानंद रुग्णालयामार्फत सेवा पुरविली जाते.

तसेच वर्धा व भंडारा जिल्ह्याला मे.सुपर हायजिनिक डिस्पोझल, नागपूर हे केंद्र सेवा पुरविते.

सध्या महाराष्ट्रात एकूण ३३ सामुहिक जैव वैद्यकीय विल्हेवाट व प्रक्रिया केंद्रे कार्यान्वित असून, त्यापैकी २७ केंद्रे भस्मीकरण यंत्रणेवर आधारीत आहेत व उर्वरित ६ केंद्रे भू-भराव पध्दतीवर आधारीत आहेत, ज्या ठिकाणाची लोकसंख्या ५ लाखापेक्षा कमी आहे. मंडळाने नवीन सामुहिक जैव वैद्यकीय विल्हेवाट केंद्र उभारण्यासाठी ५ ठिकाणाचा शोध घेतला आहे व त्यांना २५% अर्थसहाय्य शासनाकडून तसेच २५% वने व पर्यावरण मंत्रालय, केंद्र सरकार यांच्याकडून देण्याचे प्रस्तावित आहे. वने व पर्यावरण मंत्रालय, यांनी त्यांच्या संकेत स्थळावर याबाबत इच्छुक संस्थांकडून **"एक्सप्रेसन ऑफ इंटरेस्ट"** मागविण्यात आल्या आहेत.

छत्रपती प्रमिला राजे रुग्णालय, कोल्हापूर हे जैव वैद्यकीय कचरा नियमात नमुद केलेल्या रंगीत पिशव्यांमध्ये वर्गीकरण करुन, मे.दास एन्टरप्राईजेस या सामुहिक जैव वैद्यकीय केंद्र, कोल्हापूर या केंद्राला विल्हेवाटीसाठी पाठवित आहेत. तसेच सदर रुग्णालय निर्माण होणारा जैव वैद्यकीय कचरा नागरी घनकचऱ्यामध्ये टाकीत नसून, सदर नियमांचे पालन करीत आहेत.

मुंबईतील नागरी घनकचऱ्याची विल्हेवाट देवनार व मुलूंड येथील डंपिंग ग्राऊंडमध्ये लावीत असून, सदर बाब क्षेपणभूमी नागरी घनकचरा २००० नियमास अनुसरून नाही. सध्या बृहन्मुंबई महानगरपालिका कांजुरमार्ग येथे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरिता क्षेपणभूमी उभारीत आहेत.

"प्रादेशिक अधिकाऱ्याकडून तपासणी"

१.१८ जैव वैद्यकीय कचरा नियमांच्या नियम ११ नुसार नियमांतर्गत आरोग्य सेवा व्यवस्थापनांकडून ठेवलेले अभिलेखे कोणत्याही वेळेस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून तपासणी व पडताळणीच्या अधीन असतात. परंतु महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आरोग्य सेवा व्यवस्थापने आणि सामाईक प्रक्रिया सुविधांची तपासणी करण्यासाठी कोणतीही प्रमाणके निश्चित केली नव्हती. अशा प्रमाणकांच्या अभावी लेखा परीक्षणास तपासणी करण्यातील कमतरता निश्चित करता येणे शक्य नव्हते. अपुरी मनुष्य शक्ती दृष्टीक्षेपात ठेवून आरोग्य सेवा

व्यवस्थापनांना द्यावयाच्या भेटींबद्दलच्या सातत्यातील एकसूत्रतेची शक्यता पडताळून पाहता येईल. राज्य सरकारला अधिक मनुष्यबळासाठी प्रस्ताव ही पाठविण्यात आलेला आहे.

ज्ञापन:-

१.१९ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १८/१०/२००८ रोजी वैद्यकीय आस्थापनांना व सामुहिक जैव वैद्यकीय विल्हेवाट केंद्रांना तपासणी करण्यासाठी वारंवारता तयार केली असून उपलब्ध असलेल्या मनुष्य बळानुसार वैद्यकीय आस्थापनांची तपासणी करण्यात येते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुख्यालयात जैव व वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाचे काम करण्यासाठी स्वतंत्र विभागाची स्थापना केली असून, त्यामध्ये उप-प्रादेशिक अधिकारी, क्षेत्र अधिकारी व कनिष्ठ वैज्ञानिक सहायक, यांचा समावेश आहे. राज्य शासनाने जैव वैद्यकीय विभागाच्या कामकाजासाठी ३१ पदे मंजूर केली असून, त्यापैकी मंडळाच्या आस्थापनेवर २४ क्षेत्र अधिकारी यांची पदे भरली असून, त्यांनी मंडळाच्या प्रादेशिक कार्यालयावर जैव व वैद्यकीय नियमांची अंमलबजावणी करण्याकरीता नियुक्ती करण्यात आली आहे.

"सल्लागार समिती"

१.२० राज्य शासनास व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास जैव वैद्यकीय कचरा नियमांच्या अंमलबजावणीबाबात सल्ला देण्यासाठी एक सल्लागार समिती नेमावयाची असते. शासन निर्णयानुसार (जानेवारी २००३) समितीची बैठक वर्षातून कमीत कमी दोनदा घेणे आवश्यक आहे. पहिल्या समितीची मुदत संपून (२२ जानेवारी २००५) दोन वर्षे झाल्यानंतर ३० डिसेंबर २००६ ला दुसरी समिती गठीत केली त्या समितीची सुध्दा जुलै २००८ अखेर बैठक झाली नव्हती. त्यामुळे या क्षेत्रातील तज्ञांकडून नियमांच्या अंमलबजावणी संबंधात योग्य तो सल्ला मिळण्याबाबत राज्य शासन वंचित राहिले.

ज्ञापन:-

१.२१ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला

राज्य शासनाने दिनांक ११/११/२०१० रोजी सल्लागार समितीची स्थापना केली असून त्याची मुदत २ वर्षांकरीता आहे.

साक्ष :

१.२२ लोकलेखा समितीने दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० रोजी महाराष्ट्रातील जैव वैद्यकिय कचऱ्याचे व्यवस्थापन या परिच्छेदासंदर्भात प्रधान सचिव पर्यावरण विभाग यांची साक्ष घेतली. सदरहू परिच्छेद जैव वैद्यकीय कचरा निर्माण करणारी व्यवस्थापने, राज्यातील आरोग्य सेवा व्यवस्थापनाने प्राप्त करुन घ्यावयाचे प्राधिकार, जैव वैद्यकीय कचऱ्याचा अंदाज व निर्मिती, जैव वैद्यकीय कचऱ्याचा संग्रह आणि वर्गीकरण इत्यादी मुद्दे पर्यावरणाशी संबंधित आहेत. त्यासंबंधी सविस्तर चर्चा करण्यासाठी हे सर्व परिच्छेद महालेखाकारांकडून तपासून घेणे आवश्यक आहे आणि त्यानंतरच विभागीय सचिवांनी समितीपुढे आले पाहिजे. असे मत व्यक्त करून समितीने पर्यावरण विभागाच्या कामकाजाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

१.२३ त्यांचे मत प्रदर्शित करतांना यासंदर्भात महालेखाकार यांनीही विभागीय सचिवांना विदित केले की, Department have to submit A.G. the updated information before coming to the Public Accounts Committee. What is the action Department have taken on the points raised by A.G. office ? What are the rectification Department have made after this audit para ? Department have to submit all these details to A.G. office then Department will come before the Public Accounts Committee.

१.२४ याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, Department have made inventory of 26,000 Health Care Units in the State of Maharashtra. But, in the meantime the numbers of Health Care Units rise to 41,000. Department have also done verification of these Health Care Units and verified that there is no duplication in the list. Department will submit you all these information immediately.

१.२५ पर्यावरण हा आज अत्यंत महत्वाचा विषय असूनही यावर पर्यावरण विभागाचे नियंत्रण नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. तसेच एखाद्या जिल्हापरिषद, नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये पर्यावरण विषयक योजना राबविण्याबाबत काही अटी/नियम विभागाने घातल्या आहेत काय ? अस्वच्छता आणि आरोग्याची काळजी न घेतल्यामुळे राज्यामध्ये संसंर्गजन्य रोगांचे प्रमाण फार वाढलेले आहे. याकरिता पर्यावरण विभागाकडून कडक नियम तयार करून बंधने घालणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या बजेटमधून

पर्यावरणाविषयक योजनांवर किती खर्च करावा हे सांगितले पाहिजे. जर त्यांचे पालन केले नाही तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी. पर्यावरण विभाग अशा काहीच उपाययोजना करताना दिसत नाही याचा परिणाम असा होतो की, ज्याला पाहिजे त्याप्रमाणे नियमांचे पालन होते. कोणी प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर करतात तर कुणी करीत नाहीत, कोणी घन कचऱ्याचे नियोजन करतात तर कोणी करीत नाहीत. कोणी नदी पाणी प्युरिफिकेशनचा प्लान करतात तर कुणी करीत नाहीत. तसेच किती जिल्हापरिषदा, नगरपालिका, महानगरपालिकांवर पर्यावरण विभागाने पर्यावरणाच्या दृष्टीने आवश्यक अशा योजना राबविण्याबाबत कोणती बंधने घातली आहेत याविषयीची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पर्यावरणविषयक योजनांचे पालन न करणाऱ्या १४ नगरपालिकांवर विभागाकडून प्रॉसेक्युशन सुरु आहे. तसेच, नगरपालिकांतील ४ चिफ ऑफिसरना कारावासाची शिक्षा करण्यात आली असून २२ लोकांचे प्रॉसिक्युशन सुरु आहे.

१.२६ नगरपालिकांकडून शासनाकडून प्राप्त होणारे अनुदानाचे पैसे काही वेळा अनावश्यक गोष्टींवर खर्च होण्याची शक्यता असते. अशा वेळेस विभागाकडून शासनातर्फे दिले जाणारे अनुदान थांबविण्याची कारवाई करावी असे मत समितीने व्यक्त केले असता पर्यावरण विभागाने ज्या नगरपालिका, जिल्हापरिषद किंवा महानगरपालिका सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणार नाहीत किंवा घनकचरा व्यवस्थापन करणार नाहीत त्यांना कोणत्याही योजनांसाठी निधी दिला जाऊ नये अशा सूचना सहा महिन्यापूर्वीच नगरविकास विभागास दिल्या असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.२७ याबाबत नगरविकास, आरोग्य व पर्यावरण या तिन्ही विभागांच्या को-ऑर्डिनेशनने काही ॲक्शन प्लान तयार केला जातो काय? अशी पृच्छा समितीने केली असता, यासंबंधात मा.महसूल मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयीन उप समिती नेमण्यात आली असून या समिती समोर पुढच्या आठवड्यात ॲक्शन प्लानचे सादरीकरण होणार असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

१.२८ अनेक महानगरपालिका सांडपाणी नद्यांमध्ये सोडून देतात तेच पाणी काही किलोमिटर अंतरावरील गावांतील लोक पिण्यासाठी वापरतात. याबाबत उदाहरण देताना समितीने सांगितले की, पुणे येथील मुळा, मुठा नद्यांच्या पाणी शुध्दीकरणाच्या योजना

महानगरपलिका करीत नाही आणि हेच अशुध्द पाणी गावोगावच्या पाणी पुरवठा योजनांसाठी वापरले जाते याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, नदी पाणी शुध्दीकरण योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील २० मोठ्या नद्या वर्गीकृत करण्यात आल्या असून त्यांच्या पाणी शुध्दीकरणाची कार्यवाही पर्यावरण विभागामार्फत सुरु आहे. या व्यतिरिक्त UIDSSMT, JNNURM, National River Conservation Programme यासारखे केंद्र शासनाचे जे अधिकृत प्रकल्प आहेत ते राज्यशासन महानगरपालिका व नगरपालिकांच्या मदतीने राबविते. नॅशनल प्लानमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबतीतील योजनेचा समावेश करण्याकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला जात असून त्याकरिता किती निधीची आवश्यकता आहे हे एकदा स्पष्ट झाल्यानंतर ते मंत्रालयीन उप समिती समोर सादर करुन त्यांच्या मान्यतेनंतर त्यासाठी निधी मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. सध्या नाशिक, त्र्यंबकेश्वर, नांदेड, कराड, सांगली, वाई, पंढरपूर, पैठण या ठिकाणी ही योजना कार्यान्वित करण्यात आली असून नागपूर व पुणे येथे अशाप्रकारचे प्रस्ताव विचाराधीन आहे.

१.२९ नाशिक येथे अशाप्रकारची योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. तथापि नाशिक व कळवण येथील रस्त्यांची परिस्थितीबाबत माहिती देण्याबाबत समितीने विभागीय सचिवांना सांगितले असता, सन २००३ मध्ये सिंहस्थ झाला त्यापूर्वी नाशिक येथे आवश्यक ती सर्व कार्यवाही पूर्ण केली गेली होती. आता येथे काही अधिक योजना करावयाची असेल तर नवीन आराखड्यात तिचा समावेश करता येईल असे विभागीय प्रतिनिधीनी समितीला विदित केले.

१.३० नाशिक येथील योजनांकरिता केंद्र शासनामार्फत निधी मिळतो. असे असताना प्रत्यक्षात सिंहस्थ आला की, त्या वर्षापुरते काम होते व नंतर परिस्थिती पुन्हा आहे तशीच राहते तसेच नागपूर, जळगाव, पुणे येथील महानगरपालिकांची किंवा इतरही नगरपालिकांची सध्याची स्थिती पाहता जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट, पाण्याचे शुध्दीकरण योजना, नद्यांमध्ये सांडपाणी सोडणे याबाबत योग्य ती कार्यवाही झाली तर ५० टक्के रोगराई कमी होईल. कारण मुख्यत्वे अशुध्द पाण्यातूनच रोगराईचा प्रसार होतो. हे रोखण्याकरिता विभागाने कोणते नियम, अटी त्या त्या नगरपालिकांवर घातल्या हे जितके महत्त्वाचे आहे. तितकेच त्या नगरपालिकांचे बजेट करताना विभागाकडून ज्या अटी घातल्या जातील त्या केवळ कागदोपत्री

राहता कामा नयेत तर त्यांचे पालनही संबंधित नगरपालिकांकडून होणे आवश्यक आहे. बजेटमधील काही हिस्सा त्या नगरपालिकांनी प्रामुख्याने पर्यावरणावर खर्च केला पाहिजे अशाप्रकारच्या अटी घालण्याची आवश्यकता आहे. मग त्यामध्ये कचऱ्याच्या निर्मुलनाच्या व इतरही काही योजना असतील. आज झपाट्याने वाढणारे शहरीकरण लोकांच्या जीवावर बेतणारे आहे. शहरी भागात निर्माण झालेली रोगराई ही आपल्याच चुकांमुळे कृत्रिमरित्या निर्माण झालेली आहे. त्यामुळे मग एखाद्या आजाराची साथ फैलावली की ती आटोक्यात आणण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च केले जातात. परंतु, तशाप्रकारच्या साथीचे आजार येऊच नयेत यासाठी काम करण्याची जबाबदारी पर्यावरण विभागाची आहे. पर्यावरण विभागाचे काम केवळ गाईड लाईन्स ठरविण्यापुरते नाही. तर जबाबदार असलेल्यांना जेलमध्ये टाकण्याची कार्यवाही झाली पाहिजे. स्पोर्टस् व इतर ॲक्टिव्हीटीजवर खर्च होतो. त्यापेक्षा त्या त्या नगरपालिकांच्या बजेटमधील २५ टक्के खर्च हा पर्यावरणाविषयक योजनांवर खर्च व्हायला पाहिजे. सध्याची पर्यावरण विभागाची भूमिका पाहता विभागाचा प्रशासनावर वचक नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. पर्यावरणविषयक गाईड लाईन्स न पाळणाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई करण्याचे समितीने सूचित केले.

१.३१ पर्यावरण विभागाच्या जबाबदाऱ्यांविषयी विश्लेषण करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, पर्यावरण विभाग हे फक्त धोरणात्मक नियम ठरविते. त्यांचे यशस्वी पालन करुन घेण्याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, नगरविकास विभाग, व आरोग्य विभाग यांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची असते. यावर पर्यावरण विभागाने या विभागांशी समन्वय साधून काम केले पाहिजे. एखाद्या रुग्णालयाची जर पाहणी केली तर रुग्णालयाच्या मागिल बाजूस जैविक कचरा टाकला जातो याबाबतीत प्रत्येक वॉर्डमध्ये जैविक कचऱ्यासाठी स्वतंत्र डबा ठेऊन त्यातच तो कचरा टाकून त्याची योग्यरितीने विल्हेवाट लावण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा प्रत्येक रुगणालयामध्ये असली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. त्यावर पर्यावरण विभाग पर्यावरणविषयक योजनांचे पालन न करणाऱ्या नगरपालिकांवर प्रॉसिक्युशनची कार्यवाही करत असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१.३२ पर्यावरणविषयक योजनांचे पालन करण्यासंदर्भात पर्यावरण विभागाने काही कायदे केले आहेत काय ? पर्यावरणाच्या योजनांबाबत नियमांचे उल्लंघन होऊ नये याकरिता

उपाययोजना करण्याबाबत विभागाकडून काही प्रयत्न केले जातात का अशी विचारणा समितीने केली असता, यासंबंधात केंद्र शासनाचा कायदा आहे. सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे वगैरे सारख्या योजना महागड्या असल्याने नगरपालिकांना निधीची समस्या निर्माण होत असल्याचे विभागाने सांगितले.

१.३३ जवाहरलाल नेहरु नागरी पुननिर्माण सारख्या योजनांसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळत असला तरी, त्यामध्ये राज्य शासनाचाही काही टक्के भाग असतो असे समितीने सांगितले. असता, बायोमेडीकेल वेस्टचे व्यवस्थापन वगैरे योजना आरोग्य विभागामार्फत राबविल्या जातात आणि घनकचरा व्यवस्थापनाबाबतच्या योजना या स्थानीक स्वराज्य संस्थामार्फत राबविल्या जातात. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या योजना राबविण्याचा अधिकार पर्यावरण विभागाला नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.३४ विभागाचा अहवाल स्थानिक स्वराज्य संस्थांकडून बाजूला का ठेवला जातो, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, त्यावर जोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून या कार्यक्रमांची अंमलबजावणी योग्य रितीने होत नाही तोपर्यंत त्यांना निधी मिळू नये अशा प्रकारच्या सूचना नगरविकास विभागास देण्यात आलेल्या आहेत.

१.३५ राज्य शासनाकडून या स्थानिक स्वराज्य संस्थांना विविध योजना राबविण्यासाठी जो निधी दिला जातो त्या निधीचे वाटप तर विभाग थांबवू शकते. प्रत्येक नगरपालिकेने त्यांच्या बजेटच्या ठराविक निधी पर्यावरणविषयक बाबींवर खर्च केला पाहिजे असे विभाग ऑन रेकॉर्ड सांगू शकते. त्याप्रमाणे जर निधी खर्च झाला नाही तर विभागाने त्यांना ना हरकत प्रमाणपत्र न देण्यासारख्या उपाययोजना विभागाने कराव्यात असे समितीने सूचित केले.

१.३६ केंद्रशासनाचे UIDSSMT, JNNURM, National River Conservation Programme सारखे जे प्रकल्प आहेत ते शहरांमध्ये घन कचरा व्यवस्थापन, स्वच्छता, शौचालय सुविधा इत्यादी नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी आखण्यात आले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. त्यावर या योजनांकरिता लागणाऱ्या निधीपैकी काही भाग हा केंद्र शासनाकडून मिळतो, काही भाग हा राज्य शासनाचा असतो तर काही हिस्सा स्थानिक स्वराज्य संस्थांचा असतो. अशावेळी राज्यशासनातर्फे दिला जाणारा हिस्सा तरी थांबविण्याची कार्यवाही पर्यावरण विभागाने केली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले.

१.३७ "राज्यातील आरोग्य सेवा व्यवस्थापनाने प्राप्त करुन घ्यावयाचे प्राधिकार" या परिच्छेदाबाबत विभागाने असा अभिप्राय दिलेला आहे की, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रणा मंडळाकडून नियमितपणे पाठपुरावा करण्यात आला असून सध्या जैव वैद्यकीय नियम, १९९८ च्या अनुषंगाने ९५ टक्के पूर्तता झालेली आहे. अशाप्रकारची पूर्तता खरोखरच झालेली आहे का? भुसावळ, जि.जळगाव येथील परिस्थिती पाहता अशाप्रकारची पूर्तता झालेली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे मग कशाच्या आधारावर ९५ टक्के पूर्तता झालेली आहे असे अभिप्राय विभागाने दिले आहेत अशी विचारणा समितीने केली असता "संपूर्ण राज्यात कचऱ्यावरील प्रक्रियेसाठी एकूण ३४ प्लांट उभारण्यात आले असून ५ प्लांट प्रस्तावित आहेत. भुसावळ येथे जरी अशाप्रकारे केंद्र नसले तरी, जळगाव येथे संपूर्ण जिल्ह्यासाठी सामुहिक जैव वैद्यकीय प्रक्रिया केंद्र आहे. ज्या ठिकाणी अशी सामुहिक जैव वैद्यकीय प्रक्रिया केंद्रे आहेत त्या केंद्रापासून १५० किलोमिटरच्या परिसराचा त्यामध्ये समावेश असतो. या परिसरातील गावांना वाहतुक करुन या केंद्रापर्यंत जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट करण्याकरिता जावे लागते" या सामुहिक जैव वैद्यकीय केंद्रावर देखरेख (Monitoring) असते त्याप्रमाणे या केंद्राकडून ते काम केले जाते. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.३८ विभागाच्या अधिकाऱ्यांनी महालेखाकार यांचेबरोबर बैठक घेऊन महालेखाकारांनी सांगितलेल्या नमुन्याप्रमाणे समितीला माहिती सादर करावी. समिती या माहितीचा सखोल अभ्यास करुन शासनाकडे त्यावर आधारित शिफारशी करेल. पर्यावरण विभागाच्या धोरणांची कार्यवाही प्रभावीपणे होत नाही त्यामुळे शासनाने असा कायदा केला पाहिजे की, जेणेकरुन या धोरणांच्या अंमलबजावणींवर पर्यावरण विभागाचा नियंत्रण राहील व त्यांना अधिक प्रभावीपणे काम करता येईल असे समितीने सूचित केले.

१.३९ समितीने राज्यातील आरोग्यविषयक तपासणीबाबत जसे हॉस्पिटल्सना अचानक भेट देण्याचे ठरविले आहे. त्याचप्रमाणे विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पांना देखील समितीने भेट द्यावी, विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रकल्पांची यादी समितीसमोर सादर करावी त्याप्रमाणे भेटीचा कार्यक्रम ठरविता येईल. तसेच बाबतीत काय निकष आहेत याची समितीला माहिती द्यावी असे समितीने सांगितले. त्यावर योजनांची यादी समितीच्या माहितीसाठी सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी दिले.

१.४० विटभट्टयांचा प्रश्न हा जरी महसूल विभागाशी संबंधित असला तरीही जेव्हा विटभट्टयांतून धूर निघतो तेव्हा ही बाब पर्यावरणविषयक ठरते. तेव्हा हा विषय केवळ महसूल विभागाशी संबंधित कसा आहे अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडे केवळ ४० लोकांचा कर्मचारी वर्ग असल्यामुळे यासंदर्भात जी देखरेख (Monitoring) करणारी यंत्रणा आहे ती सक्षम नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.४१ पर्यावरण विभागाकडे मर्यादित कर्मचारी वर्ग असेल तर तो वाढविला पाहिजे. १२ कोटींचे राज्य ४० कर्मचारी वर्ग असलेला विभाग कसे काय सांभाळणार ? आज जगभर ग्लोबल वॉर्मिंगबाबत, पर्यावरणाबाबत चर्चा होते. परंतू, ते राखण्याबाबत पर्यावरण विभागाकडेच ठोस उपाय नसल्याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच जो पर्यावरण विभाग जगाला वाचवणार आहे त्यांच्याकडेच त्याकरिता कोणत्या उपाययोजना नाहीत. यावरही समितीने खेद व्यक्त केला.

१.४२ पुण्यामध्ये साथीचे रोग सुरु आहेत. गेल्या वर्षी साथीच्या रोगामुळे ४२५ माणसे मृत्युमुखी पडली आणि यावर्षी ३०० माणसे मृत्युमुखी पडली आहेत. मुंबईमध्ये सुध्दा चार ते साडेचार हजार माणसे मृत्युमुखी पडली असून या सर्व गोष्टी पर्यावरणाशी निगडीत आहेत.सध्या हाडाच्या रोगाचे, कॅन्सरचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच मुंबई मध्ये मलेरियाचे प्रमाण देखील भयानक स्वरुपामध्ये वाढलेले आहे आणि त्यावर कोणीच कंट्रोल करु शकत नाही अशी स्थिती आहे.आता केवळ माणसे मरणे हा एवढाच पर्याय आहे. त्यामुळे याबाबतीत अधिक लक्ष देण्यात यावे असे समितीने विभागीय सचिवांना सूचित केले.

१.४३ दिनांक २६ ऑक्टोबर, २०१० रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीबाबत समितीचे समाधान न झाल्याने समितीने दिनांक २ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या बैठकीत सचिव, पर्यावरण विभाग यांची पुनः साक्ष घेतली. सदर बैठकीत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने राज्यातील आरोग्य सेवा व्यवस्थापनाचे सर्वेक्षण केले आहे काय, असल्यास केव्हा ? राज्यातील पशु वैद्यकीय संस्थांपैकी आतापर्यंत किती संस्थांनी जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम, १९९८ अंतर्गत असलेले प्राधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त करुन घेतले आहेत अशी विचारणा समितीने केली असता, राज्यात सर्व

आस्थापनांची तपासणी झाली असून यादी तयार झाली आहे. २००७-०८ मध्ये १७ हजार आस्थापना होत्या. आता ही संस्था ४६ हजार झाली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.४४ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नोंद नसलेल्या ३२५ वैद्यकीय आस्थापनांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे? याबाबत विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, या वैद्यकीय आस्थापनांना कारणे दाखवा नोटीस देण्यात येणार असून एकूण आस्थापना ४६ हजार आहेत. त्यापैकी ३६ हजार आस्थापनांनी कॉमन फॅसिलिटी जॉईन केली आहे. ३२५ आस्थापना शिल्लक राहिल्या होत्या. त्यांना कारणे दाखवा नोटीस ही देणार आहोत. क्लोजर नोटीस सुध्दा दिली गेली आहे.

१.४५ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ च्या अनुषंगाने २४ वैद्यकीय आस्थापनांवर १९९८ च्या कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे खटले दाखल केले त्याची सद्य:स्थिती बाबत व खटले दाखल करण्याच्या कार्यपध्दतीविषयी समितीने विचारणा केली असता, खटले दाखल केल्यानंतर सुनावणी घेतली जाते. एफआयआर दाखल केल्यानंतर न्यायिक प्रक्रिया सुरु होते. १९९३-९४ पासूनचे खटले अद्याप सुरु असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

१.४६ २४ वैद्यकीय आस्थापनांची यादी समितीला सादर केली जाणार होती. खटले केव्हा दाखल करण्यात आले. सन १९९३ चे खटले अद्याप सुरु आहेत. १७ वर्षे उलटूनही अद्याप काहीही प्रगती झाली नाही म्हणजे कार्यपध्दतीमध्ये काही दोष आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता हे खटले जेएमएफसी यांच्यापुढे चालविले जातात. त्यामुळे जेवढा वेळ लागायचा तेवढा लागतो. या २४ वैद्यकीय आस्थापनांवर २००९-१० मध्ये खटले दाखल केले आहेत तसेच या खटल्याबाबत २००९ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले आणि २००९-१० मध्येच खटले दाखल केले आहेत. ४५० आस्थापनांना नोटीस बजावली होती. एकूण २४ आस्थापनांवर खटले दाखल केले असून त्यापैकी २० आस्थापनांना क्लोजर नोटीस दिली असल्याचे विभागीय प्रतिनिधीनी समितीस सांगितले व सदरहू २४ आस्थापनांची यादी समितीस सादर केली. **(परिशिष्ट-)**

१.४७ वैद्यकीय आस्थापनांची नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत नोंदणी करताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते काय ? समितीच्या या प्रश्नावर

नर्सिंग होम ॲक्टमध्ये सुधारणा करुन त्यामध्ये ही अट अंतर्भूत करावी यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाला पत्र दिले असल्याचे सांगितले. नर्सिंग होम ॲक्ट मध्ये सुधारणा झाली नसली तरीही विभागाच्या कन्सेन्टमध्ये ही कण्डिशन मँडेटरी आहे. नर्सिंग होम ॲक्टमध्ये सुधारणा करुन त्यांनी ही अट अंतर्भूत करावयाची आहे. संचालक, आरोग्य सेवा यांनी नियमात बदल करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाला सादर केला असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्राधिकार पत्राशिवाय नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत रजिस्ट्रेशन द्यायचे नाही, अशी अटही पर्यावरण विभागाने घातलेली आहे. पर्यावरण (संरक्षण) कायद्यांतर्गत रजिस्ट्रेशन झाले असेल तर मंडळाकडून संमती देता येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१.४८ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सन २००४-२००५ या कालावधीपूर्वीची व विल्हेवाट लावलेल्या जैव वैद्यकीय कचऱ्याविषयीची माहिती का उपलब्ध होऊ शकली नाही अशी समितीने विचारणा केली असता यादी समितीला देण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला आश्वासित केले तसेच त्यावर ३४ कॉमन फॅसिलिटी असून ५ नवीन प्रस्तावित केल्या असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

१.४९ १२ जिल्ह्यांमध्ये सामुहिक जैव वैद्यकीय विल्हेवाट केंद्र उपलब्ध नाहीत त्याबाबतच्या कार्यवाही विषयी समितीने विचारले असता, या योजनेमध्ये केंद्र शासनाकडून २५ टक्के व राज्य शासनाकडून २५ टक्के सबसिडी दिली जाते. त्यामुळे केंद्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक असते. उस्मानाबाद, हिंगोली, बुलढाणा, वसई-विरार-मिरा-भाईंदर आणि यवतमाळ या पाच ठिकाणी केंद्र स्थापन करण्यासाठी एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट मागवित आहेत. ही कार्यवाही पूर्ण झाली तर कव्हर करण्यासाठी पाठपुरावा करु असा खुलासा विभागीय प्रतिनिधीनी केला.

१.५० गडहिंग्लज येथील सामुहिक जैव वैद्यकीय विल्हेवाट केंद्राची मंडळाने तपासणी केली असता ज्या त्रुटी आढळून आल्या होत्या, त्याबाबत करण्यात आलेली आणि केंद्राच्या उपाययोजना सद्य:स्थिती विषयी समितीने विचारणा केली असता, महालेखाकार यांनी समितीला विदित केले की,

१.५१ Three medical colleges had not utilized Central funds of Rs.1.46 crore meant for purchase of autoclave and shredders. However, it was noticed that the colleges were selling plastic waste to private parties. What is the reason for non-utilization of funds ?

१.५२ याबाबत विभागीय प्रतिनिधीनी खुलासा केला की, The B.J.Medical College, Mumbai, GMC, Mumbai and Government Medical College, Nagpur had not utilized this fund and they are disposing these waste in common facilities. This issue is related to Ministry of Health and the respective Government medical colleges. In this behalf, we had written a letter to Secretary, Medical Education and Research, Government of Maharashtra regarding compliance of BWM rules. We are also pursuing this matter with Director, Medical Education and Research who is disciplining authority for these Medical colleges. We had written last letter on 12.11.2010 and informed these Medical Colleges regarding non-utilization of fund released by Government of India.

१.५३ विभागीय प्रतिनिर्धीनी केलेल्या उपरोक्त खुलाशाच्या अनुषंगाने शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट कशी करण्यात येणार आहे ? अनेक मेडिकल कॉलेजची सिस्टीम वेगळी आहे. मंडळाचे नॉर्म्स काय आहेत ? याची सविस्तर माहिती समितीला देण्याबाबत समितीने सूचित केले.

१.५४ बी.जे.मेडिकल कॉलेजसारख्या मोठया रुगणालयांनी त्यांच्याकडील जैव वैद्यकीय कचरा योग्य ठिकाणी न टाकल्यास जनतेचे आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. खाजगी आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधी नियम काय आहेत याबाबतची माहिती देण्याबाबत समितीने सांगितले असता, विभागीय प्रतिनिधीनी खुलासा केला की, खाजगी आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी वेगवेगळे नियम नाहीत. केंद्र शासनाने कॉमन रुल्स तयार केले आहेत. म्हणून चार पध्दतीने इन्सीनरेबल वेस्ट जाळता येते, ते जाळायचे असते. व्हेजिटेबल वेस्ट डिस्पोजअप करताना पुनर्वापर करता येते याकरीता वेगवेगळे ठेवण्याची पध्दत वापरली जाते. ऑटोक्लेव्ह पध्दतीमध्ये चार वेगवेगळया रंगाच्या बॅगा वापरल्या जातात. पिवळया रंगाच्या बॅगमध्ये इन्सरेबल वेस्ट टाकला जातो. लाल रंगाच्या बॅगेतील डिस्पोजलचे ॲटो-क्ले केले जाते, निळया रंगाच्या पिशवीत

धारदार वस्तु, सुया आणि काळया रंगाच्या बॅगमध्ये औषधासाठी वापरले जाणारे नॉन बायो-मेडिकल वेस्ट गोळा करतात अशा प्रकारे चार पध्दतीने वर्गीकरण केले जाते.

१.५५ रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांना या संदर्भात प्रशिक्षण दिले आहे काय तसेच या चार रंगाच्या बॅगमध्ये ज्यांच्याकडून वेस्ट टाकले जाते त्यांना यादृष्टीने प्रशिक्षण दिले आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांपेक्षा बायो वेस्ट कलेक्शन करणाऱ्या ज्या एजन्सी आहेत त्यांची यात महत्वाची भूमिका आहे. नर्सेसकडून चार वेगवेगळया बॅगेमध्ये बायो वेस्ट टाकले जाते. कलेक्शन करणाऱ्या एजन्सी या चार वेगवेगळया बॅगा घेऊन जातात. मेडिकल विभागाकडून त्यांना प्रशिक्षण दिले जाते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

१.५६ कोणताही जैव कचरा कुठेही टाकता येत नाही. जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषाप्रमाणे वेगवेगळया बॅगांमध्ये तो साठवावा लागतो. त्यादृष्टीने संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

१.५७ गडहिंग्लज, वर्धा, चंद्रपूर इ.ठिकाणी मंडळाच्या अधिकाऱ्यांना ज्या त्रुटी आढळून आल्या त्याबाबत कार्यवाही झाली आहे काय अशी विचारणा समितीने केली असता स्थानिक पातळीवर ज्या ज्या त्रुटी आढळून आल्या होत्या, त्या सायिंटिफिक लेव्हलला आणण्यास सांगितले होते. त्या संदर्भातील निरीक्षण अहवाल आणि संमती अहवाल सादर केला आहे. गडहिंग्लज येथे कॉमन फॅसिलिटी आहे. ज्या ठिकाणी मंडळाने तपासणी केली होती तेथे त्रुटी आढळल्या होत्या, त्यामध्ये सुधारणा झाली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

१.५८ देवनार व मुलुंड येथील डंपिंग ग्राऊंडमध्ये मुंबईतील नागरी घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येत असून सदर क्षेपणभूमी नागरी घनकचरा नियम, २००० नुसार अनुसरुन नसल्याने याबाबत विभागाने कोणती कारवाई केली अशी विचारणा समितीने केली असता देवनार येथे असलेल्या जैविक कचऱ्याच्या बाजुलाच लागून असलेल्या डम्पिंग ग्राऊंड मधील घनकचरा जैविक कचऱ्यात मिसळणार नाही याची काळजी घेतलेली असून याबाबत मंडळाच्या चमूने प्रत्यक्ष जाऊन पाहणी केल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

१.५९ सल्लागार समिती उशिरा स्थापन करण्याची तसेच सदर समितीच्या बैठका वेळेत न होण्याची कारणे काय आहेत ? आतापर्यंत सल्लागार समितीने कोणते तांत्रिक मार्गदर्शन

केले आहे व त्यानुसार शासनाने कोणती उपाययोजना वा सुधारणा केली आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, राज्यस्तरावर नवीन समिती स्थापन करण्यात आली असून समितीमध्ये पुढील व्यक्तिचा समावेश आहे.

१) सचिव, पर्यावरण विभाग, अध्यक्ष

२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, सदस्य,

३) संचालक, अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प, बृहन्मुंबई महानगरपालिका, सदस्य

४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग, सदस्य

५) अतिरिक्त संचालक, पशुसंवर्धन विभाग, सदस्य

६) डॉ. संजीव शारंगपाणी, जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन समिती इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य, चिपळूण, सदस्य

७) डॉ. रोहिणी केळकर, विभाग प्रमुख, मायक्रोबायॉलॉजी, टाटा मेमोरीयल हॉस्पिटल, परेल, मुंबई-१२, सदस्य

८) प्रो.सीमा उन्नीकृष्णन, राष्ट्रीय औद्योगिक इंजिनियरिंग संस्था, मुंबई, सदस्य

९) प्रो. अनिल दीक्षित , पर्यावरण विज्ञान व अभियांत्रिकी केंद्र, आय.आय.टी.मुंबई, सदस्य

१०) डॉ. सुशीलकुमार चौधरी, वरिष्ठ प्राध्यापक, विज्ञान संस्था, मुंबई, सदस्य

११) श्री. जयंत जोशी, अध्यक्ष हार्मनी ट्रस्ट, पुणे, अशासकीय सदस्य आणि

१२) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सदस्य सचिव,

१.६० जैव व वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाचे काम करण्यासाठी फक्त मुख्यालयात स्वतंत्र विभागाची स्थापना केलेली आहे. जैव व वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात संपूर्ण राज्यभर कसे नियंत्रण करणार अशी पृच्छा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय कार्य एसआरओ आणि फिल्ड ऑफिसर्स् मार्फत मॉनिटरिंग केले जाते. मनुष्यबळ वाढविण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. यासंदर्भात वित्त विभागाने असा खुलासा केला की, वित्त विभागाच्या उच्चाधिकार समितीची बैठक झाली होती. अनेक शहरातील दूषित पाणी, सांडपाणी नदीमध्ये सोडले जाते, पुणे शहराचे संपूर्ण सांडपाणी नदीमध्ये सोडले जाते. शहराच्या पुढील गावांमध्ये या नद्यांच्या पाण्याचा वापर पिण्यासाठी केला जातो. त्यामुळे त्यांच्या

आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. याबाबतीत संबंधितावर खटले दाखल केलेले आहेत काय अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर प्रदूषणाच्या संदर्भात १४ महापालिकांवर खटले दाखल केलेले असून ४ अधिका-यांना तुरुंगवासाची शिक्षा देखील झालेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. यावर ज्या वैद्यकीय आस्थापनांमध्ये द्रव रुप कचरा निर्मिती होतो अशा आस्थापनांना निधी देत असताना त्यांनी दरवर्षी ईटीपी साठी १०/२० टक्के तरतूद करण्याचे बंधन त्यांच्यावर टाकणे जरुरी असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जेथे ईटीपीची जास्त गरज आहे अशा ठिकाणांची यादी केलेली आहे. ज्या शहरांमध्ये ईटीपी बंद आहेत अशा नगरपालिका, महानगरपालिका जोपर्यन्त बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर तयार करीत नाहीत तोपर्यन्त त्यांना फंडिग करु नये अशी सूचना नगरविकास विभागाला केलेली आहे. महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेण्ट कार्पोरेशनमार्फत पीपीपी मॉडेलद्वारे प्रकल्प सुरु करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. केन्द्र शासनाचा नॅशनल रिव्हर ॲक्शन प्लॅन आहे. त्यानुसार ४ प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. २/३ प्रस्ताव प्रगतीपथावर आहेत. याबाबतीत पर्यावरण विभाग पाठपुरावा करीत आहे. तसेच प्रोजेक्टमध्ये ७० टक्के शासनाचा आणि ३० टक्के नगरपालिकेचा हिस्सा असून नगरपालिका त्यांचा हिस्सा देण्यास तयार होत नसल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.६१ पर्यावरण विभागाचे बजेट किती आहे तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळास केंद्र शासनाकडून किती निधी प्राप्त होतो तसेच प्रदुषण नियंत्रण मंडळामध्ये एकूण किती कर्मचारी आहेत अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पर्यावरण विभागाचे ९० कोटीचे बजेट असून प्रदूषण नियंत्रण मंडळावर केंद्र शासनाकडून २२ कोटी रुपये मिळतात. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे एकूण ७०० स्टाफ आहे. अतिरिक्त पदांची मागणी केलेली आहे. आकृतिबंधाबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

अभिप्राय व शिफारशी

१.६२ जैव वैद्यकीय कचरा निर्माण करणारी व्यवस्थापने, राज्यातील आरोग्य सेवा व्यवस्थापनाने प्राप्त करुन घ्यावयाचे प्राधिकार, जैव वैद्यकीय कचऱ्याचा अंदाज व निर्मिती, जैव वैद्यकीय कचऱ्याचा संग्रह आणि वर्गीकरण इत्यादी मुद्दे पर्यावरणाशी संबंधित आहेत. जैव

वैद्यकिय कचऱ्याची योग्य व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट न लागल्यास नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. याबाबत नगरविकास, आरोग्य व पर्यावरण या तिन्ही विभागांच्या समन्वयाने ॲक्शन प्लान तयार करण्याचे काम पूर्ण झाले असल्यास व त्यानुसार केलेल्या कार्यवाही माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.६३ अनेक महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हापरिषदा सांडपाणी नद्यांमध्ये सोडून देतात. त्यामुळे नद्यांचे पाणी प्रदुषित होऊन हेच पाणी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पिण्यासाठी वापरले जाते. आता शासनाने नदी पाणी शुध्दीकरण योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील २० मोठ्या नद्या वर्गीकृत करण्यात आल्या असून त्यांच्या पाणी शुध्दीकरणाची कार्यवाही पर्यावरण विभागामार्फत सुरु आहे. केंद्र शासनाचे जे अधिकृत प्रकल्प आहेत ते राज्यशासन महानगरपालिका व नगरपालिकांच्या मदतीने राबविते. **सध्या नाशिक, त्र्यंबकेश्वर, नांदेड, कराड, सांगली, वाई, पंढरपूर, पैठण या ठिकाणी ही योजना कार्यान्वित करण्यात आली असून ती यशस्वीरित्या चालु आहे काय याची माहिती समितीला देण्यात यावी तसेच नागपूर व पुणे येथे अशाप्रकारच्या विचाराधीन असलेल्या योजना कधी पर्यंत कार्यान्वित करण्यात येणार आहे व ही योजना संपूर्ण राज्यात राबविण्याच्या दृष्टीने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

१.६४ जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट, पाण्याचे शुध्दीकरण योजना, नद्यांमध्ये सांडपाणी सोडणे याबाबत योग्य ती कार्यवाही झाली तर ५० टक्के रोगराई कमी होईल. कारण मुख्यत्वे अशुध्द पाण्यातूनच रोगांचा प्रादुर्भाव होतो. पर्यावरण विभाग हे धोरणात्मक निर्णय ठरविते. परंतु त्याची अंमलबजावणी व त्यांचे यशस्वी पालन करुन घेण्याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, नगरविकास विभाग व आरोग्य विभाग यांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची असते. पर्यावरण विभागाने या विभागांशी समन्वय साधून काम करावे. **सध्याची पर्यावरण विभागाची भूमिका पाहता विभागाचा प्रशासनावर वचक नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे पर्यावरणविषयक मार्गदर्शक तत्वे न पाळणाऱ्या महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामपंचायती यांवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी व संबंधित संस्थांवर खटले दाखल करण्यात यावे. यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

१.६५ पर्यावरणविषयक योजनांचे पालन करण्यासंदर्भात केंद्र शासनाचा कायदा आहे. सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे वगैरे सारख्या योजना खर्चिक असल्याने नगरपालिकांना निधी अभावी राबविणे शक्य होत नाही. जवाहरलाल नेहरु नागरी पुननिर्माणसारख्या योजनांसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळत असला तरी, त्यामध्ये राज्य शासनाचाही काही टक्के भाग असतो. बायोमेडीकेल वेस्टचे व्यवस्थापन वगैरे योजना आरोग्य विभागामार्फत राबविल्या जातात आणि घनकचरा व्यवस्थापनाबाबतच्या योजना या स्थानीक स्वराज्य संस्थामार्फत राबविल्या जातात. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या योजना राबविण्याचा अधिकार पर्यावरण विभागाला नाही. विभागाच्या पर्यावरणविषयक अहवालाची दखल स्थानिक स्वराज्य संस्थांकडून घेतली जात नाही. जोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून शासन योजनांची अंमलबजावणी योग्य रितीने होत नाही तोपर्यंत त्यांना निधी देण्याची कार्यवाही नगरविकास विभागाने करु नये. राज्य शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना विविध योजना राबविण्यासाठी जो निधी दिला जातो त्या निधीचे वाटप विभागाने थांबवावे. **स्थानिक स्वराज्य संस्था जोपर्यंत त्यांच्या बजेटचा ठराविक निधी पर्यावरणविषयक बाबींवर खर्च करत नाही तोपर्यंत त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येवू नये अशी समितीची शिफारस आहे.**

१.६६ पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी महालेखाकार यांचेबरोबर बैठक घेऊन महालेखाकारांनी सांगितलेल्या नमुन्याप्रमाणे समितीला माहिती सादर करणे आवश्यक होते. तथापि पर्यावरण विभागाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केलेली दिसून येत नाही. **पर्यावरण विषयक धोरणांची कार्यवाही प्रभावीपणे करण्यासाठी शासनाने निश्चित धोरण ठरविल्यास किंवा कायदा केल्यास त्याची अंमलबजावणी करताना पर्यावरण विभागाचे इतर विभागावर नियंत्रण राहिल त्यामुळे शासनाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच विभागाकडे अत्यंत तुटपुंजा कर्मचारी वर्ग आहे. ११ कोटीहून अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यातील जनतेचे आरोग्य निरोगी व सुदृढ राखणेकामी प्रदुषणविरहित पर्यावरण असणे आवश्यक आहे. पर्यावरणातील प्रदुषणाला आळा घालण्यासाठी विभागाकडे पुरेसा व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असण्याची अत्यंत आवश्यकता असून शासनाने पर्यावरण विभागातील प्रशिक्षित मनुष्यबळ संख्या वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

१.६७ आज जगभर ग्लोबल वॉर्मिंगबाबत, पर्यावरणाबाबत चर्चा होते. परंतु, ते राखण्याबाबत पर्यावरण विभागाकडेच ठोस उपाय नसल्याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. पर्यावरण विभागाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने प्रभावी उपाययोजना करु शकत नाही. तसेच जैव व वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाचे काम करण्यासाठी फक्त मुख्यालयात स्वतंत्र विभागाची स्थापना केलेली आहे. जैव व वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात संपूर्ण राज्यभर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय कार्य एसआरओ आणि फिल्ड ऑफिसर्स् मार्फत नियंत्रण केले जाते. **यासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. तरी पर्यावरण विभागात मनुष्यबळ वाढविण्याचा वित्त विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

१.६८ पुण्यामध्ये साथीच्या रोगाने सन २००९ मध्ये ४२५ माणसे मृत्युमुखी पडली आणि सन २०१० मध्ये ३०० माणसे मृत्युमुखी पडली आहेत. मुंबईमध्ये सुध्दा चार ते साडेचार हजार माणसे मृत्युमुखी पडली असून या सर्व गोष्टी पर्यावरणाशी निगडीत आहेत. सध्या हाडाच्या रोगाचे, कॅन्सरचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच मुंबई मध्ये मलेरियाचे प्रमाण देखील भयानक स्वरुपामध्ये वाढलेले आहे आणि त्यावर कोणाचेच नियंत्रण नाही. **मुंबई व पुणे शहरात तसेच यासारख्या राज्यातील अन्य मोठ्या शहरात प्रदुषणामुळे दिवसेंदिवस वाढणारे साथीचे रोग त्यामुळे पर्यावरणातील प्रदुषणात नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी पर्यावरण विभागाने तातडीने कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

१.६९ उस्मानाबाद, हिंगोली, बुलढाणा, वसई-विरार-मिरा-भाईंदर आणि यवतमाळ या पाच ठिकाणी जैव वैद्यकीय विल्हेवाट केंद्र स्थापन करण्यासाठी एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट मागवित आहेत. यासंदर्भात विभागाने केलेली कार्यवाही, या प्रकल्पांची सद्यस्थिती इ.बाबतची माहिती समितीस सादर करावी तसेच हे प्रकल्प त्वरेने पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा शासनाकडे करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

१.७० देवनार व मुलुंड (पूर्व) येथील डंपिंग ग्राऊंडमध्ये मुंबईतील नागरी घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येत असून सदर क्षेपणभूमी नागरी घनकचरा नियम, २००० नुसार अनुसरुन नसल्याने याबाबत विभागाने कारवाई करणे आवश्यक आहे. या दोन्ही डंपींग ग्राऊंड

यांची घनकचरा साठवून घ्यावयाची क्षमता ५-६ वर्षापूर्वीच संपुष्टात येवूनही या जागांवर घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येत आहे. **देवनार व मुलुंड (पुर्व) येथील रहिवाश्यांना या डंपींगचा होणारा त्रास विशेषत: रात्री अपरात्री कचरा जाळण्याचे वारंवार होत असलेले प्रकार यामुळे येथील रहिवाश्यांमध्ये श्वसनाच्या आजाराच्या वाढलेल्या तक्रारी विचारात घेता देवनार व मुलुंड (पुर्व) येथील क्षमता संपलेल्या डंपींग ग्राऊंडला पर्याय शोधण्याची आवश्यकता असल्याने शासनाने त्यासंदर्भात तातडीने उपाययोजना करावी अशी समितीची शासनास शिफारस आहे. तसेच देवनार येथे असलेल्या जैविक कचऱ्याच्या बाजुलाच लागून असलेल्या डम्पिंग ग्राऊंड मधील घनकचरा जैविक कचऱ्यात मिसळणार नाही याची काळजी घेतलेली असली तरी याबाबत मंडळाच्या समितीने प्रत्यक्ष जाऊन वेळोवेळी पाहणी केली नाही त्यामुळे त्यामध्ये पारदर्शकता दिसून येत नाही. त्यामुळे प्रदुषण मंडळाच्या सदस्यांनी जैविक व घन कचरा यांची विल्हेवाट लावण्यात येणाऱ्या ठिकाणी वेळोवेळी पाहणी करुन त्या-त्या भागातील प्रदुषणाबाबत आपला अहवाल शासनास सादर करावा अशी समितीची शिफारस आहे. शासनाने त्यासंदर्भात तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

१.७१ ज्या वैद्यकीय आस्थापनांमध्ये द्रव रुप कचरा निर्मिती होतो अशा आस्थापनांना निधी देत असताना त्यांनी दरवर्षी ईटीपी साठी १०/२० टक्के तरतूद करण्याचे बंधन त्यांच्यावर टाकण्यात यावे. जेथे ईटीपीची जास्त गरज आहे अशा ठिकाणी ते बसविण्यात यावे व ज्या शहरांमध्ये ईटीपी बंद आहेत अशा नगरपालिका, महानगरपालिका बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर नाहीत तोपर्यन्त त्यांना निधी देवू नये अशी कार्यवाही नगरविकास विभागाने करावी. **महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेण्ट कार्पोरेशनमार्फत पीपीपी मॉडेलद्वारे सुरु असलेला प्रकल्प केन्द्र शासनाचा नॅशनल रिव्हर ॲक्शन प्लॅन व त्यानुसार तयार केलेले ४ प्रस्ताव त्यापैकी २/३ प्रगतीप्रथावर असलेला प्रस्तावाबाबत पर्यावरण विभागाने पाठपुरावा करुन योग्य ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

नियोजन विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या नागरी अहवालातील **परिच्छेद क्र.३.२.६ "निधी व्यवस्थापन," ३.२.६.२ "योजनेंतर्गत अखर्चित शिल्लक रकमा," ३.२.६.३ "खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेच्या कामावरील टक्केवारी खर्च आकार," ३.२.७.१ "योजनेंतर्गत अमान्य कामे, " ३.२.७.२ "राज्य योजनेंतर्गत विशेष बाबींना मान्यता," व ३.२.९ "शासनाकडून केलेली कार्यवाही"** या संदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

निधी व्यवस्थापन

२.१ प्रत्येक खासदारकरीता खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना निधीमधील वाटपातील हिस्सा रु.२ कोटी (पूर्वीचा रु.१ कोटी) इतका १९९८-९९ पासून वाढविला होता. हा निधी थेट पध्दतीने केन्द्र शासनाकडून जिल्हाधिकाऱ्याकडे दिला जातो. तो निधी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडे सूपूर्द करतो. आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत राज्यामध्ये प्रत्येक मतदार संघाकरीता वाटप करण्यात येत असलेला निधी रु.८० लाखाहून रु.१ कोटी इतका वाढविला होता. (२००७-०८) ह्या योजनेच्या अंमलबजावणीकरीता लागणारा निधी योजना विभाग अंदाजपत्रक वाटपातर्फे जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणात ठेवला होता. जो नंतर कार्यान्वयन संस्थासाठी मुक्त केला गेला.

खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना

२.२ २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीमध्ये केंद्र शासनाकडून मिळालेल्या आणि खा.स्था.क्षे.वि.यो. च्या कार्यान्वयनावर खर्च झालेल्या निधीची वर्षवार स्थिती खालीलप्रमाणे होती.

(रुपये कोटीत)

वर्ष	सुरुवाती शिल्लक	केंद्र शासनाकडून मिळालेला निधी	जिल्हाधिकाऱ्या -कडे असलेला एकूण निधी	कार्यान्वयन संस्थाना दिलेला निधी	जिल्हाधिकाऱ्या -कडे शेवटची शिल्लक	खर्च
२००३-०४	३४.८०	१३२.५०	१६७.३०	१४१.९४	२५.३६	१३५.७६
२००४-०५	२५.३६	१३२.३८	१५७.७४	११९.६७	३८.०७	११५.२६
२००५-०६	३८.०७	१२५.०८	१६३.१५	११४.९२	४८.२३	१०५.०९
२००६-०७	४८.२३	९६.२१	१४४.४४	९३.५८	५०.८६	७६.२३

२००७-०८ (डिसेंबर २००७)	५०.८६	३५.००	८५.८६	२२.७३	६३.१३	१३.१७
एकूण		**५२१.१७**		**४९२.८४**		**४४५.५१**

सदर योजना सुरु झाल्यापासून जिल्हाधिकाऱ्यांकडे असलेल्या एकूण व्याजाच्या रकमेपेक्षा (रु.५५.८७ कोटी), रु. ११.१३ कोटी, कामे हाती घेतलेल्या संस्थांसाठी मुक्त केले होते ज्या पोटी रु. १०.८३ कोटी खर्च केले होते.

संपूर्ण राज्याकरीता म्हणून नियोजन विभागाने एकत्रित केलेल्या डिसेंबर २००७ च्या प्रत्येक खासदारनिहाय आणि मतदारसंघ निहाय प्रगति अहवालाची छाननी केली असता असे आढळून आले की, अखर्चित शिल्लक रु. १ कोटीपेक्षा जास्त होती आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून पुर्वीच्या वर्षाकरीता लेखापरीक्षा आणि उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यात अलेली नव्हती. तसेच रु. २०४.८३ कोटी इतका निधी केंद्र शासनाकडून २००३-०८ या कालावधीमध्ये परिशिष्ट ३.४ मध्ये दिलेल्या तपशीलानुसार मुक्त करण्यात आला नव्हता.

पुढील छाननीमध्ये असे आढळून आले की, ११ खासदारांचा (LS+RS) बाबतीत परिशिष्ट ३.५ मधील यादीनुसार २००३-०८ या कालावधीमध्ये त्यांचे नावे असलेल्या रु ८८ कोटी इतक्या रकमेपैकी फक्त रु. २८.८१ कोटी इतकीच रक्कम, मुख्यत्वे कामाच्या शिफारशी न झाल्यामुळे आणि कामे रद्द झाल्यामुळे, संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना मिळाली. खासदारांकडून कामाची शिफारस न झाल्यामुळे देय निधी मिळाला नव्हता त्याचा परिणाम म्हणून जनता योजनेच्या फायद्यापासून वंचित राहिली होती.

शेवटच्या परिच्छेदामध्ये, अतिरिक्त मुख्य सचिव यांनी म्हटले की, कामाची शिफारस हा खासदारांचा हक्क होता. शिवाय, एकाच वेळेस, शिफारशींचे एकत्रिकरण करण्याने सुध्दा अडचणी निर्माण झाल्या होत्या. पुढे, लेख्याचे लेखापरिक्षण करणे आणि लेखापरिक्षा प्रमाणपत्र पाठविणे ह्या नवीन बाबी नोव्हेंबर, २००५ पासून समाविष्ट करण्यात आल्या होत्या.

आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम

२.३ गेल्या पाच वर्षातील, आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमासाठी करण्यात आलेली अंदाजपत्रकीय तरतूद आणि त्यावर झालेला खर्च खाली दर्शविल्याप्रमाणे होता.

(रुपये कोटीत)

वर्ष	तरतूद	खर्च	जादा(+)शिल्लक(-)	टक्केवारी
२००३-०४	३०२.७०	२६३.९५	(-) ३८.७५	१२.८०
२००४-०५	३२९.४२	३१७.४०	(-) १२.०२	३.६५
२००५-०६	३०२.४२	३०६.०८	(+) ३.६६	१.२१
२००६-०७	२८७.०५	२८३.०९	(-) ३.९६	१.३८
२००७-०८	३७३.८०	३६९.९३	(-) ३.८७	१.०४
एकूण	**१५९५.३९**	**१५४०.४५**	**(-) ५४.९४**	**३.४४**

२००७-०८ विनियोजन लेख्याच्या तात्पुरत्या आकडेवारीनुसार

आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत शासनास फक्त एकूण निधी मुक्त केला गेल्याची माहिती होती, परंतु जिल्हावार दिल्या गेलेल्या निधीची, पूर्ण झालेल्या कामाची आणि सुरु न झालेल्या कामांची माहिती नव्हती.

महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मध्ये असलेल्या तरतूदी आणि वेळोवेळी राज्यशासनाकडून काढले गेलेले आदेश ह्यानुसार कोषागारातून वर्षाच्या शेवटी अंदाजपत्रकीय अनुदान व्यपगत होणे टाळण्यासाठी निधी काढणे संमत नव्हते. तथापि असे लक्षात आले होते की, नऊ चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांपैकी सात जिल्ह्यातील जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी २००३-०४ या कालावधीत आर्थिक वर्षाच्या शेवटी अनुदान व्यपगत होणे टाळण्यासाठी रु. २४.७१ कोटी इतकी रक्कम काढून ३७ अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना वाटली.

जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी उशिरा रकमा काढण्यासाठी, राज्य शासनाकडून उशिरा निधी मुक्त होणे (२००५-०६) आणि २००४-०५ या कालावधीमध्ये निवडणुका होत असल्यामुळे आचारसंहिता चालू असणे ही कारणे दिली होती.

शेवटच्या परिषदेमध्ये अतिरिक्त मुख्य सचिव यांनी असे निवेदन दिले की, ऑक्टोबर (२००८) पाच वर्षामध्ये वर्षाच्या शेवटी रु. २४.७१ कोटी इतकी रक्कम मुक्त होणे ही बाब एकूण त्या कालावधीमध्ये एकून मुक्त झालेल्या रकमेशी तुलना करता फारशी विशेष नव्हती. शासनाने, तथापि, जिल्ह्यांसाठी उशिरा निधी मुक्त करण्यासाठी कारणे दिली नव्हती.

दिलेले उत्तर स्विकारता येण्यासारखे नव्हते कारण राज्य स्तरावर एकूण काढलेल्या निधीची आर्थिक वर्षाच्या शेवटी सात चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांमध्ये मुक्त झालेल्या

निधीशी केलेली तुलना चुकीची होती. शिवाय वर चर्चा केल्यानुसार शासनाकडे ह्या जिल्ह्यांसाठी मुक्त केलेल्या निधीविषयी कोणतीही माहिती नव्हती.

ज्ञापन :-

२.३ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला.

मुंबई व उपनगर येथे सन २००५-०६ या आर्थिक वर्षात राज्य शासनाकडून उशिरा निधी मुक्त झाल्याने व २००७-०८ या कालावधीत निवडणूका होत्या. शिवाय आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २००३-०४ ते २००७-०८ अंतर्गत विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्यांकडून कामाचे प्रस्ताव फार उशिरा प्राप्त झाले. त्यामुळे अंदाजपत्रके मागवून प्रशासकीय मंजूरी मार्च महिन्यात देण्यात आलेली आहे म्हणून आर्थिक वर्षाच्या शेवटी निधी वितरित करावा लागला. सध्या सन २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीसाठी अनुज्ञेय असलेला सर्व निधी प्राप्त झाला आहे.

१) नाशिक व मालेगाव लोकसभा मतदार संघामध्ये केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीच्या अधिन राहून रु. २००.०० लाख रकमेची मा.खासदार महोदयांनी प्रस्तावित केलेली कामे मंजूर करण्यात आली असून मंजूर कामांवर निधी वितरित करण्यात आला आहे. मंजूर रकमेपेक्षा कमी रकमेत कामे पूर्ण झाल्यामुळे निधी शिल्लक असल्याचे दिसून येते. १४ व्या लोकसभेपर्यंत शिल्लक राहणारा निधी राज्य शासनास कळविण्यात आला आहे. सन १९९३-९४ पासून ते सन २००७-०८ पर्यंतचे सर्व वर्षनिहाय उपयोगिता प्रमाणपत्र व सनदी लेखापाल यांनी सादर केलेला लेखा परिक्षण अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे.

२) आर्थिक वर्षात प्रशासनाकडून प्राप्त होणारा निधी व कामाची भौतिक प्रगती लक्षात घेऊन या कार्यालयामार्फत निधी वितरित करण्यात आला आहे. आर्थिक वर्षात काही आमदारांनी शेवटच्या ३ महिन्यात (जानेवारी ते मार्च) उशिरा कामे प्रस्तावित केल्याने व कार्यान्वयीन यंत्रणाकडून उशिरा अंदाजपत्रक प्राप्त झाल्याने काही कामांना उशिरा प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती. सन २००४-०५ मध्ये निवडणूक आचार संहिता लागू असणे व शासनाकडून मार्च महिन्यात शेवटी निधी प्राप्त होणे या कारणांमुळे तसेच संबंधित नगर परिषद व महानगरपालिका अशा कार्यालयांसाठी जिल्हा कोषागारांचे आहरण व संवितरण अधिकारी नसल्याने तसेच संगणकाची रक्कम संबंधित पुरवठादारास अदा करण्यासाठी जिल्हा

नियोजन अधिकारी यांनी आर्थिक वर्षाच्या शेवटी जिल्हा कोषागारातून रक्कम काढून संबंधित अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना वाटली होती. सध्या सन २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीसाठी अनुज्ञेय असलेला सर्व निधी प्राप्त झाला आहे.

नागपूर जिल्ह्यात खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मा.खासदार महोदयांनी सूचविलेल्या कामांना या कार्यालयाकडून मान्यता प्रदान करण्यात येते. मा.खासदार महोदयांनी सूचविल्यानुसार व कार्यान्वयन यंत्रणांच्या मागणीनुसार या कार्यालयाकडून निधी वितरित करण्यात येतो. खासदार निधी वर्षनिहाय व्यपगत होत नसल्याने मा.खासदार काही वेळा वर्षनिहाय कामे प्रस्तावित न करता त्यांच्या कार्यकाळात कामे सूचवितात. त्यामुळे काही वेळा केंद्र शासनाकडून निधी वितरित केला जात नाही. केंद्र शासनाकडून निधी वितरित करण्याकरिता तीन अटी घालून दिलेल्या आहेत. लोकसभा सदस्यांकडून वर्षनिहाय कामे प्रस्तावित न केल्यामुळे सदर अटींची पूर्तता होत नाही. परिणामी, केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होऊ शकत नाही. लोकसभा सदस्यांना वर्षनिहाय कामे सूचविण्याबाबत या कार्यालयाकडून वारंवार कळविण्यात येते. सध्या सन २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीसाठी अनुज्ञेय असलेला निधीपैकी नागपूर मतदारसंघाचे रु. ५.०० कोटी वगळता उर्वरीत सर्व खासदारांचा निधी प्राप्त झाला आहे.

औरंगाबाद जिल्ह्यात राज्य शासनाकडून उशिरा निधी प्राप्त झाल्यामुळे तसेच विधानसभा व लोकसभा निवडणूकीच्या आचारसंहितेमुळे प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांवरील खर्च भागविण्यासाठी निधी संबंधित कार्यान्वयन यंत्रणांकडे हस्तांतरित करण्यास विलंब झाला होता.

धुळे जिल्ह्यात कामास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निधी वितरित करण्यात आला आहे. सध्या सन २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीसाठी अनुज्ञेय असलेला सर्व निधी प्राप्त झाला आहे.

नंदुरबार जिल्ह्यात आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत वर्षाअखेर निधी व्यपगत होणार नाही. याकरिता जसजशी कामे मंजूर होतील त्याप्रमाणात त्या त्या कामांवर निधी वितरित करण्यात येईल. मार्च अखेर म्हणजेच वर्षाच्या शेवटी निधी शिल्लक राहणार

नाही याची यापुढे दक्षता घेण्यात येत आहे. सध्या खासदार स्थानिक विकास कार्यक्रमाचा सन २००३-०४ या कालावधीसाठी अनुज्ञेय असलेला सर्व निधी प्राप्त झाला आहे.

अमरावती जिल्ह्यात सन २००३-०४ ते सन २००७-०८ पर्यंतचे लेखापरिक्षण व उपयोगिता प्रमाणपत्र खालील प्रमाणे केंद्रशासनास सादर करण्यात आली आहेत. अमरावती लोकसभा मतदारसंघाचा व राज्यसभा सदस्याचा सर्व अनुज्ञेय निधी प्राप्त झालेला आहे.

सन २००८-०९ चे लेखा परिक्षण अहवाल व सन २००९-१० चे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर करण्यात आले असून सन २००९-२०१० पर्यंतचा अमरावती लोकसभा मतदार संघाचा अनुज्ञेय निधी प्राप्त झालेला आहे.

आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत गेल्या पाच वर्षातील प्राप्त तरतूद व त्या अनुषंगाने झालेला खर्च खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	प्राप्त तरतूद	झालेला खर्च
१	२	३
२००३-०४	९१४.८५	९१४.७८
२००४-०५	९७२.१६	९६३.२
२००५-०६	९०२.०९	९०१.९४
२००६-०७	९५३.४२	८९१.६५
२००७-०८	१२३८.६५	१२३७.८५

१) वाशिम जिल्ह्यात खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत वाशिम जिल्ह्यासाठी सन २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीत केंद्र शासनाकडून सर्व अनुज्ञेय निधी मुक्त करण्यात आलेला असून प्राप्त निधीबाबतचे लेखा परिक्षा तसेच उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र शासनाकडे सादर करण्यात आलेली आहेत.

२) खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय निधीच्या मर्यादेत कामे सूचविण्याबाबत खासदार महोदयांना वेळोवेळी विनंती करण्यात आलेली आहे. त्यानुसार खासदार महोदयांनी त्यांच्या मतदारसंघात कामे सूचविलेली आहेत. त्यांच्या मतदार संघात कामे सूचविलेली आहेत. सुचविलेल्या कामांची छाननी करुन अनुज्ञेय कामांना विहित कालावधीत मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहेत.

३) ज्यावेळी निवडणूक आचारसंहिता लागू असते त्यावेळी कामे मंजूर करण्यासाठी विलंब लागू शकतो.

४) सद्य:स्थितीत कार्यान्वयीन यंत्रणांकडे तसेच या कार्यालयाकडे अखर्चित निधी निरंक आहे.

५) वाशिम लोकसभा मतदार संघातील जनतेसाठी खासदार स्थानिक क्षेत्र विकास या कार्यक्रमांतर्गतच्या निधी अंतर्गत कामे मंजूर करुन त्या कामाचा लाभ सर्व जनतेसाठी देण्यात येत आहे. तसेच यापुढे याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

संबंधित आमदारांनी शेवटी कामे सूचविल्यामुळे व निवडणूकीची आचार संहिता लागू होणार असल्याने वर्षाचे शेवटी कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरित करण्यात आला.

याच अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला आहे.

खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम -

२.४ या कार्यक्रमांतर्गत सन २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीत ९ जिल्ह्यांसाठी अनुज्ञेय असलेल्या व प्राप्त निधीची माहिती विवरणपत्र-१ मध्ये दिली असून त्यानुसार फक्त नागपूर मतदार संघाचे रु. ५.०० कोटी अप्राप्त आहेत. वेळेत कामांची शिफारस न झाल्यामुळे निधी खर्च करुन त्यांची उपयोगिता प्रमाणपत्रे व लेखाप्रमाणपत्रे केंद्रशासनास सादर न करता आल्यामुळे सदरचा निधी प्राप्त होऊ शकला नाही. मात्र आता शिफारशी प्राप्त झाल्या आहेत. निधी खर्च करण्याची कार्यवाही सुरु आहे.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रम -

२.५ या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामाची शिफारस करणे हा आमदारांचा स्वेच्छाधिकार आहे. त्यामुळे एका आर्थिक वर्षाच्या पूर्ण कालावधीत आमदार कधीही कामांची शिफारस करतात. त्यांच्याकडून कामाचे प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्याने आर्थिक वर्षाच्या शेवटी निधी वितरित करावा लागतो. सन २००६ पूर्वी विधान परिषद सदस्यांच्या निधीच्या वितरणासाठी त्यांचे प्रस्ताव शासनाकडे पर्यायाने नियोजन विभागाकडे प्राप्त होणे आवश्यक होते. त्यांचे प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्यास निधी वितरणास उशिर होऊ शकतो. तसेच सन २००४-०५ या वर्षी विधानसभा व लोकसभेच्या निवडणूकांची आचार संहिता असल्यामुळे निधी

वितरणास उशिर झाला असण्याची शक्यता आहे. नियोजन विभागाचे पत्र क्र.स्थाविका-२००५/प्र.क्र.२६३/का.१४४५, दि.१ ऑगस्ट २००५ अन्वये सर्व विधानमंडळ सदस्यांना विहित वेळेत प्रस्ताव सादर करण्याबाबत मा.मंत्री (नियोजन) यांच्या स्तरावरुन कळविण्यात आले होते.

आता राज्य शासनाचा सर्व योजनांतर्गतचा निधी बीम्स प्रणालीद्वारे वितरित करण्यात येत असून वित्त विभागाने ठरवून दिलेल्या कॅश फ्लोच्या संकल्पनेनुसार निधी वितरित केला जातो.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २००३-०४ ते २००७-०८ या कालावधीतील अर्थसंकल्पीत तरतूद व खर्च याची माहिती विवरणपत्र-१ मध्ये दिली आहे.

योजनेतंर्गत अखर्चित शिल्लक रकमा :-

२.६ खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पूर्ण झालेल्या कामाच्या खर्चातील शिल्लक राहिलेल्या रकमा कार्यान्वयन संस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे कामे पूर्ण झालेल्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आंत भरणा करणे आवश्यक होते. छाननीतून असे निष्पन्न झाले की, ४८ चाचणी परीक्षा झालेल्या कार्यान्वयन संस्थांपैकी दोन संस्थांनी (कार्यकारी अभियंता (का.अ.) विशेष प्रकल्प विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (सां.बां.विभाग), दर्यापूर, जिल्हा अमरावती आणि का.अ. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषदा (जिल्हा परिषद), नंदुरबार) हाती घेतलेली कामे जून २००६ मध्ये अगोदरच पूर्ण केली असताना सव्वीस आणि सात कामांच्या बाबतीत अनुक्रमे रु.७.१६ लाख आणि रु.१.९६ लाख या खर्च न झालेल्या शिल्लक रकमा मार्च २००८ अखेर जिल्हाधिकाऱ्यांकडे परत केल्या नव्हत्या.

कार्यकारी अभियंत्याने खर्च न झालेल्या शिल्लक रकम परत करण्याचे मान्य केले.

शेवटच्या परिषदेमध्ये, अतिरिक्त मुख्य संचिवांनी असे म्हटले की, (ऑगस्ट २००८) जिल्हा प्राधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या होत्या.

खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतूदींनुसार राज्याच्या पूर्वीच्या राज्यसभा सदस्यांकडून प्रमुख जिल्ह्यांमध्ये शिल्लक राहिलेला अखर्चित निधी त्यानंतर राज्यशासनाकडून राज्यसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांमध्ये वाटून टाकावयाचा होता. तथापि असे लक्षात आले होते की, नऊ चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांपैकी चार

जिल्ह्यांतील पुर्वीच्या १६ राज्यसभा सदस्यांचा रु. ६.०४ कोटी इतका अखर्चित शिल्लक निधी बँक खात्यामध्ये तीन ते पंधरा महिने इतक्या कालावधीकरीता पडून होता (जून २००८). हा निधी विद्यमान राज्यसभा सदस्यांमध्ये जुलै २००८ अखेरपर्यंत वाटप करण्यात आला नव्हता. वर नमूद केलेल्या चार जिल्ह्यांपैकी तीन जिल्ह्यांनी शिल्लक निधीची माहिती नियोजन विभागास दिली नव्हती. पुणे प्रकरणी सुध्दा जेथे तीन राज्यसभा सदस्यांच्या (रु. ८०.३८ लाख) शिल्लक निधीबाबत माहिती कळवूनही (जून २००७) नियोजन विभागाने निधीच्या पुनर्वाटपाची कार्यवाही केली नव्हती.

जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी असे निवेदन दिले की, बँक बचत खात्यातील शेवटची शिल्लक हिशोबीत केल्यानंतर अखर्चित शिल्लक निधीबाबत नियोजन विभागास कळविण्याची आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. दिलेली ही उत्तरे पटण्यासारखी नव्हती कारण ह्या निधीबाबतची माहिती न दिल्यामुळे सदरहू निधी बँक खात्यामध्ये तीन ते पंधरा महिने इतक्या कालावधीकरीता तसाचा रिकामा पडून होता.

शेवटच्या परिषदेमध्ये अतिरिक्त मुख्य सचिव यांनी असे म्हटले की, (ऑगस्ट २००८) संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निवृत्त राज्यसभा सदस्यांचे लेखे बंद करुन त्यातील रकमा बदली करण्याविषयी सूचना देण्यात आल्या होत्या.

ज्ञापन :-

२.७ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला.

मुंबई व उपनगर जिल्ह्याच्या बाबतीत मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून अखर्चित निधी वितरणाचे सुधारित आदेश अपेक्षित असून ते प्राप्त होताच याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

पुणे जिल्ह्याबाबत नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून प्राप्त सूचनेप्रमाणे सदरचा निधी विद्यमान सदस्यांमध्ये वाटण्यात आलेला आहे.

नंदुरबार जिल्ह्यात कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जि.नंदुरबार यांनी अद्यापपर्यंत रु.१.९६ लक्ष निधी या कार्यालयाकडे जमा केलेला नाही. सदर निधी तात्काळ जमा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

अमरावती जिल्ह्यात खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प विभाग (सार्वजनिक बांधकाम विभाग), दर्यापूर यांचेकडील पूर्ण झालेल्या कामांवरील बचतीच्या पूर्ण रकमा परत घेण्यात आल्या आहेत. राज्यसभा सदस्यांचे संदर्भात लेखे पूर्ण करुन कार्यकाळ पूर्ण झालेल्या राज्यसभा सदस्यांचा अखर्चित निधी संबंधित नोडल जिल्ह्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम -

२.८ निवृत्त राज्यसभा सदस्यांचा अखर्चित निधी या विभागाचे पत्र क्र.खाविनि-२००६/प्र.क्र.७/का.१४४६, दिनांक २ जानेवारी, २००७ अन्वये तसेच नियोजन विभाग पत्र क्र. खाविनि-२००९/प्र.क्र.१४/का.१४८२, दिनांक ७ नोव्हेंबर, २००९ अन्वये विद्यमान राज्यसभा सदस्यांना वाटप करण्यात आला आहे. तसेच सन २००९-१० मध्ये निवृत्त झालेल्या राज्यसभा सदस्यांच्या अखर्चित निधीची माहिती सर्व संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून मागविण्यात येत असून ही माहिती प्राप्त झाल्यानंतर या अखर्चित निधीचे विद्यमान राज्यसभा सदस्यांना वाटप करण्यात येईल.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत

२.९ यंत्रणांच्या खात्यावर अखर्चित राहिलेल्या सन २००३-०४ ते २००९-१० या आर्थिक वर्षातील जिल्हाधिकारी यांनी समर्पित केलेल्या व व्यपगत झालेल्या रकमा शासनाने त्या पुढील आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करुन उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(रु.कोटीत)

अ.क्र.	निधी समर्पित झालेले आर्थिक वर्ष	उपलब्ध करुन दिलेला निधी
१	२००३-०४	१०.४
२	२००४-०५	१२.३९
३	२००५-०६	११.७७
४	२००६-०७	९.४८
५	२००७-०८	१.२३
६	२००८-०९	२१.४३
७	२००९-२०१०	५५.०४

खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेच्या कामावरील टक्केवारी खर्च आकार -

२.१० खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हाधिकारी आणि कार्यान्वयन संस्थांनी, खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनांतर्गत प्रकल्प/कामासाठी त्यांनी दिलेल्या पुर्वतयारीची कामे, कार्यान्वयन व पर्यवेक्षण यासारख्या सेवांच्या मोबदल्यात प्रशासकीय आकार, टक्केवारी खर्च आकार, पगार, प्रवास खर्च इ. लादावयाचे नव्हते. तथापि छाननीतून असे निष्पन्न झाले होती की, ४८ चाचणी परीक्षा झालेल्या कार्यान्वयन संस्थांपैकी सात संस्थांनी मार्गदर्शक सूचनांच्या विरोधात २००३-०४ ते २००६-०७ या कालावधीत मंजूर झालेल्या (१२५ पैकी) १०७ खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना कामांच्या बाबतीत रु. १७.०८ लाख इतक्या रकमेचा आकस्मिक/टक्केवारी खर्च आकार लादला होता. ह्याप्रमाणे, योजना निधींवर अतिरिक्त भार पडत होता.

शेवटच्या परिषदेमध्ये अतिरिक्त मुख्य सचिव यांनी असे म्हटले की, (ऑगस्ट २००८) खासदार स्थानिक क्षेत्र विकास कामांच्या संबंधातील टक्केवारी खर्च आकार लादण्याविषयीची बाब केंद्र शासनाकडे नेण्यात आली होती ज्याचे उत्तर प्रलंबित होते.

ज्ञापन :-

२.११ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला.

नंदुरबार जिल्ह्याकरीता आकस्मिक खर्चासाठी ०.५० टक्के काढलेली रक्कम ही आकस्मिक खर्चासाठीच वापरण्यात येते ती रक्कम पगार, प्रवास खर्च इ.कारणासाठी वापर करण्यात येत नाही. खासदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत शासकीय विश्रामगृहाच्या आवारातील रु. १६.८६ लक्ष च्या बांधकामासाठी एक सभागृह, एक अतिमहत्वाच्या व्यक्तीसाठी सभागृहासह दालन, शयन कक्ष, बैठकीचा कक्ष आणि प्रतिक्षा दालन समाविष्ट असून यास प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे.

अमरावती जिल्ह्यात खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत कामांना प्रशासकीय मंजूरी देताना अंदाजपत्रकात आकारलेल्या आकस्मिक निधी/टक्केवारी खर्च अनुज्ञेय करण्यात येत नाही. वाशिम जिल्ह्यात खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत आकस्मिक निधी अनुज्ञेय नसल्यामुळे कामे मंजूर करताना त्यामध्ये आकस्मिक निधीचा समावेश करण्यात येत नाही.

२.१२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत कार्यान्वयन संस्थांनी केलेल्या कामांसाठी त्यांनी दिलेल्या पूर्वतयारीची कामे कार्यान्वयन व पर्यवेक्षण यासारख्या सेवांच्या मोबदल्यात प्रशासकीय आकार, टक्केवारी खर्च आकार, पगार, प्रवासखर्च इत्यादी सर्व अभिकरण शुल्क (सेंटेज चार्जेस) राज्यातील इतर योजनांप्रमाणेच आकारण्यात येत असून सदरचे अभिकरण शुल्क रद्द करता येणार नसल्याबाबत शासनाच्या स्तरावर निर्णय घेण्यात आला आहे. सदरचा निर्णय वेळोवेळी केंद्र शासनाला कळविण्यात आला आहे. या प्रकरणी अद्यापि केंद्र शासनाकडून सुस्पष्ट निदेश आलेले नाहीत.

योजनेअंतर्गत अमान्य कामे :-

२.१३ छाननीतून असे आढळले की, नऊ चाचणी परीक्षा झालेल्या जिल्हाधिकाऱ्यांपैकी सहा जिल्हाधिकाऱ्यांनी योजनेअंतर्गत २००३-०८ या कालावधीत रस्त्यांची दुरुस्ती आणि देखभाल संगीत व्यवस्था बसवणे, अति महत्वाच्या व्यक्तिसाठी खोल्या बांधणे, कार्यालयीन इमारती बांधणे, अधिकाऱ्यांचे क्लब बांधणे, इ.मान्य नसलेल्या कामांना मंजूरी दिली होती. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

जिल्हा	अमान्य कामाचा तपशील	विभागाचे उत्तर आणि त्यावरील अभिप्राय
(१)	(२)	(३)
अमरावती आणि ठाणे	खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेंतर्गत दुरुस्ती आणि देखभालीची कामे मान्य नव्हती. तरी सुध्दा असे लक्षात आले होते की, रु. ४२.६५ लाखाच्या १३ अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या (अमरावती) आणि रु.३२.१७ लाखाच्या ७ अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या (ठाणे) डांबरीकरण कामास जिल्हाधिकाऱ्यांकडून मान्यता देण्यात आली होती.	जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी असे म्हटले की, (फेब्रुवारी आणि मार्च २००८) डब्ल्यु.बी.एम. रस्ते अस्फाल्ट रस्त्यांत रुपांतरीत केले होते आणि म्हणून त्या कामांची गणना दुरुस्तीची कामे म्हणून करणे शक्य नव्हते. दिलेली उत्तरे योग्य वाटत नव्हती कारण कामाच्या खर्चाच्या अंदाजात असे म्हटले होते की, डांबरी रस्त्यावर अस्फाल्टचे काम करण्यात येईल. त्यामुळे अशी कामे नवीन कामे नव्हती.
	आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत	जिल्हा नियोजन अधिकाऱ्याने असे

	मान्य असलेल्या कामांच्या यादीत जॉगींग पार्क मध्ये संगीत व्यवस्था स्थापित करणे हे काम समाविष्ट नव्हते. ठाण्यातील बारा बंगला भागातील जॉगिंग पार्क मध्ये रु. १० लाख खर्चाची संगीत व्यवस्था बसविण्याचे काम मंजूर करण्यात आले होते आणि नोव्हेंबर २००६ मध्ये पूर्ण करण्यात आले होते.	निवेदन दिले की, (फेब्रुवारी २००८) जॉगिंग पार्क मध्ये संगीत व्यवस्था करणे हा सौंदर्यीकरणाचा एक भाग होता म्हणून ते काम मंजूर करण्यात आले होते. दिलेले हे उत्तर बरोबर नव्हते कारण संगीत व्यवस्था स्थापित करणे हा सौंदर्यीकरणाचा भाग होऊ शकत नाही आणि म्हणून ती बाब मार्गदर्शक सूचनांनुसार नव्हती.
नंदुरबार	खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत शासकीय विश्राम गृहाच्या आवारातील रु. १६.८६ लाख किंमतीच्या एका सामाजिक सभागृहाच्या बांधकामास मंजूरी देण्यात आली होती (मार्च २००८). अभिलेख्यांची छाननी आणि स्थळ भेट (जून २००८) यातून असे आढळले की केलेल्या बांधकामात एक सभागृह, एक अति महत्वाच्या व्यक्तिसाठी सभागृहासह दालन, निजण्याची खोली, बैठकीची खोली आणि प्रतिक्षा दालन ह्या बाबींचा समावेश होता. त्या ठिकाणी सामाजिक सभागृह नव्हते. म्हणून ते अनियमित होते.	जिल्हा नियोजन अधिकाऱ्याने असे म्हटले की, (जून २००८) कार्यान्वयन संस्थेचे अभिप्राय मागविण्यात येतील. दिलेले उत्तर समर्थनीय नव्हते. कारण अंदाजित खर्च तयार केल्यानंतर ज्यामध्ये सर्व तपशील होता, त्यास मंजूरी देण्यात आली होती.
	डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, सांगरखेडा, तालुका शहादा येथील रु. ५.३८ लाख इतक्या खर्चाच्या सिमेंट रस्ता व सुरक्षा भिंत ह्या बांधकामास मार्च २००७ मध्ये मंजूरी दिली होती. आराखडा, कामाचा अंदाजित खर्च ह्यांची छाननी आणि स्थळ भेट यातून असे उघडकीस आले की जे बांधकाम केले गेले होते ते पुतळ्याच्या चौथऱ्यासह पुतळ्यास आधार देण्यासाठी होते आणि सभोवतालच्या जागेच्या विकासासाठी होते जे प्रशासकीय मंजूरी प्रमाणे नव्हते.	
वाशिम	२००२-०३ आणि २००५-०६ या कालावधीत रु. ३२.२२ लाख किंमतीचे अधिकाऱ्यांच्या क्लबचे बांधकाम चार भागात विभागणी करुन मंजूर करण्यात आले होते. ही कामे दोन लोकसभा सदस्य, एक विधानसभा सदस्य आणि एक विधान परिषद सदस्य ह्यांनी शिफारस केलेली होती. हा क्लब फक्त अधिकाऱ्यांकडून वापरला जात होता आणि जो जनतेसाठी खुला नव्हता. म्हणून हे	जिल्हा नियोजन अधिकाऱ्याने असे म्हटले की, (जून २००८) सदर क्लब अधिकारी आणि सदस्यांकरीता होता हे उत्तर मान्य नव्हते कारण हा क्लब जनतेसाठी खुला नव्हता. आणि म्हणून योजनेच्या आवाक्याबाहेर होता. जिल्हाधिकाऱ्यांनी खासदारांच्या /वि.स.स.यांनी शिफारस केलेली ही कामे नाकारावयास हवी

	बांधकाम दोन्ही योजनांच्या आवाक्यात येत नव्हते. मांडवा तालुका-करंजा, जिल्हा वाशिम येथील खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत रु. १० लाख किंमतीचे एका सार्वजनिक बागेचे बांधकाम मंजूर केले गेले होते (डिसेंबर २००६). ज्यावर प्रशासकीय मंजूरी मिळाली होती त्या अंदाजित खर्चाची छाननी केली असता असे लक्षात आले की, ह्या मध्येच रु.७ लाख किंमतीचे बागेतील घराचे बांधकाम समाविष्ट होते जे खासदारांनी शिफारस केले नव्हते.	होती. जिल्हा नियोजन अधिकाऱ्याने असे म्हटले होते की (जून २००८) सुधारीत शिफारस मिळविण्यात येईल. दिलेले उत्तर मान्य नव्हते कारण हे काम खासदारांच्या शिफारशीनुसार नव्हते.
नागपूर	नागपूर येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाच्या परिसरात एका सामाजिक सभागृहाच्या बांधकामाचे काम चार खासदारांच्या शिफारशीने चार भागात विभागून सप्टेंबर २००० आणि मार्च २००३ या कालावधीत मंजूर केले होते. सदर कामा रु. ३४.५३ लाख खर्च करुन पूर्ण करण्यात आले होते. अमान्य कामाच्या यादीनुसार केंद्रशासन आणि राज्यशासनासंबंधित असलेल्या इमारतींच्या बांधकामांना मान्यता नव्हती.	जिल्हा नियोजन अधिकारी यांनी असे म्हटले की, (एप्रिल २००८) योग्य त्या अवधित लेखापरीक्षा निरीक्षणाचा बारीक अहवाल सादर करण्यात येईल.
मुंबई उपनगर	राज्य योजनेअंतर्गत रु. १० लाख आणि त्यावरील किंमतीचे कामांची विभागणी करुन हाती द्यावयाची नव्हती. बझार रोड, बांद्रा (प) येथील रु. ५२ लाख अंदाजित किंमत असलेले शाळाच्या खोल्यांचे बांधकाम मान्यता नसलेले म्हणून नाकारण्याऐवजी विधानसभा सदस्यांच्या शिफारशीनुसार २००३-०४ आणि २००५-०६ या कालावधीत १० भागांमध्ये विभागून हाती घेण्यात आले होते.	जिल्हा नियोजन अधिकाऱ्याने असे म्हटले की लोकांच्या प्रतिनिधीने शिफारस कलेली कामे ही स्वतंत्र होती आणि म्हणून ती पात्र होती आणि म्हणून ती मंजूर केली होती. दिलेले उत्तर योग्य नव्हते कारण १० लाख किंमतीवरील कामांच्या विभागणीस मार्गदर्शक सूचनांनुसार परवानगी नव्हती.

शेवटच्या परिषदेमधील अतिरिक्त मुख्य सचिव यांनी असे म्हटले की, (ऑगस्ट २००८) खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेच्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यांना पुन्हा एकदा सूचना देण्यात आल्या होत्या. राज्य योजनेखाली असलेल्या कामांच्या बाबतीत राज्यशासनाने कामांच्या विभागणीबाबत आणि संगीत व्यवस्था मंजूर करण्याविषयी जिल्हाधिकारी नियोजन अधिकाऱ्यांच्या विचारांशी सहमती दर्शविली होती.

दिलेल्या उत्तराशी सहमत होता येत नव्हते कारण शासनाचेच आदेश होते की (सप्टेंबर १९९८) रु. १० लाख किंमतीवरील कामांची विभागणी करण्यात येऊ नये. तसेच, संगीत व्यवस्था ह्या कामाची गणना मान्यता असलेल्या कामाच्या यादीचा भाग नव्हती.

ज्ञापन:-

२.१४ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला.

मुंबई उपनगर जिल्ह्यात लोकप्रतिनिधींनी शिफारस केलेली कामे ही विभागून केलेली होती. त्या त्या वर्षात कामे मंजूर करताना स्वतंत्र कामे म्हणून करण्यात आली. याबाबतीत यापुढे योग्य ती दक्षता घेण्यात येईल.

नागपूर जिल्ह्यात खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत श्री.रा.सु.गवई, श्री.दत्ताजी मेघे व श्री.एन.के.पी.साळवे या तत्कालिन राज्यसभा सदस्य व श्री.विलासजी मुत्तेमवार, लोकसभा सदस्य, नागपूर यांच्या खासदार निधीतून सामाजिक सभागृह बांधण्यात आलेले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात ग्रामीण भागातून नेहमी जनता येत असते. ही बाब विचारात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात सामाजिक सभागृहाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. तथापि, जिल्हा नियोजन समिती कार्यालयाकरिता इमारत उपलब्ध नसल्यामुळे तात्पुरती व्यवस्था म्हणून या सामाजिक सभागृहाचा उपयोग करण्यात येत आहे. जिल्हा नियोजन समिती कार्यालयाकरित इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर सामाजिक सभागृहाचा उपयोग त्याच प्रयोजनाकरिता करण्यात येईल.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन १९९८-९९ ते २००५-०६ या कालावधीतील मंजूर केलेल्या कामांसंबंधातील अखर्चित शिल्लक निधी मनपा, नागपूर व नागपूर सुधार प्रन्यास द्वारे शासन जमा करण्यात आलेला आहे.

नंदुरबार जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, सारंगखेडा तालुका शहादा येथील रु.५.३८ लक्ष सिमेंट रस्ता व सुरक्षा भिंत मंजूरीबाबत कार्यान्वयीन यंत्रणेकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर तात्काळ सादर करण्यात येईल.

१) ठाणे जिल्ह्यात खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेंतर्गत दुरुस्ती आणि देखभालीची कामे मान्य नव्हती. तरीसुध्दा असे लक्षात आले की, अस्तित्वात असलेल्या ७ रस्त्यांच्या डांबरीकरण कामास जिल्हाधिकाऱ्यांकडून मान्यता देण्यात आली होती.:-

"खडीकरणाने तयार केलेल्या ७ रस्त्यांच्या कामांना अस्फाल्टींग करणे" ही कामे खासदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आलेली होती. परंतु रस्त्याच्या खडीकरणाचे काम खासदार स्थानिक विकास कार्यक्रमातून मंजूर केलेले नसल्याने सदरील कामे ही प्रस्तुत कार्यक्रमांतर्गत नवीनच असल्याने त्यांची दुरुस्तीची कामे म्हणून गणना करणे उचित नाही असे वाटते. कोकण विभागात अतिवृष्टीचे प्रमाण इतर ठिकाणांच्या तुलनेत जास्त असल्याने केवळ खडीकरणाने रस्ते पावसाळ्यात टिकू शकत नाहीत. सदर रस्त्यांना डांबरीकरण/अस्फाल्टींग केल्यास काही वर्ष टिकू शकतात. त्यामुळे वरील अभिप्राय स्विकृत करुन त्यास मान्यता देण्याची विनंती आहे.

२) आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मान्य असलेल्या कामांच्या यादीत जॉगिंग पार्कमध्ये संगीत व्यवस्था स्थापित करणे हे काम समाविष्ट नव्हते. ठाण्यातील बारा बंगला भागातील जॉगिंग पार्कमध्ये रु. १०.०० लाख खर्चाची संगीत व्यवस्था बसविण्याचे काम मंजूर करण्यात आले होते आणि नोव्हेंबर, २००६ मध्ये पूर्ण करण्यात आले होते.

आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय कामांच्या यादीत, "जॉगिंग पार्कमध्ये संगीत व्यवस्था स्थापित करणे"हे काम विवक्षितपणे समाविष्ट करण्यात आलेले नाही. तथापि, जॉगिंग पार्कचा उद्देश हा जनतेच्या उत्तम आरोग्यमानाशी निगडित आहे. आणि जॉगिंग करताना सर्वसामान्य माणसांना श्रवणीय संगीत ऐकावयास मिळाल्यास त्याचे मन तर प्रसन्न राहतेच परंतु जॉगिंग सुध्दा लयबध्द पध्दतीने होते. परिणामी आरोग्यावर सकारात्मक परिणाम होत असतो.

वरील अभिप्राय लक्षात घेता बगीच्याचे सौंदर्यीकरण/जॉगिंग पार्क करणे या कामाचाच एक उपभाग म्हणून जॉगिंग पार्कमध्ये संगीत व्यवस्था स्थापित करणे हे काम समाविष्ट करण्यात आलेले आहे. तसेच सदरील काम हे अनुज्ञेय नसलेल्या कामांच्या यादीतही समाविष्ट नसल्याने प्रस्तुत अभिप्राय स्वीकृत करावेत.

अमरावती जिल्ह्यात खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत रस्त्याचे काम मंजूर करताना डांबरी रस्त्यावर अस्फाल्टचे काम (पुनर्डांबरीकरण) मंजूर होणार नाही याची काळजी घेण्यात येत आहे.

२.१५ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, ठाणे व अमरावती यांच्या अभिप्रायाशी शासन संमत आहे. नागपूर व नंदुरबार यांचे सविस्तर खुलाशे प्राप्त करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

राज्य योजनेअंतर्गत विशेष बाबींना मान्यता

२.१६ आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य यांनी ह्या निधीतून त्यांच्या मतदारसंघासाठी दिलेल्या अटीमध्ये असलेल्या हेतूसाठी आणि प्रकारासाठी विकास कामे सुचवावयाची होती. मार्गदर्शक सूचनांपासून फारकत मान्य नव्हती. मंत्रालयामधील अभिलेख्यांची तपासणी केल्यावर असे लक्षात आले की, राज्यशासनाने अनेक प्रसंगी २००६-०८ या कालावधीत (मार्च २००८ पर्यंत) विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य यांनी सूचविलेली रु. २.५८ कोटी किंमतीची **(परिशिष्ट ३.७)** कामे, त्या सर्व कामांस मान्यता नसताना आणि मार्गदर्शक सूचनांमध्ये समाविष्ट नसताना विशेष बाब म्हणून मंजूर केली होती. ह्या विशेष मार्गदर्शक खाजगी महाविद्यालयांच्या परिसरांतील रस्ता बांधणी, खाजगी शाळेच्या इमारतीकरीता कुंपण बांधणे, मतदारसंघाबाहेर सुविधांचा विकास करणे, सार्वजनिक वर्गणीची अदायगी, धार्मिक स्थळांचा विकास करणे, विभागीय आयुक्तांच्या कार्यालयीन इमारतीमधील सभागृहाचे बांधकाम आणि अशासकीय संस्थांकरीता इमारतींचे बांधकाम यांचा समावेश होता. प्रत्येक प्रकरणात जरी सचिव, नियोजन विभाग यांनी ही कामे मार्गदर्शक सूचनांनुसार पात्र नाहीत असे मतप्रदर्शन केले होते तरी सुध्दा मंत्र्याने सदरहू विशेष बाब म्हणून कोणतेही समर्थन अभिलेखित न करता मंजूर केली होती.

जेव्हा ही बाब लेखापरीक्षणाने दाखवून दिली तेव्हा विभागाने असे म्हटले की, (जुलै २००८) मार्गदर्शक सूचना अनुल्लंघनीय नव्हत्या आणि विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य यांच्या विनंती आणि पाठपुरवठ्यामुळे मंजूरी देण्यात आली होती. सदरहू उत्तर मान्य नव्हते कारण अशा कामांचा समावेश करण्याकरीता शासनाने मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करणे आवश्यक होते.

राज्य योजनेअंतर्गत असलेल्या मान्य कामांच्या यादीनुसार कोणत्याही सहकारी भवनांच्या (जेथे सहकारी संस्थांची कार्यालये कार्य करतात ती केंद्रे) बांधकामास मान्यता

नव्हती. तथापि अमरावतीमध्ये असे दिसून आले होते की, एका विधानसभा सदस्याने रु. ३३.१७ लाख किंमतीचे सहकारी भवनांच्या ३२ बांधकामांची शिफारस केली होती (जुलै २००२). ही कामे नाकारण्याऐवजी अमरावती जिल्हाधिकाऱ्याने कामाचे नाव सांस्कृतिक भवने (सांस्कृतिक कामाकरीता वापरांत येणाऱ्या इमारती) असे बदलून मान्य केली. ही कामे रु. ३२.६४ लाख खर्च करुन पूर्ण करण्यात आली (ऑक्टोबर २००५). ज्यावर रु. ३.१० लाख खर्च करण्यात आले होते, अशा तीन कामांची प्रत्यक्ष सह पडताळणी करत असताना (एप्रिल २००८) असे आढळले की, एका इमारतीचा उपयोग (लिंगा येथे) रास्त भावाचे दुकान आणि दुसऱ्या दोन इमारतीचा उपयोग (अमदापूर आणि वंडाळी येथे) सहकारी भवन म्हणून केला जात होता. वरील ह्या बाबी दाखवून दिल्यानंतर जिल्हा नियोजन अधिकारी असे म्हणाले की, (एप्रिल २००८) नावातील बदल विधान सभा सदस्यांनी मान्य केला होता. दिलेले हे उत्तर समर्थनीय नव्हते कारण नावातील बदलाने कामाचे स्वरुप बदलले नव्हते. शिवाय, इमारतींचा उपयोग ठरविलेल्या हेतूसाठी केला जात नव्हता.

शेवटच्या परिषदेमध्ये अतिरिक्त मुख्य सचिवांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडून ३२ इमारतींच्या प्रत्यक्ष वापरांची खात्री करुन घेण्याचे मान्य केले होते (ऑगस्ट २००८).

ज्ञापन:-

२.१७ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला.

नाशिक जिल्ह्यात आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत "एक विशेष बाब" म्हणून कामांना नियोजन विभागाकडून शासन स्तरावरुन मान्यता दिली होती. शासन स्तरावरुन मान्यता दिल्यानंतर संबंधित कामांना जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सन २००६ ते २००८ या कालावधी मा.आमदार श्री.राजकुमार पटेल, विधानसभा सदस्य यांचे निधी अंतर्गत सन २००५-०६ व सन २००७-०८ या वर्षामध्ये चिखलदरा महोत्सवाकरिता प्रति वर्ष रु. ५.०० लक्ष शासनाची विशेष बाब म्हणून मान्यता प्राप्त झाल्यावर या कार्यालयाकडून मंजूर करण्यात आले होते.

आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सन २००२-०३ मध्ये आमदार, श्री.नरेशचंद्र ठाकरे, विधानसभा मतदार संघ, मोर्शी यांनी प्रस्तावित केलेल्या कामांमध्ये ३२

सहकार भवन बांधकामाची शिफारस केली होती. परंतु त्यांना सांस्कृतिक भवन बांधणेच अपेक्षित होते. त्यामुळे "सांस्कृतिक भवन बांधकाम करणे" या कामांनाच या कार्यालयाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे ही कामे नाकारण्यात आलेली नाहीत. लिंगा, ममदापुर व वंडली, ता.वरुड येथे या इमारतीचा उपयोग सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता करण्यात येत असून इतर वेळी स्थानिक सामाजिक कार्याकरिता वापर करण्यात येतो.

२.१८ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत कोणती कामे घ्यावीत याबाबतची मार्गदर्शक तत्वे शासनाने वेळोवेळी निश्चित केली आहेत.

याबाबतचा थोडक्यात तपशील शासन परिपत्रक दिनांक २८.२.१९९८ आणि दिनांक १९.४.२००४ मध्ये नमूद केला आहे. तथापि, जी कामे आमदार निधीच्या मार्गदर्शक तत्वात बसत नाहीत अशी कामे आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यास अनुमती द्यावी अशी विनंती आमदार महोदयांकडून करण्यात येते. या विनंतीच्या अनुषंगाने आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाची प्रचलित मार्गदर्शक तत्वे शासनाच्या निदर्शनास टिप्पणीद्वारे आणली जातात. अपवादात्मक परिस्थितीत लोकहितार्थ असलेल्या कामांना विशेष बाब म्हणून मान्यता दिली जाते. अशा सर्व कामांचा समावेश मार्गदर्शक तत्वात करणे शक्य होत नाही. मात्र अशा कामांची शिफारस अनेक विधानमंडळ सदस्यांकडून आल्यास त्याचा समावेश मार्गदर्शक तत्वात सुधारणा करुन करण्यात येतो.

<u>शासनाकडून केलेली कार्यवाही :-</u>

२.१९ शासन विभागीय प्रमुख यांनी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालात असलेल्या परिच्छेदावर आणि त्यानंतर लोकलेखा समितीने केलेल्या शिफारशींवर सुधारात्मक कारवाई करणे आवश्यक असते. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या ३१ मार्च १९९९ आणि ३१ मार्च २००० रोजी संपलेल्या वर्षाच्या अहवालात अनुक्रमे परिच्छेद ३.२ आणि परिच्छेद ३.१३ मध्ये आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम आणि खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना यांचे कार्यान्वयन याविषयी उल्लेख केलेला होता. तथापि, टिकून राहिलेल्या अनयिमितता आणि त्याबद्दलची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे.

अनियमिततेचे स्वरूप	परिच्छेदाचा मतितार्थ/लोक लेखा समितीची शिफारस/शासनाकडून प्रस्तावित कारवाई	सद्य:स्थिती
(१)	(२)	(३)
कार्यान्वयन संस्थांनी त्यांचेकडे मोठ्या प्रमाणात ठेवलेला अखर्चित निधी	परिच्छेद ३.२.७.१ (आ.स्था.क्षे.वि.का) मध्ये उल्लेखित केले होते की, महानगरपालिका आणि नगरपरिषदांनी १९९५-९८ या कालावधीची मोठ्या प्रमाणांतील अखर्चित शिल्लक रक्कम रु. २.४५ कोटी स्वत:कडे ठेवली होती. शासकीय ज्ञापनांत असे म्हटले होते की कामाचा अवधि वाढवून दिला होता आणि कामे पूर्ण करण्यात आली होती.	राज्यशासनाने कार्यान्वयन संस्थांना १९९८-९९ ते २००५-०६ या वर्षामध्ये मंजूर केलेल्या कामासंबंधातील अखर्चित शिल्लक रकमा ३० जून २००७ पर्यंत उपयोगात आणाण्यास परवानगी दिली होती. ३० जून, २००७ रोजी राहिलेली अखर्चित शिल्लक जिल्हाधिकाऱ्यांकडे परत करावयाची होती. ४८ चाचणी परीक्षा झालेल्या कार्यान्वयन संस्थांपैकी आठ संस्थांनी ३० जून २००७ रोजी त्यांचेकडे असलेली अखर्चित शिल्लक रु. २.४५ कोटी जून २००८ अखेरपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे परत केली नव्हती. कार्यान्वयन संस्थांनी अखर्चित शिल्लक शासनास परत करण्याचे मान्य केले होते. (फेब्रुवारी आणि जून २००८).
कामाच्या मंजूरीतील विलंब	परिच्छेद ३.१३ (a) २ (खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना) मध्ये असे दाखवून दिले आहे की, चाचणी परीक्षा झालेल्या फक्त तीन जिल्ह्यामध्ये ३२ दिवसांपासून ३६५ दिवसांपर्यंत विलंब झाला होता. शासकीय ज्ञापनामध्ये असे म्हटले होते की, कार्यान्वयन संस्थांना वेळेचे वेळापत्रक पाळण्याविषयी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या होत्या.	नऊ चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांपैकी आठ जिल्ह्यां (अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नंदूरबार, नाशिक, पुणे, ठाणे आणि वाशिम) मध्ये २००३-०४ ते २००७-०८ या वर्षामध्ये १९९७ शिफारस केलेल्या कामांपैकी ५२२ कामांना मंजूरी देण्यामध्ये ६३० दिवसांपर्यंत विलंब झाला होता **(परिशिष्ट ३.१०)** लेखापरीक्षेने असे पाहिले की, जास्तीत जास्त विलंब ठाणे (११ कामे १ वर्षापर्यंत) नंदुरबार (१६ कामे १ वर्षापर्यंत, नऊ कामे एका वर्षापेक्षा जास्त) आणि नागपूर (११ कामे १ वर्षापर्यंत, ७ कामे एक वर्षापेक्षा जास्त) या ठिकाणी होता. कामाच्या मंजूरीतील विलंब म्हणजे योजनेचे फायदे लांबणीवर टाकणे. शासनाने असे म्हटले की, (ऑगस्ट २००८) अंदाजित खर्च आणि योजना तयार करणे, जमिनीची उपलब्धता अजमावणे, खासदारांच्या शिफारशींचे एकत्रिकरण ह्या बाबी कांही वेळेस कामाच्या मंजूरीस विलंब लावू शकतात. तथापि, जिल्हा प्राधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचनांचे सक्त अनुपालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या

		होत्या.
काम उरकण्यामधील विलंब	परिच्छेद ३.१३.३ (a).१ (खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना) मध्ये असे उल्लेखित केले होते की १९९३-९८ मध्ये हाती घेतलेली कामे अनुसूचीनुसार २४ ते ४८ महिन्यांनी मागे होती. शासकीय ज्ञापनात असे म्हटले होते की, काम लवकरात लवकर पूर्ण करण्याविषयीच्या आवश्यक त्या सूचना कार्यान्वयन संस्थांना देण्यात आल्या होत्या.	नऊ चाचणी परीक्षा झालेल्या जिल्ह्यांपैकी सहा (अमरावती, औरंगाबाद, नंदूरबार, नशिक, पुणे, आणि वाशिम) जिल्ह्यांतील २००२-०३ ते २००५-०६ या कालावधीत मंजूर झालेली ८९ कामे वेळा पत्रकानुसार पूर्ण झाली नव्हती. ह्याप्रमाणे, त्यावर झालेला रु. २.३६ कोटीचा खर्च १२ महिन्यांपासून ४८ महिन्यांपर्यंत अडकून पडला होता. ह्या कामांना प्रामुख्याने कामाच्या निविदा नव्याने मागविणे आणि जमिन उपलब्ध न होणे ह्या कारणांमुळे विलंब झाला होता. शासनाने असे म्हटले की, (ऑगस्ट २००८) कामासाठी योग्य अशी जमिन विनामोबदला मिळवून देणे ही स्थानिक संस्थांची जबाबदारी आहे. काही प्रकरणांत कामांना होणारा विलंब जमिनीची अनुपलब्धता ह्या कारणांमुळे असू शकतो.
संनियंत्रण	परिच्छेद ३.१३.४ (खासदार स्थानिक क्षेत्र विकास) मध्ये हे लक्षात आणून दिले होते की, राज्यस्तरीय समितीची फक्त एकच बैठक १९९७ आणि २००० या कालावधीत घेण्यात आली होती. जिल्ह्यामध्ये विहित केलेल्या तपासण्या एकतर जिल्हाधिकाऱ्यांकडून घेतल्या गेल्या नव्हत्या किंवा त्यामेध्ये कमतरता होती, शासकीय ज्ञापनामध्ये असे	खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना मार्गदर्शक सूचनांनुसार वर्षातून कमीत कमी एक वेळ योजनेच्या कार्यान्वयनातील प्रगतिचा आढावा मुख्य सचिव/विकास आयुक्त/अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अधिपत्याखालील समितीने जिल्हाधिकारी अणि खासदार बरोबर घ्यावयाचा होता. खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी नेमलेल्या (मे २००६) सहा सदस्य असलेल्या समितीची समिती नेमल्यापासून एकही बैठक झाली नव्हती. शासन यावर असे म्हणाले (ऑगस्ट २००८) की, इतर काही निकडीच्या कामांमुळे अशा तऱ्हेच्या बैठका घेणे मुख्य सचिवास शक्य झाले नव्हते. तथापि २००५-०८ या दरम्यान विकास आयुक्तांनी अशा आढावा बैठका घेतल्या होत्या. असे लक्षात आले होते की, चार जिल्हाधिकाऱ्यांनी (अमरावती, नंदुरबार, पुणे आणि वाशिम) कोणत्याही तपासण्या केल्या नव्हत्या. तसेच २००३-०८ या कालावधीत कामाच्या तपासणीत ६० टक्क्याहून १००

	म्हटले होते की, सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कामाच्या संनियंत्रण व तपासणी संबंधातील सूचना अगोदरच देण्यात आल्या होत्या.	टक्क्यापर्यंत ३ जिल्ह्यामध्ये तपासणीत कमतरता होती जसे की, मुंबई उपनगर (जास्तीत जास्त १०० टक्के २००३-०४ आणि २००४-०५ मध्ये), नागपूर (२००७-०८ मध्ये जास्तीत जास्त ६७ टक्के) आणि ठाणे (२००५-०६ मध्ये जास्तीत जास्त ९० टक्के), शासनाने असे म्हटले की, (ऑगस्ट २००८) या योजनेखाली पार पाडलेल्या कामांच्या तपासणीकरीता आवश्यक त्या सूचना प्रसृत करण्यात आल्या होत्या.

<u>ज्ञापन :-</u>

२.२० उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला.

नागपूर जिल्ह्यात आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन १९९८-९९ ते २००५-०६ या कालावधीतील मंजूर केलेल्या कामासंबंधातील अखर्चित शिल्लक निधी मनपा, नागपूर व नागपूर सुधार प्रन्यास द्वारे शासन जमा करण्यात आलेली आहे.

खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मा.खासदार महोदयांनी सूचविल्यानुसार संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेकडून अंदाजपत्रक मागविण्यात येते. मंजूरीकरिता आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता विहित वेळेत न झाल्यामुळे काही वेळा कामाला मंजूरी देण्यात विलंब होतो.

खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांच्या मार्गदर्शक तत्वानुसार कामाची तपासणी करण्यात येते. जिल्हा नियोजन समिती कार्यालयाकडे सोपविण्यात आलेली विविध कामे विचारात घेता प्रमाणकानुसार निरिक्षणे घेणे शक्य होत नाही.

औरंगाबाद जिल्ह्यात कार्यवाही अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी दिनांक ३०.५.२००७ अखेरील अखर्चित रक्कम शासनाकडे समर्पित केली असल्याचे प्रमाणित केले आहे.

प्रस्तावित कामांना विहित मुदतीत मंजूरी देण्यास विलंब झाला :-

मार्गदर्शक तत्वानुसार कामाच्या मंजूरी पूर्वी अंदाजपत्रकासोबत जागा उपलब्धता, ना-हरकत देखभाल दुरुस्ती प्रमाणपत्रे घेणे आवश्यक आहे. तथापि, सदरील प्रमाणपत्रे संबंधित

स्थानिक संस्थेकडून लवकर प्राप्त होत नसल्याने कामाच्या मंजूरीस विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागतो.

१) पुणे जिल्ह्यात आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गतचा अखर्चित निधी कार्यान्वयीन यंत्रणा यांचेकडून परत मागविणेत आला आहे. तसेच कामातील विलंब हा खासदार महोदयांकडून प्रस्ताव प्राप्त होणे काही वेळा संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने प्राप्त तोंडी सूचनेनुसार अंदाजपत्रक पाठविणेस विलंब होणे तसेच खासदार महोदय तोंडी सूचना देत असतात व काम मंजूरीस विलंब होत असतो. सदरची बाब तपासणी पथकाच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे.

२) शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दरमहा तपासणी करण्याच्या सूचना आहेत. या कार्यालयाने सदर सूचनांच्या अनुषंगाने तपासणी केलेली आहे. परंतु कार्यालयाकडे वाहनाची सुविधा नसल्याने शासन सूचनांनुसार तपासणी करणे शक्य झालेले नाही.

नाशिक जिल्ह्यात कार्यालयीन यंत्रणेकडून विहित कालावधीत प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके प्राप्त न झाल्याने कामे मंजूर करण्यास विलंब झाल्याचे दिसून येते. तथापि, आढावा बैठकीमध्ये कार्यान्वयीन यंत्रणांना सूचना देण्यात आल्या आहेत. यापुढे विहित कालावधीत कामे मंजूर करण्याची कार्यवाही सुरु आहे. नाशिक जिल्ह्यातील मागील ७ अपूर्ण कामे तांत्रिक अडचणीमुळे विहित वेळेत पूर्ण झाली नव्हती. सदरच्या ७ कामांपैकी २ रस्त्यांची कामे, आहेत त्या स्थितीत अंतिम करुन, या रस्त्यांचा जनतेसाठी वापर होत आहे. या कामाच्या पूर्णत्वाचे दाखले या कार्यालयास प्राप्त झाले आहेत. दोन कामे खर्च निरंक असल्यामुळे रद्द करण्यात आली आहेत व उर्वरित तीन कामे कार्यान्वयीन यंत्रणांनी पूर्ण केली आहेत.

अमरावती जिल्ह्यात खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत कार्यकारी यंत्रणेसोबत कामांचा मासिक आढावा घेण्यात येतो.

वाशिम जिल्ह्यात खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर करावयाची कामे खासदार महोदयांनी दिलेल्या प्राधान्यक्रमाने मंजूर करण्यात येतात. यापुढे कामे विहित मुदतीत मंजूर करण्याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामांच्या तपासण्या करण्यात येत आहेत.

२.२१ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला.

जिल्हाधिकारी यांच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

साक्ष :-

२.२२ उपरोक्त लेखी माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक १५ व २१ फेब्रुवारी, २०११ रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग यांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी योजनानिहाय वापर न झाल्यामुळे खासदारांच्या कामांसंदर्भातील २०४ कोटी रुपये इतका केंद्रीय निधी कमी मिळाला आहे. खासदारांकडून कामाची शिफारस न झाल्यामुळे आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून योजना निधीचा वापर न झाल्यामुळे रु.२०४.८३ कोटी इतक्या रकमेचा केंद्रीय निधी कमी मिळाल्याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, १४ व्या संसदेचा कार्यकाळ सन २००९ पर्यंत होता, ही माहिती विभागाने महालेखापरिक्षकांना कळविली आहे. १४ व्या संसदेचा कार्यकाळ सन २००९ पर्यंतच होता त्यावेळी २०४ कोटी रुपये प्राप्त झाले नव्हते. आजच्या परिस्थितीत १८ कोटी रुपये अजून प्राप्त व्हायचे आहेत बाकीची रक्कम प्राप्त झाली आहे. मुंबई दक्षिण व उत्तर इचलकरंजी, कुलाबा, कोल्हापूर, नागपूर, पंढरपूर, पुणे, राजापूर, रामटेक, सोलापूर या भागांसाठी प्रत्येकी १ कोटी रुपये आणि नागपूरसाठी ७ कोटी रुपये अशाप्रकारे १८ कोटी रुपये एवढा निधी अजून प्राप्त व्हायचा आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली तसेच खासदारांचा निधी अप्राप्त असेल तर तो पुढे खेचून घेण्यात येतो. सन २००५ नंतर त्यांनी ३ अटी टाकल्या आहेत. रकमेचा उपयोग केला पाहिजे, लेखापरिक्षण झाले पाहिजे. १ कोटी रुपये अखर्चित असतील तर पुढील हप्ता येत नाही. खासदारांची शिफारस प्रात होणे गरजेचे आहे व त्यानंतर ते काम आपल्या अनुशेष कामाच्या यादीत आहे की नाही हे पाहणे देखील गरजेचे आहे. प्राईम एस्टिमेट करुन घेण्यास उशीर झाल्यामुळे २०४ कोटी रुपयांपैकी काही निधी प्राप्त झालेला नाही. अद्याप १८ कोटी रुपये येणे शिल्लक आहे. आता खासदार महोदयांची शिफारस प्राप्त झालेली असून, कार्यवाही सुरु आहे.

२.२३ साधारणपणे खासदार महोदयांनी एखादे काम सुचविल्यानंतर ते काम आपल्या यादीमध्ये आहे की नाही, हे समजत नाही. अंतिम यादीतील काम समजण्यास किती दिवस लागतात ? तसेच जिल्हाधिकाऱ्यांना छाननी करीता किती दिवस लागणार आहेत अशी

विचारणा समितीने केली असता यासंदर्भात ४५ दिवसामध्ये निर्णय घ्यावयास पाहिजे होता. कामांचे अंदाजपत्रक करुन घ्यावयास पाहिजे होते निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कार्यारंभ आदेश दिले पाहिजे. यासंदर्भात मुख्य सचिव यांनी बैठक घेतली व त्या बैठकीत जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या होत्या अशी माहिती विभागाच्या सचिवांनी समितीला दिली.

२.२४ पुढे समितीने अशी विचारणा केली की, खासदार निधी व्यपगत झाला तर परत मिळतो त्याचप्रमाणे आमदार निधी व्यपगत झाला तर परत मिळतो काय यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, आमदार निधी व्यपगत झाला तर पुन्हा पुरवणी मागणी सादर करुन तो उपलब्ध करुन देण्यात येतो.

२.२५ व्यपगत झालेला आमदार निधी परत मिळतो किंवा नाही. तसेच, यवतमाळ मतदार संघातील २५ लाख रुपये व्यपगत झाले आहेत ते परत मिळाले नाहीत व भुसावळ मतदार संघातील अगोदरच्या सन्माननीय सदस्यांचा आमदार निधी मिळावा यासाठी अनेक वेळा पत्रव्यवहार करुनही तो निधी मिळालेला नाही. तो व्यपगत झाला आहे काय ? याबाबत समितीने माहिती देण्यास सांगितले असता, खासदार निधी हा केंद्र सरकारचा असून तो थेट जिल्हाधिकारी यांच्या खात्यात जमा करण्यात येतो. आमदार निधी कोषागारातुन आहरण झाल्यानंतर जिल्हा परिषदा, महानगरपालिका यांच्याकडे वर्ग केला जातो अलिकडे अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, हा निधी एक वर्षापर्यंत खर्च करण्यास परवानगी देण्यात यावीत. ती रक्कम परत करता येत नाही. पुढील वर्षी ती वापरता येते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

२.२६ चालू वर्षाचा निधी अखर्चित राहिला तर तो पुढे नेण्यात (carried forward) येतो काय ? असे समितीने विचारले असता याबाबत समितीला माहिती देताना विभागाच्या सचिवांनी असे सांगितले की, सरकारच्या कोषागारातुन कार्यान्वित यंत्रणेने निधी काढला नाही तर ती रक्कम व्यपगत होते. अशा रकमा ज्या व्यपगत होतात त्यांच्यासाठी पुरवणी मागणी सादर करुन ती रक्कम उपलब्ध करुन देण्यात येते.

२.२७ संबंधित कार्यान्वित यंत्रणेकडून कार्यलेख काढल्यानंतर जर तो निधी अखर्चित राहिला तर हा निधी पुढील वर्षासाठी खर्च करता येईल काय ? ज्या मतदार संघाचा निधी आहे त्याच मतदार संघासाठी तो देण्यात येतो काय ? अशी विचारणा समितीने केली असता,

पुरवणी मागणी सादर करुन निधी उपलब्ध करुन देता येतो. ज्या मतदार संघाचा निधी आहे त्याच मतदार संघासाठी निधी देण्यात येतो. सन २००९-१० या वर्षासाठी एकूण १२.३८ कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर केली होती अशी माहिती सचिवांनी समितीला दिली.

२.२८ जो निधी मंजूर झाला तो त्या कामावर खर्च न होता व्यपगत होतो. तो निधी लोकप्रतिनिधींना परत प्राप्त होणार आहे काय ? असा निधी मिळावा म्हणून लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा पत्र व्यवहार केला आहे. तथापि, निधी खर्च करण्याची परवानगी मिळाली नाही. एखाद्या कामास प्रशासकीय मंजुरी मिळाली तरी रक्कम प्राप्त होत नाही ती रक्कम नंतर व्यपगत होते ती रक्कम परत मिळणार आहे काय? तसेच मागच्या पंचवार्षिक योजनेमध्ये समजा एखाद्या मतदार संघातील एक कोटी रुपयांच्या निधी पैकी ५० लाख रुपयांचा निधी अखर्चित राहिला तर तो निधी परत मिळेल काय ? असा अखर्चित निधी कोणकोणत्या मतदार संघात आहे त्याची मतदारसंघ निहाय माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, अखर्चित राहिलेल्या रकमेची पुरवणी मागणी सादर करुन निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

२.२९ जळगांव जिल्हयातील, भुसावळ मतदार संघ, पुणे जिल्हयातील पर्वती, भवानी व कसबा पेठ तसेच जुना हवेली मतदारसंघ. त्याचप्रमाणे यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर व यवतमाळ मतदारसंघ, अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत-जामखेड मतदारसंघ, त्याचप्रमाणे जुना ट्रॉम्बे उपनगर जिल्हा या मतदार संघाची माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता समितीला माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

२.३० नियोजन विभागाने सन २००७-२००८ चा अहवाल विधानमंडळात दिनांक १२.६.२००९ रोजी सादर केला. त्यासंदर्भातील ज्ञापने विधानमंडळास प्राप्त होण्याचा दिनांक १२.९.२००९ असा होता. ही ज्ञापने प्राप्त करण्यासाठी विधानमंडळाने चार ते पाच स्मरणपत्रे पाठवूनही समितीला कोणतेच उत्तर पाठविण्यात आले नाही. बाब अत्यंत गंभीर असल्याचे प्रतिपादन करुन समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच यासंदर्भातील माहिती महालेखाकार यांना देणे आवश्यक असून लोकलेखा समितीकडे पाठविणे आवश्यक असल्याचे सांगत विधानमंडळाने जी स्मरणपत्रे पाठविली आहेत ती कोणाकडे गेली आहेत, त्या पत्रावर

संबंधित अधिकाऱ्यांनी काय कार्यवाही केली याची सविस्तर माहिती समितीला आवश्यक आहे. या पत्राची दखल कोणत्या अधिकाऱ्यांनी घेतली नाही त्या अधिकाऱ्यांवर विभागाने कडक कारवाई करणे समितीला अपेक्षित आहे असे सांगितले असता आपण जी सूचना केली त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

२.३१ वित्तीय सल्लागार हे पद नियोजन विभागात नाही. आंतरवित्तीय सल्लागाराची तीन पदे आहेत. ही तीन पदे सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व अन्न व नागरी पुरवठा विभागात कार्यरत आहेत यावर वित्तीय सल्लागाराचे पद नियोजन विभागात आवश्यक होते असे मत समितीने व्यक्त केले असता काही विभागात आंतरवित्तीय सल्लागाराचे पद आहे. केंद्र सरकारमध्ये तशी पध्दत आहे. आंतरवित्तीय सल्लागाराचा सल्ला घेऊन कार्यवाही करण्यात येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२.३२ आमदारांना मिळणाऱ्या स्थानिक विकास निधीच्या संदर्भात एक शासन निर्णय काढण्यात येणार होता. त्यासंदर्भातील शासन निर्णय काढण्यात आला आहे काय ? सदर नस्ती माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे होती. त्यासंदर्भातील निर्णय झाला आहे काय ? आमदार विकास निधीमधून राज्यस्तरावरील सामने आयोजित करण्यासाठी निधी खर्च करण्याची परवानगी आहे. जिल्हा व तालुका स्तरावरील सामने आयोजित करण्यासाठी व त्यासाठी खर्च करण्याची परवानगी असावयास पाहिजे. तसेच, नवीन क्रीडा धोरण जाहीर होणार आहे त्यामध्ये या सर्व गोष्टींचा समावेश केला असावा. अशा बाबींवर नियंत्रण आणल्यामुळे खर्च करण्यास अडचणी निर्माण होतात. विकास कामांसाठी पैसा द्यावा लागतो. आमदारांना जे संगणक देण्यात येतात ते अपडेट दिले पाहिजेत. ॲपल कंपनीचा नवीन संगणक अपडेट आहे. माननीय पंतप्रधान, माननीय मुख्यमंत्री व मंत्रालयातील सचिव ॲपल संगणक वापरीत आहेत. मग आमदारांना जुना संगणक का देण्यात येतो. ॲपल कंपनीचा नवीन अद्ययावत संगणक द्यावयास पाहिजे. वित्त मंत्री महोदयांनी ही मागणी मान्य केलेली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, यासंदर्भात मार्गदर्शक सूचना तयार करण्यात येत आहे. त्या सूचनांचा व माननीय आमदार महोदयांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा विचार करुन शासनाच्या मान्यतेसाठी ती फाईल सादर करण्यात आलेली आहे. शासनाची मान्यता मिळाल्यानंतर

यासंदर्भातील नवीन शासन निर्णय दोन दिवसात काढण्यात येणार आहे. या अनुषंगाने शासन निर्णयाची एक प्रत ताबडतोब समितीला देण्याबाबत विभागीय सचिवांनी आश्वासित केले तसेच ज्या दोन सन्माननीय सदस्यांनी पत्रे दिली आहेत, त्यांना विशेष बाब म्हणून ॲपल कंपनीचा संगणक घेण्यास मान्यता देण्यात आलेली असुन डी.आय.टी. ची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे सांगितले.

२.३३ माननीय पंतप्रधान, माननीय मुख्यमंत्री व सचिव महोदय ॲपल कंपनीचा संगणक वापरीत आहेत, आमदारांना तो का देण्यात येत नाही. यासाठी विशेष बाब करण्याची काय आवश्यकता आहे. सर्व आमदारांना तोच संगणक देणे आवश्यक असल्याचे समितीने मत व्यक्त केले असता यासाठी डी.आय.टी.ची परवानगी घ्यावी लागणार असल्याचे विभागीय सचिवांनी स्पष्ट केले. यावर मंत्रालयातील सचिवांना ॲपल कंपनीचे संगणक देतांना डी.आय.टी.ची परवानगी घेतली होती काय ? यासंदर्भातील सविस्तर माहिती २१ तारखेच्या बैठकीत समिती सदस्यांना देण्यात यावी असे समितीने विभागास निदेश दिले असता विभागीय सचिवांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आश्वासित केले.

२.३४ मुख्य सचिवांसमवेत होणाऱ्या बैठकीसंदर्भात माहिती महालेखाकार यांनी विचारली असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, After 2008, we have made progress in the case of Rs. 204 crores Fund. At present only 18 crore remains to be given. Information regarding the implementation of the programme, pending money and usage of money has been taken. We have communicated this in the reply send to you. The money can be obtained after we give usage and the details of the money spent and after audit has been completed. There are few points regarding some works which were not admissible under the schemes. We have obtained explanations and many of them are justifiable, if we take broader view of the utility of the entire programme. Accordingly, we have requested that the explanation may be considered. So far as the supervision of the programme is concerned, immediately after the Exit Conference, the Chief Secretary has reviewed this programme in detail and he has written to all the Collectors. Further more, the Chief Secretary has written to all the MPs that they should recommend the works as early as possible so that the money can be spent. So, after 2008, significant progress in the implementation, monitoring of the scheme has been done.

२.३५ विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने उप महालेखाकार यांनी असे सांगितले की, They did not get the money. If the balance is one crore or more they will not get the fund. It will lapse. यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, After we send the utilisation, the money gets released.

२.३६ २०४ कोटी रुपये व्यपगत झाले असे महालेखाकार यांचे म्हणणे असल्याचे समितीने सांगितले त्यावर ही रक्कम व्यपगत होत नाही. ती रक्कम पुढच्या वर्षी नेण्यात येते (carried forward) असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. हा २०४ कोटी रुपयांचा निधी कधीपासूनचा आहे? अशी विचारणा समितीने केली त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, प्रत्येक मतदार संघात २ कोटी रुपये प्राप्त व्हावयाचे असतात. २००८ मधील हिशोब काढला की, ज्या मतदार संघामध्ये नॉर्मप्रमाणे जो निधी प्राप्त व्हावयास पाहिजे होता, तो प्राप्त झाला नाही. २०४ कोटी रुपयांचा निधी कमी प्राप्त झालेला आहे व हा निधी १९९३ पासूनचा आहे तसेच १४ वी लोकसभा २००९ पर्यंत होती आता फक्त १८ कोटी रुपये द्यावयाचे बाकी आहेत.

२.३७ या रक्कमेसंबंधीची तपशीलवार माहिती समितीस दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ रोजी होणाऱ्या बैठकीत देण्याविषयी समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी तसे समितीस आश्वासित केले.

२.३८ आमदारांचा निधी कोणकोणत्या कामांसाठी खर्च करावा यासंबंधी शासनाने मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत. एखादे सार्वजनिक हिताचे काम असेल तर आमदार निधी खर्च करता येतो काय ? तसेच सार्वजनिक प्रयोजनासाठी निधी खर्च करता येतो काय ? अशी विचारणा समितीने केली असता, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी १० टक्के निधी राखून ठेवून तो विकास कामांवर खर्च केला जातो व ५ टक्के निधी नाविण्य पूर्ण योजनेसाठी खर्च करावयाची आहे. ही योजना नव्याने आलेली असल्याचे समितीस सांगितले यावेळी नाविन्यपूर्ण योजनेची माहिती समितीला देण्याबाबत समितीने विभागीय सचिवांना सूचित केले.

२.३९ नाविन्यपूर्ण योजना नव्यानेच तयार करण्यात आलेली आहे, त्यासंबंधीची संविस्तर माहिती दिनांक २१ फेब्रुवारी २०११ रोजी होणा-या बैठकीत देण्याचे विभागीय सचिवांनी

आश्वासित केले व या योजनेसंदर्भात नव्यानेच शासन निर्णय काढण्यात येणार असून त्यात ५ टक्क्यांची तरतूद खर्च करण्याची तरतूद केलेली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

२.४० महालेखाकार यांचा आक्षेप असा आहे की, २००३-०४ साली राज्यसभा व लोकसभा यांच्याकडून अंदाजित निधी १४२ कोटी रुपये अपेक्षित होता. प्रत्यक्षात १३२ कोटी रुपये एवढाच निधी प्राप्त झाला. २००४-०५ या वर्षी १५० कोटी रुपयांचा निधी अपेक्षित होता, प्रत्यक्षात १३२ कोटी रुपये प्राप्त झाला आहे. २००५-०६ या वर्षी १४८ कोटी निधी अपेक्षित होता, प्रत्यक्षात १२५ कोटी रुपये निधी प्राप्त झाला. २००६-०७ मध्ये १४६ कोटी रुपयांचा निधी अपेक्षित होता, प्रत्यक्षात ९६ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. २००७-०८ या वर्षी १४० कोटी रुपयांचा निधी अपेक्षित होता, प्रत्यक्षात ३५ कोटी रुपये एवढाच निधी प्राप्त झाला. केंद्राकडून एकूण ७५६ कोटी रुपयांचा निधी अपेक्षित होता, जिल्हाधिकारी यांचेकडे फक्त ५२१ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. २०४ कोटी रुपयांचा आकडा काढला आहे, तो मागच्या पाच वर्षे कम्युनिटी धरुन काढला आहे की मागील पाच वर्षाचा प्रलंबित निधी प्राप्त झालेला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता २०४ कोटी रुपयांचा निधी कमी प्राप्त झाला आहे. ज्या मतदार संघात हा निधी प्राप्त झाला नव्हता, त्या मतदार संघात तो खर्च केला गेला. त्यातील १८ कोटी रुपयांचा निधी शिल्लक असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली. २००५-०६ या वर्षी १४८ कोटी रुपये निधी अपेक्षित होता, प्रत्यक्षात १२५ कोटी रुपये निधी प्राप्त झाला. त्या वर्षाचा निधी जो शिल्लक होता तो ॲड करुन सदर निधी वाढीव म्हणून दिसावयास पाहिजे होता. परंतु वाढीव निधीचा आकडा या ठिकाणी कुठे दिसून येत नाही. या निधीच्या बाबतीत सन २००७-०८, २००८-०९, २००९-१० या आर्थिक वर्षाची माहिती समितीला नंतर सादर करतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.४१ आमदार निधी देखील वर्षअखेर खर्च झाला पाहिजे तसेच किती मतदार संघातील रक्कम व्यपगत न होता पुढे नेण्यात (carried forward) आली आहे व जिल्हाधिकारी यांच्याकडे किती निधी शिल्लक आहे यासंबंधीची माहिती समितीला हवी आहे तसेच नव्यानेच मतदार संघांची पुनर्रचना झाली आहे. २०४ कोटी रुपयांच्या निधीबाबत डी.पी.ओ. यांच्याकडून माहिती घ्यावी व ती दिनांक २१ रोजीच्या बैठकीत देण्यात यावी असे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले.

२.४२ सन २००७-०८ च्या नागरी अहवालातील खासदार / आमदार स्थानिक क्षेत्र विकास योजना "या परिच्छेदासंदर्भात दिनांक १५ फेब्रुवारी, २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली होती." सदर बैठकीत विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीने समितीचे समाधान न झाल्याने समितीने दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ रोजी पुन्हा विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम-सर्वसाधारण अनुज्ञेय कामांच्या संदर्भात माहिती देण्यास विभागीय सचिवांना सूचित केले. आमदार, खासदारांना निधीतून विकास कामे करताना अनेक अडचणी येत असतात. तसेच जिल्हापरिषद आपल्या कार्यपध्दतीनुसार काम करीत असते. महानगरपालिका क्षेत्रात नगरसेवक त्यांच्या कार्यपध्दतीनुसार विकासकामे करीत असतात. यासंदर्भात काही सूचना मागविल्या होत्या. आता नवीन शासन निर्णय निर्गमित झालेला असून त्यासंदर्भातील माहिती विभागाने द्यावी तसेच विकासकामे करीत असताना आमदार किंवा खासदार निधी व्यपगत होऊ नये याकरिता नियोजन विभागाने लक्ष देणे आवश्यक आहे. यासंदर्भात समितीला थोडक्यात माहिती द्यावी. असे निदेश समितीने विभागाला दिले असता विभागीय सचिवांनी माहिती देताना असे सांगितले की, या विषयाच्या संदर्भात नवीन शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. अनुज्ञेय कामांची पूर्वी जी आर्थिक मर्यादा होती, आता ती अनुज्ञेय कामाच्या संदर्भात कामनिहाय आर्थिक मर्यादा वाढविण्यात आलेली आहे. कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, लघु पाटबंधाऱ्याची कामे, वळण बंधारे, वनराई बंधारे कामे करण्यासाठी सध्याची मर्यादा १५ लाख रुपये होती. ती आता २० लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. लहान रस्ते, पूल व साकव बांधकामाची कामे करण्यासाठी सध्याची मर्यादा १० लाख रुपये होती, ती आता १५ लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. सामाजिक सभागृह बांधणे व कंपाऊंड वॉल बांधण्यासाठी सध्याची मर्यादा १० लाख रुपये होती, ती आता १५ लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. स्वच्छता विषय कामांमध्ये, शौचालयाचे बांधकाम, झोपडपट्टी परीसरात स्नानगृहांचे बांधकाम, फिरते शौचालयासाठी लागणारी ट्रॉली खरेदी करणे, स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी घनकचरा वाहून नेण्यासाठी वाहन खरेदी करणे, घनकचरा व्यवस्थापन व सुविधा निर्माण करणे, ग्रामपंचायत हद्दीत गटार बांधणे, वगैरे कामे पूर्ण करण्यासाठी सध्याची मर्यादा १० लाख रुपये होती, ती आता १५ लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. व्यायामशाळांसाठी कायम स्वरुपाचे साहित्य

व इतर उपकरणे खरेदी करण्यासाठी सध्याची मर्यादा दीड लाख रुपये होती, ती आता पाच लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. उद्यानाच्या विकास व बालकांसाठी क्रीडा साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी सध्याची मर्यादा १ लाख रुपये होती, ती आता ५ लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. ग्राम सचिवालय बांधण्यासाठी सध्याची मर्यादा ५ लाख रुपये होती, ती आता १५ लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळांना शैक्षणिक, अध्यापन, क्रीडा, प्रयोगशाळा साहित्य व डेस्क बेंचेस तसेच वॉटर प्युरिफायर पुरविण्यासाठी सध्याची मर्यादा १ लाख रुपये होती, ती आता ५ लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे.

२.४३ आमदार निधीतून बस स्थानक बांधलेले असून त्याच्या देखभाल-दुरुस्तीचे काम कोणी करावयाची हा खरा प्रश्न असतो. देखभाल-दुरुस्तीची कामे स्थानिक विकास निधीतून करता येत नाही. आमदार निधीतून बस स्थानक बांधून एसटीकडे हस्तांतरीत केले तर त्यांनीच त्याची रंगरंगोटी किंवा देखभाल-दुरुस्तीची कामे केली पाहिजेत. स्थानिक विकास निधीतून देखभाल-दुरुस्तीची कामे घेतली तर विकास कामे करण्यासाठी पैसे उपलब्ध होणार नाहीत. एखादा दवाखाना बांधल्यानंतर जिल्हापरिषदेच्या आरोग्य खात्याकडे वर्ग केल्यानंतर त्यांनीच त्याची देखभाल-दुरुस्ती केली पाहिजे असे समितीने व्यक्त केले असता याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ती कामे प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांना शैक्षणिक, अध्यापन, क्रीडा, प्रयोगशाळा साहित्य व डेस्क बेंचेस तसेच वॉटर प्युरिफायर पुरविणे, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये संगणक व अनुषंगिक साहित्य उपलब्ध करणे, अंध, अपंग, मतिमंद व गतीमंद मुलांसाठी चालविण्यात येणाऱ्या वर्ग खोल्यांचे बांधकाम, स्वच्छता गृहांचे बांधकाम, सुरक्षित क्रीडांगणे, श्रवणयंत्रे व त्यास आवश्यक इतर बाबी तसेच ब्रेल लिपीच्या सॉफ्टवेअरची कामे करण्यासाठी १५ लाख रुपयांपर्यंत मर्यादा वाढविण्यात आलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी आग प्रतिबंधक उपकरणे खरेदी करण्यासाठी २ लाख रुपयांपर्यंत मर्यादा वाढविण्यात आलेली आहे. महानगरपालिका क्षेत्रातील उपकर आकारण्यात आलेल्या चाळींमधील गल्ल्या, गटारे, सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणे व त्यांची दुरुस्ती, दुरुस्त न होणाऱ्या शौचालयाची पुनर्बांधणी व दुरुस्ती, सार्वजनिक न्हाणी गृहे बांधणे, सार्वजनिक जिने, पॅसेज व व्हरांडे यांची दुरुस्ती अशा

कामांसाठी सध्याची मर्यादा १० लाख रुपये होती ती आता १५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत विधानमंडळ सदस्यांना लॅपटॉप/ डेस्कटॉप संगणक व लेझर प्रिंटर हे सामान्य प्रशासन विभागाच्या दरकरार पत्रकानुसार देण्यात येते.

२.४४ क्रीडा स्पर्धांबाबत आमदारांची मागणी होती, फक्त राज्यस्तरीय स्पर्धा भरविण्यासाठीच ही परवानगी आहे परंतु सन्माननीय सदस्यांना त्यांच्या मतदारसंघातील गावांमध्ये असलेल्या मुलांसाठी काही तरी करावयाचे वेळेस शासनाच्या शासन निर्णयाची अडचण येते. असे समितीने नमूद केले असता शासनाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व स्तरावरील स्पर्धांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. यामध्ये विविध मान्यताप्राप्त संस्थांच्या वतीने, तालुका, जिल्हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा घेता येतील. यात विशेष करुन विधानपरिषद सदस्यांना मतदारसंघाबाहेरच्या स्पर्धांसाठी २ लाखाची मर्यादा ठेवलेली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांची मर्यादा फक्त दोन लाखांचीच आहे या दोन लाख रुपयांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचा खर्च कसा होऊ शकतो ? अशी विचारणा समितीने केली असता बऱ्याच वेळेस आमदारांची मागणी येत असते की, त्यांच्या मतदारसंघाच्या बाहेर क्रीडा स्पर्धा भरविण्यात येतात त्यासाठीच हा मार्ग काढलेला आहे. यामागचा हेतू एवढाच आहे की, या कार्यक्रमाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना सामान्य जनतेंपर्यंत जाणे सोईचे व्हावे. तसेच लोकांकडूनही आपल्याकडे मागणी येत असते त्यादृष्टीने आपल्याला काम करायचे असते, या पध्दतीने हा निर्णय घेण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये समितीला आणखी काही सुचवावयाचे असल्यास तसा वाव आहे. या बैठकीच्या निमित्ताने समितीच्या काही सूचना असतील तर त्यांचा नक्कीच विचार करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी यावेळी दिले.

२.४५ ठराविक मर्यादेत जर आमदारांचा स्थानिक विकास निधी खर्च केला नाही तर तो व्यपगत होतो, याबाबत नियोजन विभागाने काय विचार केला आहे ? अशी विचारणा केली असता आमदार व खासदार निधी हा व्यपगत न होण्याबाबत मागणी होती व प्रत्यक्षात गेल्या चार-पाच वर्षांपासून विभाग तसे करीत आला आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२.४६ एखाद्या सन्माननीय सदस्यांनी मतदारसंघात कोणती कामे घ्यावयाची याबाबतचे पत्र दिले नाही, त्यामुळे निधी खर्च झाला नाही अथवा पडून राहिला व तो व्यपगत झाला तर त्याबद्दल काही वाटत नाही. पण आमदारांच्या स्थानिक विकास निधीचा वापर समाज मंदिराच्या बांधकामासाठी, पिण्याच्या पाण्याची एखादी लाईन टाकण्यासाठी केला तर त्यामध्ये ऑब्जेक्शन येते. त्यात निधी खर्च होत नाही अथवा बीडीए सिस्टमबरोबर पैसे येण्यासाठी वेळ लागतो म्हणून समितीची मागणी अशी आहे की, अशा कामांसाठी जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेऊन तो निधी त्या त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडे वर्ग करावा किंवा ट्रेझरीकडे वर्ग करावा, जेणेकरुन हा पैसा व्यपगत होणार नाही असे समितीने सुचविले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या अनुषंगाने मागील तीन चार वर्षांपासून दोन प्रकारे निधी व्यपगत होतो. त्यात प्रामुख्याने निधीअभावी पुरवणी मागणीच्या माध्यमातून अतिरिक्त निधी विभाग उपलब्ध करुन देत आला आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर सन २००८-०९ चा व्यपगत झालेल्या २१.४३ कोटी निधी पुरवणी मागणीच्या माध्यमातून मंजूर करुन घेतला आहे.

२.४७ सदर २१.४३ कोटीची रक्कम कुठेतरी परवर्तीत (Reflect) झालीच असेल असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, राज्यात केंद्रशासनाच्या खासदार निधीसारखी परिस्थिती नाही. कारण निधी जर अर्थसंकल्पित केला आणि खर्च झाला नाही तर तो एक तर समर्पित होतो अथवा व्यपगत होतो. पण मागील तीन चार वर्षांपासून पुरवणी मागणीच्या माध्यमातून असा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सन २००९-१० मध्ये व्यपगत झालेल्या निधीची भरपाई म्हणून ५५.०४ कोटी एवढा निधी यावर्षीच्या पुरवणी मागणीच्या माध्यमातून मंजुरीसाठी ठेवलेला आहे. त्याचप्रमाणे सन २००९-१० च्या बाबतीत अजून दोन प्रकारच्या पुरवणी मागण्या घेण्यात आल्या. त्यात एक म्हणजे सुरुवातीला एक कोटी रुपये आपण उपलब्ध करुन दिले होते, त्यातून जी कामे सुरु होऊन ती अपूर्ण राहिली, त्यासाठी निधी देणे आवश्यक होते. त्यानुसार १२.३८ कोटीची एक पुरवणी मागणी आणि नव्याने निवडून आलेल्या आमदारांसाठी २५ लाख एवढा अतिरिक्त निधी देण्यात आला होता. त्या अनुषंगाने जो खर्च झाला त्यासाठी ४२.६५ कोटीच्या पुरवणी मागण्या घेतल्या. त्याचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले की, सुरुवातीला जी एक कोटीची रक्कम दिली होती त्यातून सुरु असलेल्या कामांसाठी आपण १२.६५ कोटी एवढी

रक्कम दिलेली आहे. जी कामे समर्पित झाली त्यासाठी पुरवणी मागणी घेतली नाही याचे कारण यावर्षी मतदारसंघ बदललेले आहेत. समर्पित झालेला निधी कोणत्या मतदारसंघासाठी द्यावा हा प्रश्न निर्माण झाला पण तीन चार मतदार संघांच्या बाबतीत माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाली होती. त्या बैठकीत असे ठरले होते की, जे मतदारसंघ पुनर्रचनेतही जसेच्या तसे राहिले त्यांच्यासाठी असलेली तरतूद तशीच ठेवावी. पण विघटन होऊन मतदारसंघ बदलले त्यांच्या भौगोलिक क्षेत्राचा विचार करुन वाढ करुन घ्यावी. माझगांव-शिवडी-भायखळा या मतदारसंघांमध्ये तेवढाच खर्च झालेला आहे.

२.४८ पुण्याच्या मतदारसंघात देखील बाजूच्या मतदारसंघातील ४० टक्के भाग अंतर्भूत झालेला असल्याने त्यांना ४० टक्के एवढाच हिस्सा देण्याची सूचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, पुण्याची माहिती घेतो. हा निर्णय जरी यावर्षी झालेला असला तरी विभागाकडून पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या नाहीत कारण मार्च महिन्यात पुरवणी मागण्या न ठेवता ३१ मार्च नंतर ठेवल्या तर पूर्ण वर्षभर खर्च करण्याची संधी मिळेल अशी आमदार महोदयांची मागणी होती.

२.४९ आमदारांचा हक्काचा निधी आहे तो परत जाता कामा नये. माननीय सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी आमदारांना विशेष निधी दिला जातो, त्यावेळेस विरोधी पक्षाच्या आमदारांना तो मिळाला नाही अशी चर्चा देखील झाली होती पण हा निधी टप्प्याटप्प्याने देणार असे म्हटले होते. पुण्यात मतदारसंघात पहिल्यांदा १.२५ कोटी एवढी रक्कम मिळाली होती, पुढचे १.२५ कोटी मिळालेच नाहीत त्यामुळे खर्च करता आले नाहीत. या निधीचा अंतर्भाव देखील विशेष निधी म्हणून केला पाहिजे. हा निधी सर्वच भागात सारखा असला पाहिजे. असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यासंबंधीची माहिती घेऊन शासनाकडे सादर करण्यात येईल. त्याचबरोबर मागील वेळेस महालेखापालांचा असा मुद्दा होता की, स्थानिक विकास निधी कसा व्यपगत होतो ? पण खासदार निधी तसा व्यपगत होत नाही. म्हणजे ज्या ज्या वर्षी जिल्हाधिकाऱ्यांनी निधी आहरित करुन ठेवला असे तो पुन्हा तिजोरीत भरुन ठेवावा लागत नाही आणि निधी कमी प्राप्त झाला तर तो नंतर देखील काढला जाऊ शकतो. समजा सन २००७-०८ चा निधी असेल तर तो नंतरच्या वर्षात सुध्दा घेता येतो. In our table, we are having the amount Rs.

246 cr as unspent amount. What is the reason behind non-utiliisation of fund? अशी विचारणा उप महालेखाकार यांनी केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,

२.५० Department will justify it to you. This amount was unspent in that year. But, it was carried forward in subsequent year. The fund was got utilised in the next year and now only Rs. 18 cr. are remaining to utilise.

२.५१ यावर महालेखापालांच्या म्हणण्यानुसार त्यांना कळविले असते तर हा मुद्दा उपस्थित झाला नसता. असे मत समितीने दर्शविले.

२.५२ या अनुषंगाने खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापन पाठविलेले आहे व त्यात ही भूमिका शासनाच्या वतीने स्पष्ट केली आहे, पण महालेखाकारांचे असे मत पडते की गतवर्षी निधी प्राप्त झाला नाही तर तो वेळोवेळी प्राप्त होत नाही. याबाबत उप महालेखाकार यांनी असे सांगितले की, The Hon'ble Member of Parliament gets the development fund of Rs. 2 cr. every year. When he spent Rs. 1 cr. fund then he will get the next installment of Rs. 1 cr. This is the procedure of M.P. fund. यावर समितीने असे मत प्रदर्शित केले की, The Planning department is saying that if the M.P. fund is not utilised fully in one year then it will be carried forward in the next year also. Until you spend the M.P. fund of Rs. 1 cr you will not get the second installment of Rs. 1 cr. Committee have difference of opinion on this issue. The Department had not submitted updated information to the office of A.G. about this particular point. Therefore, the balance amount of Rs. 246 cr. shown unspent in their table. If you informed them this updated information then there is no need to come this point before this Committee. Your officers are not reconcilling with the Office of A.G. from time to time. You have to regularly submit updated information to the office of A.G.. या निधीसंबंधी माननीय खासदारांनी लक्ष द्यावे एवढीच आमची मागणी आहे. त्याचप्रमाणे युटिलायझेशन सर्टिफिकेट सादर केले आणि एक कोटीच्या वर निधी शिल्लक असेल तर तो सगळा निधी येईपर्यंत व्यपगत होत नाही, एक खासदार गेला आणि दुसरा निवडून आला तरी देखील तो निधी व्यपगत होत नाही तीच परिस्थिती आमदार निधीची देखील आहे.

२.५३ याबाबत खुलासा करतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, नागपूरचे ५ कोटी शिल्लक राहिले आहेत. १४ व्या लोकसभेतील सन २००८-०९ मधील रकमेचा कुलाबा भागाचा एक हप्ता शिल्लक आहे, कोल्हापूर, सोलापूर आणि पुण्याचाही एक हप्ता शिल्लक आहे. जळगांव, पुणे, यवतमाळ या मतदारसंघांची माहिती संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून घेऊन आणि जर मतदारसंघ बसलले असतील तर त्यांच्या भौगोलिक क्षेत्राचा विचार करुन पुढे ओढून घेण्यासाठी हीच पध्दत अवलंबिण्यात येणार आहे. तसेच क्र. १ ते ९ साठी हा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्या १२.३८ कोटीमध्ये कर्जत-जामखेड, भुसावळ, लाखांदूर, कसबापेठ व इतर मतदारसंघांची माहिती घेऊन समितीला सादर करण्यात येईल.

२.५४ सन २००८-०९ मध्ये भुसावळ मतदारसंघामध्ये एकूण किती निधी शिल्लक होता ? पंचायत समित्यांची निवडणूक असल्यामुळे हा निधी वापरता आला नाही. त्यामुळे हा निधी पुढे घेण्यात यावा. असे समितीने सांगितले असता, दिनांक १८ जुलै २००९ रोजी व्यपगत झालेल्या निधीच्या संदर्भात शासन निर्णय काढण्यात आला आहे. २१.४२ कोटी रुपयाची पुरवणी मागणी करण्यात आली होती. २५.५२ लाख रुपये भुसावळ मतदारसंघाकरिता अंतर्भूत असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

२.५५ सन २००८-०९ मधील निधी सन २००९-१० मध्ये उपलब्ध करुन दिला जाईल. व या संदर्भात विभाग अधिक माहिती घेईल असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, पुरवणी मागण्यांमध्ये २५ लाख रुपयांचा निधी वर्ग करावा असे समितीने नमूद केले. यावर निधी शिल्लक असल्यास वर्ग केला जाईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी यावेळी दिले.

२.५६ अनेकदा लोकप्रतिनिधी जी विकासकामे देतात, तीच विकासकामे दुसऱ्या संस्थांकडून देखील दिली जातात. त्यामुळे सदर कामाकरिता दिलेला निधी रद्द केला जातो. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी येतात. तसेच एकाच कामासाठी स्थानिक विकास निधी व इतर संस्थेकडून देखील निधी घेतला जातो. या संदर्भात नियोजन विभागाकडे काही यंत्रणा आहे काय ? काही वेळेला एखादे काम करण्यासाठी रस्ता खोदल्यानंतर खाली महापालिकेची ४ इंच पाईपलाईन आहे, असे लक्षात येते. यामुळे शासनाचा निधी वाया जातो. या संदर्भात आपल्याकडे काही यंत्रणा आहे काय ? काही वेळेला रस्ता दुरुस्तीचे काम केले जाते, मात्र बजेटमध्ये रस्ता निर्मितीचे काम दाखविले जाते. अनेकदा कामाच्या संदर्भात जिल्हा परिषद व

महापालिका यांच्यामध्ये समन्वय नसतो. या सर्व बाबी डीपीडीसीच्या बैठकीमध्ये लक्षात आणून दिल्या पाहिजेत. एकच काम अनेक संस्थांकडून सुचविले जाते. अशा काही केसेस पुण्यामध्ये देखील घडल्या आहेत. काम आमदारांकडून होते मात्र त्या कामाकरिता निधी दोन्ही संस्थांकडून दाखविला जातो. लोकप्रतिनिधी व अधिकारी संगनमताने भ्रष्टाचार करतात असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले. अशा प्रकरणांची आपण कोठे तरी नोंद घेतली पाहिजे. शासनाचे कोटयवधी रुपये कोठे खर्ची पडतात, याचा पत्ता लागत नाही. या संदर्भात डीपीडीसीच्या बैठकीमध्ये लोकप्रतिनिधींनी अनेकदा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी त्यांना वेगवेगळी उत्तरे मिळाली नियोजन विभागाकडे याबाबत कोणती यंत्रणा आहे ? सदर बाब अतिशय गंभीर असून ही बाब समितीमार्फत राज्याच्या नियोजन विभागाला कळवावी लागेल. त्यांनी अशा प्रकारची प्रकरणे तपासली असे समितीने सांगितले असता, ग्रामीण भागामध्ये कामे करण्याबाबत यंत्रणा ठरलेली आहे. ओडीआर जिल्हापरिषदेमार्फत पूर्ण केले जातात. एमडीआर किंवा राज्य रस्ते राज्य शासनाकडून पूर्ण केले जातात. नगरपालिका क्षेत्रात ज्या संस्थांची मालकी असेल, त्यांच्याकडून कामे पूर्ण केली जातात. मात्र बरेचदा राज्य शासनाच्या संस्थेकडून कामे करुन घेण्यासाठी स्थानिक संस्थांकडून एनओसी घेतली जाते. म्हाडाकडून विकासकामे व्हावीत अशी मुंबईमध्ये मागणी असते. अशा वेळी मुंबई महानगरपालिकेकडून एनओसी घेतली जाते व कामे सुरु केली जातात असे स्पष्टीकरण विभागीय सचिवांनी दिले.

२.५७ विकास कामांकरिता महापालिका एनओसी देते. काही कामे नगरपालिकेच्या अंतर्गत असतात तर काही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत असतात. कामे करण्याकरिता प्रथम स्थानिक स्वराज्य संस्थांनी निधी खर्च केला पाहिजे. आमदाराने एखादे काम सुचविले असेल व तेच काम नगरसेवकाने देखील सुचविले असेल तर त्या कामावर खर्च करण्याची परवानगी प्रथम आमदाराला दिली पाहिजे. या संदर्भात विभागाने यंत्रणा निश्चित करुन एखादा शासन निर्णय काढावा तसेच काही वेळा दोन्ही यंत्रणेकडून एकाच कामासाठी पैसा खर्च केल्याचे दाखविले जाते असे मत समितीने व्यक्त केले असता, ज्या संस्थेची मालकी असते, त्यांनीच ते काम केले पाहिजे. दुसऱ्या यंत्रणेकडून काम करावयाचे असल्यास त्यांच्याकडून एनओसी घेणे आवश्यक असते. ज्या संस्थेची मालकी असते, त्यांना तेथे रस्ता झालेला आहे की नाही, याची माहिती असते. त्यामुळे यंत्रणेमध्ये दुहेरीकरण होऊ शकत नाही.

मात्र बोगस काम होत असेल तर कार्यवाही करणे आवश्यक आहे. अशी प्रकरणे समोर आली तर कडक कारवाई केली जाईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२.५८ मुंबई महापालिकेने ७०० कोटी रुपयांचा खर्च दाखवला मात्र तेवढया रकमेचे काम झालेले नाही. अपर वैतरणा प्रकल्प हे देखील अशाच प्रकारचे उदाहरण आहे. असे प्रकार थांबविण्यासाठी शासनाची यंत्रणा कार्यान्वित असली पाहिजे. चालू आर्थिक वर्षामध्ये रायगड जिल्हयामध्ये ज्या ठिकाणी मोठे रस्ते आहेत तेथेच वाडया, वस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचे काम हाती घेतले आहे. या कामांना नियोजन विभागाने कशी काय परवानगी दिली ? वाडीजोड रस्त्याची कामे स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हापरिषदेमार्फत सुचवावी, असा शासन निर्णय आहे. कोकणातील महत्वाकांक्षी विकास कामांसाठी २५० कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. खेडयामध्ये वाडया, वस्त्या कोठे आहेत हे स्थानिकांना चांगल्या प्रकारे माहीत असते. रायगड जिल्हयाच्या संदर्भात ज्या ठिकाणी एमडीआर आहे, तेथे वाडीजोड रस्ता होऊ शकतो काय ? तसेच वाडीजोड रस्त्याबाबतचा मूळ प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून, सीईओ यांच्याकडून यावयास हवा. शासनाने रस्त्यांकरिता २५० कोटी रुपयांचा विशेष निधी दिलेला आहे अशी माहिती समितीने सांगितली असता, सदर कामाबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेला असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. शासनाने १ कोटी रुपयांचा निधी निर्गमित केलेला आहे. पूर्वी १ किमी रस्त्यासाठी ५ लाख रुपये खर्च येत असे. आता त्याच कामासाठी १५ लाख रुपयांचा खर्च येतो. ग्रामीण भागामध्ये आमदार निधीमधून मोठया आजाराकरिता मदत करता येईल काय ? तसेच मोठया आजारांकरिता आमदार निधी व मुख्यमंत्री निधीमधून देण्यात येणाऱ्या निधीची मर्यादा १० ते १५ लाख रुपये आहे. सध्या रोगांची संख्या वाढत आहे. निरनिराळे साथीचे रोग वाढत आहेत मात्र त्या प्रमाणात मदतीची रक्कम वाढत नसल्याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

२.५९ वाळू उपसा करण्याच्या संदर्भात आता वाळूच शिल्लक राहिलेली नाही नसुन मागिल कामाच्या वेळी जी वाळू उपसा करण्यात आली, त्या कामाचा शिल्लक राहिलेला त्या वर्षातील निधी परत मिळालेला नसल्याचे समितीने सांगितले असता यासंदर्भात व्यपगत झालेला किंवा समर्पित झालेला निधी पुरवणी मागणी करुन पुढील वर्षापर्यंत देणार असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२.६० कामाला मुदत वाढवून देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, सद्य:परिस्थितीमध्ये सदर काम अपूर्ण असून ते काम पुढील वर्षी करावयाचे आहे. कामाला मुदत वाढ दिली जाते. त्यासंदर्भातील निधी समर्पित होतो किंवा व्यपगत होत असतो मिळालेला निधी ठराविक कालावधीत खर्चच करु शकत नाही, अशा निधीस समर्पित निधी आणि एखाद्या कामासाठी दिलेली रक्कम ठराविक कालावधीत काही प्रमाणात खर्च केली जाते व जी रक्कम शिल्लक राहते त्याला व्यपगत रक्कम म्हणतात असे स्पष्टीकरण विभागीय सचिवांनी केले.

अभिप्राय व शिफारशी

२.६१ जिल्हा वार्षिक योजना राबविताना निधी अभावी किंवा योजनेतील प्राथम्यक्रमा अभावी जी लहान -लहान लोकोपयोगी कामे रहातात अशी नावे स्थानिक लोकप्रतिनिधींना सुचविता येणे तसेच या कार्यक्रमांतर्गत शासनाची स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी व विधानपरिषद संस्थांना शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुरुप निधी देण्यात येतो.

२.६२ "खासदार / आमदार स्थानिक क्षेत्र विकास योजना" यासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस माहिती देताना असे सांगितले की, निधीचा योजनानिहाय वापर न झाल्यामुळे खासदारांच्या कामासंदर्भातील २०४ कोटी रुपये इतका केंद्रीय निधी कमी मिळाला आहे. सन २००९ पर्यंतची ही रक्कम होती. या रकमेपैकी अद्याप १८ कोटी बाकी आहे. उर्वरित रक्कम शासनास प्राप्त झाली आहे. **मुंबई दक्षिण, उत्तर इचलकरंजी कुलाबा, कोल्हापूर, नागपूर, पंढरपूर, पुणे, राजापूर, रामटेक, सोलापूर या भागांसाठी रु. १८ कोटी एवढा निधी अप्राप्त असल्यामुळे तेथील जनता या योजनेच्या फायद्यापासून वंचित राहीलेली आहे. त्यामुळे अखर्चित राहीलेला रुपये १८ कोटीच्या निधीचा लवकरात लवकर वापर करुन त्यासंबंधिची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

२.६३ खासदार निधी अखर्चित राहिल्यास तो पुढील वर्षी वापरण्यात येतो. तथापि आमदार निधी अखर्चित राहिल्यास तो पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येतो. मात्र विधानमंडळ सदस्यांचा हा आमदार निधी एखाद्या वर्षी अखर्चित राहिल्यास तो निधी पुढील वर्षी

त्वरित शासनाने उपलब्ध करुन द्यावा व यामध्ये कोणतीही दिरंगाई होणार नाही याची शासनाने दक्षता घ्यावी अशी समिती शिफारस करीत आहे. तसेच सद्य:स्थितीत आमदारांचा जो अखर्चित निधी आहे तो कोणकोणत्या मतदारसंघात आहे त्याची मतदारसंघनिहाय माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.६४ सन २००७-२००८ या वर्षाचा भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा नागरी अहवाल विधानमंडळात दिनांक १२.६.२००९ रोजी सादर केला. त्यासंदर्भातील ज्ञापने विधानमंडळास प्राप्त होण्याचा दिनांक १२.९.२००९ असा होता. ही ज्ञापने प्राप्त करण्यासाठी विधानमंडळाने चार ते पाच स्मरणपत्रे नियोजन विभागाला पाठवूनही समितीला कोणतेच उत्तर पाठविण्यात आले नाही. ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे प्रतिपादन करुन समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच **यासंदर्भातील माहिती महालेखाकार यांना देणे आवश्यक असून लोकलेखा समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. विधानमंडळाने जी स्मरणपत्रे पाठविली आहेत त्या पत्रावर संबंधित अधिकाऱ्यांनी काय कार्यवाही केली याची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी व या पत्राची दखल ज्या अधिकाऱ्यांनी घेतली नाही त्या अधिकाऱ्यांवर विभागाने कडक कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

२.६५ सन २००३-०४ साली राज्यसभा व लोकसभा सदस्यांचा खासदार निधी अंदाजित रुपये १४२ कोटी अपेक्षित होता. प्रत्यक्षात रुपये १३२ कोटी एवढाच निधी प्राप्त झाला. २००४-०५ या वर्षी रुपये १५० कोटीचा निधी अपेक्षित होता, प्रत्यक्षात रुपये १३२ कोटी प्राप्त झाला आहे. २००५-०६ या वर्षी रुपये १४८ कोटी निधी अपेक्षित होता, प्रत्यक्षात रुपये १२५ कोटी निधी प्राप्त झाला. २००६-०७ मध्ये रुपये १४६ कोटीचा निधी अपेक्षित होता, प्रत्यक्षात रुपये ९६ कोटीचा निधी प्राप्त झाला. २००७-०८ या वर्षी रुपये १४० कोटीचा निधी अपेक्षित होता, प्रत्यक्षात रुपये ३५ कोटी एवढाच निधी प्राप्त झाला. केंद्राकडून एकूण रुपये ७२६ कोटीचा निधी अपेक्षित होता, जिल्हाधिकारी यांचेकडे फक्त रुपये ५२१ कोटींचा निधी प्राप्त झाला. २०४ कोटीचा आकडा काढला आहे. **सदर रुपये २०४ कोटीचा निधी कमी प्राप्त झाला आहे. ज्या मतदार संघात हा निधी प्राप्त झाला नव्हता, त्या मतदार संघात तो आता खर्च केला आहे. त्यातील रुपये १८ कोटीचा निधी शिल्लक असल्याची माहिती विभागाच्या सचिवांनी**

समितीला दिली. २००५-०६ या वर्षी रुपये १४८ कोटी निधी अपेक्षित होता, प्रत्यक्षात रुपये १२५ कोटी निधी प्राप्त झाला. त्या वर्षाचा निधी जो शिल्लक होता तो समाविष्ट करुन सदर निधी वाढीव म्हणून दिसावयास पाहिजे होता. सदर वाढीव निधी का दाखविण्यात आला नाही याची माहिती तसेच सन २००७-०८, २००८-०९, २००९-१० या आर्थिक वर्षाच्या निधी संबंधीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

गृहनिर्माण विभाग

भारताचे नियंत्रक व लेखा परिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.४. - "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातील सोडतीचे (लॉटरी) आणि सदनिका वाटप पद्धतीचे माहिती तंत्रज्ञान लेखापरिक्षण", परिच्छेद क्र. ३.४.९.१ - "संगणकीय कार्यप्रणालीकडून अठरा वर्षाखालील अर्जदार शोधून काढले जात नव्हते", परिच्छेद क्रमांक ४.२.२ - "जमिनीचा अनधिकृत ताबा आणि भाडे पट्टा अधिमुल्याची ना वसुली" व परिच्छेद क्रमांक ४.२.५ - "दुय्यम दर्जाच्या कामामुळे नुकसान" यासंदर्भात महालेखाकारांनी खालील प्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

व्यवस्था विकसन

३.१ संगणकीय प्रणाली कार्यक्रमास व्यवस्था विकसनाच्या त्रुटींची खात्री करुन घेण्यासाठी त्यातील सर्व स्तरांमधून, जसे कि वापर करण्याच्या आवश्यकता, व्यवस्थेच्या आवश्यक चाचण्या आणि अंमलबजावणी यातून जावे लागते आणि व्यवस्था विकसनाच्या वेळी त्रुटींची दुरुस्ती करावी लागते तसेच कार्यक्रमात सर्व व्यावसायिक नियम समाविष्ट असणे आवश्यक असते.

एन.आय.सी. कडून विकसित केल्या गेलेल्या "अर्जाचा नमुना" आणि "पणन सेल" ह्या प्रणाल्यांना आणि जून २००६ मध्ये मे व्हिजीग्राफीक्स यांचेकडून वाढीव कार्यक्रमासह आणि सुरक्षा वैशिष्टयांसह विकसित केल्या गेलेल्या नवीन सोडत व्यवस्थापन व्यवस्थेस पद्धति विकसनाच्या वेगवेगळया स्तरांसंबंधीत कोणताही दस्तऐवज नव्हता.

उत्तरादाखल, उपमुख्य अभियंता, संगणक सेल, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी असे म्हटले कि (एप्रिल २००८) "अर्जाचा नमूना" आणि "पणन सेल" प्रणाल्यांच्या बाबतीत एन.आय.सी. या संस्थेकडून दस्तऐवज तयार करण्यात आले नव्हते आणि सोडत व्यवस्थापन व्यवस्था ह्या कार्यक्रमाचे आकारमान आणि त्याची गुंतागुंत अत्यंत अल्प असल्यामुळे सिस्टम डेव्हलपमेंट लाईफ साईकलची (SDLC) गरज भासली नव्हती.

तरी सत्य हे तसेच राहते कि योग्य पुरेशा दस्तऐवजाने आधारीत पद्धतशीर व्यवस्था विकसन न अनुसरल्यामुळे व्यवस्थेमध्ये सर्व व्यावसायिक नियम प्रवेशित झाले नव्हते, विकसित झालेल्या प्रणालीमध्ये त्रुटी राहिल्या होत्या आणि प्रणालीच्या कार्यांमधील अंतर्भूत सत्यता

उपल्बध होत नव्हती ज्यामुळे कोणत्याही आणीबाणीच्या प्रकरणी व्यवहाराचे सातत्य टिकवून धरणे शक्य झाले असते.

कार्यप्रणाली विकसीत करण्याच्या प्रक्रियेत सॉफ्टवेअरची गरज असते. ओळख प्रक्रिया, चाचणी आणि अंमलबजावणीची खात्री केली की सर्व बाबी कार्यप्रणाली विकसीत करतेवेळी व्यवस्थीत आहेत व सर्व व्यवसायिक नियम सॉफ्टवेअरमध्ये आहेत याची खात्री केली जाते. ॲप्लीकेशन फॉर्म आणि मार्केटिंग सेल हे सॉफ्टवेअर एनआयसी ने विकसीत केले आहेत. नविन लॉटरी व्यवस्थापन कार्यप्रणालीमध्ये काही सुरक्षाविषयक बाबी विचारात घेऊन मे.व्हिजीग्राफीक्स या कंपनीने जून २००६ मध्ये विकसीत केले होते त्यात सिस्टीम विकसीत करण्याच्या प्रक्रियेतील डॉक्यूमेंटशी काही संबंध नाही. याला उत्तर म्हणुन उपमुख्य अभियंता संगणक कक्ष म्हाडा यांचे (एप्रिल २००८) मध्ये अर्जाचा नमुना आणि मार्केटिंग सेलचा नमुना तयार केला नव्हता. नविन लॉटरीच्या व्यवस्थापन कार्यप्रणालीचा आकार आणि गुंतागुंत कमी होती म्हणुन सिस्टीम डेव्हल्पमेंट लाईफ सायकल विकसीत करण्याची आवश्यकता भासली नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, सिस्टीम विकसीत करण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार योग्य ते डॉक्यूमेटेशन आले नाही. तसेच सर्व व्यवसायीक नियम सिस्टीममध्ये घेतले गेले नाहीत. अर्ज नमुना विकसीत करताना त्यात त्रृटी होत्या आणि तात्काळ परिस्थितीमध्ये अर्ज नमुन्याच्या कार्यपद्धतीत व्यवसायिक नियम टाकणे शक्य नव्हते.

ज्ञापन :-

३.२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

म्हाडाचे व्यवसायीक नियमांनुसार आवश्यकतेनुसार सुरक्षिततेची वैशिष्टये लॉटरी विषयक सॉफटवेअर विकसीत करण्याच्या टेंडरमध्ये जून २००६ मध्ये नमूद करण्यात आले होते. कॅग यांनी दिलेल्या सूचनांनुसार अतिरिक्त enhancement functionalities सुरक्षा विषयक वैशिष्टे सॉफ्टवेअरमध्ये अंतर्भूत करण्यात आली होती. (अपवाद SDLC). सदर सॉफ्टवेअर हे NITIE (NATIONAL INSTITUTE OF INDUSTRIAL ENGINEERING) मुंबई यांचेकडून प्रमाणित करुन घेतले होते. लॉटरीचा नियोजीत ड्रॉ १९ मे २००९ TCS (TATA

CONSULTANCY SERVICES) कडून सॉफ्टवेअर प्रणालीचे ऑडीट करुन घेण्यात आले होते.

"संगणकीय कार्यप्रणालीकडून अठरा वर्षाखालील अर्जदार शोधून काढले जात नव्हते"

३.३ कार्यन्वयीत असलेल्या विनियमानुसार कोणत्याही सदनिकेसाठी १८ वर्षाखालील व्यक्ति अर्ज करण्यास पात्र होत नव्हती. मूळ माहितीच्या छाननीतून असे आढळले कि जून २००५ मध्ये काढलेल्या सोडतीमध्ये १८ वर्षाखालील चार अर्जदारांचा विचार केला गेला होता. त्यापैकी एक जण यशस्वींच्या यादीत आणि एक जण प्रतिक्षाधीन यादीत असे होते. जूलै २००६ मध्ये घेतलेल्या सोडतीमध्ये अशा तऱ्हेच्या ३१८ अर्जदारांचा विचार केला गेला होता ज्यापैकी २६ यशस्वी होते आणि २८ प्रतिक्षाधीन यादीत होते.

संचालक पणन, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी असे म्हटले कि (जुलै २००८) सदनिकांचे वाटप अर्जदारांच्या अर्जांची छाननी केल्यानंतरच करण्यात आले होते आणि असे लक्षांत आले होते कि सर्व अर्जदार १८ वर्षाहून मोठे होते.

ह्यातून असे दिसते कि व्यवस्थेमधील मूळ माहिती सोडतीसाठी वापरण्यापूर्वी प्राधिकृत करण्यात आली नव्हती.

ज्ञापन :-

३.४ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, प्रत्यक्ष गाळ्यांचे वितरण होताना अर्जदाराच्या अर्जाची पूर्णत: छाननी केली जाते व अर्जदार १८ वर्षे पूर्ण केलेला आहे की नाही याची खात्री केली जाते. कॅग यांच्या शेऱ्यास अनुसरुन १९ मे २००९ च्या लॉटरीसाठी माहितीची नोंद बँकेकडून करुन घेतली होती आणि त्यात १८ वर्षापेक्षा कमी वयाचे अर्जदार शोधून त्यांना लॉटरीपूर्वीच अपात्र ठरविण्यात आले होते.

जमिनीचा अनधिकृत ताबा आणि भाडे पट्टा अधिमुल्याची ना वसुली

३.५ महाराष्ट्र गृह निर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाचा घटक असलेल्या मुंबई गृह निर्माण आणि क्षेत्र विकास मंडळाने माध्यमिक शाळेसाठी राखीव ठेवलेला ५९२९.४० स्क्वे.मी.भूखंड वांद्रे नागरीक शिक्षण संस्थेस माध्यमिक शाळा बांधण्यासाठी भाडेपट्टयाने देण्याचे ठरविले (एप्रिल १९७८). ३० वर्षाकरीता असलेला भाडेपट्टा विलेख ऑक्टोबर १९८४

मध्ये करण्यात आला. जमिनीचा प्रत्यक्ष ताबा जानेवारी १९८५ मध्ये देण्यात आला. भाडेपट्टा विलेखाच्या कलम १ (४) नुसार, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय जमीन पोटभाड्याने देणे कि जमिनीचा ताबा हस्तांतरीत करणे ही बाब मान्य नव्हती. तसेच कराराच्या कलम ४ नुसार मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण भाडेपट्टा विलेख रद्द करून जमिनीचा व त्यावरील इमारतीचा ताबा घेऊ शकते. वांद्रे नागरीक शिक्षण संस्थेने इंडियन एज्युकेशन सोसायटीशी शिक्षण क्षेत्रामध्ये वाहून घेतलेली दुसरी एक संस्था, नोव्हेंबर १९८७ च्या करारान्वये एक सहकार्य करार केला परंतू त्याकरिता मंडळ किंवा प्राधिकरण यांची संमती घेण्यात आली नव्हती. इंडियन एज्युकेशन सोसायटीने त्या जमिनीवर मंडळ किंवा प्राधिकरण यांची परवानगी न घेता एक बहुमजली इमारत बांधून त्या ठिकाणी वास्तुशास्त्र आणि व्यवस्थापन महाविद्यालये स्थापित केली, हि बाब सुरूवातीच्या उद्दीष्टापलीकडील होती आणि इमारतीचा काही भाग व्यावसायिक उपयोगाकरीता खाजगी व्यक्तिस भाडयाने देण्यात आला होता. ह्या व्यवहाराबद्दलची माहिती मंडळास, जेव्हां इंडियन एज्युकेशन सोसायटीने सदर भुखंड त्याच्या नांवे हस्तांतरीत करून देण्यासंबंधात मंडळास भेट दिली, तेव्हां झाली (नोव्हेंबर १९९७). तरी सुद्धा प्राधिकरणाने भाडेपट्टा करारांतील तरतुदीनुसार वांद्रे नागरीक शिक्षण संस्थेबरोबरील भाडे पट्टा रद्द करून जमिनीचा आणि त्यावरील इमारतीचा ताबा परत घेतला नव्हता. त्याऐवजी, प्राधिकरणाच्या कायदेशीर सल्लागाराने वांद्रे नागरीक शिक्षण संस्थेने वाटप कराराच्या अटींचा भंग केला आहे हे मान्य करत फेब्रुवारी २००२ मध्ये असा सल्ला दिला कि इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या च्या नांवे झालेले वाटप नियमित करावे. त्यानुसार, प्राधिकरणाने जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेतल्या वेळेपासून (जानेवारी १९८५) इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या नांवे झालेले भुखंडाचे वाटप नियमित करण्याचा निर्णय जानेवारी २००४ मध्ये घेतला. त्यांनी ह्यांकरीता वास्तुशास्त्र आणि व्यवस्थापन महाविद्यालयांसाठी जमिनीच्या वापरलेल्या क्षेत्रांकरीता बाजारभावापेक्षा ५० टक्के जादा भाव वसूल करण्याची अट घातली, जी वांद्रे नागरीक शिक्षण संस्थेस भुखंड देताना मूळ वाटप अटींमध्ये समाविष्ट केलेले नव्हती. मंडळाने इंडियन एज्युकेशन सोसायटीकडे रु.१२.७५ कोटी इतक्या रकमेची मागणी केली (नोव्हेंबर २००५) ज्यामध्ये भाडेपट्टा अधिमुल्य, भाडे आणि

दंड ह्या बाबींचा समावेश होता. तथापि, इंडियन एज्युकेशन सोसायटीने सदर रक्कम न देता भुखंडाचा ताबा स्वत:कडेच अनधिकृतपणे ठेवणे चालू ठेवले होते (मार्च २००८).

गृहनिर्माण विभागाच्या सचिवांनी प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना इंडियन एज्युकेशन सोसायटीचे ह्याबाबतीतले त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास सांगितले होते (नोव्हेंबर २००६). परंतु ह्या बाबतीत कोणतीही कारवाई मार्च २००८ अखेरपर्यंत करण्यात आली नव्हती.

ह्याप्रमाणे, वांद्रे नागरिक शिक्षण संस्थेकडून भूखंड वाटपासंबंधातील असलेल्या अटींचे पालन होत आहे कि नाही ह्यावर संनियंत्रण आणि खात्री करुन घेण्याबाबत आणि त्यानंतर भाडेपट्टा रद्द करुन जमीन व त्यावरील इमारतीचा ताबा घेण्याबाबत प्राधिकरणास आलेल्या अपयशामुळे इंडियन एज्युकेशन सोसायटीकडून भूखंड वाटपाच्या वेळी मूळ करारनिविष्ट असलेल्या हेतूव्यतिरिक्त इतर हेतूसाठी वापर चालू ठेवण्यात आला होता. शिवाय, ह्या प्रकरणी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून निर्णय घेण्यास झालेला विलंब आणि त्यानंतरची न झालेली कारवाई ह्यामुळे इंडियन एज्युकेशन सोसायटीकडून मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या जमिनीचा अनधिकृत उपयोग चालू राहिला होता. महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण इंडियन एज्युकेशन सासायटीकडून भूखंडाचा अनधिकृत ताबा ठेवण्याकरीता भाडेपट्टा अधिमुल्य (रु.०.३९ कोटी), भाडे (रु.१२.१८ कोटी) आणि दंड (०.१८ कोटी) या पोटी रु.१२.७५ कोटी रकमेची वसुली झाल्याची खात्री करुन घेण्यातही अपयश आले होते. ह्या येणे रकमेवर कर्जावरील चालू शासकीय दरानुसार व्याजापोटी रु.१.५३ कोटी इतके मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास नुकसान झाले होते.

ही बाब मे २००८ मध्ये शासनाच्या सचिवास कळविण्यात आली होती. उत्तर आले नव्हते (ऑगस्ट २००८).

ज्ञापन :-

३.६ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, वांद्रे रेक्लमेशन, वांद्रे-प, येथे सुमारे ६०००.०० चौ.मी. क्षेत्रफळाचा माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेला भूखंड सन-१९८५ मध्ये वांद्रे नागरीक शिक्षण संस्थेस वितरीत करण्यात आला होता. २. वांद्रे नागरीक शिक्षण संस्थेने

मंडळाच्या पूर्व परवानगीशिवाय, इंडियन एज्युकेशन सोसायटीस विकासासाठी भूखंड हस्तांतरीत केला होता. या दोन्ही संस्थांमध्ये दि.१९/११/८७ रोजी करारनामा झालेला आहे. ३. वांद्रे नागरीक शिक्षण संस्थेस हा भूखंड माध्यमिक शाळेसाठी सवलतीच्या दराने (फक्त भूईभाडे) वितरीत केलेला होता. हा भूखंड इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या नावे नियमितीकरण करण्याबाबतची बाब प्राधिकरणासमोर सादर करण्यात आली होती. प्राधिकरणाने याबाबत ठराव क्र.६००६,दि.०९/०१/०४ अन्वये खालील अटी व शर्तींवर नियमित करण्याचा निर्णय घेतला. (अ) वांद्रे नागरीक शिक्षण संस्थेला शाळेच्या भूखंडाचे केलेले वितरण रद्द करुन, सदर भूखंड इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या नावे दि.१९/०१/८५ या ताबा दिनांकापासून नियमित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. उक्त ठरावान्वये घेतलेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे इंडियन एज्युकेशन सोसायटीकडून अधिमुल्य व भूईभाडे वसुल करणे आवश्यक आहे. (ब) शाळेच्या भूखंडासाठी प्राधिकरणाच्या आजच्या प्रचलित धोरणानुसार अधिमुल्य व त्यावर भूईभाडे आकारावे, प्राधिकरणाच्या किंमतविषयक धोरणानुसार अधिमुल्य व अद्ययावत केलेला विकास खर्च, यावर आधारीत दरावर अधिमुल्य व या अधिमुल्यावर १% येणाऱ्या वार्षिक भूईभाडयाचे भांडवलीकरण करून येणारी रक्कम आकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. (क) आर्किटेक्चरल कॉलेज व मॅनेजमेंट कॉलेज या उपयोगासाठी वापरण्यात येणाऱ्या क्षेत्रफळासाठी, भूखंडाच्या आजच्या बाजारमुल्याप्रमाणे येणाऱ्या ५०% अधिमुल्य व २.५% भूईभाडे आकारावे. (ड) दंडनीय रक्कम म्हणून अधिमूल्य रक्कमेच्या १.५ पट इतकी रक्कम आकारणे. दि.१३.०८.०९ अन्वये संस्थेने सारांशाने अशी विनंती केली आहे की, वांद्रे रेक्लमेशन येथील शाळेकरीता आरक्षित असलेला भूखंड नियमितीकरण करण्याबाबत अधिमुल्य व इतर रक्कमेपोटी आकारलेली रु.१२,१८,२३,३२२/- ही रक्कम योग्य नसून, संस्थेच्या वतीने असा युक्तीवाद करण्यात आला की, प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार अर्जात नमूद असल्यानुसार रक्कम आकारणे योग्य होते. याबाबत सचिव, गृहनिर्माण यांचेसोबत चर्चा झाली. त्यानुसार संस्थेची बाजू ऐकून घेण्यात आली. तसेच, सभापती/मुंबई मंडळ यांच्या दालनात अधिमूल्याबाबत बैठक झाली. संस्थेने असा युक्तीवाद केला की, त्यांच्या विनंती अर्जानुसार या प्रकरणी कार्यवाही करण्यात यावी. कारण अधिमूल्य व आकारलेली इतर रक्कम योग्य नसून, संस्थेवर अन्याय आहे. बैठकीत अधिमूल्याबाबत असलेल्या धोरणानुसार प्रकरण तपासण्यात

येईल असे मंडळामार्फत प्रतिपादन करण्यात आले व खालील अटी संस्थेस लागू राहतील असे सुचित करण्यात आले. १) ५ टक्के आरक्षित जागा मुंबई मंडळ/म्हाडात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात येतील. मात्र, सर्व शिक्षणक्रमांसाठी विहित केलेल्या मुदतीत कर्मचाऱ्यांनी आपल्या पाल्यांचे अर्ज विहीत नमुन्यात व विहीत मुदतीत संस्थेकडे सादर करावेत असे संस्थेच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी प्रतिपादन केले. २. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर व मॅनेजमेंट कॉलेज करीता शिक्षण विभागाच्या नियमानुसार मॅनेजमेंटकरीता प्राप्त होणाऱ्या कोटयातुन ५५ जागा मुंबई मंडळ/म्हाडाच्या सेवेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार व नियमानुसार शुल्क आकारुन राखून ठेवण्यात येतील. मात्र, सर्व विहित केलेल्या मुदतीत कर्मचाऱ्यांनी आपल्या पाल्यांचे अर्ज विहित नमुन्यात व विहीत मुदतीत संस्थेकडे सादर करावेत असे संस्थेच्यावतीने पदाधिकाऱ्यांनी प्रतिपादन केले. ३) वाणिज्य प्रयोजनार्थ वापरात असलेल्या क्षेत्रापासून प्राप्त होणाऱ्या निव्वळ नफ्यामधून २५ टक्के रक्कम संस्था मुंबई मंडळ/म्हाडाकडे वर्षांतुन एकदा वर्ग करण्यास तयार आहे. सदर रक्कम लायसन असलेल्या लेखापरिक्षकाकडून तपासून अंतिम करुन येणारी रक्कम भरणा करण्यात येईल. प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार अधिमूल्याची रक्कम तपासण्यात आली असून, पूर्वी निश्चित करताना वापरलेली धोरणे व प्रकरण तपासून या प्रकरणी लागू होणारी धोरणे यामधील फरक दर्शविण्याकरीता परिशिष्ट-अ म्हणून जोडला आहे. परिशिष्ट-अ नुसार दर्शविण्यात आलेले क्षेत्र, अधिमूल्याचा दर, शाळेकरीता आरक्षित असलेल्या भूखंडाच्या वितरणाकरीता असलेली धोरणे आणि वि.नि.नि.१९९१ मधील कलम ३३[२] नुसार प्राप्त होणाऱ्या अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाकरीता आकारण्यात येणारे ना हरकत प्रमाणपत्र शुल्क याबाबतची आकडेमोड परिशिष्ट-ब मध्ये नमूद केले आहे. यानुसार संस्थेस सुधारित अधिमूल्य व इतर रक्कम रु.२,२३,९५,७९५/- पत्र दि.२३.०२.१० अन्वये कळविण्यात आली आहे. संस्थेने रक्कम रु.१७,५५,५४०/-, पावती क्र.३६४५८१, दि.२५.०५.०९ अन्वये व रक्कम रु.२,०६,४०,२५५/-, पावती क्र.३६७६०७, दि.२३.०३.१० अन्वये भरणा केली आहे.

"दुय्यम दर्जाच्या कामामुळे नुकसान"

३.७ इमारत बांधकाम अननुभवी कंत्राटदारास दिल्यामुळे आणि काम चालू असताना बांधकामाच्या गुणात्मकतेची खात्री करुन न घेतल्यामुळे दुय्यम दर्जाचे बांधकाम झाले आणि परिणामी गाळ्यांची किंमत कमी झाल्यामुळे रु.६३.२१ लाख इतक्या रकमेचा तोटा झाला.

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रीय विकास प्राधिकरणाच्या घटक असलेल्या औरंगाबाद, गृह विभाग आणि क्षेत्रीय विकास मंडळाने लातुर जिल्ह्यातील गुमास्ता सहकारी गृहनिर्माण संस्थेकरीता अल्प उत्पन्न गटासाठी रु.६८.९५ लाख किंमत असलेल्या १०० सदनिकांचे बांधकाम केले (डिसेंबर २००१). करारनिविष्ट सहा महिन्याच्या कालावधीमध्ये प्रकल्प पूर्ण करण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सुचनांचे पालन करण्याच्या हेतूने निविदा मागविण्याची विहित पध्दत बाजूला सारण्यात आली होती. सदर कामाची १० भागांत विभागणी करुन सार्वजनिक बांधकाम सर्कल, उस्मानाबादच्या अधिक्षक अभियंताच्या शिफारशीनुसार सदर काम अंदाजित खर्चामध्ये अननुभवी नोकरीत नसलेल्या अभियंत्यांना थेट पध्दतीने देण्यात आले होते. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या किंमत ठरविण्याच्या धोरणानुसार प्रत्येक सदनिकांचे विक्री किंमत रु.८४,६६५ अशी ठरविण्यात (फेब्रुवारी) आली होती.

प्रति गाळा रु.२८,२९० ची सुरुवातीची अदायगी घेऊन संस्थेच्या सदस्यांकरीता सदनिकांचे वाटप करण्यात आले होते (मार्च २००२). शिल्लक रक्कम (रु.६०,००० प्रति सदनिका) १३.५ टक्के दराचे कर्ज म्हणून समजण्यात आले होते. ज्याची परतफेड रु. ९०० मासिक हप्त्याने १४ वर्षामध्ये करावयाची होती.

मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या अभिलेख्यांची तपासणी केली असता (एप्रिल २००८) असे आढळून आले की, संस्थेच्या बहुतांश सदस्यांनी गाळ्यांचा ताबा घेतल्यानंतर मासिक हप्ते देण्याचे बंद केले होते. जानेवारी २००५ मध्ये संस्थेच्या सदस्यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली की, सदनिकांचे बांधकाम निकृष्ट व दुय्यम दर्जाचे होते आणि म्हणून सदनिकांची किंमत कमी करण्याविषयी ही विनंती केली होती.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दक्षता शाखेने सदनिकांचे गुणात्मकतेमध्ये संशोधन केले आणि अशा निष्कर्षाप्रत आले कि काम चालू असताना कार्यकारी अभियंता, उप अभियंता आणि कनिष्ट अभियंता कामाच्या गुणात्मकतेची खात्री करुन घेण्यामध्ये

कमी पडले होते. त्यांनी अशीही शिफारस केली होती ही प्रशासनाने त्यांच्या विरोधात योग्य ती कारवाई करावी. तथापि, ह्या कोणत्याही अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती (ऑगस्ट २००८).

संस्थेच्या सदस्यांच्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने गृह विभागाच्या प्रधान सचिवांनी एक बैठक बोलावली होती, ज्यामध्ये एक वेळ समझोता म्हणून सदनिकांचे किंमत कमी करण्याचे ठरविले होते. त्यानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने अगोदरची फेब्रुवारी २००६ मध्ये वसुलीयोग्य प्रति सदनिका ठरविलेल्या रु.१,२०,५०० विक्री किंमतींच्या ऐवजी प्राधिकरणाच्या किंमत धोरणानुसार प्रति सदनिका रु.५७,२८६ अशी विक्री किंमत निश्चित केली.

ह्याप्रमाणे, अननुभवी कंत्राटदारांकडून इमारतीचे बांधकाम करुन घेणे आणि काम चालू असताना कामाच्या गुणात्मकतेची खात्री करुन न घेणे ह्या कारणांमुळे काम दुय्यम दर्जाचे झाले होते. परिणामी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांस रु. ६३.२१ लाखाचा तोटा सहन करुन सदनिकांची किंमत कमी करावी लागली होती.

ही बाब शासनाच्या सचिवास मे, २००८ मध्ये कळविण्यात आली होती. उत्तर आले नव्हते (ऑगस्ट २००८).

ज्ञापन :-

३.८ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृहनिर्माण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, लेखा परिक्षण परिच्छेदात नमूद केलेल्या बाबीसंबंधी खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१) सदर योजनेतील गाळे १.३.२००२ पासून संबंधित लाभधारकांना वाटप करण्यात आलेले आहेत. गाळे वाटपाच्या वेळेस एकाही गाळेधारकांनी गाळयाच्या बांधकामाच्या गुणवत्तेबद्दल तक्रार केलेली नाही. गाळे वाटपानंतर तीन वर्षापर्यंत संबंधित गाळेधारकांनी त्यांना म्हाडाने उपलब्ध करुन दिलेल्या कर्ज रकमेच्या भाडेखरेदी मासिक हप्त्याची रक्कम म्हाडाकडे भरली नाही. त्यामुळे मासिक भाडेखरेदी हप्त्याच्या थकीत रकमेची वसूली करणेसाठी जेव्हा मंडळाने त्यांना सूचना पत्र दिले. तेव्हा केवळ वसूलीचे सूचनापत्र दिल्यामुळे त्यांनी कामाच्या गुणवत्तेबद्दल तक्रारी केल्या.

२) सदर योजनेचे बांधकाम विहित कालावधीतच पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामाचे तुकडे पाडून सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना काम देणेबाबत महाराष्ट्र शासनाने निर्धारित केलेल्या नियमानुसारच सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना काम वाटप करण्यात आले. त्यामुळे अननुभवी अभियंत्यांना काम दिले असे होत नाही.

३) जेव्हा गाळेधारकांनी तथा गुमास्ता सहकारी संस्थेच्या सभासदांनी गाळयांच्या बांधकामाच्या गुणवत्तेबद्दल तक्रारी केल्या, तेव्हा जनमानसात म्हाडाची प्रतिष्ठा कायम राखण्याच्या हेतूने गाळेधारकांच्या तक्रारीनुसार दुरुस्त्या करण्यासाठी रु.११,७१,४३७/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घेण्यात आली. सदर दुरुस्त्यासाठी होणारा खर्च गाळयांच्या विक्री किंमतीमध्ये अनपेक्षित दायित्वासाठी ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्याचे ठरले.

४) सुरूवातीला सदर योजनेतील गाळयांची अंदाजित विक्री किंमत रूपये ७६,१००/- एवढी घोषित केली होती. तथापि, योजनेचे बांधकाम चालू असतांना संबंधित लाभार्थी तथा गुमास्ता संस्थेच्या सभासदांच्या मागणीच्या अंदाजपत्रकात तरतूद नसलेल्या अतिरिक्त बाबींचे काम करावे लागले. त्यामुळे सदर कामासाठी खर्च झालेल्या रकमेचा विक्री किंमतीत अंतर्भाव तसेच काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष झालेल्या खर्चावर फेब्रुवारी २००२ पर्यंत व्याज भांडवलीकरणामुळे गाळयाच्या किंमती गाळे वाटपाच्या वेळेस रूपये ८४,६६५/- झाली.

गाळेधारकांनी केलेल्या तक्रारीनुसार गाळयांच्या दुरूस्तीसाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.११,७१,४००/- मध्ये रुपये ६,१८,३६०/- (प्रति गाळा रुपये ६,१८४/-) ही रक्कम निविदा तरतुदीशिवाय कराव्या लागणाऱ्या वॉटर प्रूफींग या नवीन बाबींसाठी होती. सदर वॉटर प्रूफींगसाठीची बाब मूळ कामाच्या निविदेत अंतर्भूत नव्हती. त्यामुळे सदर बाब गाळयाच्या दुरूस्ती अंतर्गत येत नाही.

जेव्हा गाळयाची दुरूस्ती करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले तेव्हा गाळेधारकांनी गाळयाची दुरूस्ती न करता दुरूस्तीसाठी लागणारा खर्च गाळे वाटपाच्या वेळेस निश्चित केलेल्या गाळयांची किंमत रू.८४,६६५/- मधून वजा करून गाळयाची किंमत कमी करून देण्याची मागणी केली, तेव्हा सदर किंमतीतून केवळ दुरूस्तीसाठी लागणारा खर्च वजा करून

(रूपये ८४,६६५-रूपये ११,७१४ रूपये ६,१८४/-) कमी झालेली किंमत रूपये ७९,१३५/- प्रति गाळा परिगणित व्हावयास पाहिजे होती. सदर परिगणनाप्रमाणे कमी झालेल्या किंमतीनुसार एकूण रक्कम रू.५.५३ लक्ष रकमेचा तोटा झाला असता.

तथापि, प्राधिकरणाच्या ११२ व्या बैठकीत झालेल्या चर्चेवरून असे दिसून येते की, योजनेतील गाळेधारक गरीब असल्याने गाळे बांधण्यासाठी झालेल्या मूळ किंमतीतून दुरूस्तीसाठीची एकूण अंदाजपत्रकीय रक्कम वजा करून गाळयाची विक्री किंमत कमी करावी असे प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी सुचविल्यामुळे मूळ बांधकाम किंमतीतून फक्त दुरूस्तीसाठीचा खर्च वजा न करता वॉटर प्रूफींग या नवीन बाबीसाठीचा खर्चसुद्धा वजा करून गाळयाची किंमत कमी केली. परिणामी तोटयाच्या रकमेत वाढ झाली.

तसेच तोटयाची रक्कम परिगणीत करताना कमी केलेली किंमत ही दि.३१.१.२००६ पर्यंत व्याज भांडवलीकरण करून येणाऱ्या गाळयाची किंमत रू.१,२०,५००/- मधून वजा करून तोटयाची रक्कम परिगणित केली असल्याचे दिसून येते. जे योग्य नसून तोटयाच्या रक्कमेत वाढ होण्यास कारणीभूत आहेत.

असे असले तरीही गाळयाची कमी केलेली विक्री किंमत ही म्हाडाने ठराव क्र.६१५८ अन्वये मंजूर केली असून विक्री किंमत कमी केल्यामुळे जो काही तोटा झाला तो म्हाडास झालेला तोटा म्हणून उक्त ठरावात विचारात घेण्यात आला आहे. सदर ठरावामध्ये या तोटा रकमेची वसूली करण्यासंबंधी काहीही नमूद केलेले नसून सदर रक्कम अनपेक्षित दायित्वाखाली टाकण्यात आली आहे, जी वसूल करण्यायोग्य नाही.

साक्ष :-

३.९ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.४.७ - "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातील सोडतीचे (लॉटरी) आणि सदनिका वाटप पध्दतीचे माहिती तंत्रज्ञान लेखापरीक्षण" या संदर्भात विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दिनांक ०६ जूलै, २०११ रोजी प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली. सदर बैठकीत उक्त परिच्छेदाबाबत अधिक माहिती देतांना विभागीय सचिवांनी समितीला सांगितले की, सदर परिच्छेद हा म्हाडात सन २००५-०६ मध्ये केलेल्या लॉटरी प्रक्रियेमध्ये आढळलेल्या

उणिवासंदर्भातील आहे. त्यावेळी लॉटरी प्रक्रियेमध्ये जी प्रक्रिया अनुसरली गेली. (फॉलो केली), त्या अनुषंगाने प्रत्यक्षात वाटप प्रक्रिया अनुसरण्यात आली. महालेखापरीक्षकांकडून सदर लॉटरी प्रक्रियेसंदर्भात काही उणीवा दाखवून देण्यात आल्या. त्या उणिवांची म्हाडाने दखल सन २००८-२००९, सन २००९-२०१० या वर्षांतील लॉटरी प्रक्रियेमध्ये घेतली आहे. म्हाडाने सदर वर्षांत जी लॉटरी प्रक्रिया केली, ती पारदर्शकपणे केलेली आहे. महालेखाकारांनी दाखवून दिलेल्या सर्व मुद्यांसंदर्भात गेल्या ३ वर्षांतील सर्व लॉटरी प्रक्रियांमध्ये विभागाने अनेक सुधारणा केल्या आहेत.

३.१० सन २०११ ची लॉटरी काढताना विभागाने संगणकाच्या आज्ञावलीमध्ये सुधारणा केल्या आहेत. या सुधारणा टिसीएस आणि एनआयआयई (National Institute of Industrial Engineering) यांच्या माध्यमातून केल्या आहेत. विभागाने सन २००८ पासून ते सन २०११ पर्यंत प्रक्रियेमध्ये सातत्याने सुधारणा केलेल्या आहेत. पारदर्शकतेचा अभाव, एकाच व्यक्तीला एकापेक्षा जास्त घर वाटप होण्याची शक्यता, अर्ज करताना व्यक्तीची जन्मतारीख, पॅन क्रमांक आणि युनिक आयडेन्टिफिकेशन देत नसल्यामळे एकाच व्यक्तीचे बरेचसे अर्ज येणे असे प्रकार घडत होते. आता या सर्व गोष्टींना आळा घालण्यासाठी म्हाडाने नियम / विनियमामध्ये बदल करुन त्याप्रमाणे अर्जाच्या नमुन्यात बदल करुन सिस्टिममध्ये तशी सोय केली आहे. विभागाने सदर सुधारणेबाबत महालेखाकार यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांना देखील कळविले आहे. सिस्टिमसंदर्भात त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली आहे आणि त्यामध्ये सेवानिवृत्त न्यायाधीश, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सचिव, सेवानिवृत्त उप लोकायुक्त यांना घेण्यात आले आहे. गेल्या ३ वर्षापासून विभाग सतत सुधारणा करीत आहे.

३.११ विभागाने सांगितलेल्या त्रिसदस्यीय समितीमध्ये सर्व सदस्य बाहेरचे आहेत. म्हाडातील कोणत्या व्यक्तींचा समावेश सदर समितीमध्ये केलेला नसल्याने समितीने निदर्शनास आणून दिले असता त्रिसदस्यीय समितीमध्ये माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सचिवांचा समावेश असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

३.१२ मुलतः म्हाडाकडून झालेल्या चुका पाहिल्या गेल्या नाहीत, असे समितीच्या लक्षात आले आहे. सिस्टिम विकसित करण्याच्या प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार योग्य ते दस्तऐवज आले नाही. व्यावसायिक नियम सिस्टिममध्ये घेतले गेले नाहीत. अर्ज नमुना विकसित करताना

त्यात त्रुटी होत्या. कार्यप्रणाली विकसित करण्याच्या प्रक्रियेत आज्ञावलीची गरज असते. अर्जाचा नमुना आणि बाजार विक्री नमुना तयार केलेला नव्हता. अर्जाच्या नमुन्यामध्ये अर्जदाराची जन्मतारीख, वय इत्यादि नमूद करण्यासंबंधी रकाना नसल्याचे दिसून आले असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, विभागाने आता टिसीएसची सर्व्हिस ठेवली आहे. लॉटरीचा नियोजित सोडतीच्या आज्ञावलीचे टिसीएसकडून लेखापरीक्षण करुन घेण्यात आले आहे. तसेच, उप मुख्य अभियंत्यांच्या अध्यक्षतेखाली आयटी सेल निर्माण केला आहे. अशाप्रकारे म्हाडाने लॉटरी प्रक्रियेमध्ये बऱ्याच सुधारणा केलेल्या आहेत.

३.१३ महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणातील सोडतीचे आणि सदनिका वाटप पद्धतीसंदर्भात मागील वेळी एका व्यक्तीने जनहित याचिका कोर्टात दाखल केली होती. त्यामुळे आता म्हाडाच्या कामकाजात बऱ्यापैकी सुधारणा झाल्या आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सदर त्रुटी म्हाडाला जनहित याचिकेमुळे लक्षात आल्या नाहीत तर महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिल्यामूळे लक्षात आल्या आहेत. महालेखाकारांनी जे मुद्दे उपस्थित केले त्याप्रमाणे विभागाने सुधारणा केली आणि त्यामुळे विभागाला जनहित याचिकेच्या प्रकरणामध्ये व्यवस्थित उत्तरे देता येऊ शकली. सदर जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. तसेच महालेखाकारांनी सन २००५-०६ च्या लॉटरी प्रक्रियेसंदर्भात एक गंभीर मुद्दा नजरेस आणून दिला. काही व्यक्तींना लॉटरी प्रक्रियेमध्ये एकापेक्षा जास्त क्रमांक लागले होते. सदर संबंधित व्यक्तीला एक घर वाटप व्हायला पाहिजे होते. परंतु, तसे न होता ३ व्यक्तींना एकापेक्षा जास्त घरे म्हणजे दोन घरे वाटप करण्यात आली.

३.१४ एकाच व्यक्तीला एकापेक्षा जास्त घरांचे वाटप केलेल्या व्यक्तींकडून सदर घरे परत घेतली आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, तत्संदर्भातील कार्यवाही सुरु असून ३ व्यक्तींना २ घरांचे वाटप झाले आहे. सदर दोन वाटपामधील एक वाटप रद्द करण्याची कार्यवाही सुरु आहे. यासंदर्भात संबंधितांना नोटीस देण्यात आली असून एका घराचे वाटप रद्द करुन वापरलेल्या घरावर ईको रेंट लावून वसुली

करण्यात येणार आहे. तसेच सदर प्रकरणी येत्या ४५ दिवसांमध्ये निर्णय घेण्यात येईल असे आश्वासनही विभागीय सचिवांनी समितीस दिले.

३.१५ अर्जाच्या आज्ञावलीमध्ये फोटो तपासण्याची तरतूद करता येणे शक्य नाही काय? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले कि, अर्जाच्या आज्ञावली मध्ये फोटोच नव्हे तर पॅन कार्ड देखील घेण्यात येत आहे. आता विभागाने लॉटरी प्रक्रियेसंदर्भात नव्याने सिस्टिम विकसित करुन सुधारणा केली आहे. अर्जाच्या नमुन्यात अर्जदाराचे जन्मतारीख, वय, लिंग हे रकाने विकसित करुन सुधारणा केलेल्या आहेत. आज्ञावलीमध्ये कुटुंबाचे उत्पन्न किती आहे, याबाबतही सुधारणा केली आहे. पूर्वी म्हाडामध्ये अशी पध्दत होती की, अर्ज आल्यानंतर अर्जाची पूर्वछाननी करण्यात यायची आणि त्यानंतर लॉटरी काढली जायची. काही परिस्थिती निर्माण झाली तरच अर्जदारांकडून माहिती घेण्यात यायची. अर्जदारांकडून नंतर उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र घेतले जायचे. ती पध्दत अयोग्य होती. आता अर्जदारांकडून कुटुंबाचे उत्पन्न, घराचा पत्ता इ. संदर्भात प्रतिज्ञा लेख लिहून घेण्यात येतो, अर्ज पूर्ण भरुन घेण्यात येतात आणि मग त्या आधारे लॉटरी काढण्यात येते. गेल्या ३ वर्षांपासून याप्रमाणे कामकाज सुरु आहे. लॉटरी सिस्टिम आता परिपूर्ण झालेली आहे. आज्ञावलीमध्ये फोटो टाकण्याची देखील तरतूद आहे.

३.१६ अनुसुचित जाती अनुसुचित जमाती साठी वेगळे आरक्षण ठेवण्यात येते काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय समिवांनी आरक्षणासंदर्भात माहिती देताना सांगितले कि, एस.सी.साठी ११ टक्के, एस.टी.साठी ६ टक्के, एन.टी.साठी १ टक्का, डिनोटीफाईड नॉमेडिक ट्राईबसाठी १ टक्का, पत्रकाराकरिता अडीच टक्के, स्वातंत्र्यसैनिकांसाठी अडीच टक्के, अपंग, दृष्टीहीन यांच्यासाठी २ टक्के, संरक्षण खात्याच्या कुटुंबांकरिता २ टक्के, माजी सैनिकांसाठी ५ टक्के, माजी व आजी खासदार, आमदार यांच्यासाठी २ टक्के, म्हाडा प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांसाठी २ टक्के, राज्य शासकीय कर्मचारी व इतर स्टॅच्युटरी बोर्डासाठी ५ टक्के, केंद्र शासनातील पुढील ३ वर्षांत सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी २ टक्के, कलावंतांसाठी २ टक्के असे आरक्षण आहे. सदर आरक्षणाची अंमलबजावणी केली असून अपंग व नाटयकलावंतांना या आरक्षणाचा फायदा मिळतो. आता या सर्व बाबी संगणकामध्ये समाविष्ठ केल्या आहेत.

३.१७ समितीने पुढे अशी विचारणा केली कि, समाजांसाठी ४७ टक्के व मुख्यमंत्री कोटा २ टक्के असे एकूण ४९ टक्के आरक्षण आहे. अर्ज आल्यानंतर काही कारणास्तव अर्ज फेटाळले जातात, त्यामुळे जागा रिक्त होते. त्यानंतर ते आरक्षण शासन स्तरावर भरले जाते. याबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली की, असे होत नाही. परंतु, म्हाडा प्राधिकरणाच्या नियमात असलेल्या तरतुदीप्रमाणे अनुसुचित जाती (एस.सी.), अनुसुचित जमाती (एस.टी.) या वर्गांमध्ये जागा रिक्त राहिली तरी एकमेकांत समायोजित केली जाते. परंतु, ते आरक्षण खुल्या वर्गामधून भरता येत नाही. यासंदर्भात समितीकडे जर काही उदाहरणे असतील तर ती उदाहरणे विभागास सांगावीत. त्यासंदर्भात विभागाकडून जरुर कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले. परंतु, नियमाप्रमाणे असे करता येत नाही. अनुसुचित जाती (एस.सी.), अनुसुचित जमाती (एस.टी.), भटक्या जमाती (एन.टी.), डी.टी. यामध्ये असे काही झालेले नाही. नियमाप्रमाणे त्यामध्ये अदलाबदली होऊ शकते. परंतु, अर्ज न आल्यामुळे ते आरक्षण खुल्या वर्गातील व्यक्तीला दिले आहे असे होत नाही. एस.सी. नसेल तर एनटी, एनटी नसेल तर डीटी असे घेता येऊ शकते. परंतु, ती जागा खुल्या वर्गातील (ओपन) व्यक्तीला देणे योग्य नाही असेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

३.१८ विभागाने यासंदर्भात प्राथ्यमक्रम दिलेला आहे का ? व सन २००५ च्या लॉटरीमध्ये काही अर्जांची छाननीच केली नाही असे समितीच्या निदर्शनास आले असल्याचे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, प्राथ्यमक्रम दिलेला नाही. प्रवर्गामध्ये कोणालाही अगोदर देता येऊ शकेल. तसेच लॉटरीच्या अर्जांची छाननीच होत नाही असे आता होत नाही. आता विभागाकडून आऊटसोर्सिंग करुन बँकेची मदत घेतो. बँकेकडून लोकांचे अर्ज आल्यानंतर त्यांची संगणकामध्ये नोंद केली जाते आणि त्यानंतर लॉटरी काढण्यात येते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

३.१९ संगणकीय कार्यप्रणालीकडून अठरा वर्षाखालील अर्जदार शोधून काढले जात नव्हते याबाबत सन २००५ मध्ये १८ वर्षे वयाखालील ४ अर्जदार, जुलै, २००६ मध्ये ३१८ अर्जदार नोकरीत समाविष्ट करण्यात आले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, आता संबंधितांकडून प्रतिज्ञालेखे घेण्यात येतात. त्यामध्ये सर्व बाबी नमूद केलेल्या असतात. माहिती योग्य नसेल तर संगणक त्यास मान्यता

देत नाही जन्मतारीख १८ वर्षांपेक्षा कमी असेल तर त्यांची नोंद संगणकामध्ये होत नाही. संगणक आज्ञावलीमध्ये दिलेल्या उत्पन्न गटातच सदर व्यक्तिची नोंद होते. सॉफ्टवेअरमध्ये इंटरलिंकिंग असते. त्यामुळे कोणतीही गडबड होत नाही.

३.२० एकाच कुटुंबातील व्यक्तींनी म्हणजे वडिलांनी अल्प उत्पन गट फॉर्म भरला आणि मुलाने एमआयजीमध्ये फॉर्म भरला तर विभाग कोणती कार्यवाही करते व आतापर्यंत एकाच व्यक्तीला दोन घरे देण्याचे प्रकार घडले आहेत. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले कि, एलआयजी, एमआयजीमध्ये उत्पन्न गट वेगवेगळा आहे. आज्ञावलीमध्ये प्रतिज्ञापत्रात दिलेली माहितीची नोंद केली जाते. सॉफ्टवेअर ती माहिती डिफरेन्शिएट करुन दुसऱ्या अर्जाला बाद ठरविते. संगणकामध्ये सर्व सोयी केलेल्या आहेत. सन २००५ च्या लॉटरीमध्ये एकाच व्यक्तिला दोन घरे देण्याच्या घटना घडलेल्या आहेत व या संदर्भात विभागाकडून येत्या ४५ दिवसांत कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन समितीला दिले. परंतु अद्यापपर्यंत केलेल्या कार्यवाहीबाबत विभागाकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

३.२१ सोडत क्रमांकाच्या अग्रक्रमानुसार सदनिकांचे वाटप मजल्यानुसार नव्हते याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले कि, आता सर्व काही योग्य पध्दतीने सुरु आहे. आता सॉफ्टवेअर यादी स्वतः जनरेट करते. पूर्वी मॅन्युअली काम चालत असल्यामुळे गोंधळ होत होता. आता सॉफ्टवेअरमुळे इमारतीच्या कोणत्या मजल्यावर घराचे वाटप केले जात आहे, हे देखील समजते. प्रतिक्षा यादीमधील अमूक एक व्यक्ती आली नाही तर पुढील व्यक्तीला घर मिळेल अशी पध्दत आहे. आता प्रतिक्षा यादी ४-५ दिवस ठेवण्याची आवश्यकता नाही. सन २००५ मध्ये प्रतिक्षा यादी व्यवस्थित अनुसरली नसल्यामुळे ती प्रतिक्षा यादी रद्द करावी, अशी सूचना विभागीय सचिवांनी केली. परंतु सदर प्रतिक्षा यादी सुरु ठेवावी, असे काहींचे मत असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. याबाबत म्हाडाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, सचिवांनी सांगितल्यानुसार हा निर्णय म्हाडाने जाणीवपूर्वक घेतला आहे. सन २००५-०६ ची प्रतिक्षा यादी रद्द करुन उपलब्ध होणारे गाळे नवीन लॉटरी काढून वितरित करावयाचे आहेत. अगोदरचा ठराव रद्द करुन निर्णयाप्रमाणे गाळे परत वितरित करण्यासाठी लॉटरीमध्ये टाकण्यात येतील. तसेच म्हाडामध्ये १०० टक्के संगणकीकरण झाले असल्याचेही म्हाडाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

३.२२ जमिनीचा अनधिकृत ताबा आणि भाडेपट्टा अधिमूल्याची ना वसूली या मुद्याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले कि, म्हाडाने १९७८ मध्ये वांद्रे नागरिक शिक्षण संस्थेस भूखंड देण्याचा निर्णय घेतला होता. १९८५ साली प्रत्यक्ष संस्थेला भूखंड देण्यात आला. त्यानंतर असे दिसून आले की, वांद्रे नागरिक शिक्षण संस्थेने हा भूखंड परस्पर इंडियन एज्युकेशन सोसायटीकडे पोट-भाड्याने दिला ही बाब म्हाडाच्या निदर्शनास आल्यानंतर वांद्रे नागरिक शिक्षण संस्थेस १९८५ पासून केलेले वाटप रद्द करुन प्रथमपासून हे वाटप इंडियन एज्युकेशन संस्थेच्या नावे करण्यास मान्यता देण्यात आली.

३.२३ म्हाडाने या संस्थेची जागा आणि इमारत याचे निर्धारण करुन १२ कोटी रुपयांची मागणी केली होती. वास्तविक संस्थेने स्वखर्चाने इमारत बांधली होती. आता सुधारणा करुन अधिमूल्य म्हणून फक्त भूखंडाची किंमत आकारण्याचा निर्णय झाला आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, या शिक्षण संस्थेच्या कामामध्ये अनियमितता नसल्यामुळे त्यांच्याकडून दंड किती घ्यावा याबाबतचा निर्णय म्हाडाने घेतला. अधिमूल्य म्हणून ५ टक्के रक्कम घेण्यात येणार आहे.

३.२४ वांद्रे येथील नागरीक शिक्षण संस्था ही वाणिज्यिक संस्था नाही. त्यामुळे म्हाडाने चांगला निर्णय घेतला आहे. याबाबत समितीचे समाधान झाले असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

३.२५ "दुय्यम दर्जाच्या कामामुळे नुकसान" या मुद्याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले कि, म्हाडाने लातूर येथे गुमास्ता सहकारी संस्थेच्या सभासदांकरिता गृहनिर्माण योजना हाती घेतली होती. सन २००२ मध्ये ही योजना पूर्ण झाली. योजनेची अंमलबजावणी झाली त्यावेळच्या नियमानुसार ही योजना सुशिक्षित बेरोजगार इंजिनिअर्स असोसिएशनमार्फत राबविण्यात आली. सन २००२ मध्ये योजना पूर्ण करुन संस्थेच्या सभासदांना गाळ्यांचा ताबा देण्यात आला. प्रत्येक गाळ्याची बांधकाम किंमत ६९ हजार रुपये आणि विक्री किंमत ८४ हजार रुपये निश्चित करण्यात आली होती. सभासदांनी घरे ताब्यात घेऊन ३ वर्षे वापर केला. सन २००५ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे एक अर्ज करण्यात आला. त्या अर्जावरील शिर्षक असे होते, गट नं.७२ मध्ये गुमास्ता संस्थेच्या सभासदांकरिता जी घरे बांधण्यात आली त्या १०७ घरांपैकी १०० अल्प उत्पन्न गाळ्यांची किंमत आणि मासिक

हप्ता जास्त आकारण्यात आला आहे. म्हाडाने जी किंमत आकारली आहे ती जास्त आहे. मासिक हफ्ता कमी करुन द्यावा. त्या अर्जामधील एका परिच्छेदामध्ये सदरहू १०० घरांच्या बांधकामाचा दर्जा निकृष्ट असल्याचा उल्लेख केला होता. अर्जातील किंमतीचा उद्देश बाजूला राहिला आणि निकृष्ट बांधकामाबाबतची चर्चा सुरु झाली. तेथील उप अभियंत्यांनी कळविले की, घरांचा दर्जा चांगला राखला गेला नाही. त्यामुळे त्यावेळचे संबंधित कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन विभागीय चौकशी सुरु करण्यात यावी असा निर्णय झाला. त्या वेळच्या दक्षता व गुण नियंत्रण विभागाच्या लोकांनी सांगितले की, निकृष्ट दर्जाचे बांधकाम आहे म्हणून तपासणी करावयाचे ठरविले तरी मागील चार वर्षात एकही तक्रार त्यांच्याकडून प्राप्त झालेली नव्हती. चार वर्षे सभासदांनी घराचा वापर केला आहे. त्या गाळ्यांची किंमत कमी करुन दिल्यानंतर हा वाद मिटला. गाळ्याची किंमत ५७ हजार रुपये निश्चित केली आणि ती सभासदांनी भरली. महालेखापालांचा आक्षेप हाच होता की, गाळ्याची किंमत ८४ हजार रुपये असताना ५७ हजार रुपये वसूल केल्यामुळे शासनाचे ११ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. चार वर्षानंतर निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबद्दल निर्धारणा (असेसमेंट) करण्यात आली तेव्हा अर्जदारांनी माघार घेतली. त्यांचे मुख्य म्हणणे घरांची किंमती कमी करुन द्या असे होते. दक्षता व गुण नियंत्रण विभागाच्या संबंधित अभियंत्यांनी कामावर लक्ष न दिल्यामुळे त्यांना ताकीद देण्यात आली.

३.२६ मुंबई शहरामधील म्हाडा संक्रमण शिबीरामध्ये मोठया प्रमाणात घुसखोरी झालेली आहे. तेथील घुसखोरांना बाहेर काढण्यात आले आहे काय? याबाबत विभागीय सचिवांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.

३.२७ मुंबई शहरामध्ये जवळपास २० हजाराच्या आसपास संक्रमण गाळे आहेत. म्हाडाने जेव्हापासून संक्रमण शिबीरे उभारली तेव्हापासून हा घुसखोरांचा प्रश्न निर्माण झाला आहे. विधानसभेत जेव्हा जेव्हा या संदर्भात प्रश्न उपस्थित होतो तेव्हा ५० टक्के, ४० टक्के घुसखोर आहेत अशी उत्तरामध्ये टक्केवारी दिली जात होती. घुसखोरांचे विविध प्रकार आहेत. एखाद्या व्यक्तीला सदनिका खाली करावयाची सूचना देऊन बाहेर काढले, त्याच्या इमारतीचे बांधकाम २-३ वर्षात पूर्ण होऊन तो पुन्हा त्या इमारतीत रहावयास जाईल अशी अपेक्षा होती. परंतु वर्षानुवर्षे पाडल्या गेलेल्या इमारतीचे बांधकाम होत नाही. भूमी

संपादनाचा मुद्दा असतो, इतर अनेक अडचणी आहेत. असे निदर्शनास आले की, ज्यांना व्हॅकेशन नोटीस दिली त्यांनी त्या व्हॅकेशन नोटीसची विक्री केली. भाडे कायद्यामध्ये भाडेकरु बदलण्याची तरतूद आहे. मालकामार्फत तो अधिकार बदलता येतो. परंतु संक्रमण शिबीरातील गाळा सोडून जायचे असले तरी विक्री करण्याची मुभा नाही. तसे केले तर त्या ठिकाणी नव्याने रहावयास आलेल्या भाडेकरुला आपण अनधिकृत मानतो. यासाठी आता सविस्तर नमूना तयार केला आहे. कोणी जबरदस्तीने घुसखोरी केली, संक्रमण शिबीर सांभाळणाऱ्या माणसाशी संगनमत करुन घुसखोरी केली असेल अशा भाडेकरुंची अद्ययावत माहिती तयार केली आहे. त्याचे वर्गीकरण पूर्ण होत आले आहे. पुढील दोन महिन्यात दुरुस्ती मंडळाकडून ही माहिती उपलब्ध होईल. त्यानंतर खरोखर किती घुसखोर आहेत, किती भाडेकरुंना अधिकृत करु शकतो आणि किती अनधिकृत आहेत हे स्पष्ट होईल व याचा सगळा अभ्यास पूर्णपणे केला गेला आहे.

३.२८ मुंबईत कोणत्या ठिकाणी आणि कोणत्या वर्षी संक्रमण शिबीर बांधण्यात आले, तेथे कोणत्या प्रवर्गातील भाडेकरु रहात आहेत, घुसखोर किती आहेत, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येत आहे. तसेच संक्रमण शिबीरांमध्ये राहणारे लोक हे अधिकृत आहेत की नाहीत? संक्रमण शिबिर हे कायम स्वरुपाचे नाही. मुंबईमध्ये मोठया प्रमाणात इमारतींची पुनर्बांधणी झाली. अशा इमारतीमध्ये म्हाडाला अनेक गाळे उपलब्ध झाले. असे गाळे संक्रमण शिबिरात राहणाऱ्या रहिवाशांना उपलब्ध करुन दिले जाणे अपेक्षित होते, परंतु तसे झाले नाही. संक्रमण शिबिरातील प्रतिक्षा यादी किती लोकांची आहे? संक्रमण शिबीरातील गाळ्यांची एकूण संख्या किती आहे? परंतु उपलब्ध झालेल्या गाळ्यांमध्ये प्रतिक्षा यादीबाहेरील लोकांचा शिरकाव झालेला आहे. त्यामुळे याबाबतची सविस्तर टिप्पणी महिन्याभरात समितीला सादर करावी असे निदेश समितीने विभागास दिले असता उपरोक्त माहिती समितीस सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले. तसेच लोकलेखा समितीकडून विभागाला उपलब्ध झालेल्या निधीबाबत लेखापरिक्षण केले जाते. त्याच धर्तीवर म्हाडा व नगरविकास विभागाकडून ज्या जागा वितरित केल्या जातात, त्यापासून शासनाला महसूल मिळतो. त्या जागांबाबतचे परिक्षण झाले पाहिजे. या जागा कोणाला दिल्या गेल्या याची माहिती देखील लोकलेखा समितीस देण्याचे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले.

३.२९ याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा करताना सांगितले की, संक्रमण शिबीरातील गाळ्यांमध्ये राहणारे जे रहिवासी अधिकृत असल्याचा दावा करतात ते पुराव्यासाठी कागदपत्रे सादर करतात. व्हॅकेशन नोटीस ज्यांना दिली ती व्यक्ती योग्य होती किंवा नाही याबाबतचा शोध घेणे आवश्यक आहे. तसेच संक्रमण शिबीरातील गाळ्यामध्ये सध्या राहणाऱ्या व्यक्तीचा दर्जा काय आहे. हेही स्पष्ट होणे आवश्यक आहे तथापि, वरील सर्व प्रकरणाची सविस्तर टिप्पणी विभागाकडून समितीला सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

३.३० म्हाडाने बांधलेल्या वसाहतीमध्ये पाणीपुरवठा, सुरक्षा आदी आवश्यक सुविधा कोणाकडून पुरविल्या जातात याविषयी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले कि, म्हाडाच्या १५६ वसाहती आहेत. जोपर्यंत कन्व्हेयन्स होत नाही तोपर्यंत त्या वसाहतीची जबाबदारी म्हाडाकडे असते. मोठे ले-आऊट आहेत त्यांचे हस्तांतर महानगरपालिकेकडे झाले पाहिजे. एकदा हस्तांतर झाले की, म्हाडाची जबाबदारी संपते. हस्तांतर झाले नसेल तर म्हाडाची जबाबदारी आहे. त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली जाते.

३.३१ मुख्यमंत्र्यांनी २ टक्के कोट्यातून सदनिका देण्यासाठी शिफारस केल्यानंतर पुढील कार्यपध्दती काय असते व माननीय मुख्यमंत्र्यांनी २ टक्के कोट्यातून सदनिका देण्याबाबत अर्जावर सही केल्यानंतर पुढील कार्यपध्दती काय आहे? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले कि, सध्याची परिस्थिती अशी आहे की, मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार कोटा २ टक्के, म्हाडा २ टक्के आणि युएलसी ५ टक्के कोट्याबाबत एका वाटपधारकाकडून न्यायालयात दावा दाखल केला गेल्यानंतर कोर्टाने स्थगिती दिली. त्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी गृहनिर्माण, नगरविकास व महसूल विभागाच्या प्रधान सचिवांची एक समिती स्थापन केली. या तीन विभागांच्या प्रधान सचिवांनी स्वेच्छाधिकाराचा वापर कसा कमी करता येईल, त्यामध्ये पारदर्शकता आणून काय सुधारणा करता येईल याचा अहवाल माननीय मुख्यमंत्र्यांना सादर केला आहे. त्याबाबत निर्णय अपेक्षित आहे.

३.३२ माननीय मुख्यमंत्र्यांनी २ टक्के कोट्यातून सदनिका देण्याबाबत अर्जावर सही केल्यानंतर पुढील कार्यपध्दतीबाबत विभागीय सचिवांनी सांगितले कि, पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांच्या

काळात अशी पध्दत होती की, मुख्यमंत्र्यांनी शिफारस केल्यानंतर त्याबाबत गृहनिर्माण विभागाकडून कोणते गाळे उपलब्ध आहेत याची माहिती नमूद करुन ती नस्ती मुख्यमंत्र्यांकडे सादर केली जात असे आणि मुख्यमंत्री संबंधित व्यक्तीला अमुक गाळा वाटप करावा असा आदेश देतात, त्याप्रमाणे गाळ्याचे वाटप केले जात होते.

३.३३ विधिमंडळ सदस्यांच्या राजयोग सहकारी गृहनिर्माण संस्थेला म्हाडातर्फे वर्सोवा येथे सदनिका उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्या ठिकाणी पाणीपुरवठा उपलब्ध नाही, उद्‌वाहनाची सोय नाही. त्यामुळे तेथे वास्तव्य करणे शक्य होत नाही. पण त्या इमारतीच्या बाजूला असलेल्या सोसायट्यांमध्ये महापालिकेचा पाणीपुरवठा सुरु आहे? याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले कि, महानगरपालिकेने ज्या साईजचे वॉटर कनेक्शन द्यायला पाहिजे त्या साईजचे न दिल्यामुळे ही अडचण निर्माण झाली आहे. महापालिकेचे म्हणणे आहे की, टनेलचे काम सुरु आहे ते एक ते दीड महिन्यात पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. ते काम पूर्ण झाल्यानंतर मोठ्या साईजचे कनेक्शन दिले जाईल. तोपर्यंत म्हाडामार्फत टँकरने पाणीपुरवठा करीत आहोत.

अभिप्राय व शिफारशी

३.३४ म्हाडाने सन २००५-०६ मध्ये केलेल्या लॉटरी प्रक्रियेमध्ये आढळलेल्या उणीवांसंदर्भात महालेखापालांनी त्यांच्या अहवालामध्ये मुद्दा उपस्थित केला होता. सदर परिच्छेद त्यासंदर्भातील आहे. त्यावेळी जी प्रक्रिया अनुसरण्यात आली त्यानुषंगाने सदनिकांचे वाटप लाभधारकास करण्यात आले. परंतु, या लॉटरी पध्दतीमध्ये उणीवा दिसून आल्या. महालेखापालांनी निदर्शनास आणलेल्या उणीवांची म्हाडाने योग्य दखल घेऊन सन २००५-२००९ व सन २००९-२०१० या वर्षात लॉटरी प्रक्रिया केली. महालेखापालांनी म्हाडास दाखवून दिलेल्या सर्व मुद्दयांसंदर्भात गत तीन वर्षामध्ये सर्व लॉटरी प्रक्रियामध्ये विभागाने अनेक सुधारणा केल्या आहेत.

३.३५ महालेखाकारांनी सन २००५-०६ च्या लॉटरी प्रक्रियेसंदर्भात एक गंभीर मुद्दा नजरेस आणून दिला. काही व्यक्तींना लॉटरी प्रक्रियेमध्ये एकापेक्षा जास्त क्रमांक लागले होते. सदर संबंधित व्यक्तीला एक घर वाटप व्हायला पाहिजे होते. परंतु, तसे न होता तीन व्यक्तींना एकापेक्षा जास्त घरे म्हणजे दोन घरे वाटप केली होती. यासंदर्भात समितीने

एकापेक्षा जास्त घरे वाटप करण्यात आलेल्या व्यक्तींकडून घरे परत घेतली आहेत का? यासंदर्भात माहिती विचारली होती. त्यावेळी **दोन वाटपांमधील एक वाटप रद्द करण्याची कारवाई सुरु झाली असून संबंधितांना नोटीस देण्यात आल्या आहेत. एका घराचे वाटप रद्द करुन वापरलेल्या घरावर वाजवी रेंट लावून वसूली करण्यात येणार आहे. या प्रकरणी ४५ दिवसांमध्ये निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. सदरहू माहिती अद्याप सचिवालयास सादर करण्यात आलेली नसून त्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

३.३६ म्हाडाने लातूर येथे गुमास्ता सहकारी संस्थेच्या सभासदांकरिता गृहनिर्माण योजना हाती घेतली होती. सन २००२ मध्ये ही योजना पूर्ण झाली. योजनेची अंमलबजावणी झाली त्यावेळच्या नियमानुसार ही योजना सुशिक्षित बेरोजगार इंजिनिअर्स असोसिएशनमार्फत राबविण्यात आली. सन २००२ मध्ये योजना पूर्ण करुन संस्थेच्या सभासदांना गाळ्यांचा ताबा देण्यात आला. प्रत्येक गाळ्याची बांधकाम किंमत ६९ हजार रुपये आणि विक्री किंमत ८४ हजार रुपये निश्चित करण्यात आली होती. सभासदांनी घरे ताब्यात घेऊन ३ वर्षे वापर केला. सन २००५ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे एक अर्ज करण्यात आला. सदर अर्जात नमूद केल्याप्रमाणे गट नं.७२ मध्ये गुमास्ता संस्थेच्या सभासदांकरिता जी घरे बांधण्यात आली त्या १०७ घरांपैकी १०० अल्प उत्पन्न गाळ्यांची किंमत आणि मासिक हप्ता जास्त आकारण्यात आला आहे. म्हाडाने जी किंमत आकारली आहे ती जास्त आहे. मासिक हफ्ता कमी करुन द्यावा. त्या अर्जामधील एका परिच्छेदामध्ये सदरहू १०० घरांच्या बांधकामाचा दर्जा निकृष्ट असल्याचा उल्लेख केला होता. गाळ्यांच्या संबंधिचे कामकाज पहाणाऱ्या उप अभियंत्यांनी कळविले की, **घरांचा दर्जा चांगला राखला गेला नाही. त्यामुळे त्यावेळचे संबंधित कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ/शाखा अभियंता यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन विभागीय चौकशी सुरु करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी तसेच दक्षता व गुण नियंत्रण विभागाच्या संबंधित अभियंत्यांनी कामावर लक्ष न दिल्यामुळे शासनाच्या झालेल्या रुपये ११ कोटीची जबाबदारी संबंधित अभियंत्यावर निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

३.३७ मुंबई शहरामध्ये जवळपास २० हजाराच्या आसपास संक्रमण गाळे आहेत. म्हाडाने जेव्हापासून संक्रमण शिबीरे उभारली तेव्हापासून घुसखोरांचा प्रश्न निर्माण झाला आहे. वर्षानुवर्षे पाडल्या गेलेल्या इमारतीचे बांधकाम होत नाही. भूमी संपादनाचा मुद्दा असतो, इतर अनेक अडचणी आहेत. असे निदर्शनास आले की, ज्यांना व्हॅकेशन नोटीस दिली त्यांनी त्या व्हॅकेशन नोटीसची विक्री केली. टेनन्सी ॲक्टमध्ये टेनन्सी बदलण्याची तरतूद आहे. मालकामार्फत तो अधिकार बदलता येतो. परंतु संक्रमण शिबीरातील गाळा सोडून जायचे असले तरी विक्री करण्याची मुभा नाही. तसे केले तर त्या ठिकाणी नव्याने रहावयास आलेल्या भाडेकरुला आपण अनधिकृत मानतो. यासाठी आता सविस्तर नमूना तयार केला आहे. कोणी जबरदस्तीने घुसखोरी केली, **संक्रमण शिबीरात वास्तव्य करणाऱ्या व्यक्तिशी संगनमत करुन घुसखोरी केली असेल अशा भाडेकरुंची अद्ययावत माहिती तयार केली आहे. त्याचे वर्गीकरण पूर्ण होत आले आहे. दुरुस्ती मंडळाकडून ही माहिती उपलब्ध करण्यात येत असून खरोखर किती घुसखोर आहेत, किती भाडेकरुंना अधिकृत करु शकतो आणि किती अनधिकृत आहेत याची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी.**

३.३८ मुंबईमध्ये मोठया प्रमाणात इमारतींची पुनर्बांधणी झाली. अशा इमारतीमध्ये म्हाडाला अनेक गाळे उपलब्ध झाले. असे गाळे संक्रमण शिबिरात राहणाऱ्या रहिवाशांना उपलब्ध करुन दिले जाणे अपेक्षित होते, परंतु तसे झाले नाही. **संक्रमण शिबिरात पाठविण्यासाठी किती लोकांची यादी आहे. संक्रमण शिबीरातील गाळ्यांची एकूण संख्या किती आहे? परंतु उपलब्ध झालेल्या गाळ्यांमध्ये प्रतिक्षा यादीबाहेरील किती लोकांचा शिरकाव झालेला आहे. याबाबत सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी.**

३.३९ संक्रमण शिबीरातील गाळ्यांमध्ये राहणारे जे रहिवासी अधिकृत असल्याचा दावा करतात ते पुराव्यासाठी कागदपत्रे सादर करतात. व्हॅकेशन नोटीस ज्यांना दिली ती व्यक्ती व प्रत्यक्ष संक्रमण शिबिरात वास्तव्य करणारी व्यक्ती योग्य होती किंवा नाही याबाबतचा शोध घेणे आवश्यक आहे. तसेच संक्रमण शिबीरातील गाळ्यामध्ये सध्या राहणाऱ्या व्यक्तीचा दर्जा काय आहे, हेही स्पष्ट होणे आवश्यक आहे वरील सर्व प्रकरणाची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सार्वजनिक बांधकाम

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील **परिच्छेद ४.१.३ "लबाडीचे प्रदान", परिच्छेद क्र.४.१.४ "बोगस प्रदाने", परिच्छेद क्र.४.२.७ "अतिरिक्त दायित्व", परिच्छेद क्र.४.२.८ "विनिर्देशांचे पालन न केल्याने अधिक खर्च", परिच्छेद क्र.४.३.४ "जमिनीच्या अभावामुळे टाळता येण्याजोगे जादा दायित्व", परिच्छेद क्र.४.४.२ "बांधकामाची अनधिकृत अंमलबजावणी", परिच्छेद क्र.४.४.३ "व्यर्थ खर्च", परिच्छेद क्र. ४.४.४ "अतिरिक्त न्यायालय इमारतीमध्ये व्यर्थ गुंतवणूक", परिच्छेद क्र.४.४.५ "निष्फळ खर्च"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

"लबाडीचे प्रदान"

कंत्राटदाराला डांबर खरेदी करण्याकरीता बनावट बीजकांवर रू.१.३५ कोटीचे प्रदान केल्याचा परिणाम लबाडीचे प्रदान होण्यात झाला.

४.१ कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा यांनी केंद्रीय मार्ग निधी (सी.आर.एफ.) अंतर्गत शिरूर-अनंतपाल-शेकापूर मार्गाच्या रूंदीकरणाचे काम कंत्राटदाराला दिले (डिसेंबर, २००६). कंत्राटाच्या शर्तीनुसार कंत्राटदाराने ६०-७० प्रतीचे डांबर कुठल्याही नामांकीत शासकीय तेल कंपनीकडून प्राप्त करून त्यांच्या स्वतःच्या जोखीमेवर आणि स्वखर्चाने आणावयाचे होते, आणि कंत्राटदाराला, कामाच्या जागी आणलेल्या साहित्याच्या खरेदीचा पुरेसा लेखी पुरावा, जसे खरेदीचे देयक, जकातीची पावती इ. विभागाने तशी विनंती केल्यास तत्परतेने सादर करावयाचा होता.

जानेवारी, २००८ मध्ये प्रदान केलेल्या चालू लेखा देयकांच्या तपासणीत (जानेवारी २००८) असे उघडकीस आले की या कामावर १९३ मेट्रीक टन डांबर वापरले गेले होते. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड यांचेकडून खरेदी केलेल्या रू.२७.०८ लाख किंमतीच्या १२१.२३ मेट्रीक टन डांबराच्या आठ बीजकांच्या झेरॉक्स प्रती चालू लेखा देयकाला जोडलेल्या होत्या त्यापैकी काही बीजकांवर एकच बटवडा क्रमांक पण वेगवेगळ्या तारखांना होता. उलट पडताळणी केली असताना भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड यांनी(फेब्रूवारी २००८) या बीजकांपैकी एकही बीजक त्यांनी तयार/निर्गमित केले नव्हते आणि बीजकांमधील तपशील

बनावट होता याची पुष्टी केली. ज्याअर्थी कंत्राटदाराने चालू लेखा देयकाबरोबर सादर केलेली बीजके बनावट होती आणि विभागाने ठेवलेल्या साहित्य नोंदवहीत ही बीजके म्हणजे रस्त्याच्या बांधणीकरीता वापरलेल्या डांबराचा अभिलेख आहे असा उल्लेख होता. त्याअर्थी रस्त्याच्या कामाच्या निष्पादनाची गुणवत्ता संशयास्पद होती. याप्रकारे कंत्राटदाराचे बनावट बीजके सादर करणे, कंत्राटदाराची डांबर खरेदीमधली लबाडी दर्शवित होता, ज्याचा परिणाम रू.२७.०८ लाखांचे लबाडीचे प्रदान होण्यात झाला. तसेच सात कामांची ६६ बीजके पडताळणीकरीता पाठविली असता (जून २००८) (भारत पेट्रोलियम कंपनी लिमिटेड यांनी ऑगस्ट २००८) पुष्टी केली की तीन कामांसंबंधी रू.१.०८ कोटी किमंतीची ३५९.०३० मे टन डांबराची २५ बीजके त्यांनी निर्गमित केलेली नव्हती. या प्रकारे मार्च २००७ आणि मार्च २००८ या दरम्यान या २५ बीजकावर दिलेले रू.१.०८ कोटीचे प्रदान ही लबाडीचे होते.

अधीक्षक अभियंता, उस्मानाबाद यांनी संबंधित कार्यकारी अभियंता यांना उपविभागीय अभियंता, लेखा अधिकारी आणि अंतर्गत लेखा परीक्षक यांचेविरूद्ध, चालू लेखा देयकाबरोबर सादर केलेल्या बनावट बीजकांची पडताळणी न केल्याबद्दल कारवाई प्रारंभ करण्याचे आदेश दिले (जुलै २००८) तसेच त्यांनी कार्यकारी अभियंता यांना डांबर खरेदीच्या इतर सर्व बीजकांची उलट पडताळणी करण्याचे आणि कसूरवार आढळल्यास भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० खाली कंत्राटदाराच्याविरूद्ध प्रथम माहिती अहवाल (FIR) दाखल करण्याचे अनुदेश दिले.

ही बाब शासनाच्या सचिवांना जुलै-ऑगस्ट २००८ मध्ये कळविण्यात आली उत्तर आले नाही.

ज्ञापन :-

४.२ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

शिरूर - अनंतपाल- दैठणा - देवार्जन - शेकापूर रस्ता एम.डी.आर. २५ कि.मी. ३१/५०० ते ५१/२०० या रस्त्याचे काम स्पर्धात्मक पद्धतीने मे. अभिजीत कन्स्ट्रक्शन, लातूर यांना देण्यात आले होते. याबाबतचे कार्यादेश दि.२१.१२.२००६ रोजी ठेकेदारास देण्यात आले. निविदा शर्तीनुसार ठेकेदाराने डांबर फक्त भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड, हिंदूस्थान

पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड, इंडीयन ऑईल कार्पोरेशन या सारख्या नामांकित कंपनीकडूनच खरेदी करणे व खरेदी केलेल्या डांबराच्या परिमाणाचे चलन विभागास सादर करणे आवश्यक होते. अशा प्रकारे वापरण्यात येणाऱ्या डांबराबाबतची नोंदवही विभागामार्फत कामाच्या ठिकाणी ठेवण्यात येते.

ठेकेदाराने सादर केलेल्या चलनाबाबत लेखा परिक्षणाचे वेळी आक्षेप घेण्यात आला. सदर काम प्रगतीपथावर असताना कार्यकारी अभियंता कार्यालयाने फक्त सात आर.ए. बीले ठैकेदारास अदा केली. केलेले काम चांगल्या स्थितीत आहे. दक्षता व गुण नियंत्रण मंडळाच्या प्रयोगशाळेने, ठेकेदाराने वापर केलेल्या डांबराचे नमुने तपासले आहेत.

लेखापरिक्षकांचा वरील आक्षेप प्राप्त झाल्यानंतर अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. पव्यशा-१/निविदा/३११, दिनांक १५ जुलै २००८ अन्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा यांना लेखापरिक्षा पथकाने त्यांच्या तपासणी निष्कर्षात दर्शविलेल्या कामाचे डांबर कंपनीच्या पावत्या (Invoices) घेवून विभागातील वरिष्ठ लेखाधिकारी यांना कंत्राटदारानी ज्या कंपनीकडून डांबर खरेदी केले त्या कंपनीच्या कार्यालयाकडे पाठवून सर्व (Invoices) ची पडताळणी करण्याची जबाबदारी सोपवावी. तसे पत्र डांबर कंपनीस द्यावे. कंपनीकडून शहनिशा झाल्यानंतर बनावट पावत्या असल्याची खात्री झाल्यास संबंधित कामाच्या कंत्राटदारावर भारतीय दंडविधान कलम ४२० नुसार संबंधित कामाच्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवावा तसेचा संबंधित उप विभागातील या कामाशी संबंधित कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/उप अभियंता यांचे विरूद्धही वरीलप्रमाणे गुन्हा नोंदवून संबंधिताविरूद्ध विभागीय चौकशी करण्यासाठी दोषारोपपत्रे सादर करावीत, अशा सूचना दिल्या होत्या.

अधिक्षक अभियंता, उस्मानाबाद यांच्या सुचनांनुसार या प्रकरणाची तपासणी करण्यात आली त्यावेळी असे आढळून आले की, सदरील काम हे मूळ ठेकेदार मे. अभिजित कंन्स्ट्रक्शन कंपनी, लातूर यांनी १) मे. मिनार कंन्स्ट्रक्शन, लातूर २) श्री. बी. आर. अंदे, लातूर, या इतर दोन नोंदणीकृत ठेकेदारांना सबलेट करून दिले होते.

मुळ ठेकेदाराने ज्या करारनाम्याद्वारे सदर कामे उप ठेकेदाराना दिली ती कागदपत्रे सादर करण्यात आली. लेखा परिक्षणाचे वेळी तपासण्यात आलेली चलने ही सदर कामाशी संबंधीत नाहीत.

कार्यकारी अभियंता कार्यालयाने भारत पेट्रोलियम कार्पोरेशन आणि हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन या कंपन्यांना कंत्राटदाराने केंद्रीय मार्ग निधीअंतर्गत केलेल्या कामाची देयके तपासून देण्याची विनंती केली होती. या दोन्ही कंपन्यांनी पावत्या खऱ्या असल्याबाबत पुष्टी दिलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभिलेख्याप्रमाणेही त्या खऱ्या आणि सत्य असल्याचे दिसून आल्या आहेत. लेखा परिक्षकांना सादर केलेल्या ८ पावत्या या विभागाशी संबंधित नव्हत्या. त्यामुळे याप्रकरणी कोणाविरूद्धी चौकशी / कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सबब सदर कामासाठी ठेकेदाराने खरेदी करून वापरलेल्या डांबराबाबत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार अथवा अनियमितता झालेली नाही असा निष्कर्ष निघतो.

महालेखापालांना याबाबतची माहिती दिनांक ०१.११.०८ च्या पत्रान्वये पाठविली आहे.

लेखापरिक्षा विभागाने खालील चालू कामांचे निरीक्षण आणि तपासणी केलेली आहे.

१. शिरूर-अनंतपाळ-दैठणा-देवर्जन-शेकापूर रस्ता (प्रजिमा-२५) (किमी ३१/५०० ते ५१/२००) (सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा).
२. माढा-वैराग-उस्मानाबाद, वरूडा, तेर पळसप रस्त्याची सुधारणा (राम क्र.१५०) (किमी ८०/४०० ते ९४/००) (सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद)
३. रत्नागिरी-सोलापूर-लातूर-नांदेड रस्ता (प्रराम-३) (किमी ५२८/०० ते ५३४/०० व ५४२/०० ते ५५१/००) (सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर) आणि
४. सावरगांव-भोयरा-मुरूड-अकोला रस्ता (प्रजिमा) (किमी ०/०० ते १२/००) (सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर)

वरील चार कामांपैकी अ.क्र.१ ते ३ येथील कामांचे बीजांक (Invoices) बी.पी.सी.एल. आणि एच.पी.सी.एल. या कंपन्यांकडे चौकशी करून तपासण्यात आले आणि डांबर पुरवठा करणाऱ्या बी.पी.सी.एल. आणि एच.पी.सी.एल. या कंपन्यांचे बीजांक खोटे नाही हे स्पष्ट केले आहे. अ.क्र.४ येथील कामाबाबत बी.पी.सी.एल. कंपनीने कळविले आहे की, सदर बीजांकामध्ये

फेरफार करण्यात आला असून त्यांनी पुरवठा केलेल्या डांबराची ग्रेड ८०/१०० आहे आणि बीजांकावर छापल्याप्रमाणे ६०/७० नाही. त्यामुळे १९ देयकांत फेरफार करण्यात आल्याचे आढळून आले आहे आणि या डांबराचे परिमाण २८१.४७ टन इतके होते. देयकाला जोडलेल्या बीजांकाची संख्या कंपनीने निर्गमित केलेल्या देयकाच्या संख्येशी जुळत असल्याने डांबराच्या ग्रेडमध्ये दर्शविलेल्या फरकाबाबत सदर डांबराच्या फरकाची रक्कम रू.१२,३३,९३८/- कंत्राटदाराकडून वसूल करण्यात आलेली आहे. तसेच केलेले काम आवश्यक त्या विनिर्दिष्ठाप्रमाणे ६०/७० ग्रेडच्या डांबराचे नसल्याने डांबराच्या बाबीच्या दरामध्ये शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. संकीर्ण-०५०६/प्र.क्र.५३/इमारत/२, दि.२८.९.२००६ नुसार कपात करून कंत्राटदाराला दंडीत करण्यात आलेले आहे आणि त्यामुळे शासनाची रू.१३,३७,२८२/- इतकी बचत झालेली आहे. कंत्राटदार मे.मिनार कन्सट्रक्शन लातूर ज्यांनी गंभीर स्वरूपाची चूक केलेली आहे त्यांचेवर अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांनी ठपका ठेवला असून सदर कंत्राटदाराच्या सन २००९-१० च्या वार्षिक गोपनीय अहवालात प्रतिकूल नोंद घेण्यात आलेली आहे. सदर कंत्राटदाराच्या नोंदणीवर/नोंदणी पुर्नर्जिवित करण्यावर भविष्यात परिमाण होईल.

संपूर्ण आणि सविस्तर चौकशीनंतर वरीलप्रमाणे कार्यवाही केलेली असल्याने याप्रकरणी अन्य चौकशी करण्यात आलेली नाही. वर नमूद कामांची अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी दि.६.५.२००६, दि.१६.१०.२००७ आणि दि.२५.१०.२००७ रोजी तपासणी केलेली असून त्यांनी गुणवत्तेबाबत सूचना निर्गमित केलेल्या होत्या सदर चौकशीचे अनुपालन करण्यात आलेले असून, सदर अवलोकन ज्ञापनांची पूर्तता करण्यात आलेली आहे व दक्षता व गुणनियंत्रण मंडळाने ती स्विकारून निर्गमित केलेली ज्ञापने बंद केलेली आहेत. त्यामुळे याप्रकरणी स्वतंत्र चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

वर नमूद कामांच्या दस्तऐवजाची तपासणी करताना कंत्राटदार हा फक्त चारपैकी एका कामामध्ये दोषी आढळून आला आहे आणि त्यामुळे अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित, करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

बोगस प्रदाने

४.३ कर्तव्यावर हजर २० कर्मचाऱ्यांचे रजा मुदती प्रवास सवलतीचे दावे मंजूर करणे हे दर्शविते की, रू.१.३० लक्षची प्रदाने घोटाळयाने देण्यात आली.

सन १९९३ पासून शासनाने (मार्च, १९९५) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरिता रजा मुदती प्रवास सवलत योजना प्रस्तुत केली. शासकीय कर्मचारी चार वर्षाच्या गटामध्ये दोन रजा मुदती प्रवास सवलती स्वगृही जाण्याकरिता किंवा एक रजा मुदती प्रवास सवलत महाराष्ट्र राज्यामध्ये मुख्यालयापासून कोणत्याही पूर्व घोषित स्थानी जाण्याकरिता व एक स्वगृही जाण्याकरिता घेण्याचे हकदार आहे. प्रवास खर्च निकटच्या मार्गाने प्रत्यक्ष तिकिट भाडयाचे आधारे प्रतिपूर्ती योग्य आहे.

केन्द्रीय लेखापरिक्षणामध्ये (डिसेंबर, २००७) अभिलेख्यांची छाननी करता, असे आढळून आले की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा हयांनी जानेवारी आणि मे, २००७ दरम्यान वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांचे रजा प्रवास सवलतीचे देयक मंजूर केले व त्यांना रू.२.५१ लाख प्रदान केले. (ऑगस्ट, २००७). परंतु असे दिसून आले की, २९ प्रकरणांमध्ये हजेरी पुस्तकानुसार कर्मचाऱ्यांनी ज्या तारखेला रजा मुदती प्रवास सवलत घेतली होती त्या तारखेला कर्मचारी कर्तव्यावर हजर असल्याचे आढळून आले. कार्यकारी अभियंत्यांने बिल पास करतांना नित्याची तपासणी करण्यात अपयशी ठरणे हे २९ कर्मचारी जे एलटीसी घेतलेल्या तारखेला कर्तव्यावर हजर होते त्यांना रू.१.३० लाखांच्या बोगस प्रदानाचे दर्शक आहे.

सदर बाब नजरेस (एप्रिल, २००८) आणून दिल्यानंतर, शासनाने (जुलै, २००८) असे नमूद केले की, मुख्य अभियंत्यांनी पैश्याच्या वसुलीकरिता कारवाई आरंभिली आहे व संबंधित कर्मचाऱ्यांविरूद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरू केली आहे.

ज्ञापन :-

४.४ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की, पांढरकवडा सा. बां. विभागातील ज्या २९ कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर हजर असतांनाही रजा मुदत प्रवास सवलत मंजूर करून रू.१,३०,००८/- प्रदान करण्यात आले होते. ती रक्कम त्या २९ कर्मचाऱ्यांकडून वसुल केली

असून सदरची रक्कम दि.२४.१०.२००८ रोजी चलनाद्वारे शासकीय कोषागारात जमा केलेली आहे.

सदर प्रकरणी घडलेल्या अनियमिततेबाबत रजा प्रवास सवलत मंजूरी प्रक्रियेस प्रत्यक्ष जबाबदार असलेल्या १८ अधिकारी/कर्मचारी यांचेविरूद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ अंतर्गत विभागीय चौकशी आदेशित केली असून ज्या कर्मचाऱ्यांनी कर्तव्यावर हजर असतांना रजा प्रवास सवलत उपभोगलेली आहे अशा २९ कर्मचाऱ्यांपैकी २ कर्मचाऱ्यांचे निधन झाल्यामुळे त्यांची नावे चौकशीतून वगळण्यात येवून उर्वरीत २७ कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम १० खाली विभागीय चौकशी आदेशित केली आहे.

(१) रजा मुदत प्रवास सवलत योजनेचा लाभ देऊन प्रवास खर्चाच्या रकमेची प्रतिपूर्ती विहित नियमानुसार केली आहे किंवा कसे तसेच अशा प्रकारची अनियमितता अन्यत्र घडलेली आहे किंवा कसे याबाबत तपासणी करण्याच्या व असा प्रकार भविष्यात घडणार नाही याबाबत दक्षता घेण्याबाबत दि. २/७/२०११ च्या पत्रान्वये सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) सदर प्रकरणी घडलेल्या अनियमिततेबाबत जबाबदार असलेल्या ४५ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूद्ध विभागीय चौकश्या आदेशित करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी रजा प्रवास सवलत उपभोगलेल्या एकूण २७ कर्मचाऱ्यांपैकी १ कर्मचाऱ्याचे निधन झाले असून उर्वरित २६ कर्मचाऱ्यांविरूद्ध विभागीय चौकशी अंती त्यांचेवर ठपका ठेवण्यात आला असून सदर प्रकरणात रक्कम दिल्याच्या दिनांकापासून शासनास भरणा केल्याचे दिनांकापर्यंतच्या कालावधीकरिता शासनाच्या गुंतलेल्या रक्कमेवर दरसाल दरशेकडा १८ टक्के दंडनिय दराने व्याजासह वसुली करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. तसेच उर्वरित १८ अधिकाऱ्यांविरूद्धची विभागीय चौकशी पूर्ण होण्यास काही कालावधी लागणार आहे. ही कार्यवाही पूर्ण होताच त्याबाबत अवगत करण्यात येईल.

निधी उपलब्ध असून देखील निधीच्या कमतरतेच्या कारणाखाली काम काढून घेतल्याचा परिणाम कामाच्या निविदा पुन्हा बोलावल्यावर शासनावर रू.९९ लाखाचे अतिरिक्त दायित्व येण्यात झाला.

जिल्हाधिकारी हिंगोली यांचेसाठी प्रशासकीय इमारत बांधण्याचे कामाला शासनाने प्रशासकीय मान्यता दिली (नोव्हेंबर १९९९) व ते काम कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांचे ठेवीचे काम म्हणून निष्पादीत करावयाचे होते. हे काम कार्यकारी अभियंता यांनी (मार्च २००१) एका कंत्राटदाराला रू.५.५३ कोटी या अंदाजित किंमतीच्या १९.२२ टक्के कमी याप्रमाणे दिले. तथापि कामावर रू.५.१८ कोटी खर्च केल्यानंतर हे काम कंत्राटदाराकडून खंड १५ (i) खाली निधीच्या कमतरतेच्या कारणांनी काढून घेतले गेले (जुन २००७) शिल्लक काम ज्याची किंमत चालू दर स्विकृत केल्यामुळे रू.१.६९ कोटी इ.झाली होती ते काम दुसऱ्या कंत्राटदाराला सुधारित अंदाजित किंमतीच्या १४.७० टक्के जास्त भाव याप्रमाणे रू.१.९३ कोटीला दिले गेले. (नोव्हेंबर २००७)

ज्ञापन :-

४.५ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

हिंगोली येथे प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकाऱ्यांचे निवासस्थान, महसूल विभागाचे कर्मचाऱ्यांकरीता निवासस्थाने बांधण्याचे काम ठेव निधीतून हाती घेण्यात आले होते. या कामास शासन महसूल विभाग शासन निर्णय दिनांक १६.११.१९९९ अन्वये रूपये १०.११ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता मंजूर करण्यात आली होती. प्रशासकीय मान्यता ही सन १९९८-९९ चे दरसूचीवर आधारित होती.

अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ नांदेड यांनी जून २००० मध्ये तांत्रिक मान्यता दिली होती.

मोठ्या प्रमाणावरील प्रसिद्ध आधारे रूपये ५,५२,९२,६५५/- इतक्या रकमेची निविदा जारी करण्यात आली होती. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील सर्व नियम, निकर्ष अनुसरून अंदाजपत्रकीय किंमत रू.४,४४,६५,४०९/- च्या १९.२२ टक्के निम्न दराने मे.एलोरा कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांना काम देण्यात आले होते. कार्यारंभ आदेश दिनांक ७-३-२००१ ला २४ महिन्याच्या कालमर्यादेसह (म्हणजेच दिनांक ६.३.२००३ पर्यंत) देण्यात आले होते.

उपयोगकर्त्या विभागाकडून सुरूवातीस रूपये २१०.०० लक्ष एवढी रक्कम प्राप्त झाली होती. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील कार्यपद्धती/नियमानुसार ठेवीची पूर्ण

रक्कम प्राप्त झाल्याखेरीज काम सुरू करू शकत नाही. तरीही या कामाची उपयोगकर्त्या विभागाकडून ठेवीची पूर्ण रक्कम प्राप्त होईल असा आशावाद ठेवून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांनी कार्यारंभ आदेश जारी करून कंत्राटदारास काम सुरू करण्याबाबत विचारले होते. तरीही जिल्हाधिकारी, हिंगोली यांचेकडून पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे निर्धारित वेळेत (६.३.२००३) काम पूर्ण होऊ शकले नाही. म्हणून दिनांक ३१.३.२००४ पर्यंत पहिली मुदतवाढ मंजूर करण्यात आली. या मुदतवाढीच्या कालावधीत विभागास रू.९६.५० लक्ष एवढा ठेव निधी प्राप्त झाला होता. पुरेसा निधी उपलब्ध न झाल्यामुळे दुसरी मुदतवाढ दिनांक ३१.१२.०४ पर्यंत मंजूर करण्यात आली. परंतू या वेळेसदेखील जिल्हाधिकारी, हिंगोली यांचेकडून या कामाकरीता निधी उपलब्ध करून दिला नाही. दरम्यान संबंधित कंत्राटदार सदरचे काम निविदा खंड १५ खाली काम मागे घेण्यासाठी आग्रह करीत असल्यामुळे कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, हिंगोली यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांना बरीच पत्र लिहीली. असे असतानाही विभागाने एकतर्फी तिसरी मुदतवाढ दिनांक ३१.३.०६ पर्यंत दिली. परंतू कंत्राटदार या तिसऱ्या मुदतवाढीस तयार नव्हता. निविदा खंड १५ खाली काम काढून घेण्याबद्दलची दिनांक ३१.१.२००६ ची शेवटची विनंती होती आणि कंत्राटदार निविदा १५ (i) खाली काम काढून घेण्यास पात्र होता.

दरम्यान मार्च २००६ मध्ये जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी प्रशासकीय मान्यतेनुसार उर्वरित कामाकरीता रू.३३२.७० लक्ष एवढा निधी ठेवला. परंतु कंत्राटदार काम पूर्ण करण्यास तयार नव्हता. स्टील, सिमेंट इ.साहित्याच्या दरात अधिकची वाढ झाली होती.

निविदेमध्ये भाववाढीचा खंड असला तरीही सन २००३ ते २००६ दरम्यान पुरेशा प्रमाणात भाववाढ मिळत नसल्यामुळे दुसऱ्या मुदतवाढीनंतर देखील कंत्राटदार काम करण्यास तयार नव्हता. असे असतानाही संबंधित कंत्राटदारास त्याची काहीही चुक नसताना सन १९९९-२००० च्या जिल्हा दरसूचीवर सन २००६-०७ मध्ये काम करण्यास सांगणे नैसर्गिक न्याय तत्वाच्या विरूद्ध ठरले असते.

वस्तुस्थितीचा आधार व सत्यता स्विकारून मुख्य अभियंता, औरंगाबाद यांनी अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, नांदेड यांचे शिफारशीवर दिनांक ४.१०.२००६ रोजी खंड १५ (i) खाली सदरचे काम संबंधीत कंत्राटदाराकडून काढून घेतले होते.

जिल्हाधिकारी हिंगोली यांचेकडून दिनांकनिहाय प्राप्त अनुदानाचा तपशील खालील तक्त्यात देण्यात आला आहे.

वर्ष	धनादेश क्रमांक/दिनांक	ठेव रक्कम
१९९९-२०००	४४४२३५/२९.३.२०००	२१०.००
२०००-२००१	-	निरंक
२००१-२००२	५७२८३७/३.५.२००१	८०.९४
	११५०२६/२६.६.२००१	२५.००
	एकूण	१०५.९४
२००२-२००३	९००४६२/३-६-२००२	२५.००
२००३-२००४	२८६२८२/७-४-२००३	१५.००
	२८६८८९/८-७-२००३	५.३३
	२८७०७९/१९-९-२००३	१२.२७
	२८७४७६/१२-१२-२००३	१४.४०
	२८९२३६/८-३-२००४	४.९५
	एकूण	१०३.६२
२००४-२००५	२८९६९१/१९-४-२००४	३०.००
	२८८०८४/२३-७-२००४	१०.६६
	२८८४६४/१८-१०-२००४	५६.१४
	२८८४६३/१८-१०-२००४	५.३३
	एकूण	१०२.१३
२००५-२००६	६२८९४८/४-४-२००५	२.७०
	४६७५८८/१६-७-२००५	५.००
	०९१२५५/१३-१२-२००५	१२.५०
	०९१५१३/५-१-२००६	२.५०
	०९१५१३/५-१-२००६	२.५०
	०९१६०२/२-२-२००६	२.५०
	४६८२०४/३-३-२००६	३०५.००
	एकूण	३३२.६९
२००६-२००७	४६८९२२/२९-५-२००६	१३.५७
	४७१७०५/५.३.२००७	६७.८२
	एकूण	८१.३९
२००७-२००८	४५७८९३/२९-६-२००७	९.७३
	४५९८४७/१८-१२-२००७	२८.५८
	४५९९८४/४-१-२००८	४.७६
	४३६३१३/१२-२-२००८	४.७६
	४३६४३०/२१-२-२००८	४.७६
	४३६६४५/१४.३.२००८	४.७६

	एकूण	५७.३७
	एकूण	९१३.१४

वरील कोष्टक दिनांकनिहाय प्राप्त निधी दर्शविते. त्यावरुन असे दिसून येते की, सन २०००-०१ या आर्थिक वर्षात निधी देण्यात आलेला नव्हता. ठेवीवरील काम असतानादेखील रू.५५२.९३ लक्ष किंमतीच्या एवढया मोठ्या कामाकरीता पूर्ण क्षमतेने निधी उपलब्ध करून दिला गेला नाही. या कामाकरीता निधीचा ओघ हा थेंबाथेंबाप्रमाणे होत असल्याची परिस्थिती कंत्राटदाराने जेव्हा पाहिली तेंव्हा त्याने विभागाकडे ऑक्टोबर २००३ पासून त्यांचे कंत्राट अंतिम करण्यात यावे. विभागाने दिनांक ३१.३.२००६ पर्यन्त एकतर्फी मुदतवाढ देऊन काम करण्याची विनंती करून देखील वस्तुस्थिती अशी होती की, कंत्राटदार काम करावयास तयार नव्हता.

जिल्हाधिकारी, हिंगोली यांचेकडून सन २००५-२००६ या वर्षात प्राप्त निधी/ठेवी पुढील प्रमाणे होत्या.

(१) ४.४.२००५ - रू.२.७० लक्ष

(२) १६.७.२००५ - रू.५.०० लक्ष

(३) १३.१२.२००५ - रू.१२.५० लक्ष

(४) ५.१.२००६ - रू.२.५० लक्ष

(५) २.२.२००६ - रू.२.५० लक्ष

(६) ३.३.२००६ - रू.३०५.०० लक्ष

यावरून असे दिसून येईल की, संपूर्ण वर्षभरात फक्त रूपये २५.०० लक्ष एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता व आर्थिक वर्षअखेर मार्च-२००६ मध्ये रू.३०५.०० लक्ष एवढा मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला. कंत्राटदाराने काम सुरू करण्यास प्रतिसाद देण्याच्या प्रतिक्षेनंतर त्याचा नकार अभिलेखावर घेण्यामध्ये कार्यकारी अभियंता यांनी या कामाकरीता पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात विभाग दोषी असल्यामुळे त्यांनी हे काम खंड १५ (१) खाली काढून घेण्यासाठी प्रस्तावित केले. त्यामुळे निधी उपलब्ध असतानादेखील खंड १५(१) खाली कार्यकारी अभियंता यांनी काम काढून घेण्याचे प्रस्तावित केले हे लेखापरिक्षकांचे म्हणणे बरोबर ठरत नाही.

विनिर्देशांचे पालन न केल्याने अधिक खर्च

४.६ कार्यकारी अभियंत्यांनी विहीत विनिर्देशाचा अंगिकार न केल्यामुळे नाबार्डने सहाय्य केलेल्या रस्त्यांच्या कामावर रू.२०.०७ लक्ष अधिक खर्च झाला.

शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने अशा सुचना निर्गमित केल्या की, (ऑक्टोबर १९९८) विभागातील रस्त्यांच्या सर्व कामात एकरूप विनिर्देश अंगिकारले पाहिजेत. नाबार्डच्या कामांमध्ये अंगिकारावयाच्या विनिर्देशांमध्ये अशी तरतूद होती की, रस्त्याकरिता २० मि.मि. ओपन ग्रेड प्रिमिक्स कार्पेटवर (ओपीजीसी) द्रवरूप सील थराचा वापर करायचा होता.

तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद आणि यवतमाळ यामध्ये असे आढळून आले की नाबार्ड मार्ग प्रकल्प अंतर्गत २००६-०७ मध्ये केलेल्या १७ रस्त्यांच्या कामात प्रिमिक्स सील थराचा वापर केला गेला. अमरावती विभागाच्या चालू दरसुचीप्रमाणे द्रवरूप सील थराचा वापर करण्याचा दर रू.२० प्रती चौरस मीटर तर प्रिमिक्स सील थराचा वापर करण्याचा दर रू.२६.५० प्रती चौरस मीटर होता. याप्रमाणे विभागाने प्रिमिक्स सील थराचा वापर केला होता अशा १७ रस्त्यांच्या २१,५४७६.६३ चौरस मीटर कामात रूपये १४.०१ लाख जास्त खर्च केले. शासनाच्या अनुदेशाप्रमाणे (१९९८) रस्त्यांकरीता बिटुमिनस बाउंड मेकॅडम (बीबीएम) पृष्ठभागावर द्रवरूप सील थरासहीत २० मि.मि. ओपन ग्रेड प्रिमिक्स कार्पेट (ओपीजीसी) चा वापर करावयास पाहिजे. तथापि असे दिसून आले की, कार्यकारी अभियंता, जनजाती सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवण, नाशिक आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर) पुणे यांनी अनुक्रमे २००२-०३ आणि २००७-०८ मध्ये निष्पादित केलेल्या दोन (नाशिकमधील नांदुरी ते सप्तशृंगीगड व पुण्यातील पौड कोलवण ते लोणावळा रस्त्याचा विकास) रस्त्याच्या कामात २० मि.मि. ओपीजीसी च्या ऐवजी २५ मी.मी. ओपीजीसी ची तरतुद केली. त्यासंबंधी चालू दरसुचीप्रमाणे नाशिक आणि पुणे् मधील कामांच्या दरांमधील फरक अनुक्रमे रू.१२ प्रती मि.मि. आणि रू.१५.८० प्रती चौ.मि. होता. याचा परिणाम नाशिकमध्ये वापरलेल्या २८१६० चौ.मि. ओपीजीसीवर रू.३.३८ लाख आणि पुणेमध्ये वापरलेल्या १६,९६८ चौ.मि. ओपीजीसी वर रू.२.६८ लाख जास्त खर्च होण्यात झाला.

अधिक्षक अभियंता, यवतमाळ यांनी नमुद केले (एप्रिल २००८) की, द्रवरूप सील थर अपेक्षीत दर्जाचा नव्हता. त्यामुळे प्रिमिक्स सील थराचा वापर केला गेला. तसेच कार्यकारी

अभियंता, नाशिक आणि कार्यकारी अभियंता पुणे यांनी नमुद केले (मे -२००८) की, कामाच्या जागेच्या परिस्थितीप्रमाणे आणि तांत्रिक आवश्यकतेप्रमाणे तरतुदी केल्या गेल्या.

ही उत्तरे समर्थनीय नाहीत कारण ना शासनाच्या सुचनामध्ये एकरूप मानकात बदल करता येत होता ना अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांनी मुख्य अभियंताकडून अशा बदलाची मागणी केली होती. याप्रकारे विभागाने शासनाने विहीत केलेल्या विनिर्देशाचा अंगिकार न केल्यामुळे नाबार्डने सहाय्य केलेल्या कामावर रू.२०.०७ लक्ष जास्त खर्च केले. ही बाब शासनाच्या सचिवांना कळविण्यात आली. उत्तर आले नाही. (ऑगस्ट २००८)

ज्ञापन :-

४.७ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

सदर परिच्छेदामध्ये शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने ऑक्टोबर, १९९८ मध्ये विभागातील सर्व कामांना एकरूप विनिर्देश अंगिकारले पाहिजेत अशा प्रकारच्या सूचना दिल्याचे नमूद केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर विषयाबाबतचे परिपत्रक क्र.डीबीएम-१०८२/सी.आर.२४५७/नि-३, दि.२० ऑक्टोबर, १९९३ अन्वये निर्गमित करण्यात आले होते. त्यामुळे परिच्छेदात नमूद केलेला ऑक्टोबर, १९९८ चा उल्लेख नजरचुकीने झालेला आहे.

सदर परिच्छेदात १) अमरावती विभागांतर्गत पुसद व यवतमाळ विभागांतील १७ कामांवर विहित केलेल्या लिक्वीड सीलकोट ऐजवी प्रिमिक्स सीलकोट करणे व २) जनजाती, सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवण (जि.नाशिक) विभागांतर्गत एक काम व उत्तर पुणे सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत एक काम यामध्ये विहित केलेल्या २० एम.एम.कारपेट ऐवजी २५ एम.एम.जाडीचे कारपेट करणे या दोन बाबींचा समावेश आहे. याबाबत झालेल्या अधिकच्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ) पुसद व यवतमाळ विभागातील १७ कामांमध्ये लिक्वीड सीलकोटऐवजी प्रिमिक्स कारपेट करणे - रू.१४.०१ लक्ष

ब) जनजाती, सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवण (जि.नाशिक) या विभागांतर्गत नांदुरी ते सप्तशृंगी गड या कामातील २० एम.एम.कारपेटऐवजी २५ एम.एम.कारपेट करणे रू.३.३८ लक्ष

क) सार्वजनिक बांधकाम विभाग उत्तर, पुणे या विभागांतर्गत या कामातील २० एम.एम.कारपेटऐवजी २५ एम.एम.कारपेट करणे - रू. लक्ष २.६८

डांबरीकरणाची कामे करतांना येणाऱ्या अडचणींचा व सूचनांचा विचार करून तसेच डांबरीकरणाची कामे करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध झाल्यामुळे अधिक उपयुक्त व टिकाऊ स्वरूपाची डांबरीकरणाची कामे करण्यासाठी शासनाने यापूर्वी निर्गमित केलेल्या दि.२० ऑक्टोबर, १९९३ च्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना अधिक्रमित करून शासनाचे परिपत्रक क्र.डिबीएम १०८२/सी.आर.२४५७/नि-३, दि.४ मार्च, २००३ नुसार सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार रस्त्यावरील डांबरीकरणाच्या कामासाठी अनुसरावयाच्या बाबी व विनिर्देश यांची निवड त्या रस्त्यावरील वाहतूक वर्दळ, पर्जन्यमान, कामाचे स्वरूप (जसे नवीन बांधकाम, मजबुतीकरण किंवा नुतनीकरण), रस्त्याच्या अस्तित्वातील पृष्ठभागाची स्थिती यानुसार निश्चित केलेली आहे.

सदर परिपत्रकातील परिच्छेद-२.० खालीलप्रमाणे आहे.

परि.२.० उष्ण मिश्रीत डांबरीकरणाच्या कामासंबंधात खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत. या प्रक्रियांच्या प्रकारामध्ये बदल करणे क्षेत्रिय कार्यालयास आवश्यक वाटल्यास त्यांनी संबधित मुख्य अभियंत्यांची लेखी पूर्व परवानगी घ्यावी. उष्ण मिश्रणाऐवजी पारंपारिक पद्धतीने थंड मिश्रण वापरण्यासाठी देखील मुख्य अभियंता यांची लेखी पूर्वपरवानगी आवश्यक राहील. मुख्य अभियंत्यांनी सदर बदलास मान्यता देताना त्याची कारणे अभिलेखात नोंदवावीत.

परिच्छेद-२ मध्ये नमूद यवतमाळ जिल्ह्यातील १७ कामांना सन २००६-०७ या वर्षात तांत्रिक मान्यता देण्यात आल्या आहेत. सदर तांत्रिक मान्यता देतांना शासनाचे दि.४ मार्च, २००३ चे परिपत्रक अंमलात होते. त्यानुसार डांबरीकरणाची कामे करतांना लिक्वीड सीलकोट करणे अत्यावश्यक होते. तथापि, अमरावती सा.बां.प्रादेशिक विभागातील लिक्वीड सिलकोटची

कामे करतांना येणाऱ्या अडचणी व कामाची गुणवत्ता याचा विचार करून मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.विभाग, अमरावती यांनी त्यांचे पत्र क्र.का-२(१)/बाविआ/०६-९७/४७४५, दि.१३ नोव्हेंबर, २००६ अन्वये लिक्वीड सिलकोटऐवजी प्रिमिक्स सिलकोट करण्याबाबत आदेश दिले होते. (दोन्ही प्रती अहवालातील परिशिष्टात जोडाव्यात) त्यामध्ये डांबरीकरणाची कामे करतांना केंद्र सरकारच्या मिनिस्ट्री होते. (दोन्ही प्रत अहवालातील परिशिष्टात जोडाव्यात)) त्यामध्ये डांबरीकरणाची कामे करतांना केंद्र सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ सरफेस ट्रान्सपोर्टच्या विनिर्देशाप्रमाणे २० एम.एम.उष्ण खडीमिश्रित कारपेट व लिक्वीड सिलकोट टाईप ए अथवा प्रिमिक्स सिलकोट टाईप बी अशी तरतूद करण्यात येते. लिक्वीड सिलकोटचे काम चांगल्या दर्जाचे होत नसल्यास २० एम.एम.उष्ण प्रिमिक्स खडी कारपेटवर प्रिमिक्स सिलकोट टाईप बी अशी तरतूद करण्यास हरकत नसावी असे स्पष्ट नमूद केले आहे.

मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.विभाग, अमरावती यांच्या वरील सुचनांच्या आधारे यवतमाळ जिल्ह्यातील पुसद आणि यवतमाळ विभागांमध्ये लिक्वीड सिलकोटऐवजी प्रिमिक्स सिलकोटचे काम करण्यात आले. सदरची बाब ही दिनांक ४ मार्च, २००३ मध्ये मुख्य अभियंत्यांना प्रदान केलेल्या अधिकारानुरूप आहे. त्यामुळे पुसद व यवतमाळ जिल्ह्यातील १७ कामांमध्ये लिक्वीड सिलकोटऐवजी प्रिमिक्स सिलकोट करण्याची बाब ही नियमानुसारच आहे.

जनजाती, सा.बां.विभाग, कळवण यांनी नांदुरी ते सप्तशृंगी गड येथील कामासाठी शासनाच्या दि. ४ मार्च, २००३ च्या परिपत्रकाप्रमाणे २० एम.एम.कारपेट न करता २५ एम.एम.कारपेट केल्यामुळे रू.३.३८ इतका अधिकचा खर्च झाल्याचा आक्षेप आहे. उपरोक्त परिच्छेद-३ व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासनाने विहित केलेल्या विनिर्देशामध्ये बदल करण्याचा अधिकार मुख्य अभियंत्यांना आहे.

नांदुरी ते सप्तशृंगी गड हा रस्ता गडावर जाणारा एकमेव रस्ता असून तो संपूर्णपणे डोंगराळ भागातील व घाटमाथ्यावरचा आहे. सन २००२-०३ मधील सदर भागातील पर्जन्यमान ११०० ते १२०० मि.मि. इतके होते. सप्तशृंग गड हे देवस्थान महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असून तेथे भाविकांची प्रचंड प्रमाणात वाहतूक वर्दळ असते. (वाहतूक वर्दळ ५०९३ मे.टन प्रतिदिन). त्यामुळे डोंगराळ भाग, घाटरस्ता, अतिवृष्टीचा प्रदेश व वाहतूक वर्दळ याचा विचार करता विहित केलेल्या २० एम.एम.कारपेटपेक्षा २५ एम.एम.कारपेट करणे

आवश्यक होते. या बाबीचा विचार करून मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि.१२ फेब्रुवारी, २००२ रोजी निरिक्षण टिप्पणी काढली होती. (प्रत सोबत) त्यानुसार मुख्य अभियंता यांनी सदर काम करतांना २५ एम.एम.ओपन ग्रेडेड कारपेट व सिलकोट करण्यात यावा असे स्पष्ट निर्देश दिले होते. त्यानुसार सदर कामास सन २००२-०३ मध्ये तांत्रिक मान्यता देण्यात आली. त्यामुळे परिच्छेदात नमूद केलेला रू.३.३८ लक्ष रकमेचा अधिकचा खर्च झाला अशी बाब नाही.

सार्वजनिक बांधकाम विभाग, उत्तर पुणे शासनाच्या दिनांक ४ मार्च, २००३ च्या परिपत्रकाप्रमाणे २० एम.एम.कारपेट न करता २५ एम.एम.कारपेट केल्यामुळे रू.२.६८ लक्ष इतका अधिकचा खर्च झाल्याचा आक्षेप आहे. उपरोक्त परिच्छेद-३ व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासनाने विहित केलेल्या विनिर्देशामध्ये बदल करण्याचा अधिकार मुख्य अभियंत्यांना आहे.

उपरोक्त कामे करताना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आलेल्या अडचणी तसेच केंद्रीय मंत्रालयाच्या मिनिस्ट्री ऑफ सरफेस ट्रान्सपोर्टने विहित केलेले विनिर्देश यांचा साकल्याने विचार करून तसेच ग्रामीण भागात गावातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करतांना येणाऱ्या अडचणी शासनाने दि.४ मार्च, २००३ चे परिपत्रक अधिक्रमित करून परिपत्रक क्र.संकीर्ण-२००७/प्र.क्र.२५७/रस्ते-१, दिनांक २१ जानेवारी, २००८ अन्वये रस्त्याचे डांबरीकरण करणे व तद्अनुषंगिक मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार आता लिक्वीड सिलकोटऐवजी प्रिमिक्स करण्याची बाब तसेच २५००० मेट्रिक टन ते १०००० मेट्रिक टन वाहतूक वर्दळीसाठी व २५००० मि.मि. पेक्षा जास्त पर्जन्यमान असलेल्या भागात २५ एम.एम.प्रिमिक्स कारपेटची तरतूद केली आहे. त्यामुळे उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेल्या बाबीस शासनाने मंजूरी दिली आहे. तसेच यापूर्वी केलेली कार्यवाही ही मुख्य अभियंता यांच्या अधिकारक्षेत्रातील असल्याने नियमानुसारच होती ही बाब स्पष्ट होते. उपरोक्त सर्व बाबींचा विचार होऊन सदर परिच्छेद संपुष्टात आणण्यात यावा अशी विनंती आहे.

"जमिनीच्या अभावामुळे टाळता येण्याजोगे जादा दायित्व" -

४.८ जमिनीच्या उपलब्धतेबाबत खोट्या प्रमाणकावर कार्यालयीन इमारत बांधणीच्या प्रारंभामुळे रूपये ५८.३६ लाखाचे अतिरिक्त दायित्व आले.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेमध्ये अशी तरतूद आहे की, ज्या जमिनीचे हस्तांतरण जबाबदारी नागरी अधिकाऱ्यांनी केले नाही त्यावर कुठलेही काम प्रारंभ करू नये. जेव्हा जमीन संपादन करण्याआधीच कामांच्या निविदा स्विकारल्या जातात तेव्हा जमीन संपादन करण्यास आवश्यक असलेला कालावधी संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडून काम सुरू करण्याचे आदेश निर्गमित करण्याआधी जाणून घेतला पाहिजे.

कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग भंडारा यांच्या अभिलेख्यांच्या छाननीत (मार्च २००८) असे उघडकीस आले की, शासनाने नोव्हेंबर, २००२ मध्ये लाखणी जिल्हा भंडारा येथे तहसिल कार्यालयाची इमारत रू.१.४१ कोटी खर्चाने बांधण्यास मंजूरी दिली. ऑगस्ट २००४ मध्ये कार्यकारी अभियंता यांनी अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ नागपूर यांना असे वचन दिले होते की, जमीन ताब्यात असून जमिनीच्या अभावी काम अडणार नाही. हे काम एका कंत्राटदाराला (डिसेंबर २००४) रू.७५.९९ लाख या अंदाजित किंमतीच्या ४.९९ टक्के कमी या दराने १२ महिन्यांच्या आत पूर्ण कण्यासाठी दिले. कंत्राटदाराला काम सुरू करता आले नाही. कारण ग्रामपंचायत लाखणीने (डिसेंबर २००३) प्रस्तावित जागेवर कुठलेही बांधकाम करू देण्याचे नाकारले. जिल्हाधिकारी भंडारा यांनी डिसेंबर २००५ मध्ये पर्यायी जमिनीची तरतूद केली. कंत्राटदाराला फेब्रुवारी २००६ मध्येच काम सुरू करता आले व यावर एप्रिल २००७ पर्यंत रू.६.३० लाखाचा खर्च झाला. (८.७२ टक्के) कारण १.०३ हेक्टर पैकी फक्त ०.४५ हेक्टर जमीन उपलब्ध केली गेली होती.

कार्यकारी अभियंता यांनी (ऑगस्ट २००७) कामाची धीमी प्रगती या कारणाने कंत्राटदाराच्या जोखीम आणि किंमतीवर कंत्राट समाप्त केले. कंत्राटदाराने या निर्णयाच्या विरूद्ध मुख्य अभियंता यांचेकडे अपील केले. कंत्राटदाराने केलेल्या अभिवेदनांच्या आधारावर कार्यकारी अभियंता यांनी अधीक्षक अभियंता यांचेकडे विभागाला कंत्राटदाराला जमीन उपलब्ध करून देण्यात अपयश आले होते या कारणाने, काम कंत्राटदाराची जोखीम आणि किंमत या बाबी ऐवजी बाब १५ खाली काढून घेण्याची शिफारस केली. यामुळे पहिल्या कंत्राटदाराकडून जादा किंमत वसुल करण्याची कुठलीही शक्यता नव्हती. मार्च २००८ मध्ये रू.६९.१२ लाख किंमतीचे उरलेले काम दुसऱ्या कंत्राटदाराला उर्वरित कामाच्या अंदाजित किंमतीच्या ७९.८० टक्के जास्त या दराने नऊ महिन्यात पूर्ण करण्यासाठी दिले गेले. खोटया प्रमाणकावर काम

देणे, कामाकरिता आवश्यक असलेल्या १.०३ हेक्टर जमिन उपलब्ध करण्यातील विलंब, पहिल्या कंत्राटदाराकडून काम काढून घेणे आणि उरलेले काम दुसऱ्या कंत्राटदाराला त्याच जागेवर देणे यामुळे रू.५८.३६ लाखाचे टाळता येण्याजोगे दायित्व आले.

कार्यकारी अभियंता यांनी नमूद केले (मार्च २००८) की काम सुरू करण्याच्या आदेशाच्या तारखेला जमीन ताब्यात होती.

हे उत्तर मान्य करण्यासारखे नव्हते कारण १.०३ हेक्टर पैकी फक्त ०.४५ हेक्टर जमीन कार्यकारी अभियंता यांच्या ताब्यात होती. ज्यांनी संपूर्ण जमीन ताब्यात असल्याचे चूकीचे प्रमाणपत्र दिले. याशिवाय ग्रामपंचायतीनेही स्थानिक लोकांच्या जागेवर आंदोलनाच्या भीतीने त्या जागेवर (डिसेंबर २००३) काही बांधकाम करू देण्याचे नाकारले होते. त्याप्रमाणे जमिनीची उपलब्धता असल्याचे प्रमाणकानंतरही कार्यकारी अभियंत्यांना काम सुरू होण्याआधी जमिन उपलब्ध करून देण्यात अपयश आले. ही बाब शासनांच्या सचिवांना मे २००८ मध्ये कळविण्यात आली.

ज्ञापन :-

४.९ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

महाराष्ट्र शासनाने पत्र दिनांक २८.११.२००२ रोजी रू.१,४०,५५,३००/- ची प्रशासकीय मान्यता तहसिल कार्यालय लाखणीच्या बांधकामाकरीता प्रदान केली होती. उपरोक्त काम प्रथमतः सन २००२-०३ च्या पुरवणी अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले होते. उपरोक्त कामाला अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ नागपूर यांनी रू.७८,१९,४००/- ची तांत्रिक मान्यता दि. १९.१.२००४ च्या पत्रान्वये प्रदान केली होती. कामाच्या निविदा जुलै, २००४ मध्ये प्रकाशित करण्यात येऊन निविदा स्विकृतीचा दिनांक २७.८.२००४ असा होता.

उपरोक्त इमारतीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागास महसूल खात्याने वाटप केलेल्या जमिनीवर प्रस्तावित होते. महसूल विभागाने या जमीनीचे हस्तांतरण या विभागास केले होते. तसेच ७/१२ चा उतारा देखील सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा यांच्या नावे देण्यात आला होता. तथापि, कामाची सुरूवात करताना स्थानिक लोकांनी मोर्चे काढून उपरोक्त जमीन ही शाळेतील/कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे खेळाचे मैदान असल्यामुळे त्यावर

तहसील कार्यालयाचे बांधकाम करू नये, याबाबत स्थानिक नागरिकानी, आमदार, प्राचार्य तसेच जिल्हाधिकारी यांना अभिवेदने सादर करून आणि निर्देशने करून काम बंद पाडले.

ग्रामपंचायत मुरमाडी/सावरी यांनी ग्रामसभेत ठराव पास करून तहसील कार्यालयाचे काम करून देण्याचे नाकारले.

तत्कालीन परिस्थितीत स्थानिक लोकांचा तहसील कार्यालयाच्या बांधकामावरील बहिष्कार लक्षात घेता कार्यकारी अभियंता, यांनी महसूल विभागाशी संपर्क साधून पर्यायी जागेचा शोध घेण्याची कार्यवाही योजली. पर्यायी जागा रा.म.क्र.६ च्या जवळ शोधण्यात आली असून ती ३५ मीटर उत्तरेला पूर्वी वाटप केलेल्या जमिनीच्या जवळ आहे. उपरोक्त जमीन तहसील कार्यालयाच्या बांधकामाकरता महसूल खात्याने या विभागाला दिनांक ७/१२/२००५ ला हस्तातंरित केली.उपरोक्त जागा देखील कामाकरिता पूर्णपणे उपलब्ध नव्हती तर त्या जागेत विद्युत डी.पी. व जिल्हापरिषदेची व्यायामशाळा होती. प्रस्तावित जमिनीचा समोरचा भाग हा अस्तित्वात असलेल्या तहसील कार्यालयाच्या मागील भागावर येत होता.

उपरोक्त नमूद केलेल्या बाबीवरून असे स्पष्ट होते, की तहसील कार्यालयाची जमीन या कार्यालयाच्या ताब्यात होती परंतु स्थानिक नागरीकांनी शाळा/कॉलेजातील विद्यार्थ्यांच्या खेळाच्या मैदानाकरिता त्या जागेवर बांधकाम करण्यास विरोध तथा आंदोलनाची तयारी केल्यामुळे पर्यायी जागेची मागणी करणे या कार्यालयास भाग पडले. पर्यायी जागेवरील अडचणी लक्षात घेता असे ठरविण्यात आले होते की, काम एक एक अडथळा दूर करून टप्प्या टप्प्यानी करावे. विद्युत डी.पी. जानेवारी २००७ मध्ये हटविण्यात आल्यानंतर प्रथम टप्प्यातील काम हातात घेण्यात आले. जेणेकरून तहसील कार्यालय नवीन तहसील कार्यालय पूर्ण करण्याचे प्रस्तावित होते. (प्रस्तावित नवीन इमारतीचा समोरचा भाग अस्तित्वात असलेल्या तहसील कार्यालयाच्या मागील भागावर येत होता.) जिल्हा परिषदेला व्यायामशाळा तोडण्याबाबत विनंती करण्यात आली होती.

परिस्थितीच अशी निर्माण झाली होती की वेळ जात होता परंतु, कंत्राटदाराला काम करण्याकरीता पूर्ण जमीन उपलब्ध करून देणे विभागाला शक्य होत नसल्यामुळे कंत्राटदाराच्या कामाची प्रगती मंदावली होती. त्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी कंत्राटदाराच्या जोखीम व किंमतीवर कंत्राट समाप्त केले. कंत्राटदाराने केलेले अभिवेदनाच्या आधारावर कार्यकारी

अभियंता यांनी अधीक्षक अभियंता यांचेकडे विभागाला कंत्राटदाराला जमिन उपलब्ध करून देण्यात अपयश आले या कारणाने काम कंत्राटदाराची जोखीम व किंमत या बाबीऐवजी बाब १५ खाली काढून घेण्याची शिफारस केली. विभागाकडे निविदा कलम १५ अन्वये काम काढून घेण्याशिवाय इतर कोणताही पर्याय शिल्लक नसल्यामुळे काम कलम १५ अन्वये काढून घेण्यात आले.

तहसील कार्यालयाच्या बांधकामाला स्थानिक नागरिकांचा विरोध असल्यामुळे कंत्राटदाराला काम करण्याचा पूर्ण वाव मिळाला नसल्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याने केलेली कार्यवाही न्यायोचित असल्यामुळे उपरोक्त परिच्छेद नागरी अहवालातून वगळण्याची विनंती करण्यात येत आहे.

कंत्राटदाराला काम जरी डिसेंबर २००४ मध्ये मिळाले असले तरी काम करण्याकरिता पुर्ण जागा उपलब्ध करून देण्याकरिता साधारणतः ३ वर्षाचा कालावधी लागला. सन २००४ ते २००७ (साहित्य व मजुराचे दर वाढल्यामुळे) कंत्राटदाराला काम परवडण्यासारखे नव्हते. तसेच त्याच कंत्राटदाराला काम पूर्ण करण्याकरिता बाध्य करणे न्यायोचित नसल्यामुळे काम कलम १५ अन्वये काढून घेण्यात आले. तीन वर्षात झालेला दरसुचीतील फरकामुळे कामाची किंमत वाढली.

उपरोक्त बाबीकरिता (रू.५८.३६ लक्षची भाववाढ) कंत्राटदार तसेच सा.बां.खाते जबाबदार नाही. महसुल खात्याने या कार्यालयास तहसील कार्यालयाच्या बांधकामाकरिता ०.४५ हेक्टर जमीन मुद्दा क्र.१ परिच्छेद ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ७/१०/२००५ ला देण्यांत आली होती. ०.४५ हेक्टर जमीन तहसील कार्यालयाच्या बांधकामाकरिता पर्याप्त असल्यामुळे उर्वरित (१.०३-०.४५) जमीनीची मागणी करण्यांत आली नाही.

वरील नमुद केलेल्या बाबीवरुन स्पष्ट होते की, निविदा प्रक्रिया सुरु करतांना सा.बां. विभागाकडे १.०३ हेक्टर जमीन होती. तद्नंतर स्थानिक लोकांच्या विरोधामुळे तहसील कार्यालयाची जागा विद्यार्थ्यांच्या खेळण्याच्या मैदानाकरिता राखीव ठेवल्यामुळे पर्यायी जमिनीची मागणी करण्याची गरज पडली. महसुल खात्याने सा.बां. विभागास १.०३ हेक्टर ऐवजी ०.४५ हेक्टर जागा उपलबध करुन दिली. दिलेली पर्यायी जागा पर्याप्त असल्यामुळे उर्वरित जागेची मागणी करण्यात आली नाही.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग भंडारा यांनी त्यांचे दिनांक १४.२.२००३ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी भंडारा यांना १.०३ हेक्टर जागेची मागणी केली होती. त्यामध्ये तहसिल कार्यालय लाखनीचे बांधकाम करीता ०.५३ हेक्टर तसेच भविष्यात तहसीलदार, नायब तहसीलदार व इतर कर्मचाऱ्यांची निवासस्थाने बांधावे लागतील असे गृहीत धरून १.०३ जागेची मागणी केली होती. परंतू प्रशासकीय मान्यता मंजूरीमध्ये फक्त तहसील कार्यालय बांधण्यासाठी रू.१,४०,५५,३००/- ची मंजूरी दिनांक २८.११.२००२ नुसार प्राप्त होती. फक्त तहसील कार्यालय बांधावयाचे असल्यामुळे उपविभागीय अधिकारी (राजस्व) साकोली, यांनी त्यांचे पत्र क्र.१३७६ दिनांक १९.५.२००३ नुसार गट क्र.१९१ मधील ०.४५ हेक्टर जागा फक्त तहसील कार्यालयाच्या इमारतीचे बांधकामासाठी दिलेली होती. त्यानुसार दि.२४.११.२००३ रोजी राजस्व विभागाकडून तलाठी यांचेकडून उपअभियंता सा.बां.उपविभाग, साकोली यांचे ताब्यात दिली होती.

प्राप्त झालेली ०.४५ हेक्टर जागा तहसील कार्यालय इमारतीचे बांधकामासाठी पुरेशी असल्यामुळे उपवास्तूशास्त्रज्ञ, नागपूर यांनी वास्तुमांडणी आराखडा त्यांचे पत्र क्र.६०७ दिनांक ५.८.२००४ रोजी अमृता कंन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर यांचेशी ४.९९ टक्के कमी दराने कंत्राट निश्चित करण्यात आले होते.

सदर स्पष्टीकरणावरून असे निदर्शनास येते की, तहसील इमारतीच्या बांधकामासाठी लागणारी जागा पुरेशी तसेच बांधकामासाठी ताब्यात होती तरी सदर परिच्छेद बंद करण्यात यावा, ही विनंती.

"बांधकामाची अनधिकृत अंमलबजावणी"

४.१० रू.१.५५ कोटी आकस्मिक कामांच्या खर्चाकरीता असलेली रक्कम वळवून कार्यालयांची आणि विश्रामगृहाची नुतनीकरणाची अनधिकृत कामे उरकली.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकामे नियमपुस्तिकेच्या परिच्छेद १४५ नुसार अनपेक्षित खर्चाकरीता आकस्मिक म्हणून कामाच्या अंदाजित खर्चामध्ये प्राधिकाऱ्याच्या संमतीशिवाय जरी ती त्या कामाची अनुषंगिक बाब असली तरी वळवावयाची नसते. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेच्या परिशिष्ट ४२ नुसार (अनुक्रमांक १४) अधीक्षक अभियंता यांना अंदाजपत्रकात

एखाद्या कामाच्या आकस्मिक खर्चाकरीता असलेली तरतूद त्याच अंदाजपत्रकात तरतूद न केलेल्या नवीन बाबीवर वळविण्याचे पूर्ण अधिकार आहेत.

चार कार्यालयातील (कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण; कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम), ठाणे आणि कार्यकारी अभियंता ठाणे विभाग, ठाणे (अधिक्षक अभियंता अंतर्गत), ठाणे (सार्वजनिक बांधकाम) मंडळ आणि बंदर अभियंता विभाग उत्तर विभाग, कोकण भवन, नवी मुंबई (बंदर अभियंता, मुंबई अंतर्गत)) अभिलेख्यांची तपासणी केली असता (ऑक्टोबर २००६ ते नोव्हेंबर २००७) असे लक्षात आले की अधीक्षक अभियंता, ठाणे मंडळ आणि सागरी अभियंता मुंबई यांनी मंडळ विभाग आणि उपविभगाच्या कार्यालयांच्या अतिरिक्त बाबी आणि बदल तसेच विश्रामगृहाच्या नुतनीकरणाच्या कामांच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत केले होते. (ऑक्टोबर २००३ आणि नोव्हेंबर २००७ च्या दरम्यान) असे प्रधिकृत करत असताना रू.१.५५ कोटी इतकी एकूण मूळ कामांसाठी (केळशी क्रॅकवरील बंदर महामार्गावरील मुख्य पुलाचे बांधकाम; तळवळी परचुरे रस्त्यावरील फरारे खाडी पुल, बोर्डी, डहाणू-ठाणे रस्त्याच्या पोच रस्त्याचे बांधकाम, पडघा खडवली रस्त्यावरील पुलाचे बांधकाम; खोनी खडीपार, रस्त्यावरील पुलाचे बांधकाम, बॅटरी बंदर येथे रिटेनींग भिंतीचे बांधकाम, वरसोली येथे ग्रोयान्स या प्रकारातील बंधाऱ्याचे बांधकाम, नरीमन पॉईंट येथील भाग II आणि III इ. समुद्र भिंतीचे मजबूतीकरण) असलेली आकस्मिक कामाची तरतूद संपूर्णपणे असंबंधित कामांसाठी नियमपुस्तिकेतील तरतूदींचे उल्लंघन करून वळविण्यासाठी परवानगी दिली होती. शासनाने असे म्हटले आहे की, (जुलै २००८) वेगवेगळया कामांची विभागीय कार्यालयांतर्फे अंमलबजावणी होत असताना विभागीय कार्यालयांच्या दुरूस्ती आणि नुतनीकरणाची थेटपणे सदर कामाशी संबंधित नसलेली कामे त्या कामाशी अप्रत्यक्षपणे अनुषंगिक होती आणि अधीक्षक अभियंत्यांच्या पूर्व परवानगीने कार्यान्वित करण्यात आली होती.

दिलेले उत्तर समर्थनीय नव्हते कारण विभागीय कार्यालयांची नुतनीकरण आणि दुरूस्तीची कामे हया विभागांकडून हाती घेतलेल्या वेगवेगळया कामांशी अनुषंगिक म्हणून विचारात घेणे शक्य नव्हते म्हणून या कामांच्या कार्यान्वयनामुळे वर उल्लेखित केलेल्या म.सा.बां.च्या नियमपुस्तिकेच्या तरतूदीचे उल्लंघन झाले होते आणि म्हणून रू.१.५५ कोटीचा अनधिकृत खर्च झाला होता.

ज्ञापन :-

४.११ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

अधीक्षक अभियंता ठाणे मंडळ -

प्रस्तुत प्रकरणी विभागीय कार्यालयाचे नुतनीकरण आणि दुरूस्ती कामे ही विभागाकडून हाती घेतलेल्या विविध कामांच्या संबंधित आकस्मिक स्वरूपाची कामे नसली तरी आकस्मिक खर्च वळविण्यासाठी सक्षम असलेले प्राधिकारी अधीक्षक अभियंता यांनी मंजूर केलेल्या तरतूदी अंतर्गत अप्रत्यक्षपणे अनुषंगिक कामे म्हणून पूर्ण केलेली आहेत. सदरच्या कार्यालयीन व विश्रामगृहाची दुरूस्तीची कामे ही विभागाकडून हाती घेण्यात येणाऱ्या विविध कामांसाठी कार्यरत असलेल्या कार्यालयीन कर्मचारी वर्गाशी निगडीत असल्यामुळे त्यासाठी करण्यात आलेला खर्च हा प्रत्यक्षपणे आकस्मिक कामांसाठी नाही परंतु अप्रत्यक्ष अनुषंगिक कामांशी संबंधित आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम Account Code मध्ये परिशिष्ट २२.१ (१७) मध्ये अप्रत्यक्ष या आकस्मिक निधी वळविण्याचे पूर्ण अधिकार अधीक्षक अभियंता यांना असल्यामुळे व त्याच्या मंजूरीनुसार अप्रत्यक्षपणे अनुषंगिक कामासाठी आकस्मिक खर्च करण्यात आलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र सा.बां.नियमावलीतील तरतूदींचे उल्लंघन करण्यात आलेले आहे.

सागरी अभियंता, मुंबई.

४.१२ किनारी अभियंता मंडळ कार्यालयातील पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (ऊ) कोकण भवन, नवी मुंबई यानी किनारी अभियंता, पत्तन अभियंता तसेच सहाय्यक पत्तन अभियंता यांच्या कार्यालयांच्या नुतनीकरणासाठी रू.४३.६० लक्ष इतका खर्च केला आहे. सदरचा खर्च करण्यासाठी त्यांच्या अखत्यारितील धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या अंदाजपत्रकातील आकस्मिक खर्चासाठी उपलब्ध असलेली तरतूद सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजूरीने वळवून त्यातून सदर बाबीचा खर्च केलेला आहे. ही कामे करताना कार्यालयीन इमारतीच्या दुरूस्तीसाठी लेखाशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम ०५३ परिरक्षण व दुरूस्ती, इमारतीची दुरूस्ती (अनिवासी इमारती) अंतर्गत फारच कमी तरतूद उपलब्ध होती. त्यामुळे या लेखाशिर्षांतर्गत कार्यालयाच्या नुतनीकरणावरील खर्च टाकणे शक्य झाले नाही. त्याचप्रमाणे या कार्यालयाचे नुतनीकरण

करणे अत्यंत निकडीचे होते. या इमारतीच्या मूळ बांधकामामध्ये निधीच्या कमतरतेमुळे पार्टीशन्स बांधले गेले नव्हते. त्यामुळे आवश्यकतेनुसार नुतनीकरणाची कामे हाती घ्यावी लागली. किनारी अभियंता मंडळांतर्गत पत्तन अभियंता, अभियांत्रिकी (ऊ) कोकण भवन, नवी मुंबई तसेच सहाय्यक पत्तन अभियंता, पत्तन उपविभाग, अंधेरी मुंबई ही कार्यालये प्रामुख्याने किनारपट्टीवरील धुप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या योजनांची कामे करण्यासाठी प्रस्थापित झालेली आहेत. या कार्यालयांचा बहुतांश कार्यभार धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या कामाशी निगडीत आहे. त्यामुळे सादर करण्यात येते की, या कार्यालयांची नुतनीकरणाची कामे प्रत्यक्षपणे नसली तरी अप्रत्यक्षपणे बंधाऱ्याच्या कामाशी निगडीत आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकामे नियमपुस्तिकेच्या परिच्छेद १४५ नुसार अनपेक्षित खर्चाकरीता आकस्मिक निधी म्हणून कामांच्या अंदाजपत्रकांमध्ये केलेली तरतूद कामाच्या नवीन बाबींसाठी सक्षम प्राधिकाऱ्याच्या संमतीशिवाय वळती करता येत नाही. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकामे नियमपुस्तिकेतील परि.४२ अंतर्गत अनुक्रमांक १४ अन्वये एखाद्या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये आकस्मिक बाबींकरीता केलेली तरतूद त्याच अंदाजपत्रकात तरतूद न केलेल्या बाबींवर वळविण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता यांना आहेत. सदर नियमाच्या अधीन राहून धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या कामावर आकस्मिक निधीअंतर्गत केलेली तरतूद किनारी अभियंता, मुंबई यांची प्रत्येक बाबीकरीता मान्यता घेऊन वळविण्यात आलेली आहे व त्यानुसार वर नमूद केलेल्या कार्यालयांच्या नुतनीकरणाचा खर्च भागविण्यात आलेला आहे. सदर कार्यालयाच्या दुरूस्तीची/नुतनीकरणाची कामे थेटपणे समुद्र धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या कामाशी संबंधित नसली तरी त्या कामांशी अप्रत्यक्षपणे अनुषंगिक होती. त्यामुळै किनारी अभियंता (अधीक्षक अभियंता) यांनी बंधाऱ्यांच्या कामांच्या अंदाजपत्रकातील आकस्मिक निधीची तरतूद वळवून त्यातून नुतनीकरणाच्या कामावरील खर्च भागविण्यास मान्यता दिली आहे.

कार्यालयीन इमारतीच्या नुतनीकरणासाठी असलेली निकड परंतु २०५९ सा.बां. ०५३ परिरक्षण व दुरूस्ती, इमारतीची दुरूस्ती (अनिवासी इमारती) अंतर्गत उपलब्ध न झालेले अनुदान तसेच ज्या बंधाऱ्यांच्या कामांचा आकस्मिक निधी कार्यालयीन नुतनीकरणाकरीता वापरला गेला आहे ती कामे त्याच कार्यालयाकडून कार्यान्वित केली गेली असल्याने किनारी अभियंता यांनी आकस्मिकता निधी वळविण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे.

अतिरिक्त माहिती -

अधीक्षक अभियंता, ठाणे मंडळ

४.१३ शासकीय विश्रामगृह वर्सोवा या आवारातील इमारतीची दुरूस्ती करणे या कामांकरीता खालील कामांचा आकस्मिक निधी वापरण्यात आलेला आहे.

कामाचे नांव	लेखाशिर्ष	मंजूर आकस्मिक
ठाणे जिल्ह्यातील आगवण खाडीवर	५०५४ - मार्ग व पूल	१०.००
ठाणे जिल्ह्यातील दूध खाडीवर	५०५४ - मार्ग व पूल	१०.००
गावाजवळ पूल बांधणे	भांडवली खर्च ०३ राज्यमार्ग	
बोर्डी-डहाणू ठाणे प्रामा-४ च्या कि.मी.२२/१०० जवळ डहाणू बाजूकडील डहाणू खाडीवरील मोठ्या पूलाचे जोडरस्त्याचे बांधकाम करणे	५०५४ - मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०३ राज्यमार्ग	४.५०
	एकूण :-	२४.५०

सदरील विश्रामगृह हे मुंबई अहमदाबाद व ठाणे ते बोरीवली या रस्त्याच्या जंक्शनवर आहे. प्रमुख अतिथी व सरकारी अधिकारी यांची तेथे सतत वर्दळ असल्यामुळे सदरील विश्रामगृहाच्या आवारातील इमारतींची तातडीने डागडुजी करणे अत्यावश्यक होते. परंतु विश्रामगृह व इमारतींची दुरूस्ती करणे या कामांना पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे व सदरचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने वरील कामांचा आकस्मिक निधी वापरण्यात आला आहे.

किनारी अभियंता, मुंबई

४.१४

कामाचे नांव/निविदा क्रमांक	**ज्या कामाच्या आकस्मिक निधीमधून काम केलेल्या कामाचे नांव**	**किनारी अभियंता यांच्यामार्फत मंजूरी दिल्याचा दिनांक**
किनारी अभियंता कार्यालयातील अंतर्गत रचनेत बदल व फेरफार करणे भाग-१ (ब-१/एएचई/१९/२००३-०४)	आग्राव येथे मत्स्य प्रकल्प उभारणे व बत्तेरी बंदर येथे संरक्षक भिंत बांधणे	२२.७.२००३

किनारी अभियंता कार्यालयातील अंतर्गत रचनेत बदल व फेरफार करणे भाग-३ (ब-१/एएचई/२३/२००३-०४)	वर्सोवा कोळीवाडा येथे समुद्र धुप प्रतिबंधक बंधारा बांधणे	८.१०.२००३
किनारी अभियंता कार्यालयातील अंतर्गत रचनेत बदल व फेरफार भाग-२ (ब-१/एएचई/२४/२००३-०४)	चौपाटी ते वाळकेश्वर येथील अस्तित्वातील भिंतीचे मजबुतीकरण करणे	८.१०.२००३
पत्तन अभियंता कार्यालयातील अंतर्गत रचनेत फेरबदल करणे (पत्तन अभियंता यांची केबीन व तांत्रिक अभियंत्याचे केबीनचे नुतनीकरण) (ब-१/एचई/३४/२००३-०४)	वरसोली येथे ग्रोयान्स पद्धतीचा बंधारा बांधणे	१३.१.२००४
किनारी अभियंता कार्यालय अंतर्गत रचनेत फेरबदल करणे (ब-१/एचई/३९/२००३-०४)	बत्तेरी बंदर येथे संरक्षक भिंत बांधणे	१३.१.२००४
पत्तन अभियंता कार्यालयातील अंतर्गत रचनेत फेरबदल करणे (लेखा व भांडार शाखा व वरीष्ठ लिपीक यांच्या केबीनचे नुतनीकरण (ब/१/एचई/३/२००३-०४)	वरसोली येथे ग्रोयांन्स पद्धतीचा बंधारा बांधणे	१६.२.२००४
पत्तन अभियंता कार्यालय अंतर्गत रचनेत फेरबदल (नवीन फ्लोरिंग बसविणे) (ब-१/एचई/३४/२००३-०४)	थेरोंडा येथील धुप प्रतिबंधक बंधारा बांधणे	१६.२.२००४
नवीन प्रशासकीय इमारतीतील तळमजल्यावरील सहा. पतन अभियंता कार्यालय नुतनीकरण (भाग-१) (ब-१/इएचई/१०/२००४-०५)	नरीमन पॉईंट भाग-२ येथील समुद्र भिंतीचे बळकटीकरण करणे	५.७.२००४
नवीन प्रशासकीय इमारतीतील तळमजल्यावरील सहा. पत्तन अभियंता कार्यालय नुतनीकरण (भाग-२) (ब-	नरीमन पॉईंट भाग-२ येथील समुद्र भिंतीचे बळकटीकरण करणे	५.७.२००४

१/इएचई/१३/२००४-०५)		
पत्तन अभियंता कार्यालयातील अंतर्गत रचनेत फेरबदल करणे (स्लोईंडिग विंडोज व पेंटीग) (ब-१/एएचई-१४/२००४-०५)	नरीमन पॉईंट भाग-३ येथील समुद्रभिंतीचे बळकटीकरण करणे	१२.७.२००४

किनारी अभियंता मंडळ कार्यालयातंर्गत पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ) कोकण भवन, नवी मुंबई तसेच सहाय्यक पत्तन अभियंता ही कार्यालये प्रशासकीय इमारतीमध्ये आहेत. त्यामुळे कार्यालयीन कामकाज सुरळीत व प्रभावी होण्याच्या दृष्टीने ही कामे होणे आवश्यक होते.

किनारी अभियंता कार्यालयाअंतर्गत मुख्यत्वे धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची कामे करण्यात येतात. त्यामुळे वरील कामांची आवश्यकता पहाता ही कामे सार्वजनिक बांधकाम नियमावली नुसार योग्य त्या प्राधिकरणाकडे मंजूरी घेवून धुप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या आकस्मिक निधीमधून करण्यात आली आहेत.

"व्यर्थ खर्च" -

४.१५ सनियंत्रण आणि विद्युतीकरणाचे काम लवकर पूर्ण करणे यातील कार्यकारी अभियंता यांच्या अपयशाचा परिणाम रू.८३.५२ लाखाचा व्यर्थ खर्च होण्यात झाला.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा यांनी (सप्टेंबर १९९७) कर्मचाऱ्यांच्या सदनिका बांधण्याचे काम एका कंत्राटदाराला रू.६३.४४ लाख या अंदाजित किंमतीच्या १५.७५ टक्के जास्त याप्रमाणे १५ महिन्यात पूर्ण करण्यासाठी दिले. पुरेशा निधीच्या अनुपलब्धतेमुळे काम ऑक्टोबर १९९९ मध्येच सुरू होऊ शकले आणि त्यामुळे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांनी (सप्टेंबर २०००) कामाला डिसेंबर २००१ पर्यंत मुदतवाढ दिली होती.

कार्यकारी अभियंता, भंडारा यांच्या अभिलेखांच्या छाननीत (मार्च-२००८) असे उघडकीस आले की, कंत्राटदाराने रू.७७.४८ लाख किंमतीचे काम झाल्यानंतर (विद्युतीकरण, नळकाम आणि सॅनिटेशनची कामे सोडून) काम पूर्ण केले. कार्यकारी अभियंता, भंडारा यांनी

कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग (सार्वजनिक बांधकाम) नागपूर यांना अंतर्गत विद्युतीकरणासाठी रू.४.५० लाख आणि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना नवीन जोडणी भार म्हणून रू.१.५४ लाख अनुक्रमे नोव्हेंबर २००३ आणि मार्च २००४ मध्ये प्रदान केले. तथापि मार्च २००८ पर्यंत विद्युतीकरणाचे काम पूर्ण झाले नाही. याप्रकारे वेळेवर काम पूर्ण होण्याच्या संनियंत्रण करण्यातील कार्यकारी अभियंता यांच्या अपयशाचा परिणाम रू.८३.५२ लाखाचा व्यर्थ खर्च झाला, शिवाय घरभाडे भत्ता आणि अनुज्ञप्ति शुल्क यांच्यापायी शासनाला हानी झाली.

ज्ञापन :-

४.१६ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

भंडारा येथे प्रकार-१ चे १६ निवासस्थाने, प्रकार-२ चे १६ निवासस्थाने व प्रकार, ३ चे ४ निवासस्थानाच्या बांधकामास शासनातर्फे दिनांक ६.६.१९९६ ला रू.७४,४३,८००/- करीता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांचेतर्फे सन १९९६-९७ ला रू.६८,१६,१९५/- करीता तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली. सदर काम मेसर्स जे.के.कन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर यांना १५.७१ टक्के अधिक दराने देण्यात आले. काम पूर्ण करण्याचा मुळ कालावधी १५ महिने म्हणजे दिनांक १७.१२.१९९८ पर्यंत होता. सदर कामास कंत्राटदाराला दिनांक ३१.१२.२००१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

सदर काम ४२१६ भांडवली खर्च, एकत्रित निवासस्थाने या लेखाशिर्षातंर्गत असून या कामावर आर्थिक वर्षात आवश्यक तेवढा निधी प्राप्त झालेला नाही. कंत्राटदाराने माहे १२/२००१ पर्यंत रू.७०.३२ लक्ष किंमतीचे काम केलेले होते. त्यापैकी कंत्राटदाराला रू.५५.६० लक्ष एवढेच भुगतान अपुऱ्या अनुदानामुळे करता आले. कंत्राटदारास प्रदान करावयाची उर्वरित रक्कम रू.२१.८८ लक्षचे भुगतान अपुऱ्या अनुदानामुळे करता आले. कंत्राटदारास प्रदान करावयाची उर्वरित रक्कम रू.२१.८८ लक्षचे भुगतान अपुऱ्या अनुदानामुळे करता आले. कंत्राटदारास प्रदान करावयाची उर्वरित रक्कम रू.२१.८८ लक्षचे भुगतान सन २००७-०८ मध्ये निधी उपलब्ध झाल्यावर करण्यात आले.

या अपुऱ्या निधीमुळे सदर काम रेंगाळले. स्थापत्य कामावर पुरेसा निधी उपलब्ध न

झाल्यामुळे हे काम रेंगाळले व त्यामुळे विद्युतीकरणाअभावी इमारतीचे हस्तांतरण करता आले नाही. या इमारतीच्या परिसराला लागूनच झोपडपट्टी असल्यामुळे समाजकंटकानी सदर इमारतीतील काही दरवाजे व खिडक्यांची नासधूस केली. वरील सर्व प्रकारच्या नासधूसीची दुरूस्ती कंत्राटदाराद्वारे त्याच्या स्वखर्चाने व जबाबदारीवर करण्यात आली, यामध्ये शासनाचे कुठलेही नुकसान झालेले नाही.

दरवर्षी आवश्यकतेइतपत निधी उपलब्ध न झाल्याने कामे रेंगाळली आहे. त्यात कंत्राटदाराचा कोणताही दोष नसल्याने कंत्राटदाराकडून काम काढून घेणे शक्य नव्हते, म्हणून मुळ कंत्राटदाराकडून इमारतीचे काम पूर्ण करून घेणे आवश्यक होते व हा निर्णय शासनहितार्थ होता. वर्षनिहाय अनुदान, खर्च व मागणी याबाबतचा तक्ता सोबत जोडला आहे.

इमारतीचे मुख्य बांधकाम दिनांक ३१.१२.२००१ ला पूर्ण झाले, विद्युतीकरणाचे काम व वसाहतीमध्ये नवीन ट्रान्सफार्मरचे काम फेब्रुवारी, २०११ मध्ये पूर्ण झाले व फेब्रुवारी २०११ मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याने इमारतीचे ताबा घेऊन निवासीगाळे वाटप करण्याकरीता निवासी वाटप समिती यांच्याकडून दिनांक ४.३.२०११ ला मंजूरी घेण्यात आली.

वाटप केलेल्या गाळयामध्ये मार्च, २०११ पासून कर्मचारी/अधिकारी राहण्यासाठी आले. एकूण ४० गाळयापैकी ३२ गाळयामध्ये कर्मचारी/अधिकारी राहण्यास आले व उर्वरित ८ गाळयाकरीता मागणी नसल्यामुळे रिकामे आहेत. गाळयाची स्थिती सुस्थितीत असून राहण्यास योग्य आहे.

तोडफोड/नादुरूस्त दरवाजे व खिडक्यांची दुरूस्ती त्याच ठेकेदाराकडून करून घेण्यात आली असल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही. ठेकेदाराला तोडफोड ना-दुरूस्त खिडक्यांची दुरूस्ती करीता वेगळे कुठेही पैसे देण्यात आलेले नाही.

महालेखापरिक्षक यांचा सन २००७-०८ या परिच्छेद क्रमांक ४.४.३ व्यर्थ खर्चाच्या अनुषंगाने

(रू.लक्ष)

वर्ष	अनुदान	अंतिम सुधारीत अनुदान	खर्च
१९९७-१९९८	१.२८	१.२८	१.२८
१९९८-१९९९	१०.००	०.००	०.००
१९९९-२०००	१५.००	०.००	०.००

२०००-२००१	१२.००	२३.२७	२३.२७
२००१-२००२	१५.००	३२.३३	३२.३३
२००२-२००३	७.००	४.५०	४.५०
२००३-२००४	१.५४	१.५४	१.५४
२००४-२००५	२.००	५.०७	५.०७
२००५-२००६	०.१०	०.२०	०.२०
२००६-२००७	०.००	०.००	०.००
२००७-२००८	२५.००	२४.९८	२४.९८
२००८-२००९	१.००	१.००	१.००
२००९-२०१०	०.००	०.००	०.००
२०१०-२०११	०.००	०.००	०.००
२०११-२०१२	०.००	०.००	०.००

अतिरिक्त न्यायालय इमारतीमध्ये व्यर्थ गुंतवणूक -

४.१७ आवश्यक त्या मान्यता मिळविल्याशिवाय एका अतिरिक्त न्यायालय इमारतीच्या कामास सुरूवात आणि शासनाच्या वेगवेगळया संस्था आणि विभाग यामधील योग्य त्या समन्वयनाचा अभाव ह्याचा परिणाम म्हणून रू.७०.०६ लाख इतक्या रकमेची व्यर्थ गुंतवणूक आणि टाळता येण्याजोगा रू.५९ लाखाचा खर्च.

डहाणू येथील थकीत प्रकरणे पालघर आणि इतर न्यायालयात हाताळली जात होती. ही जनतेची गैरसोय टाळण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील डहाणू येथे एक अतिरिक्त न्यायालयाची इमारत बांधण्यासाठी अधीक्षक अभियंता, ठाणे सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) मंडळ यांनी रू.१.२४ कोटी इतक्या रक्कमेची तांत्रिक मंजूरी दिली होती. तांत्रिक मंजूरीमध्ये असे करारनिविष्ट केले होते की इमारतीच्या कामास सुरूवात करण्यापूर्वी स्थानिक संस्थाकडून आवश्यक त्या मान्यता मिळविणे आवश्यक होते. कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) उपविभाग, जव्हार जिल्हा ठाणे यांनी डहाणू नगरपालिकेस सादर केलेले इमारतीचे आरेखन आणि योजना (जून २००२) फेब्रुवारी २००८ मध्ये मंजूर केले होते. प्रस्तावित तीन मजले इमारतीची उंची ११.७ मीटर होती आणि छप्पर सपाट स्लॅबचे केले होते. ही बाब प्रारूप विकास नियंत्रण नियमाच्या (प्रारुप विकास नियंत्रण नियमाच्या नियम १९ अ (४) नुसार मोठ्या

प्रमाणात वस्ती असलेल्या भागात तीन मजली इमारतीच्या बांधकामाकरीता जास्तीत जास्त उंचीची मर्यादा ९ मीटरची होती. तसेच त्याच नियमांच्या नियम १९ अ-(३) मध्ये असे करार निविष्ट करण्यात आले होते की, होणारी बांधकामे तेथील वातावरण परिसर आणि बांधकामाची पध्दती यास अनुरुप असावयास हवीत) विरोधात असल्यामुळे मे २००६ मध्ये त्यात सूट मिळण्याकरीता सहाय्यक संचालक, नगर योजना ठाणे यांचेकडे प्रस्ताव सुध्दा सादर करण्यात आला होता. सप्टेंबर २००७ मध्ये शासनाकडून त्यास परवानगी मिळाली होती. आवश्यक त्या मान्यता मिळाण्यापूर्वी कार्यकारी अभियंता यांनी सदर काम एका कंत्राटदारास रू.१.३२ कोटी करीता (रू.१.२४ कोटी अंदाजित खर्चाच्या ६.०९ टक्क्याने जादा) ३० महिन्यामध्ये म्हणजेच ऑगस्ट २००६ पर्यंत पूर्ण करण्याच्या अटीवर दिले होते. कंत्राटदाराने फेब्रुवारी २००४ मध्ये काम सुरू केले आणि जोत्याच्या पातळीपर्यंत काम पूर्ण केल्यानंतर वरून जाणाऱ्या वीजेच्या तारा स्थानांतरीत न केल्यामुळे ते काम बंद केले. (जुलै २००४) वीजेच्या तारा स्थानांतरीत केल्यानंतर ते काम पुन्हा सुरू करण्यात आले (जानेवारी २००६) जून २००७ मध्ये, शासनाकडून प्रारूप विकास नियंत्रण नियमांतर्गत सूट न मिळाल्यामुळे कंत्राटदारास काम बंद करण्याविषयी तोंडी सूचना देण्यात आल्या होत्या. तोपर्यंत त्या कामावर रू.७०.०६ लाख इतका खर्च करण्यात आला होता.

काम वारंवार बंद होत गेल्यामुळे, कंत्राटदाराने कराराच्या कलम १५(२) अंतर्गत कार्यकारी अभियंत्यास त्या कामातून मोकळे करण्याविषयी विनंती केली. ही विनंती मुख्य अभियंत्यांनी ऑक्टोबर २००७ मध्ये मान्य केली. उरलेले काम रू.१.१९ कोटीकरीता तांत्रिकदृष्ट्या मंजूर केले (ऑक्टोबर २००७) आणि दुसऱ्या संस्थेकरीता रू.१.१३ कोटी करीता जानेवारी २००८ मध्ये कामाचे आदेश देण्यात आले. ह्या सर्व सोपस्कारात रू.७०.०६ लाख इतका व्यर्थ खर्च झाला. पुढे, उरलेल्या कामाकरीता काढलेल्या कामाच्या आदेशानुसार असे दिसले की वेळ गेल्यामुळे खर्चामध्ये रू.५९.०० लाखाची वाढ झाली होती जी टाळता येणे शक्य होते.

ह्याप्रमाणे, अनिवार्य मान्यता न मिळविण्यापूर्वी कामाला सुरूवात करणे, मान्यता मिळण्यामध्ये झालेला विलंब तसेच वरून गेलेल्या वीजेच्या तारा हलविण्यात झालेला विलंब

ह्यामुळे रू.७०.०६ लाख इतकी व्यर्थ गुंतवणूक झाली आणि टाळता येण्याजोगा रू. ५९.०० लाखाचा खर्च झाला.

शासनाने असे म्हटले की (एप्रिल २००८) महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून वीजेच्या तारा हलविण्यासाठी आणि नगर रचना विभागाकडून प्रा.वि.नि.नि. मधून सूट देण्याकरीता २ वर्षाचा विलंब झाला होता. त्यामुळे विलंबासाठी विभाग जबाबदार नव्हता. जरी पुढे मान्यता मिळाल्यानंतर काम सुरू झाले असते तरी कामाला विलंब होणारच होता आणि खर्चामध्ये वाढ होणारच होती.

शासनाच्या उत्तरातून शासनाच्या वेगवेगळया संस्था आणि विभाग यांमध्ये योग्य त्या समन्वयाची वानवा दिसून येते ज्यामुळे रू.७०.०६ लाखाची व्यर्थ गुंतवणूक झाली होती आणि अतिरिक्त टाळता येण्याजोगा रू.५९.०० लाखाचा खर्च झाला होता. शिवाय ठाणे जिल्ह्यातील डहाणू येथील अतिरिक्त न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामात विलंब झाला होता.

ज्ञापन :-

४.१८ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

डहाणू येथील न्यायालयाकरीता अतिरिक्त इमारत बांधणे या कामास शासन विधी व न्याय विभाग यांचे निर्णय क्र.सीबीबी-३३९५/५३७ (७१)/का-१३,दि.११/११/१९९७ अन्वये रू.२१८.१७ लक्ष इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास अधीक्षक अभियंता, ठाणे सा.बां.मंडळ यांनी त्याचे पत्र क्र.ठामं/प्रशा-६/मुळकाम३६६२ दि.३०.४.२००३ अन्वये रू.१२४.०० लक्ष इतक्या किंमतीस तांत्रिक मान्यता दिलेली आहे. उपरोक्त कामाचे कार्यादेश दि.११.२.२००४ रोजी कंत्राटदार रचना कंन्स्ट्रक्शन डहाणू यांना करारनामा ब-१/१७५ सन २००३-२००४ अंतर्गत देण्यांत आले असून, सदर कामाची अंदाजित रक्कम रू.१,२४,००,३००/- व स्विकृत निविदा रक्कम रू.१,३१,५५,४६८/- (६.०९ प्रतिशत अधिक दराने) इतकी आहे. सदर बांधकामास दिनांक १२.२.२००४ रोजी सुरूवात करण्यांत आली. तत्पुर्वी बांधकाम परवानगी प्राप्त होण्याकरीता, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नकाशान्वये कोर्टाची उंची तळमजला + २ मजले अशी एकूण

११.७० मी.उंच इमारतीचे बांधकाम परवानगीकरीता प्रस्ताव उपविभागीय अभियंता, विशेष प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) उपविभाग, डहाणू यांनी त्यांचे पत्र क्र.विप्रविठा/सा.बां./डहाणू/१०७, दि.४/६/२००२ अन्वये डहाणू नगरपरिषद, डहाणू यांचेकडे सादर केला होता. डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण यांचे दि.१०/१०/२००५ च्या बैठकीत सूचित केल्यानुसार, सदर इमारतीची उंची तळमजला + दोन मजले अशी एकूण ११.७० मीटर असून, डहाणू शहर विकास नियंत्रण व नियमावलीतील नियम क्र.१९ अ/३, व १९ अ/४ नुसार ९.०० मीटर पेक्षा उंची जास्त असल्याने उंची शिथीलता करण्याचा प्रस्ताव दि.२/४/२००४ रोजी मा.उपसंचालक, नगररचना ठाणे यांना सादर करण्यांत आलेला आहे. तसेच सी.आर.झेड.ची परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव चेअरमन, कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी, मुंबई यांचेकडे दि.२१/१०/२००५ रोजी सादर केला असून त्यास कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी यांचेकडून ईडिव्ही/एनओसी/२००५/१३४७/१९८/डी-९, दि.२७/४/२००६ अन्वये परवानगी (तळमजला + २ मजले बांधण्यास) मिळालेली आहे. दरम्यान मा.जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांनी उपरोक्त इमारतीस तळमजला अधिक २ मजले अशी मंजूरी असल्याने ९ मिटर उंचीपर्यंत (तळ मजला + १ मजला) बांधकाम करण्याविषयी नकारात्मक अभिप्राय दिलेला आहे. तद्नंतर उंची शिथीलता प्रस्ताव सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे यांनी मा.संचालक, नगर रचना पुणे यांचेकडे दि.२७.६.२००६ रोजी सादर केला. दि.१५/११/२००६ रोजी प्रत्यक्ष जागेवर भेट होऊन संचालक, नगररचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचा प्रस्ताव दि.५/१२/२००६ रोजी नगररचना विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेकरिता सादर केला. सदरच्या प्रस्तावास नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.६/६/२००७ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिलेली असून, अंतिमत: मंजूरी दि.२०/२/२००८ रोजी मुख्याधिकारी, डहाणू नगरपरिषद यांचेकडून प्राप्त झालेली आहे. या व्यतिरिक्त सदर इमारतीवरील ११ केव्ही उच्च दाब उपरीतार मार्ग असल्याने हलविण्याविषयी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाशी दिनांक १८/८/२००४ पासून पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यास अनुसरून दिनांक २५/७/२००५ रोजी रू.५,७२,७०५/- इतक्या रक्कमेचा भरणा कार्यकारी अभियंता, विद्युत (सा.बां) विभाग, ठाणे यांचेकडे केलेला आहे. दिनांक २१/१/२००६ रोजी उपरोक्त तार हलवुन अडचण दूर करण्यांत आलेली आहे. बांधकाम परवानगी प्राप्त

होण्याकरीता बराच कालावधी निघून गेल्यामुळे कामाची प्रगती मंद झाली. दरम्यानच्या काळात बांधकाम साहित्यांच्या दरात खुपच वाढ झाल्याचे कारण देऊन कंत्राटदाराने उर्वरित काम करणे शक्य नसल्याचे कळविले, यानुसार सदरचे काम निविदा कलम १५(२) अन्वये काढण्याचे प्रस्तावित करण्यांत आले असून त्यास मुख्य अभियंता, मुंबई सा.बां.प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी त्याचे पत्र जा.क्र.मुअ(मुं)/का-५(१)/५५३३, दि.१६/१०/२००७ अन्वये मान्यता दिलेली आहे. उर्वरित कामाचे रु.१,१३,५३,६१०/- किंमतीचे अंदाजपत्रकास अधीक्षक अभियंता, ठाणे (सा.बां.) मंडळ, ठाणे यांनी त्यांचे पत्र क्र.ठामं/प्रशा-५/मुळकाम/इमारत/११२०७ दिनांक २३/१०/०७ अन्वये तांत्रिक मंजुरी देऊन नव्याने निविदा काढण्यात आल्या. उर्वरित बांधकामाचे कार्यादेश एच.जे.सोरटी, डहाणू यांना दिनांक १५/१/२००८ रोजी देण्यात आले.

कामाची अंदाजित रक्कम रु.१,१३,५३,६९०/-

स्विकृत निविदा रक्कम रु.१,१३,४२,२५६/- (०.१० प्रतिशत कमी दराने)

करारनामा :- ब-१/५४ सन २००७-०८

सद्य:स्थितीत उर्वरित काम पूर्ण झालेले आहे.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, विभागाकडून बांधकाम परवानगी प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने करावयाच्या कार्यवाहीत दुर्लक्ष झालेले नाही किंबहुना परवानगी प्राप्त करून घेण्यासाठी सतत पाठपुरावा करण्यात आलेला आहे. कामास परवानगी प्राप्त होणे क्रमप्राप्त असल्यामुळे कार्यादेश देण्यात आलेले होते. सदरील इमारतीच्या बांधकामास आवश्यक त्या सर्व प्रकारच्या परवानगी प्राप्त झाल्यानंतर काम हाती घेण्यात आले असता सदर कामाची प्रत्यक्ष अंदाजपत्रकीय किंमत रु.२,५५,३६,४११/- इतकी झाली असती. सद्य:स्थितीत मुळ निविदेनुसार कामावर झालेला खर्च रु.६४,२९,२७९/- इतका असून उर्वरित कामाकरीता झालेला खर्च रु.१,४७,४९,४३०/- इतका अशी कामाची एकूण किंमत रु.२,११,७८,७०९/- इतकी येत आहे. मुळ तांत्रिक मंजुरीपेक्षा उपरोक्त किंमत जरी रु.८७,७८,४१९/- इतक्या रक्कमेने अधिक वाढलेली दिसून येत असली तरी सर्व प्रकारच्या परवानगी प्राप्त झाल्यानंतर काम हाती घेण्यात आले असते तर कामाची किंमत रु.२,५५,३६,४११/- इतकी झाली असती.

उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेता, काम पुर्वीच हाती घेण्यात आल्यामुळे प्रत्यक्षात रु.२,५५,३६,४११/- (२,३६,२८,००० + ४,००,०००) १५,०८,४११/- इतक्या रक्कमेची बचत

झाल्याचे दिसून येत आहे. तसेच मुळ तांत्रिक मान्यतेनुसार पुर्ण करण्यांत आलेले काम, चालु प्रचलित दरसुचीनुसार हाती घेण्यांत आले असते तर अंदाजे रु.४३,५७,७०२/- इतका अधिक खर्च झाला असता. सदरचे काम पूर्वीच पूर्ण केल्यामुळे अप्रत्यक्षपणे रु.४३,५७,७०२/- इतक्या रकमेची बचत झालेली आहे. सद्य:स्थितीत नविन कंत्राटदारास कार्यादेश देण्यांत आले असून काम पूर्ण करण्यात आलेले आहे व इमारत वापरासाठी ऑक्टोबर २००८ पासून उपलब्ध आहे. परंतु, बांधकामासाठी आवश्यक त्या सर्व प्रकारच्या परवानगी प्राप्त झाल्यानंतर बांधकाम हाती घेण्यांत आले असते तर साधारणपणे डिसेंबर २०१० मध्ये इमारत उपभोक्ता खात्यास वापरासाठी उपलब्ध झाली असती. या बाबीनुसार विश्लेषण केले असता साधारणपणे २ वर्षे २ महिने अगोदरच इमारत वापरासाठी उपलब्ध झालेली आहे. परिणामी वेळेची बचत झाली आहे म्हणजेच प्रत्यक्ष रु.१५,०८,४११/- इतक्या रकमेची आर्थिक बचत व २ वर्षे २ महिने इतक्या वेळेची बचत झाल्याने शासनाचा फायदा करण्याच्या दृष्टीने पूर्वीची कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास येते.

अ) डहाणु येथील न्यायालयाकरीता अतिरिक्त इमारत बांधण्याचे कामास खालीलप्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे.

१) प्रशासकीय मान्यता : शासन निर्णय क्र.सीसीबी/३३९५/५३७/
(७१)/का.तेरा, मंत्रालय, मुंबई दिनांक ११/११/१९९७ रु.२,१८,१७,१७५/-

२) तांत्रिक मान्यता : अधीक्षक अभियंता, ठाणे सा.बां. मंडळ, ठाणे यांनी पत्र क्र. ठामं/प्रशा-६/मुळ काम/३६६२, दि.३०/०४/२००३ अन्वये रु.१२४.०० लक्ष.

३) कार्यारंभ आदेश : विभागीय कार्यालयीन पत्र क्र. एसपीडी/टीएच/पीडब्ल्यु/टेंडर/४७७, दि.११/०२/२००४ ब-१/७५ सन २००३-०४ मे.रचना कन्स्ट्रक्शन, डहाणु

उपरोक्त कार्यारंभ आदेशान्वये उपविभागीय अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) उपविभाग, डहाणु यांनी मुळ बांधकामास सुरूवात करण्यात आली. त्यापुर्वी उपरोक्त इमारतीच्या बांधकामास परवानगी प्राप्त होण्याकरीता उपविभागीय अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) उपविभाग, डहाणु यांनी डहाणु नगरपरिषद दि.०४/०६/२००२ रोजी प्रस्ताव प्रथमत: सादर केला.

डहाणु शहर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.१९अ/३ व १९अ/४ नुसार इमारतीची उंची ९.०० मी पेक्षा जास्त असल्याने म्हणजे ११.७० मीटर असल्याने उंची शिथीलकरण प्रस्ताव दि.०२/०४/२००४ रोजी संचालक, ठाणे यांचेकडे सादर करण्यात आला.

सदरचा प्रस्ताव सहाय्यक नगर संचनालय, ठाणे यांनी संचालक नगर रचना, पुणे यांना दि.२७/०६/२००६ रोजी सादर केला. दि. १५/११/२००६ रोजी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचा प्रस्ताव नगर रचना विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि. ०५/१२/२००६ रोजी मान्यतेकरीता सादर केला.

सदर प्रस्तावास नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.०६/०९/२००७ रोजी मंजुरी दिल्यानंतर मुख्याधिकारी, नगरपालिका, डहाणु यांनी अंतिमत: दि.२०/०२/२००८ रोजी बांधकाम परवानगी दिली. उपरोक्त इमारतीस बांधकाम परवानगी जून-२००२ मध्ये मिळाली नसून फेब्रु-२००८ मध्ये मिळाली. तसेच प्रस्तावित इमारतीवरील ११ के.व्ही.उच्चदाब तारमार्ग हलविण्याविषयी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, डहाणु यांचेकडे दि.१८/०८/२००४ पासून पत्रव्यवहार करण्यात आला त्यास अनुसरून दि.२५/०७/२००५ रोजी रु.५,७२,७०५/- चा भरणा कार्यकारी अभियंता, विद्युत सा.बां. विभाग, ठाणे यांचेकडे करण्यात आला. दि.२१/०६/२००६ रोजी उपरोक्त तार हलवून अडचण दुर करण्यात आली.

दरम्यानच्या काळात बांधकाम साहित्याचे दरात वाढ झाल्याने मुळ कंत्राटदाराने उर्वरीत काम पुर्ण करणे शक्य नसल्याचे कळविल्याने मा.मुख्य अभियंता, मुंबई सा.बां.प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी दि.१६/१०/२००७ रोजी मुळ निविदा रद्द केली.

उपरोक्त बांधकाम वरील कारणांमुळे मंदगतीने सुरू होते. मुळ निविदा रद्द केल्यानंतर उर्वरीत बांधकामाचे अंदाजपत्रकास मा.अधीक्षक अभियंता, ठाणे सा.बां.मंडळ, ठाणे यांनी तांत्रिक मान्यता पत्र क्र. ठामं/प्रशा-५/मुळकाम/इमारत/११२०७, दि.२३/१०/२००७ रोजी दिल्यानंतर नव्याने निविदा काढुन उर्वरीत बांधकामाचे सुधारीत कार्यादेश एच.जे.सोरथी, डहाणु यांना दि.१५/०१/२००८ रोजी देण्यात आले.

उपरोक्त काम निविदा कालावधीत ऑक्टोबर-२००८ मध्ये पूर्ण करण्यात आले. न्यायालयाने सुचविलेली इतर अतिरिक्त कामे पुर्ण करून इमारत दि.०६/०४/२०११ रोजी

उपभोक्ता खात्याकडे (मा.दिवाणी न्यायाधीश, दिवाणी न्यायालय, डहाणु यांना) हस्तांतरीत करण्यात आली.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता विभागाकडुन विविध बांधकाम परवानगी प्राप्त करण्याचे दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत दिरंगाई अथवा दुर्लक्ष झालेली नाही. बांधकाम परवानगी मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव डहाणु नगरपरिषद ते शासनस्तर अश्या विविध स्तरावरून मंजूरी प्राप्त होण्यास झालेला विलंबामुळेच प्रकल्प पुर्ण होण्यास उशीर झाला. बांधकाम परवानगी अंतिमत: फेब्रुवारी २००८ पर्यंत प्राप्त होईपर्यंत इतर सर्व अडचणी विद्युत तार हलविणे इत्यादी पुर्ण करण्यात आल्या. विद्युत तारा हलविल्यामुळे इमारतीच्या कामाचे प्रगतीवर कुठलाही परिणाम झालेला नाही.

ब) प्रकल्प इमारतीचे काम ऑक्टोबर २००८ मध्ये पुर्ण करण्यात आले असून इमारत दि.०६/०४/२०११ मध्ये उपभोक्ता खात्यास (मा.दिवाणी न्यायाधीश, दिवाणी न्यायालय, डहाणु यांना) हस्तांतरीत करण्यात आली आहे. सविस्तर माहिती सोबत सादर करण्यात येत आहे.

क) डहाणु अतिरिक्त न्यायालयाची इमारत उपभोक्ता खात्याकडे दि.०६/०४/२०११ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहे. सोबत उपभोक्ता खात्याकडे इमारत हस्तांतरीत देण्याची ताबा पावतीची छायाप्रत सादर करण्यात येत आहे. (परिशिष्ट-)

"निष्फळ खर्च"

४.१९ संबंधित खात्याकडून निधी आला नसतांनाही कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोली यांनी काम प्रारंभ केल्यामुळे नोंव्हेंबर २००२ मध्ये काम अपूर्ण ठेवावे लागले आणि एकूण रु.३७.७४ लाखाचा खर्च निष्फळ ठरला.

शासनाच्या गृह विभागाने (जुलै २०००) पोलीस अधीक्षक हिंगोली यांच्या कार्यालयाची प्रशासकीय इमारत बांधण्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिली. या करीता निधीची तरतूद महसुल व वन विभागाने करावयाची होती. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोली यांनी (ऑक्टोबर २००१) रु.१ कोटी अंदाजित खर्चाचे हे काम एका कंत्राटदाराला १९.८२ % कमी याप्रमाणे २४ महिन्यांच्या आत पूर्ण करण्यासाठी दिले. कंत्राटदाराने रु.३७.७४ लाख खर्च झाल्यानंतर काम थांबविले (नोव्हेंबर २००२)

कार्यकारी अभियंता यांच्या अभिलेख्यांच्या छाननीत (फेब्रुवारी २००६) असे उघडकीस आले की त्यांनी इमारत बांधण्याकरीता कुठल्याही विनंती शिवाय किंवा निधी आल्याशिवाय काम सुरू करण्याचे आदेश निर्गमित केले. कार्यकारी अभियंता यांनी, जिल्हाधिकारी हिंगोली यांनी ठेव म्हणून ठेवलेला निधी वळवून खर्च केला होता. या प्रकारे निधीच्या उपलब्धतेची खात्री केल्याशिवाय पोलिस अधीक्षक यांच्या कार्यालयाची इमारत बांधण्याचे काम सुरू केल्याचा परिणाम, बांधकामाच्या अपूर्ण कामावर केलेला रु.३७.७४ लाखाचा खर्च निष्फळ झाला. नंतर केलेल्या (मे.२००८) पडताळणी वरून असे उघडकीस आले की कराराच्या खंड १५ (१) खाली काम कंत्राटदाराकडून (ऑक्टोंबर २००७) काढून घेतले गेले.

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांनी वस्तुस्थिती स्वीकार केली आणि नमुद केले (जुलै २००८) की संबंधित कार्यकारी अभियंता यांचेविरूद्ध चौकशी प्रारंभ करण्यात येत आहे. ही बाब शासनाच्या सचिवांना मे २००८ मध्ये कळविण्यात आली. उत्तर आले नाही (ऑगस्ट २००८)

ज्ञापन :-

४.२० उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास गृह विभागाच्या शासन निर्णय क्र.सी.आर.पी.०७९९/४७६/भाग-१/ पोल-७ दि.१५/७/१९९९ अन्वये मुख्य लेखा शिर्ष ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च कार्यालयीन इमारती अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार या कामासाठी शासनाने याच लेखा शिर्षांतर्गत अधीक्षक अभियंतामार्फत अनुदान उपलब्ध करून देणे अपेक्षित होते. दरम्यान शासनाने परिपत्रक क्र.पुरक पत्र क्र.सी.आर.पी. ०७९९/४७६/पोल-०७ दि.१८/७/२००० अन्वये दि. १५/७/१९९९ च्या शासन निर्णयातील "अर्थसंकल्पात तरतुद केल्याशिवाय प्रत्यक्षात कामास सुरूवात करू नये" ही अट रद्द करून या कामासाठी महसूल व वन विभागास मुख्य लेखा शिर्ष ४०७० इतर प्रशासकीय सेवा वरील भांडवली खर्च या शिर्षाखाली निधी उपलब्ध करून देण्याच्या सुचना दिल्या. केवळ अनुदान वाटपाच्या पद्धतीतील या बदलामुळे हे काम ठेव

स्वरूपाचे झाले. प्रस्तुत कामास सक्षम प्राधिकाऱ्याने प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिलेली असल्याने या कामासाठी प्रचलित पद्धतीनुसार निविदा मागविण्यात आल्या व प्राप्त निविदेतील दर अत्यंत किफायतशीर, कमी व स्पर्धात्मक असल्यामुळे सक्षम अधिकाऱ्याकडून निविदा मंजुर करण्यात आली आणि कार्यारंभ आदेश देण्यात आले. तसेच दि.१८/७/२००० च्या पत्रातील सूचनेनुसार जिल्हाधिकारी यांच्याकडे निधिची मागणी करण्यात आली. परंतु जिल्हाधिकारी यांचेकडून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीप्रमाणेच पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या इमारतीसाठी देखील अनुदान उपलब्ध होऊ शकले नाही.

प्रस्तुत प्रकरणाचे दि.१४/८/२००३ रोजी मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णयाचे अनुषंगाने पुनर्विलोकन होणे आवश्यक आहे. या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार प्रशासकीय इमारतीसाठी प्राप्त होणारा निधी हा जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत व पोलीस अधीक्षक कार्यालयाची इमारत या दोन्ही कामासाठी होता. प्राप्त होणाऱ्या निधीचे या दोन्ही कामात सम प्रमाणात वाटप होणे आवश्यक होते. याच बैठकीत मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या इमारतीचे काम लवकर पुर्ण करण्याच्या सुचनाही दिल्या होत्या. या अनुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही ही सदर बैठकीत झालेल्या निर्णयाशी सुसंगत अशीच होती.

सुरवातीस काही काम झाल्यानंतर कंत्राटदाराने प्रथम देयक सादर करून देयकाची मागणी केली. दोन्ही कामांचे जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत व पोलीस अधीक्षक कार्यालयाची इमारत मुख्य शिर्ष एकच असल्याने आणि दोन्ही कामासाठी जिल्हाधिकारी यांचे कडूनच अनुदान उपलब्ध होणार असल्याने, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीसाठी प्राप्त अनुदानातुन हे देयक प्रदान करून जिल्हाधिकाऱ्यांना कळवून निधी पुरविण्याची विनंती करण्यात आली. (विभागाचे पत्र क्र.९५५० दि.१५/१२/२००१) त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी विभागाच्या या कार्यवाहीस कसलाही आक्षेप घेतला नाही. किंवा पर्यायी कार्यवाहीच्या सुचना ही दिल्या नाहीत. तद्नंतर ही विभागाकडून निधी करीता सतत पाठपुरावा करण्यात येत होता. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयाकडून या बाबत कसलेही उत्तर मिळत नव्हते.

इमारतीचे काम अत्यंत वेगाने सुरू होते. झालेल्या कामाचे दुसरे देयकही कंत्राटदाराने सादर केले होते. पहिल्या देयकाच्या प्रदानास जिल्हाधिकारी यांनी काहीही आक्षेप घेतला नसल्यामुळे आणि पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या इमारतीसाठी जिल्हाधिकारी यांनीच अनुदान उपलब्ध करून द्यावयाचे असल्यामुळे तसेच उपभोक्ता खात्याकडून इमारतीच्या कामाबाबत सतत पाठपुरावा होत असल्याने काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे या हेतुने कंत्राटदाराची पुढील देयक क्र.२, ३ व ४ प्रदान करण्यात आली, त्याचवेळी केलेल्या प्रदानाविषयी जिल्हाधिकारी यांना कळवून निधी तात्काळ पुरविण्याची विनंती करण्यात येत होती. पण जिल्हाधिकारी यांचेकडून विभागाच्या या कार्यवाहीबाबत आक्षेपही घेतला गेला नाही किंवा विभागाची अनुदानाची मागणी ही फेटाळण्यात आली नाही.

याबाबत निदर्शनात आणून देण्यात येते की, प्रस्तुत कामाची निकड तातडी ही सर्वांनांच म्हणजे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व खात्याचे सर्व वरिष्ठ अधिकारी यांना मान्य होती. प्रत्येक जण काम लवकरात लवकर पुर्ण करण्याचे दृष्टीने पाठपुरावा करत होते. परंतु महसूल खात्याचे संबंधीत वरिष्ठ अधिकारी मात्र अनुदान पुरविण्याबाबत उदासिन होते.

त्यामुळे देयक तत्परतेने मिळत नसल्याने कंत्राटदाराने कराराच्या खंड-१५ नुसार काम काढुन घेण्याची विनंती केली. निधीच्या उपलब्धतेबाबतची अनिश्चितता विचारात घेऊन विभागाने कंत्राटदाराच्या विनंतीची वरिष्ठ कार्यालयाकडे शिफारस केली. या सर्व बाबींचा विचार करून अधीक्षक अभियंता यांनी कंत्राटदाराची ही विनंती मान्य केली. व हे काम कंत्राटदाराकडून कराराच्या खंड १५ नुसार काढुन घेण्यात आले व त्यानुसार करार रद्द करण्यात आला.

प्रस्तुत करार रद्द करून काम सध्या जरी थांबविले असले तरी, झालेले काम व त्यावरील खर्चास निष्फळ म्हणता येणार नाही कारण, झालेल्या कामाचा वापर करूनच इमारतीचे शिल्लक काम पूर्ण करण्यात येईल. वस्तुतः इमारतीच्या काही भागाचे काम करून खात्याने शासनाच्या फार मोठ्या रक्कमेची बचत केली आहे, कारण या कामाच्या कंत्राटदाराचे दर १९.८२ टक्क्याने ने कमी होते. उपभोक्ता खात्याने आणि महसूल व वन विभागाने जर त्याच वेळी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला असता तर हे काम पूर्ण होऊन कमी दरामुळे जवळपास रु.१९.८२ लक्षाची बचत झाली असती.

आता देखील उपभोक्ता खात्यास पोलीस अधीक्षक कार्यालयासाठी प्रशासकीय इमारतीची अत्यंत आवश्यकता आहे. उपभोक्ता खाते या करीता शासनाकडे पाठपुरावा ही करत आहे. उपभोक्ता खात्याने नुकतेच रु.१४०.०० लक्ष एवढा निधी (जानेवरी २०११ मध्ये) उपलब्ध करून दिला आहे. तेव्हा आता शिल्लक काम लवकरच पूर्ण करण्यात येईल. असे करतांना त्यात झालेल्या कामाचा निश्चित वापर होईल आणि झालेला खर्च निश्चितपणे उपयुक्त ठरेल. या कामासाठी पुर्वी केलेला खर्च हा फलदायीच असून सदरील कामाची अद्यापी प्रचलित दरानुसार होणारी किंमत त्यापेक्षा फार जास्त होईल.

तथापि, खात्याने तत्कालीन कार्यकारी अभियंता ज्यांनी निधी प्राप्त होण्यापूर्वी काम सुरू केले व इतर कामाची ठेव या कामासाठी खर्च केली त्यांचेविरूद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरू केली आहे. वरील स्पष्टीकरणावरून प्रस्तुत काम किफायतशीर दराने व कमी किंमतीत पुर्ण करून घेण्याच्या उद्देशानेच करण्यात आले होते.

१) उर्वरित काम करण्यासाठी उपभोक्ता खात्याकडून रु.१४०.०० लक्ष निधी प्राप्त झालेला आहे. उर्वरित कामाच्या निवीदा बोलविल्या आहेत. दिनांक २१.६.२०११ रोजी निविदा प्राप्त होणार असून आठ महिन्याच्या कालावधीत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

२) होय, सदर कामासाठी वापरलेली रक्कम/अनुदानाचे समायोजन केले आहेत.

३) दिनांक १८.७.२००० ची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.(सहपत्र -१)

४) या कामाची प्राधान्यता महसूल व वन विभागाचे पत्रान्वये करण्यात आली असून त्याची प्रत सोबत (सहपत्र-२) सादर करण्यात आली आहे.

५) सद्यःस्थितीतील संपूर्ण प्रकरण अभ्यासता या प्रकरणी संबंधित कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता नाही. यास्तव अद्यापपर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही.

६) १) दिनांक १ मे १९९९ पासून परभणी जिल्ह्याचे प्रशासनाचे सोयीनुसार विभाजन करून उत्तरेकडील भागाचे मुख्यालय हिंगोली करून त्यास जिल्ह्याचा दर्जा मिळाल्यामुळे प्रशासकीय इमारत जिल्हा पोलीस अधीक्षक, कोषागार कार्यालय इ.इमारती बांधणे क्रमप्राप्त होते.

२) कोणत्याही नवनिर्मित जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी जिल्हाधिकारी जिल्हा परिषद, जिल्हा पोलीस अधिक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय आणि जिल्हा कोषागार या जिल्हा प्रशासनातील सुरवातीच्या पांच (५) महत्वाची प्रशासकीय कार्यालय त्वरीत व नियमितपणे सुरू होण्यासाठी इमारतीचे बांधकाम करणे अत्यावश्यक आहे.

३) त्यानुसार कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग यांचे विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना उद्देशून लिहिलेले पत्र क्रमांक संकीर्ण-१०/२०००/९७९/प्रक्र-१५८/म.१० (सहपत्र क्र.२) अन्वये मागणी क्रमांक सी-२०-४०७०-'इतर प्रशासनिक सेवा भांडवली खर्च' या प्रधान शिर्षाखाली, उपलब्ध करून दिलेली रु.२१०.०० लक्षचा निधी हा नविनिर्मित जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी जिल्हाधिकारी, जिल्हापरिषद, जिल्हा पोलीस अधिक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय आणि जिल्हा कोषागार या जिल्हा प्रशासनातील सुरूवातीच्या पांच (५) कार्यालयाच्या प्रशासकीय इमारती व शासकीय अधिकारी/कर्मचारी वृंदासाठी निवासस्थाने इमारतीच्या बांधकामासाठी हिंगोली जिल्ह्यासाठी उपलब्ध करून दिल्या होत्या.

४) सदर उपलब्ध रु.२१०.०० लक्षचा निधी जिल्हाधिकारी, हिंगोली कार्यालयाने, धनादेश क्रमांक ४४४२३५ दिनांक २९/३/२००० द्वारे, सा.बां.विभाग, हिंगोली कार्यालयाकडे जमा केली होती.

५) सदर कामास निधी उपलब्ध असल्याने काम त्वरीत हाती घेण्यात आले. "अनुदान नसताना काम हाती घेण्यात आले होते." हा आक्षेप वस्तुस्थितीवर आधारीत नसून काम हाती घेताना निधी उपलब्ध होता.

साक्ष:-

४.२१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव व विभागीय प्रतिनिधींची दिनांक १२ जुलै, २०११ रोजी समितीने साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रलंबित मुद्यासंदर्भात विचारणा केली की, समितीने मुख्य सचिवांना साक्षीसाठी बोलावले असता त्यांनी समितीला आश्वासन दिले होते की, तीन महिन्याच्या आत सर्व विभागांमध्ये लोकलेखा समितीच्या कामकाजाबाबत अंतर्गत व्यवस्था करण्यात येईल. सार्वजनिक बांधकाम विभागाने लोकलेखा समितीचे प्रलंबित असलेले अनुपालन अहवाल, लेखा

परिच्छेद यांचे महालेखापाल कार्यालयामार्फत संमत करुन घेण्यासाठी अंतर्गत व्यवस्था केली आहे काय? यावर माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीला सांगितले की, माननीय मुख्य सचिवांची लोकलेखा समितीसमोर जी साक्ष झाली त्या अनुषंगाने विभागाचे कोणकोणते परिच्छेद प्रलंबित आहेत याचा पूर्ण आढावा घेण्यात आला. प्रत्येक विभागामध्ये सचिवांच्या अध्यक्षतेखाली महालेखापालांचे प्रतिनिधी, विभागातील वेगवगळे अधिकारी यांचा समावेश असलेली एक समिती नेमावयाची होती. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये अशी समिती स्थापन झालेली आहे. पुढील तीन महिन्यात जेवढे महसुली परिच्छेद आहेत, लोकलेखा समितीचे परिच्छेद आहेत ते निकाली काढण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने नियोजन केले आहे. जे काही परिच्छेद प्रलंबित आहेत ते परिच्छेद संमत करुन घेण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार केला आहे. व एक महिन्याच्या काळात आम्ही सर्व परिच्छेदांची माहिती समितीला सादर करण्याबाबतची दक्षता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेतली जाईल असे समितीला सांगण्यात आले.

४.२२ आकस्मिकता निधीमधून रक्कम का मागण्यात आली? बांधकाम पूर्ण झाले आहे काय ? या कामामध्ये आकस्मिकता होती काय? तसेच हे काम कोणते होते? यासंदर्भात समितीने विभागास विचारणा केली असता, याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सगळे बांधकाम पूर्ण झाले आहे. मुख्यत: हा खर्च रेस्ट हाऊसची दुरुस्ती आणि कार्यालयीन दुरुस्तीसाठी झालेला आहे. या कामासाठी एस्टीमेटच्या ५ टक्के तरतूद ठेवली जाते. यामध्ये पुलाची काही कामे होती आणि समुद्र किनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम होते. अंदाजपत्रकामध्ये ५ टक्के तरतूद ठेवली होती. त्या तरतुदीतून संबंधित कार्यालयाच्या आणि रेस्ट हाऊसच्या दुरुस्तीवर खर्च केला आहे. ९५ रुपयांचे एस्टीमेट झाले तर ५ टक्के ॲड करुन १०० रुपये तरतूद केली जाते. ही ५ टक्के रक्कम आकस्मिक कामासाठी प्रोव्हाईड केलेली असते.

४.२३ अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध होती. पूलाच्या कामासाठी आणि धूप प्रतिबंधक बंधाऱ्यासाठी वेगळे लेखाशीर्ष असताना आणि विधिमंडळाने या कामाला मान्यता दिलेली असताना वेगळ्या माध्यमातून खर्च करता येतो का? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, काही ठिकाणी पुलाची कामे होती.

त्यात अशी तरतूद असते की, कामाच्या ठिकाणी शेड उभी करावयाची असेल किंवा साईट कार्यालय उभे करावयाचे असेल तर कामाच्या एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के तरतूद उपलब्ध केलेली असते.

४.२४ विधिमंडळाच्या मान्यतेशिवाय खर्चाचे स्वरुप बदलता येते का? रक्कम वळवून कार्यालयाचे काम केले हे काम अधिकृत होते का? त्यावेळच्या पुरवणी मागणीमध्ये या कामाचा समावेश का झाला नाही? अशी विचारणा समितीने केली असता ही ५ टक्के आकस्मिक तरतूद असते, हा आकस्मिकता निधी नसतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

४.२५ कमी रक्कमेत काम झाले तर ५ टक्के रक्कम विभागाला परत करावी लागते. त्या रक्कमेतून इतर कामे करता येतात का? तसा नियम असेल तर समितीला सांगण्यात यावा. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पुलाचे काम असेल तर त्या कामाच्या ठिकाणी छोटे साईट कार्यालय बांधावे लागते, टूल शेड उभारावी लागते. अशी प्रचलित पध्दत सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये आहे. साईटवर कार्यालय बांधलेले असले तरी नंतर ते पाडावे लागते. तेथे निधीची थोडीशी अडचण होती म्हणून विभागाने ती रक्कम वापरली.

४.२६ थोडीशी अडचण होती असे विभागीय सचिवांचे म्हणणे असेल तर १.२५ कोटी रुपये ही रक्कम थोडी होत नाही. १०-२० लाख रुपये खर्च झाला तर समजू शकतो. असे मत समितीने व्यक्त केले तसेच कामाची मूळ रक्कम किती होती आणि काम किती रक्कमेत झ ाले? याबाबत वित्त विभागाच्या सचिवांचे मत समितीने विचारले असता रक्कम वळविता येणार नाही तथापि जे मुख्य काम आहे त्याच्या अनुषंगाने ते काम असेल तर त्यासाठी खर्च करता येतो असे वित्त सचिवांनी सांगितले याबाबत नियमपुस्तिकेमध्ये तरतूद नसली तरी रक्कम वळविण्याचा अधिकार अधीक्षक अभियंत्यांना दिलेला आहे प्रकल्प अफेक्ट झालेला नाही अधीक्षक अभियंत्यांकडे ५ टक्के कॉन्टिजन्सी फंड असतो, त्यामधून हा खर्च झालेला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

४.२७ समितीने अशी विचारणा केली की, आकस्मिक निधीमधून कोणते काम करण्यात आले? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पत्तन अभियंत्यांकडील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याचे काम होते. त्यांच्या कार्यालयात अधिक दुरुस्तीचे काम केले. दुसरे व

तिसरे काम देखील अतिरिक्त सुधारनेचेच होते. अतिरिक्त दुरुस्तीमध्ये पार्टिशन करणे, रंगरंगोटी करणे अशी १२ प्रकारची कामे होती. प्रत्येक काम वेगवेगळ्या एस्टीमेटला चार्ज केले आहे.

४.२८ मुख्य काम किती रक्कमेचे होते आणि ५ टक्के रक्कम किती होती? मुख्य काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित रक्कमेतून ही कामे केली असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली आहे. ती माहिती तपासून घेण्यात येईल. खर्च अधिक झाला असेल तर संबंधितांवर कारवाई करण्याची शिफारस केली जाईल. ॲडिशनल आल्टरेशनने जी १२ कामे केली त्याची कामनिहाय सविस्तर माहिती समितीला सादर करण्याचे निदेश समितीने दिले परंतु माहिती अद्यापही अप्राप्त आहे.

४.२९ एस.आर.आणि सी.आर.ची कामे आमदारांकडून प्रस्तावित केली जातात. तेथे कार्यालयाची दुरुस्ती करण्याची आवश्यकता होती का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, मूळ कामामध्ये ५ टक्के कॉन्टिजन्सी तरतूद दाखविली जाते. त्याच कामावर नवीन बाब निघाली तर त्यावर खर्च करता येतो. यासंदर्भात मूळ काम आणि अनुषंगिक केलेली कामे याची यादी विभागाने समितीला सादर करावी. तसेच मूळ बजेट व एकूण केलेला खर्च याची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी. सदर माहिती वित्त विभाग आणि महालेखाकार कार्यालयाकडून तपासून घेण्यात येईल. त्यामध्ये काही गैर आढळून आल्यास कारवाई करण्यात येईल. असे समितीने सूचित केले.

४.३० सदरहू खर्च विधिमंडळाची दिशाभूल करुन केलेला आहे. असे मत समितीने व्यक्त करुन प्रत्येक सर्कलमध्ये असा खर्च केला जातो की याच सर्कलमध्ये केला गेला आहे अशी पृच्छा समितीने केली असता प्रत्येक ठिकाणी खर्च होतो असे नाही. तेथील स्थानिक पातळीवर गरज असेल तरच खर्च केला जातो. आकस्मिक निधीतून खर्च करण्याचा निर्णय अधिक्षक अभियंता, ठाणे आणि अधिक्षक अभियंता पत्तन यांनी घेतला आहे. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

४.३१ अतिरिक्त न्यायालय इमारतींमध्ये व्यर्थ गुंतवणूक यामुद्दयासंदर्भात महालेखाकार यांनी समितीला सांगितले की, The work was commenced without obtaining necessary approval and there was lack of co-ordination between various agencies and Departments

of the Government which resulted in idle investment of Rs. 70 lakh and extra avoidable expenditure of Rs. 59 lakh. महालेखाकारांनी दिलेल्या माहिती संदर्भात अतिरीक्त न्यायालयाची इमारतीचे बांधकाम प्रशासकीय मंजुरी न घेता करण्यात आले आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, इमारतीच्या बांधकामाकरिता विधी व न्याय विभागाची मंजुरी घेण्यात आली होती. तसेच बजेट प्रमाणे काम केलेले आहे. आता सदर काम पूर्ण झालेले आहे व ती इमारत हस्तांतरीत केलेली आहे. तेथे न्यायालयाचे काम देखील सुरु झालेले आहे. या कामाला थोडा उशीर झाला होता. विधी व न्याय विभागाने इमारत बांधण्याकरिता जी जमीन दिली होती, त्यावर सुरुवातीला ११.७० मी उंचीची इमारत बांधण्याचे प्रस्तावित केले होते. टाऊन प्लानिंगची परवानगी मिळण्यास वेळ लागला. तसेच सीआरझेडची परवानगी मिळण्यास देखील उशीर झाला. आता सर्व कामे पूर्ण झालेली आहेत व रीतसर सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत.

४.३२ समितीने पुढे अशी विचारणा केली की, विधी व न्याय विभागाची ऑर्डर मिळाली होती. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची परवानगी घेऊन काम करणे अभिप्रेत होते. या परवानग्या न घेता अधिकाऱ्यांनी इमारतीचे बांधकाम केले. या नंतर तेथे ११.७० मी. उंचीची इमारत बांधता येणार नसल्याचे लक्षात आले. या प्रकरणामध्ये कोणता अधिकारी दोषी आहे ? The sanction stipulated that the necessary permission from the local authorities should be obtained before commencement of the work. परवानगीकरिता प्रस्ताव कधी सादर केला होता ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक ४ जून २००२ रोजी उप विभागीय अभियंता,विशेष प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम, डहाणू यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. इमारतीचे बांधकाम सन २००४ मध्ये सुरु झालेले आहे. २ वर्षे परवानगी न मिळाल्यामुळे काम सुरु करता आले नाही. परवानगी प्राप्त होण्यास उशीर झालेला आहे. अंतिम मंजुरी दि.२०.२.२००८ रोजी मुख्याधिकारी,डहाणू नगरपरिषद यांच्याकडून प्राप्त झाली होती.

४.३३ म्हणजेच अधिकाऱ्यांनी इमारतीचे काम स्वत:हून सुरु केले. त्यानंतर अंदाजपत्र काढले व कार्यादेश तयार केली. या नंतर तेथे ११ मी. उंचीची इमारत होऊ शकणार नाही,असे लक्षात आल्यानंतर इमारतीचा आराखडा बदलण्यात आला, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, इमारतीचा आराखडा बदलण्यात आलेला

नाही. परवानगी मिळण्यास उशीर झालेला आहे. ९ मी.पेक्षा जास्त उंचीच्या इमारतीला परवागी देता येणार नव्हती.

४.३४ मंजुरी मिळण्यास उशीर झाल्यामुळे इमारतीची किंमत किती वाढली ? कारण एस्कलेशनमुळे किमतीमध्ये फरक पडला. साधारणपणे ४९ लाख रुपये अधिक खर्च करावा लागला आहे समितीच्या या मताबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रशासकीय मंजुरी २ कोटी १८ लाख रुपये इतक्या किमतीस देण्यात आली होती. अंतिम मंजुरी २ कोटी ११ लाख रुपये किमतीला देण्यात आली. प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक रक्कम खर्च करण्यात आलेली नाही. महालेखाकारांनी असा मुद्दा उपस्थित केला आहे की, पहिले टेंडर १ कोटी २४ लाख रुपयांचे होते. सदर कंत्राटदाराला कामाची मंजुरी न मिळाल्यामुळे काम काढून धेण्यात आले. नंतरचे टेंडर १ कोटी ३१ लाख रुपयांचे होते तफावतीमुळे रक्कम जास्त खर्च झालेली आहे, असे महालेखाकारांचे मत आहे.

४.३५ न्यायालयाची इमारत बांधण्याकरिता सन २००२ मध्ये परवानगी मागितली होती. दिनांक ४/६/२००२ रोजी त्याकरिता अर्ज करण्यात आला होता. मात्र त्याबाबत सन २००५ पर्यंत काहीच कार्यवाही केली नाही. नंतर सन २००५ च्या बैठकीत असे लक्षात आले होते की, ९ मी.पेक्षा अधिक उंचीची इमारत बांधता येणार नाही असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मंजुरीकरिता ३ टप्पे पूर्ण करण्यात आले होते. व शासकीय चीफ आर्कीटेक्टने प्लान तयार केला होता.

४.३६ चिफ आर्किटेक्टच्या चुकीच्या प्लानिंगमुळे अधिक रक्कम खर्च झालेली आहे. कारण सुरुवातीला आर्कीटेक्टने ११.७० मी उंचीचा प्लान तयार केला होता. यामुळे बांधकामास परवानगी मिळण्यास उशीर झाला. आर्कीटेक्टने कोणताही अभ्यास न करता प्लान तयार केला आहे या प्रकरणामध्ये आर्कीटेक्ट दोषी आहे, असे मत समितीने खेदाने व्यक्त केले व ज्यांनी कोणताही अभ्यास न करता प्लान तयार केला आहे. तेव्हा अर्किटेक्टच्या संदर्भात लेखी माहिती देण्याचे निदेश समितीने दिले.

४.३७ ड्रॉईंग सबमिट करताना रिलॅक्सेशनची तरतूद आहे. त्याप्रमाणे रिलॅक्सेशन मिळाले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता ड्रॉइंग सबमिट करताना

रिलॅक्सेशनच्या तरतुदीची मागणी करण्यात आली होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी नकारार्थी उत्तर दिले.

४.३८ साधारणपणे कामाचे वर्क ऑडीट केले जात असते. आर्कीटेक्टने त्याच्या कामामध्ये दिरंगाई व चूक केलेली आहे. सन २००४-०६ मध्ये इलेक्ट्रीक लाईन शिफ्ट झाली नाही हा प्रश्न दोन विभागाच्या को-ऑर्डीनेशनचा आहे. २ वर्षामध्ये इलेक्ट्रीक लाईन शिफ्ट होत नाही यामुळे काम ठप्प झाले होते यामुळे तेथील कंत्राटदाराने वैतागून काम सोडले. या नंतर नवीन कंत्राटदाराला नियुक्त केले यामध्ये शासनाचा निधी वाया गेला. संबंधित प्रकरणाबाबत समितीला कठोर भूमिका घ्यावी लागणार आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

४.३९ सन २००२ मध्ये ११.७० मी. उंचीच्या मान्यतेकरिता प्रस्ताव सादर करण्यात आला. उंची शिथिलता करण्याकरिता कधी प्रस्ताव सादर केला ? याबाबत खूलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००२ मध्ये ११.७० मी. उंचीच्या मान्यतेकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या नंतर २ वर्षानंतर म्हणजे दि. २/४/२००४ रोजी रिलॅक्सेशनसाठी प्रस्ताव उपसंचालक, ठाणे यांना पाठविला होता. यावर दिनांक २.४.२००२ रोजी ठाणे यांच्याकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर सन २००६ मध्ये परवानगी प्राप्त झाली. मधल्या काळामध्ये आपल्या विभागाकडून याबाबत कोणी फॉलोअप करीत होते काय ? याबाबत विभागीय सचिवांनी विभागाकडून पाठपुरावा करण्यात येत होता इतकीच माहिती समितीला दिली. अशाप्रकारे कामे पूर्ण होण्यास २-२ वर्षांचा कालावधी लागत असेल, तर त्या कामाला काय अर्थ आहे ? यामुळे मटेरिअल कॉस्ट वाढत जाते. विभागाच्या दिरंगाईमुळे जर शासनाला भुर्दंड सोसावा लागत असेल तर, याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. विभागाच्या अंतर्गत बैठका होतात, त्यामध्ये अशा गोष्टींचा रेव्हयू घेतला जात नाही का ? वेळोवेळी अशा गोष्टींवर चर्चा करुन संबंधीतांना वेळीच जाब विचारला पाहिजे. कारण एकदा बजेट मंजूर झाल्यानंतर दणक्यात कामाला सुरुवात केली जाते, परंतु, त्यामध्ये काही अडचण आली की, ते मध्येच सोडून दिले जाते. यामुळे शासनाचे किती आर्थिक नुकसान होते याचा गांभीर्याने विचार होताना दिसत नाही. असे मत व्यक्त करुन समितीने विभागाच्या कामकाजावर तीव्र नापसंती दर्शविली.

४.४० एखाद्या कामाच्या बाबतीत चिफ इंजिनिअरला किती रकमेच्या कामाच्या खर्चाच्या मंजुरीचे अधिकार आहेत अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, २५ लाख रुपयांपर्यतच्या कामाबाबतीत ५ टक्के पर्यंत खर्चाच्या कामाला मंजुरी देण्याचे अधिकार अधीक्षक अभियंत्याला आहेत. सव्वा कोटी व त्यापेक्षा अधिक रकमेच्या कामाला मंजुरी देण्याचे अधिकार मुख्य अभियंत्यांना आहेत.

४.४१ निष्फळ खर्चाच्या मुद्दयांबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले की, दिनांक १ मे, १९९९ पासून परभणी जिल्ह्याचे प्रशासनाच्या सोयीनुसार विभाजन करुन उत्तरेकडील भागाचे मुख्यालय हिंगोली करुन त्यास जिल्ह्याचा दर्जा देण्यात आला. कोणत्याही नवनिर्मित जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा पोलीस अधिक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय आणि जिल्हा कोषागार ही जिल्हा प्रशासनातील ५ महत्त्वाची प्रशासकीय कार्यालये त्वरित व नियमितपणे सुरु होण्यासाठी इमारतीचे बांधकाम करणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार हिंगोली जिल्ह्याच्या निर्मितीनंतर उपरोक्त कार्यालयाच्या इमारतींचे बांधकाम करण्याबाबतच्या शासन निर्णयानुसार शासनाने या कामासाठी एकत्रित तरतूद केली होती. हायपॉवर कमिटीमध्ये याबाबतचा अग्रक्रम ठरविण्यात आला त्यानुसार रु. २१०.०० लक्ष इतका निधी जिल्हाधिकारी, हिंगोली कार्यालयाने सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोली कार्यालयाकडे धनादेशाद्वारे जमा केला. त्यातून हे काम करण्यात येत होते. जिल्हाधिकाऱ्यांना हे लक्षात आले की, सार्वजनिक बांधकाम कार्यालयाकडून होणारा निधीचा फ्लो कमी असल्यामुळे पोलीस अधिक्षक यांच्या कार्यालयाची इमारत बांधण्याचे काम रेंगाळत आहे. त्यासाठी तोपर्यंत ३७ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला. दरम्यानच्या काळात ते काम थांबलेले असल्याने ते टेंडर टर्मिनेट करावे लागले. सद्य:स्थितीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीचे व क्वॉर्टर्सच्या इमारतीचे काम पूर्ण झाले आहे. पोलीस अधिक्षक यांच्या कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाबाबत उपभोक्ता खात्याकडून रु. १४०.०० लक्ष इतका निधी प्राप्त झालेला आहे. उर्वरित कामाच्या निविदा देखील परत काढलेल्या आहेत. सदरहू कार्यालय इमारतीचे काम ७-८ महिन्यांमध्ये पूर्ण होऊन ती पोलीस अधिक्षकांकडे हस्तांतरित करण्यात येईल. या कामासाठी आवश्यक असणारा निधी उपभोक्ता खात्याकडून प्राप्त झालेला आहे. व या कामासाठी ३५ लाख रुपये इतका जास्तीचा खर्च आलेला आहे.

४.४२ व्यर्थ खर्चाच्या मुद्याबात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, शासकीय निवासस्थान बांधण्याच्या कामाला आवश्यक असलेल्या निधीच्या कमतरतेमुळे उशिर झालेला आहे. सदरहू इमारतीतील विद्युतीकरणाचे व वसाहतीमध्ये नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम फेब्रुवारी, २०११ मध्ये पूर्ण झाले आहे. त्यानंतर फेब्रुवारी, २०११ मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याने इमारतीचा ताबा घेऊन निवासी गाळे वाटप करण्याकरिता निवासी वाटप समितीकडून दि. ४-३-२०११ रोजी मंजुरी घेतली. वाटप केलेल्या गाळयापैकी एकूण ४० गाळयांमध्ये ३२ कर्मचारी मार्च, २०११ पासून रहायला आलेले आहेत. उर्वरित ८ गाळ्यांकरिता मागणी नसल्यामुळे ते रिक्त आहेत. सदरहू गाळे सुस्थितीमध्ये असून राहण्यासाठी योग्य आहेत.

४.४३ सदर परिच्छेदाबाबत महालेखापालांनी असा आक्षेप घेतला आहे की, सनियंत्रण आणि विद्युतीकरणाचे काम लवकर पूर्ण करणे यातील कार्यकारी अभियंत्याच्या अपयशाचा परिणाम रु. ८३.५२ लाखाचा व्यर्थ खर्च होण्यात झाला. शिवाय, या निवासस्थानांचे बांधकाम झाल्यानंतर खोल्या मोकळया राहिल्या त्याची काय कारणे आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाने दिलेल्या खुलाशासंदर्भात महालेखाकारांनी समितीला सांगितले की, हे काम खूप रेंगाळलेले आहे. त्यामध्ये सिव्हील, विद्युतीकरण व प्लंबिंग या तिन्ही कामांचा एकत्रितपणे समावेश आहे. सिव्हिलचे काम पहिले झाले व बाकीची कामे झाली नाहीत तर क्वॉर्टर्स अलॉट करता येत नाहीत. समितीबरोबर चर्चेदरम्यान विभागाने त्यांच्या काही अडचणी असतात असे सांगितले. त्यांच्या जशा अडचणी असतात तसेच महालेखापालांच्या देखील असतात. हा जो परिच्छेद आहे तो महालेखाकार कार्यालयाने मार्च, २००८ मध्ये उपस्थित केलेला आहे. या कामाला प्रत्यक्षात सन २००० मध्ये सुरुवात झालेली आहे. याबाबतीत बऱ्याचदा असे होते की, महालेखापालांना योग्य वेळेत उत्तर मिळत नाही. समितीच्या बैठकीची तारीख निश्चित केल्यानंतर एक महिना अगोदर उत्तर मिळते. त्यामुळे हे उत्तर तपासण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. अशीही खंत महालेखाकारांनी व्यक्त केली व या महालेखाकारांच्या ज्या गोष्टी प्रलंबित राहतात वेळेवर मिळत नाहीत असे वाटते त्या गोष्टींची एक स्वतंत्र यादी त्यांनी समितीला द्यावी. समिती ती यादी मुख्य सचिवांना पाठवेल असे समितीने महालेखाकारांना आश्वासित केले.

४.४४ पहिल्यांदा सिव्हीलचे काम करण्यात आले. त्यानंतर इलेक्ट्रिकल व प्लंबिगचे काम कसे काय घेण्यात आल असा मुद्दा महालेखाकारांनी उपस्थित केला. समितीने एखादे काम हाती घेतले की, पहिल्यांदा सिव्हीलचे काम पूर्ण केले जाते. एखाद्या इमारतीच्या बांधकामाचे काम पीडब्ल्युडी सिव्हिलकडून केले जाते. परंतु, त्या इमारतीच्या लिफ्टचे व इतर विद्युतीकरणाचे काम करावयाचे असेल तर त्यासाठीची परवानगी व इतर कामांसाठीचे इंजिनिअर्स वेगळे असतात. यामध्ये योग्य त्या समन्वयाचा अभाव दिसून येतो. त्यामुळे बाकीचे विद्युतीकरण व प्लंबिगचे जे काम आहे त्याबाबतीत देखील समन्वय साधुन ते काम पूर्ण केले पाहिजे. अशी सूचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्य पातळीवरील कामांसाठी मुख्य अभियंता, प्रादेशिक विभागांबाबत अधीक्षक अभियंता, तर काही जिल्ह्यांच्या बाबतीत दोन जिल्हयांना मिळून एक तर काही जिल्हयांच्या बाबतीत एका जिल्हयाला एक कार्यकारी अभियंता यासाठी नियुक्त केलेला आहे. समन्वयासाठी नेमलेल्या त्या त्या संबंधित अधिकाऱ्याकडून नियमित रेव्ह्यू घेतला पाहिजे. तसेच काम गांभीर्याने होताना दिसत नाही. केवळ पुणे जिल्ह्यापुरते बोलावयाचे झाले तर, तेथील अशी १० तरी कामे सांगता येतील की, ज्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनाच पाठपुरावा करावा लागतो. शासन स्तरावरुन ही कामे झाली पाहिजेत. अशी खंत समितीने व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, समन्वयासाठी नेमलेल्या त्यासंबंधित अधिकाऱ्याकडून नियमित रिव्ह्यु घेतला जाईल व याबाबतीत आता विभागनिहाय मुख्य अभियंता यांच्या पातळीवर आढावा घेण्याची पध्दती सुरु केलेली आहे.

४.४५ ही जी वेगवेगळी कामे केली जातात त्यामध्ये एकसूत्रता आली पाहिजे. इमारतीचे काम झाल्यानंतरही विद्युतीकरण व प्लंबिगची कामे दहा वर्षे होत नाहीत याला जबाबदार कोण ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, याला संबंधित सिव्हील इंजिनिअर हेच जबाबदार आहेत. त्यांनी विद्युतीकरणाची कामे करुन घेतली पाहिजे होती. परंतु, आता प्लंबिंगचे काम झालेले असून विद्युतीकरणाचे काम बाकी आहे.

४.४६ यासंदर्भात महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणले की, वेळेवर काम पूर्ण होण्याच्या सनियंत्रण करण्यातील कार्यकारी अभियंता यांच्या अपयशाचा परिणाम रु. ८३.५२ लाखाचा व्यर्थ खर्च झाला. शिवाय लोकांना घरे न मिळणे, त्यांची गैरसोय होणे या गोष्टी

सुध्दा त्यामध्ये येतात. या खेरिज घरभाडे भत्ता आणि अनुज्ञप्ति शुल्क यासाठी शासनाला भुर्दंड सोसावा लागला. विभागाला लोकांची किती काळजी आहे हे यावरुन दिसून येते.

४.४७ शासनाला सोसाव्या लागणाऱ्या भूर्दंडास कोण जबाबदार आहे व याला जबाबदार असणाऱ्यांवर काय कारवाई केली ? व कारवाई केली नसल्यास तर याला कोण जबाबदार आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता यामध्ये मूळ जबाबदार संबंधित सिव्हिल इंजिनिअर आहेत. विद्युतीकरणाच्या कामासाठी निधी प्राप्त झालेला होता. परंतु, ते काम करण्यामध्ये थोडेसे दुर्लक्ष झालेले आहे. याला कारणीभूत २ मुद्दे आहेत. एक म्हणजे जमीन घेताना अडचणी येतात. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. जमिनी बाबतचे वाद न्यायालयात असतील तर समजता येईल. परंतु, इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतरही इलेक्ट्रीक व प्लंबिगच्या कामासाठी १० वर्षे थांबावे लागले असेल तर याला काय म्हणावे ? असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

४.४८ हा परिच्छेद मार्च २००८ मध्ये उपस्थित केला होता. त्याला आता ३ वर्षे झाल्यानंतरही विभागाचे उत्तर न येणे हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे. यावरुन लेखापरिक्षणास विभागाकडून किती महत्त्व दिले जाते हे दिसून येते. हे परिच्छेद प्रथम चिफ इंजिनिअर लेव्हलवर पाठविले जातात त्यानंतर पुढचे प्रोसेस होते. ही बाब महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली असता समितीने सन २००८ मध्ये हा परिच्छेद निदर्शनास आणून देऊन देखील आपल्याकडून त्याबाबत खुलासा करणारे पत्र तीन वर्षे झाली तरी पाठविले गेले नाही ही बाब अतिशय हास्यास्पद आहे. याबाबत विभागाने स्पष्टीकरण द्यावे असे सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११ या वर्षातील कामे निधी उपलब्धतेप्रमाणे आता पूर्ण केलेली आहेत. महालेखापालांनी जो आक्षेप घेतला यामध्ये प्रामुख्याने लँड मिळविणे व को-ऑपरेशनचा अभाव असे दोन प्रॉब्लेम्स दिसून येतात. या प्रकरणाबाबत लँडचा कोणता प्रॉब्लेम आला ? व निधीची उपलब्धता असताना कामे होत नाहीत असे कसे काय होऊ शकते ? या कामांसाठी कम्बाईन टेंडर काढले जाते का ? अशी विचारणा विभागास केली असता याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबतीत निधी कम्बाईन असतो व वेगवेगळया कामांची वेगवेगळी टेंडर्स काढली जातात.

४.४९ एकदा सिव्हिलचे इमारत बांधण्याचे काम झाल्यानंतर जर बाकीची कामे वेळेवर झाली नाहीत, तर त्या इमारतीची दारे, खिडक्या तुटणे, चोरुन नेणे असे गैरप्रकार घडतात. या विलंबामुळे पिरियडमुळे शासनाचे नुकसान देखील होते असे मत समितीने व्यक्त केले.

४.५० महालेखाकार कार्यालयाने आक्षेप काढल्यानंतर त्याबाबतचा खुलासा विभागाकडून करण्यात आला काय ? विभागाच्या खुलाशात या प्रकरणी अमूक एका अधिकाऱ्याकडून चूक झालेली आहे आणि त्यावर कारवाई करणार आहोत असा उल्लेख कोठेही दिसून येत नाही. पुढे असेही नमूद केलेले आहे की, "... कामे रेंगाळली आहेत, त्यात कंत्राटदाराचा कोणताही दोष नसल्याने कंत्राटदाराकडून काम काढून घेणे शक्य नव्हते, म्हणून मूळ कंत्राटदाराकडून इमारतीचे काम पूर्ण करुन घेणे आवश्यक होते" विभागाच्या प्रमुखांना देखील चूक झालेली आहे असे वाटत नाही. विभागाच्या अभिप्रायामध्ये "अमूक एका अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल" अशा प्रकारचा कोठेही उल्लेख नाही. महालेखाकार कार्यालयाकडून पॅरा आल्यानंतर त्याचे वेळेत उत्तर न देणे, या प्रकरणी कोणाही अधिकाऱ्याची चूक नाही असे वाटणे, कसेही काम केले तरी चालते अशी विभागाची मानसिकता असेल तर समितीने विभागाची साक्ष कशासाठी घ्यावयाची ? यामध्ये समितीचा आणि अधिकारी अशा दोघांचा वेळ जात आहे. अधिकाऱ्यांना काम करताना काही अडचणी येतात हे समजू शकतो, अधिकाऱ्याकडून चुकून एखादी बाब घडली तर समजू शकतो. परंतु अधिकारी जाणीवपूर्वक चुकीची बाब करीत असतील तर ते चुकीचे आहे. अधिकाऱ्यांना पाठिशी घालत आहात असा संदेश खालच्या अधिकाऱ्यापर्यंत जाता कामा नये. असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

४.५१ या प्रकरणामध्ये जो दहा वर्षे उशीर झालेला आहे त्यास कोण जबाबदार आहे हे आपण ठरवून त्याप्रमाणे समितीला कळवावे. असे समितीने विभागीय सचिवांना सांगितले असता या प्रकरणामध्ये उशीर तसेच समन्वयाचा प्रश्न निर्माण झालेला आहे या प्रकरणाची चौकशी करुन जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

४.५२ महालेखाकार कार्यालयाने जानेवारी २००८ मध्ये परिच्छेद क्रमांक ४.१.३ लबाडीचे प्रदान हा परिच्छेद काढल्यानंतर त्या संदर्भातील खुलासा विभागाने समितीच्या बैठकीच्या १५ दिवस आधी सादर केल्याबाबत समितीने विभागाच्या कामकाजाबाबत असमाधान

व्यक्त केले. याबाबत स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक १६.७.२००८ रोजी आक्षेप घेण्यात आला होता. त्या संदर्भातील खुलासा दिनांक १.११.२००८ रोजी करण्यात आला. त्यानंतर पुन्हा महालेखाकार कार्यालयाकडून अनौपचारिक संदर्भ दिनांक ४.११.२००८ रोजी आला.

४.५३ रस्त्याच्या कामासाठी कोणत्या प्रकारचे डांबर वापरण्यात आले हे डांबर कंपन्यांकडून पडताळणी करुन घेतले आहे काय ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, रस्त्याच्या कामासाठी वापरण्यात आलेले डांबर हे कंपन्याकडून तपासून घेतले आहे. महालेखाकारांच्या परिच्छेदामध्ये चार कामांबाबत आक्षेप घेण्यात आला होता. चारपैकी तीन कामे बरोबर असल्याचे कंपनीने कळविले आहे. एका कामामध्ये बनावट दस्तऐवज केलेला आहे. कंत्राटदाराने डांबराची ग्रेड ८०/१०० वापरली परंतु चलन सादर करताना ६०/७० ची ग्रेड वापरल्याचे नमूद केले होते. ही बाब निदर्शनास आल्यानंतर कंत्राटदाराकडून १२ लाख ३३ हजार ९३८ इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. कंत्राटदाराकडून एकूण २६ लाख रुपये वसूल केलेले आहेत.

४.५४ डांबर ६०/७० की ८०/१०० प्रतीचे होते हे कसे समजते ? याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, डांबराच्या नमुन्याची प्रयोगशाळेमध्ये तपासणी करण्यात येते. या संबंधी आक्षेप आल्यानंतर विभागाकडून त्या कामाची कंपनीकडून तपासणी करुन घेतली.

४.५५ डांबराचे नमुने तपासणीसाठी लॅबमध्ये पाठविण्यात येते. त्याठिकाणी ते नमुने गंभीरपणे तपासले जातात काय ? जर १०० ठिकाणी कामे झाली असतील तर त्या सर्व कामांची तपासणी होते काय ? अशी शंका समितीने उपस्थित केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जर १०० कामे झाली असतील तर ती सर्व कामे तपासली जातात. ३० टक्के कामांची प्रयोगशाळेत तपासणी करावी असा नियम आहे. अन्य टक्केवारी कंत्राटदार त्यांच्या स्वतःच्या प्रयोगशाळेत तपासणी करतात त्यावेळी विभागाचे अधिकारी तेथे उपस्थित असतात. यावर कंत्राटदाराच्या प्रयोगशाळेमध्ये अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तपासणी केली जाते परंतू सर्वच अधिकाऱ्यांकडून सत्य माहिती दिली जाते काय ? अशी विचारणा समितीने केली

असता विभागीय अधिकारी दक्षता जागृत असतात. एखाद दुसऱ्या प्रकरणामध्ये चूक होऊ शकते. असे स्पष्टीकरण विभागीय प्रतिनिधींनी दिले.

४.५६ बी.ओ.टी. तत्वावर बांधलेले रस्ते चांगल्या दर्जाचे असतात. विभागाकडून बांधलेले रस्ते वर्षाभरातच खराब होतात. असे मत समितीने व्यक्त केले. महालेखाकारांनी आक्षेप नोंदविल्यानंतर विभागाने त्या संदर्भात कंपनीकडून पडताळणी करुन ते देयक बनावट असल्याचे सांगून तसे महालेखाकार कार्यालयास कळविले. विभागाने काही दिवसांपूर्वीच ती माहिती महालेखाकार कार्यालयास कळविली आहे. विभागाच्या खुलाशाच्या अनुषंगाने महालेखाकारांचे समाधान झाल्यानंतर तसे समितीस कळविण्यात येईल असे महालेखाकारांनी सांगितले. या प्रकरणामध्ये सब कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले होते काय ? असे महालेखाकारांनी विचारले असता या प्रकरणामध्ये सब कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले होते व पेमेंट मुख्य कंत्राटदारास केले असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

४.५७ मुख्य कंत्राटदाराने सब कंत्राटदाराची नेमणूक करताना विभागाची परवानगी घेतली होती काय ? व कंत्राटदाराने बनावट देयक सादर केली म्हणून त्याच्यावर कोणती कारवाई केली ? याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मुख्य कंत्राटदाराने सब कंत्राटदाराची नेमणूक करताना विभागाची परवानगी घेतली होती व यासंदर्भातील माहिती बीपीसीएलच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच कंत्राटदाराकडून २६ लाख रुपये वसूल केलेले आहेत. दोषी कंत्राटदारांवर कोणकोणती कारवाई करावी याबाबत परिपत्रक आहे. पहिला गैरप्रकार आढळून आल्यास त्याप्रमाणे गोपनीय अहवालात नोंद घ्यावी. त्याप्रमाणे संबंधित कंत्राटदाराची गोपनीय अहवालात नोंद घेतलेली आहे.या नोंदीमुळे कंत्राटदाराच्या नोंदणीवर / नोंदणी पुनर्जीवित करण्यावर भविष्यात परिणाम होईल.

४.५८ संबंधित कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकले आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकलेले नाही. काळ्या यादीत नाव टाकणे ही शेवटची शिक्षा आहे. पहिलाच गैरप्रकार म्हणून दंडाची शिक्षा केलेली आहे आणि तशी गोपनीय अहवालात नोंद घेतलेली आहे. भविष्यात नोंदणी पुनर्जीवित करताना त्याचा परिणाम होईल. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता एखाद्या कंत्राटदाराने करोडो रुपयांचा अपहार केला आणि त्याचा पहिलाच गुन्हा आहे असे सांगून त्याला फक्त दंडाची

शिक्षा करणे योग्य नाही. गुन्ह्याचे स्वरुप लक्षात घेऊन त्याप्रमाणे कारवाई केली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले.

४.५९ अधिकाऱ्यांनी कामांची वेळोवेळी पाहणी केल्यास अशा प्रकारचे प्रसंग घडणार नाहीत. अधिकाऱ्यांनी चुकीचे काम होत आहे हे वेळीच निदर्शनास आणून दिले तर कामांमध्ये असे गैरप्रकार होणार नाहीत. विभागाच्या खुलाशामध्ये नमूद केलेले आहे की, "वर नमूद कामांच्या दस्तऐवजाची तपासणी करताना कंत्राटदार हा फक्त चारपैकी एका कामामध्ये दोषी आढळून आला आहे." चार कामांपैकी एका कामामध्ये दोषी आढळून आला म्हणून त्यास सौम्य शिक्षा करण्याचे काही कारण नाही. जे कंत्राटदार कामामध्ये गैरव्यवहार करतात त्यांच्यावर कडक कारवाई केली पाहिजे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मॅन्युअलमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. कामामध्ये गैरप्रकार करणाऱ्या कंत्राटदारावर फक्त दंडात्मक कारवाई करुन चालणार नाही तर त्यास काळ्या यादीत टाकले पाहिजे. मॅन्युअलमध्ये ज्या शिक्षा सुचविलेल्या आहेत त्याबाबत पुनर्विचार करावा. गैरप्रवृत्तींना आळा बसेल अशाप्रकारचे बदल मॅन्युअलमध्ये करावेत अशी शिफारस शासनास करण्यात येईल असे समितीने सांगितले.

४.६० तसेच एखादा कॉन्ट्रॅक्टर कामाचा ठेका घेतो आणि काम पूर्ण करीत नाही. त्याला दंड आकारण्याची प्रोसीजर काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, बी-१ कॉन्ट्रॅक्टमध्ये खंड २ नावाचा क्लॉज आहे. त्यामध्ये १/४ काम वेळेत पूर्ण झाले पाहिजे. निम्मे काम निम्म्या वेळेत पूर्ण व्हावयास पाहिजे. या नियमानुसार १/४ काम केले नाही तर खंड २ ची नोटीस दिली जाते. ४० टक्के केसेसमध्ये दंड आकारणी होते.

४.६१ ठराविक काळात काम केले पाहिजे यासाठी दंडात्मक तरतूद का केली जात नाही? अनेक वर्षापासून कामे अपूर्ण आहेत. अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी सिस्टीम का बदलण्यात येत नाही? अशी पृच्छा समितीने केली असता, कामासाठी १८ महिने, २४ महिने मुदत दिली जाते. काम आपण सांगतो तेव्हा सुरु करावे लागते. अशा वेळेला दोन वर्षात ३० टक्के रक्कम मिळणार असेल आणि ५० टक्के रक्कम दोन वर्षानी मिळणार असेल तर २० टक्क्याची गॅप राहते. मागील दीड-दोन वर्षात नव्याने फार कमी कामे मंजूर होत असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

४.६२ बजेटेड बॅकअप दिले पाहिजे तेवढे दिले जात नाही. विभागाची १० हजार कोटी रुपयांची मागणी असेल तर ४ हजार कोटी रुपये मिळतात. ही मधली तफावत अडचणीची आहे. एखादा ठेकेदार ५० लाखाचे काम असेल आणि विभागाने ३० लाख उपलब्ध करुन दिले, उर्वरित २० लाख रुपये मिळण्यासाठी एक वर्ष लागणार असेल तर २० लाखाची रक्कम व्याजासह ॲड करुन तो काम करण्यास तयार होतो. विभागाने ठेकेदाराला वेळेत काम पूर्ण करण्यास सांगितले पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले.

४.६३ रजा प्रवास सवलतीच्या परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, २९ कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्षात रजा न घेता रजा प्रवास सवलतीची रक्कम घेतली. बहुतांश कर्मचारी चौकीदार, मजूर, चालक, सुतार, शिपाई आदी संवर्गातील तृतीय व चतुर्थ श्रेणीतील आहेत. २९ पैकी २६ लोकांविरुध्द विभागीय चौकशी करण्यात येऊन त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला. त्यांच्याकडून पूर्ण रक्कम वसूल केली आहे. २९ पैकी ३ कर्मचारी मृत झाले आहेत. तसेच वर्ग ३ व ४ चे कर्मचारी असल्यामुळे त्यांना दिली जाणारी शिक्षा फार कठोर १८ टक्के दंडनीय व्याज २४७६० रुपये २६ कर्मचाऱ्यांकडून वसूल करण्यात आले आहेत. बिले तयार करणाऱ्या १८ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु केली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले. विभागीय चौकशी अहवाल समितीला सादर करण्याचे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले.

४.६४ विनिर्देशांचे पालन न केल्याने अधिक खर्चा संदर्भात नाबार्डचे जे स्पेसिफिकेशन्स आहेत आणि विभागाने जे अंमलात आणले त्यामध्ये फरक होता. या प्रकरणामध्ये जादा पेमेंट झाल्याचे म्हणणे असल्याचे महालेखाकारांनी सांगितले.

४.६५ स्पेसिफिकेशन्स तपासण्याचे अधिकार कोणाकडे आहेत? त्यांनी या प्रकरणात तपासणी केली होती का? अशी विचारणा समितीने केली असता १९९३ सालचा ऑडिट अहवाल आहे. २००३ मध्ये शासनाने परिपत्रक काढले असून त्यानुसार स्थानिक पातळीवर बदल करण्याचे अधिकार मुख्य अभियंत्यांना आहेत. कळवण आणि पुणे येथे २० मि.मि. ऐवजी २५ मि.मि. चे कार्पेट टाकण्यात आले. त्या ठिकाणी रेनफॉल जास्त असल्यामुळे मुख्य अभियंत्यांनी मान्यता दिली असल्याचे स्पष्टीकरण विभागीय सचिवांनी दिले.

४.६६ जमिनीच्या अभावामुळे टाळता येण्याजोगे जादा दायित्व याबाबत विभागीय सचिवांनी असे सांगितले की, लाखनी, जि.भंडारा येथील तहसील कार्यालय इमारतीचे बांधकाम करावयाचे होते. ऑडिट मुद्दा असा होता की, कार्यकारी अभियंत्यांनी जमीन उपलब्ध नसताना काम हाती घेतले. ०.४५ हेक्टर जमीन उपलब्ध होती. तसे पत्र उपविभागीय अधिकारी यांनी वर्क ऑर्डर देण्यापूर्वी दिले असून त्या पत्राची प्रत उपलब्ध आहे. जमीन उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र महसूल विभागाचे आहे. मूळ १.०३ हेक्टर जमिनीची मागणी केली होती. त्या जमिनीवर कालांतराने निवासस्थाने देखील बांधावयाची होती. ०.४५ हेक्टर जमीन उपलब्ध होती तेथे प्रश्न असा निर्माण झाला की, त्या जागेबाबत लोकांची आंदोलने झाली. ही जागा खेळाचे मैदान असल्यामुळे तेथे काही बांधू नये यासाठी आंदोलने झाल्यामुळे जागा बदलावी लागली. त्यामुळे बांधकाम करण्यास विलंब झाला. कामाचा ठेका दुसऱ्या ठेकेदाराला द्यावा लागला. परिणामी खर्च वाढला. वर्क ऑर्डर देताना जमीन उपलब्ध नव्हती असा ऑडिट मुद्दा होता.

४.६७ यावर स्थानिक अडचणीमुळे बांधकाम करण्यास विलंब झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभिप्रायांमध्ये कुठेही दोषी अधिकाऱ्यांबाबत कारवाईचा मुद्दा नसेल तर विभागावर कारवाई करावी लागेल. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ३७ परिच्छेद प्रलंबित आहेत. सर्व मुद्यांची माहिती समितीला सादर करावी. विभागाकडून आवश्यक तेवढे सहकार्य मिळत नाही. वेळोवेळी महालेखाकार कार्यालयाकडून रिकन्सीलिएशन करुन घेतले जात नाही. समितीपुढे येण्याच्या आदल्या दिवशी अभिप्राय सादर केले जातात. त्यामुळे समिती सदस्यांना त्या अनुषंगाने अभ्यास करण्यास पुरेसा अवधी मिळत नाही. महालेखाकार कार्यालय आणि लोकलेखा समितीचे गांभीर्य सार्वजनिक बांधकाम विभागकडून लक्षात घेतले जात नाही. अशी नाराजी व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी याची गांभीर्याने नोंद घेतली असल्याचे सांगितले.

अभिप्राय शिफारशी

४.६८ माहे ऑक्टोबर, २००३ ते नोव्हेंबर, २००७ या कालावधीत अधिक्षक अभियंता, ठाणे मंडळ आणि सागरी अभियंता, मुंबई यांनी मंडळ विभाग आणि उप विभागाच्या कार्यालयाच्या अतिरिक्त बाबी आणि बदल तसेच विश्रामगृहाच्या नुतनीकरणाच्या कामांच्या

अंमलबजावणीसाठी प्राधिकृत केले होते. असे प्राधिकृत करताना रु.१.५५ कोटी इतकी मूळ कामांसाठी (केळशी क्रकवरील बंदर महामार्गावरील मुख्य पुलाचे बांधकाम, तळवळी परचुरे रस्त्यावरील फरारे खाडी पुल, बोर्डी, डहाणू-ठाणे रस्त्याच्या पोच रस्त्याचे बांधकाम, पडघा खडवली रस्त्यावरील पुलाचे बांधकाम, खोनी खडीपार रस्त्यावरील पुलाचे बांधकाम, बॅटरी बंदर येथे रिटेनींग भिंतीचे बांधकाम, वरसोली येथे ग्रोयान्स या प्रकारातील बंधाऱ्याचे बांधकाम, नरीमन पॉईंट येथील भाग आणि समुद्र भिंतीचे मजबूतीकरण) असलेली आकस्मिक कामाची तरतूद संपूर्णपणे असंबंधित कामांसाठी नियम पुस्तिकेतील तरतुदींचे उल्लंघन करुन वळविण्यासाठी परवानगी दिली होती.

४.६९ अर्थसंकल्पीय नियमानुसार या कामासाठी तरतुद करण्यात आलेली आहे व ज्यास विधीमंडळाची मान्यता मिळालेली आहे त्या कामाकरिता केलेली तरतुद विधीमंडळाच्या मान्यतेशिवाय इतरत्र वापरता येत नाही. तथापि, मुख्य कामाच्या अनुषंगाने खर्च होत असेल तर सदर रक्कम वापरता येते. परंतु, **प्रस्तुत प्रकरणी पुलाच्या बांधकामाकरिता व धूपप्रतिबंधक बंदरांसाठी रु.१.५५ कोटी एवढी तरतुद केली असताना सदरहू रक्कम कार्यालयाच्या व विश्रामगृहाच्या नुतनीकरणासाठी वापरणे हे अत्यंत गैर असून ते वित्तीय नियमांचा भंग करणारे आहे त्यामुळे यापुढील काळात अंदाजपत्रकात तरतुद न केलेल्या व ज्या कामाला विधानमंडळाने मंजूरी दिली नाही त्या कामांवर खर्च करण्यास अनुमती देऊ नये अशी समिती शासनास शिफारस करीत आहे व विधीमंडळाच्या निदर्शनास बाब न आणता खर्च करण्यात आला आहे अशी प्रकरणे उद्‌भवल्यास संबंधितांवर कडक शिस्तभंगाची कारवाई करावी अशी देखील समिती शासनास शिफारस करीत आहे.**

४.७० डहाणू नगरपरिषद येथील न्यायालयाची इमारत बांधण्याकरिता सन २००२ मध्ये ११.७० मी उंचीच्या इमारतीची परवानगी मागितली होती. दिनांक ४/६/२००२ रोजी त्याकरिता अर्ज करण्यात आला होता. मात्र त्याबाबत सन २००५ पर्यंत काहीच कार्यवाही केली नाही. नंतर सन २००५ च्या बैठकीत असे लक्षात आले होते की, ९ मी.पेक्षा अधिक उंचीची इमारत बांधता येणार नसल्याने शासकीय चीफ आर्कीटेक्टने पुन्हा नवीन प्लान तयार करुन सादर केला होता.

४.७१ मुख्य वास्तुशास्त्रज्ञाच्या चुकीच्या नियोजनामुळे अधिक रक्कम खर्च झालेली आहे. कारण सुरुवातीला वास्तुशास्त्रज्ञाने ११.७० मी उंचीचा नकाशा तयार केला होता. यामुळे बांधकामास परवानगी मिळण्यास उशीर झाला. वास्तुशास्त्रज्ञाने कोणताही अभ्यास न करता नकाशा तयार केला आहे या प्रकरणामध्ये वास्तुशास्त्रज्ञ दोषी आहे, असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

४.७२ साधारणपणे कामाचे परिक्षण केले जात असते. वास्तुशास्त्रज्ञाने त्याच्या कामामध्ये दिरंगाई व चूक केलेली आहे. सन २००४-०६ मध्ये इलेक्ट्रीक लाईन शिफ्ट झाली नाही हा प्रश्न दोन विभागाच्या समन्वयाचा आहे. २ वर्षामध्ये इलेक्ट्रीक लाईन शिफ्ट होत नाही यामुळे काम ठप्प झाले होते परिणामी तेथील कंत्राटदाराने वैतागून काम सोडले. या नंतर नवीन कंत्राटदाराला नियुक्त केले यामध्ये शासनाचा निधी वाया गेला. त्यामुळे **या प्रकरणामध्ये वास्तुशास्त्रज्ञ व इतर संबंधित अधिकारी व ठेकेदार जे दोषी आहे त्यांची चौकशी करुन चौकशी दोषी आढळून आल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

४.७३ कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा यांनी (सप्टेंबर १९९७) कर्मचाऱ्यांच्या सदनिका बांधण्याचे काम एका कंत्राटदाराला रू. ६३.४४ लाख या अंदाजित किंमतीच्या १५.७५ टक्के जास्त याप्रमाणे १५ महिन्यात पूर्ण करण्यासाठी दिले. पुरेशा निधीच्या अनुपलब्धतेमूळे काम ऑक्टोबर १९९९ मध्येच सुरु होऊ शकले आणि त्यामुळे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांनी (सप्टेंबर २०००) कामाला डिसेंबर २००१ पर्यंत मुदतवाढ दिली होती.

४.७४ कार्यकारी अभियंता, भंडारा यांच्या अभिलेखांच्या छाननीत (मार्च -२००८) असे उघडकीस आले की, कंत्राटदाराने रु. ७७.४८ लाख किंमतीचे काम झाल्यानंतर (विद्युतीकरण, नळकाम आणि सॅनिटेशनची कामे सोडून) काम पूर्ण केले. कार्यकारी अभियंता भंडारा यांनी कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग (सार्वजनिक बांधकाम) नागपूर यांना अंतर्गत विद्युतीकरणासाठी रु. ४.५० लाख आणि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना नवीन जोडणी भार म्हणून रु. १.५४ लाख अनुक्रमे नोव्हेंबर २००३ आणि मार्च २००४ मध्ये प्रदान केले तथापि, मार्च, २००८ पर्यंत विद्युतीकरण काम पुर्ण झाले नाही. वेळेवर काम पूर्ण होण्याच्या सनियंत्रण

करण्यातील कार्यकारी अभियंता यांच्या अपयशाचा परिणाम रु. ८३.५२ लाखाचा व्यर्थ खर्च झाला. शिवाय लोकांना घरे न मिळणे, त्यांची गैरसोय होणे या गोष्टी सुध्दा त्यामध्ये येतात. या खेरिज घरभाडे भत्ता आणि अनुज्ञप्ति शुल्क यासाठी शासनाला भुर्दंड सोसावा लागला. इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतरही इलेक्ट्रीक व प्लंबिगच्या कामासाठी १० वर्षे थांबावे लागले याबद्दल समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली. **शासनाला सोसाव्या लागणाऱ्या भूर्दंडास जबाबदार असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत सिव्हील, इलेक्ट्रीक व प्लंबिग या विभागाच्या ज्या अधिकाऱ्यांनी वेळेत काम पूर्ण केले नाही, अशा अधिकाऱ्यांची तातडीने चौकशी करण्यात यावी व चौकशीत दोषी आढळून आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

४.७५ कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, निलंगा यांनी केंद्रीय मार्ग निधी (सी.आर.एफ.) अंतर्गत शिरुर-अनंतपाल-शेकापूर मार्गाच्या रुदीकरणाचे काम कंत्राटदाराला दिले (डिसेंबर, २००६). कंत्राटाच्या शर्तीनुसार कुठल्याही नामांकीत शासकीय तेल कंपनीकडून प्राप्त करुन त्यांच्या स्वतःच्या जोखीमेवर आणि स्वखर्चाने आणावयाचे होते, आणि कंत्राटदाराला, कामाच्या जागी आणलेल्या साहित्य खरेदीची देयक, जकातीची पावती इ. पुरेसा लेखी पुरावा विभागाने विनंती केल्यास तत्परतेने सादर करावयाचा होता. या कामावर १९३ मेट्रीक टन डांबर वापरले गेले होते. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड यांचेकडून खरेदी केलेल्या रु. २७.०८ लाख किंमतीच्या १२१.२३ मेट्रीक टन डांबराच्या आठ बीजकांच्या झेरॉक्स प्रती चालू लेखा देयकाला जोडलेल्या होत्या. त्यापैकी काही बीजकांवर एकच बटवडा क्रमांक पण वेगवेगळ्या तारखांना होता. उलट पडताळणी केली असताना भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड यांनी (फेब्रुवारी २००८) या बीजकांपैकी एकही बीजक त्यांनी तयार / निर्गमित केले नव्हते आणि बीजकांमधील तपशील बनावट होता.

४.७६ रस्त्याच्या कामासाठी वापरण्यात आलेले डांबर हे कंपन्याकडून तपासून घेतले. चारपैकी तीन कामे बरोबर असल्याचे कंपनीने कळविले आहे. एका कामामध्ये बनावट दस्तऐवज केलेला आहे. कंत्राटदाराने डांबराची ग्रेड ८०/१०० वापरली परंतु चलन सादर करताना ६०/७० ची ग्रेड वापरल्याचे नमूद केले होते. ही बाब निदर्शनास आल्यानंतर

कंत्राटदाराकडून १२ लाख ३३ हजार ९३८ इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. कंत्राटदाराकडून एकूण २६ लाख रुपये वसूल केलेले आहेत. दोषी कंत्राटदारांवर कोणकोणती कारवाई करावी याबाबत शासनाचे परिपत्रक आहे. पहिला गैरप्रकार आढळून आल्यास त्याप्रमाणे गोपनीय अहवालात नोंद घ्यावी. त्याप्रमाणे संबंधित कंत्राटदाराची गोपनीय अहवालात नोंद घेतलेली आहे. असे असले तरी गुन्ह्याचे स्वरुप लक्षात घेऊन त्याप्रमाणे कारवाई केली पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले.

४.७७ अधिकाऱ्यांनी कामांची वेळोवेळी पाहणी केल्यास अशा प्रकारचे प्रसंग घडणार नाहीत. अधिकाऱ्यांनी चुकीचे काम होत आहे हे वेळीच निदर्शनास आणून दिले तर कामांमध्ये असे गैरप्रकार होणार नाहीत. चार कामांपैकी एका कामामध्ये दोषी आढळून आला म्हणून त्यास सौम्य शिक्षा करण्याचे काही कारण नाही. जे कंत्राटदार कामामध्ये गैरव्यवहार करतात त्यांच्यावर कडक कारवाई केली पाहिजे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मॅन्युअलमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. कामामध्ये गैरप्रकार करणाऱ्या कंत्राटदारावर फक्त दंडात्मक कारवाई करुन चालणार नाही तर त्यास काळ्या यादीत टाकले पाहिजे. मॅन्युअलमध्ये ज्या शिक्षा सुचविलेल्या आहेत त्याबाबत पुनर्विचार करावा. गैरप्रवृत्तींना आळा बसेल अशाप्रकारचे बदल मॅन्युअलमध्ये करावेत अशी समिती शिफारस करीत आहे.

महसूल व वन (वन)

"अंगठयाचे ठसे बनावट करून रू.०.३० लाखांचे लबाडीचे प्रदान"

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालाची छाननी करताना परिच्छेद क्र. ४.१.५ ""अंगठयाचे ठसे बनावट करून रू.०.३० लाखांचे लबाडीचे प्रदान" या संदर्भात महालेखाकारांनी आपल्या अहवालात पूढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

वनातील विविध कामे करण्यासाठी लावलेल्या कामगारांना दिलेले वेतन त्यांनी स्वाक्षरी करून किंवा अंगठयाचे ठसे देऊन अभिस्वीकृत करावयाचे असते.

नऊ वनविभागांच्या (१) उपसंचालक, सामाजिक वनीकरण, रायगड (२) उपसंचालक, पूर्व नाशिक (३) उप वनसंरक्षक, बुलढाणा (४) उप वनसंरक्षक, पश्चिम नाशिक (५) उपविभागीय वन अधिकारी, बीड (६) उपवनसंरक्षक, अहमदनगर (७) उपवनसंरक्षक, जुन्नर (८) उपवनसंरक्षक, शहापूर (९) उपवनसंरक्षक, नांदेड मार्च, जून व जुलै, २००७ महिन्याच्या हजेरीपटांच्या केंन्द्रीय लेखापरिक्षेतील छाननीत (ऑक्टोंबर, २००७) असे उघडकीस आले की, कामगारांचे अंगठयाचे ठसे एकाच व्यक्तिचे वाटत होते. अशा प्रकारे कामगारांना रू.४.१३ लाख रूपयांचे केलेले प्रदान संशयास्पद होते. त्यामुळे ही बाब उपसंचालक, अंगुली मुद्रा केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना कळविण्यात आली. (मे, २००८) दोन विभागाच्या (बुलढाणा व पश्चिम नाशिक) संबंधात त्यांनी पुष्टी केली की हजेरीपटातील अंगठयाचे ठसे जरी नांवे वेगळी असली तरी एकाच व्यक्तिचे आहेत. उर्वरित सात विभागासंबंधात अहवाल प्रतिक्षित आहे. या प्रकारे हजेरीपटातील अंगठयाचे ठसे बनावट करण्याचा परिणाम रू.०.३० लाखाचे लबाडीचे प्रदान करण्यात झाला.

ही बाब शासनाच्या सचिवांना जुलै, २००८ मध्ये कळविण्यात आली होती. उत्तर आले नाही. (ऑगस्ट २००८)

ज्ञापन :-

५.१ महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल व वन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद केले आहे की,

महालेखापाल (लेखापरीक्षा-II) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडून सदर परीच्छेद प्राप्त झाल्यानंतर प्रस्तूत प्रकरणात संबंधीत मुख्य वनसंरक्षक व संचालक, सामाजीक वनीकरण संचालनालय, पुणे यांना याप्रकरणी तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालयाने परिच्छेदाशी संबंधीत प्रमाणकांच्या प्रती व उपसंचालक, अंगुली मुद्रा केंद्र यांचे अहवाल मिळण्याबाबत महालेखापाल यांचेकडे पाठपुरावा केला. त्यानंतर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र दिनांक ११/८/२००९, १६/९/२००९, २७/११/२००९ आणि दि.१६/७/२०१० अन्वये संबंधित मुख्य वनसंरक्षक व संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे् यांना प्रस्तुत प्रकरणी तात्काळ कार्यवाही करणेबाबत व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर दोषारोप पत्र बजावून विभागीय चौकशी सुरू करणे तसेच जेथे आवश्यक वाटते तेथे संबंधित कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आले. तसेच संबंधित काम ज्यांचेबद्दल मजूरी अदा केल्याचे दाखविण्यात आले ती कामे पूर्ण झाली किंवा कसे, याबाबत देखील चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत सूचना देण्यात आल्या. याअनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नाशिक, पुणे, अमरावती, औरंगाबाद, व ठाणे यांचेकडून ८ प्रादेशिक विभागाकरीता, म्हणजे पुर्व नाशिक, पश्चिम नाशिक, अहमदनगर, जुन्नर, बुलढाणा, बीड, नांदेड व शहापूर यांचेबाबतचा अहवाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे प्राप्त झालेला आहे. या ८ वनविभागात याप्रकरणी १७ अधिकारी/कर्मचारी यांचे विरूद्ध गैरवर्तणूक केल्यामुळे विभागीय चौकशीची कारवाई सुरू करण्यात आली आहे. बीड उपवनविभागात एका कर्मचाऱ्यास निलंबित देखील करण्यात आले आहे. सदर विभागीय चौकशी सध्या सुरू आहे आणि त्या संदर्भात अंतिम अहवाल प्रतिक्षीत आहे.

संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय यांनी आपल्या अहवालात कळविले आहे की, रायगड सामाजिक वनीकरण विभागात झालेला गैरवर्तणुकीबाबत ६ अधिकारी व कर्मचारी यांचेविरूद्ध कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. महालेखाकार यांचेकडून रायगड सामाजिक वनीकरण विभागाकरीता त्यांचे पत्र दि.६/५/२०१० अन्वये प्रमाणके तसेच अंगुली मुद्रा केंद्र यांचा दि.३०/१२/२००९ चा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवाल प्रधान मुख्य

वनसंरक्षक, नागपूर यांनी संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय यांचेकडे कार्यवाहीकरिता पाठविला. परंतु उपअधिक्षक, अंगुली मुद्रा केंद्र यांचे दि.३०/१२/२००९ चे अहवालात नमुद करण्यात आलेल्या ८३ प्रमाणकाऐवजी केवळ ७४ प्रमाणके प्राप्त झाली आणि प्राप्त झालेल्या प्रमाणकांपैकी फक्त ३८ प्रमाणकांच्या संदर्भात अंगुली मुद्रा केंद्र यांचा अहवाल प्राप्त झाला आहे. शिस्तभंग विषयक कारवाईकरीता महालेखाकार यांचेकडून संपुर्ण अहवाल प्राप्त होणे आवश्यक असल्याने, संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना संपुर्ण अहवाल व उर्वरित प्रमाणके प्राप्त करून त्यांना देण्यात यावे, असे त्यांचे पत्र दि.२१/८/२०१० अन्वये विनंती केली आहे. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन) यांनी त्यांचे पत्र दि.५/१०/२०१० अन्वये महालेखाकार यांना रायगड, सामाजिक वनीकरण विभागाच्या संदर्भात उर्वरित प्रमाणके वा अंगुली मुद्रा केंद्र यांचा अहवाल पाठविणेबाबत विनंती केली आहे. उर्वरित प्रमाणके वा अंगुली मुद्रा केंद्र यांचा अहवाल प्रतिक्षीत आहे.

साक्ष :-

५.२ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक १३ जूलै, २०११ रोजी प्रधान सचिव, वन विभाग यांची साक्ष घेतली. त्यावेळी "अंगठयाचे ठसे बनावट करून रू.०.३० लाखांचे लबाडीचे प्रदान" या मुद्यासंदर्भात समितीने महालेखाकारांना थोडक्यात पार्श्वभूमि विशद करण्यास सांगितले असता महालेखाकारांनी समितीस सांगितले की, एकूण ९ डिव्हीजन्समध्ये ४०३ केसेस आयडेंटिफाय केल्या होत्या. लेखापरीक्षणाच्या परिभाषेत सीआयडीने जी चौकशी केली त्या चौकशीत २८४ केसेसमध्ये अंगठ्याचे ठसे एकाच व्यक्तीचे असल्याचे आढळून आले. याचा अर्थ इतर ठिकाणी देखील असे प्रकार सुरु असू शकतात असा रेड फ्लॅग महालेखाकारांनी लावला होता. त्यामुळे या संदर्भात विभागाने काय दक्षता घेतली याबाबत समितीला सांगावे असे महालेखाकारांनी विभागीय सचिवांना सांगितले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या विषयाची वन विभागाने गंभीरपणे दखल घेतली. फॉरेन्सिक विभागाकडून अहवाल आलेले नव्हते. प्रत्येक प्रकरणात पाठपुरावा करुन विभागाने अहवाल प्राप्त करुन घेतले. सर्व १७ कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु केली. चार जणांना अंतिम शिक्षा दिलेली आहे. महालेखाकार यांनी सांगितल्याप्रमाणे ही अतिशय गंभीर बाब

आहे. जेवढा खर्च झाला तेवढ्या रक्कमेचे काम पूर्ण झाले आहे. परंतु काम करण्याची पध्दत चुकीची होती. १७ लोक दाखवून ४ लोकांना पेमेंट देणे चुकीचे आहे या प्रकरणामध्ये अफरातफर झालेली नाही. प्रक्रिया चुकीची फॉलो केली आहे ती चूक आहे, परंतु काम तेवढ्या रक्कमेचे झालेले आहे. ते आजही तपासून (verify) करता येईल.

५.३ महालेखाकरांनी पुढे असे विचारले कि, अफरातफर झालेली नाही असे म्हणणे असेल तर एकाच व्यक्तीच्या अंगठ्याचे ठसे उमटवले गेले असतील आणि ॲथॉरिटी ते कन्फर्म करीत असेल तर ही अफरातफर असल्याचेच स्पष्ट होते. ऑक्टोबर, २००७ मध्ये लेखापरिक्षण केले होते तेव्हा लगेच विभागाने कारवाई करणे अपेक्षित होते. परंतु ऑक्टोबर, २०१० मध्ये उत्तर देण्यात आले. नुकताच २१ जून, २०११ रोजी रिप्लाय मिळाला. विभागाने लवकरात लवकर ॲक्शन घेणे गरजेचे होते. यावर २००७ च्या अहवालातील परिच्छेदावर २०१० मध्ये चौकशी अहवाल दिला ही बाब गंभीर आहे. यामध्ये विभागाची चूक निश्चितपणे दिसून येते. अधिक खोलात गेल्यानंतर असे दिसून आले की, अंतरिम परिच्छेद महालेखाकारांकडून प्राप्त झाला तेव्हा महालेखाकारांनी सुमोटो व्हाऊचर्स अंगुली मुद्रा केंद्राकडे (फिंगर प्रिंट ब्युरो) तपासणीसाठी पाठविली होती. व्हाऊचर्स मिळविण्याकरिता अंगुली मुद्रा केंद्राकड (फिंगर प्रिंट ब्युरो) पाठपुरावा करण्यात आला आणि व्हाऊचर्स प्राप्त झाल्यानंतर चार्ज फ्रेम केले गेले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

५.४ उदाहरण म्हणून एखादे प्रकरण निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने इतर ठिकाणी दक्षता घेण्यात आली आहे काय? कारण असे प्रकार सर्व विभागात सुरू असण्याची शक्यता आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागाच्या सचिवांनी खुलासा केला कि, अशा सर्व कामांची विभागाकडून सविस्तर चौकशी करण्यात येईल. रेड फ्लॅग असल्यामुळे ही घटना गंभीरतेने घेताना एका प्रकरणापेक्षा संपूर्ण विभागामध्ये याची तपासणी केली पाहिजे. क्रॉस डिव्हीजन इव्हॅल्यूएशनचा तो भाग आहे. अंगुली मुद्रा देऊन पेमेंट केले असेल तर ते मस्टर जेन्युईन असले पाहिजे,

५.६ समितीने पुढे अशी विचारणा केली कि, एकाच व्यक्तिच्या अंगठ्याचे ठसे घेण्यामागे हेतू काय होता? असे का करावेसे वाटले याबाबत खुलासा करताना विभागाच्या सचिवांनी प्रतिपादन केले की, प्रोसीजर व्यवस्थित फॉलो केली नाही. अधिकारी पेपर वर्क

करतात, त्यांना असे वाटते की लेबर कमी दाखविले तर आक्षेप घेतला जाईल. त्यापेक्षा हे सोपे होते की, १६ ऐवजी एकाच व्यक्तीचे नाव लिहून इतर १५ असे दाखविले असते तर त्या पद्धती मध्ये चूक झाली नसती. या प्रकरणी पध्दतीमध्ये चूक झाली आहे. १६ ठिकाणी एकाच व्यक्तीच्या अंगठ्याचे ठसे घेण्यात आले.

५.६ विभागाकडून चुकीच्या गोष्टी होत असल्याचा संशय असल्यामुळे महालेखाकारांनी रेड फ्लॅग दाखविला आहे असे असताना ही विभागाकडून याबाबत दक्षता घेण्यात येत नसल्यामुळे समितीने विभागाच्या कामकाजाबाबत नापसंती व्यक्त केली.

५.७ मोखाडा जिल्ह्यातील उदाहरण देताना समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले कि, मोखाडा येथील एका प्रकरणात २०० शपथपत्र सादर केली गेली. ज्यांना रक्कम अदा करण्यात आली त्यातील काही व्यक्ती प्राध्यापक आहेत, नोकरी करीत आहेत. वन विभागाने चुकीची पद्धत अवलंबविली म्हणून संबंधितांना क्लिन चीट देऊ नये. त्यात काही लोकांची मोडस ऑपरेंडी असते. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या ते लक्षात येत नाही. याबाबत या प्रकरणाची उदाहरणादाखल नोंद घेऊन विभागाकडून ज्या ज्या ठिकाणी रक्कम अदा झाली त्या सगळ्या प्रकरणांची चौकशी करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

५.८ असे प्रकार प्रत्येक स्तरावर सुरु आहेत. रेंजर, फॉरेस्टर योजनांची अंमलबजावणी व्यवस्थितपणे करीत नाहीत पेपरवर काम केल्याचे दाखवितात. महालेखाकारांकडे सीआयडीचा अहवाल आलेला आहे. ४०३ प्रकरणांची तपासणी केली असता त्यातील २८४ प्रकरणे फ्रॉड असल्याचे आढळून आले आहे? त्यामुळे फक्त चौकशी करून चालण्यासारखे नाही तर ज्यांनी चुका केल्या असतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी असे निर्देश समितीने विभागास दिले असता या सगळ्या प्रकरणात सविस्तर चौकशी केली जाईल आणि असे प्रकार पुन्हा होणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल. आता डिजिटल फोटो घेऊन मजुरांना आयकार्ड दिले जाते. वन विभागाकडून पेमेंट करावयाचे असल्यास फोटो ओळखपत्र पाहून पेमेंट करण्याची सूचना दिलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

५.९ यासंदर्भात महालेखाकार यांनी सूचित केले की, महालेखाकार कार्यालयास करप्ट प्रैक्टिस को रोकने के लिए. दिनांक ४ मई को संबंधित विभाग को पत्र द्वारा सजेशन दिया था परन्तु उसका रिप्लाय अभी तक नहीं आया है. महालेखाकारजी का यह कहना है कि जो पेमेंट है वह बैंक या पोस्ट ऑफिस के माध्यम से होना चाहिए. अभी महालेखाकारजी ने सभी संबंधित अधिकारियों को निर्देश दिये हैं कि सरपंच के सामने इस तरह का पेमेंट होना चाहिए. सरपंच संबंधित व्यक्ति को आयडेंटीफाई कर सकते हैं. यासंदर्भात विभागीय सचिवांनी असे आश्वासन दिले की, अभी विभाग नरेगा स्कीम का सिस्टम फॉलो करेंगे. नरेगा स्कीम में आय कार्ड दिया जाता है. इसमें ट्रांसपेरेंसी है और फ्रॉड करने का कोई स्कोप भी नहीं है. इसके साथ ही महालेखाकार कार्यालय ने जो पत्र दिया है उसके आधार पर भी विभाग आगे की प्लानिंग करेंगे. अगर, इस तरह का सिस्टम विभाग फॉलो करेगा तो आगे ऐसा फ्रॉड नहीं होगा असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारशी :-

५.१० वन विभागातर्फे विविध कामे करण्यासाठी ठेवण्यात आलेल्या कामगारांना त्यांचे वेतन त्यांनी स्वाक्षरी करुन किंवा अंगठ्याचे ठसे देऊन अभिस्वीकृत करावयाचे असते. १) उपसंचालक, सामाजिक वनीकरण, रायगड, २) उपवनसंरक्षक, पूर्व नाशिक, ३) उपवनसंरक्षक, बुलढाणा, ४) उपवनसंरक्षक, पश्चिम नाशिक, ५) उपविभागीय वनअधिकारी, बीड, ६) उपवनसरंक्षक, अहमदनगर, ७) उपवनसंरक्षक, जुन्नर, ८) उपवनसंरक्षक, शहापूर, ९) उपवनसंरक्षक, नांदेड या नऊ वन विभागांच्या माहे मार्च, जून व जुलै, २००७ या महिन्यांच्या हजेरीपटांच्या माहे ऑक्टोबर, २००७ मध्ये घेतलेल्या केंद्रीय लेखापरिक्षेतील छाननीत कामगारांच्या अंगठ्यांचे ठसे एकाच व्यक्तीचे वाटत असल्याने रु.४.१३ लाख रुपयांचे प्रदान संशयास्पद होते. उपसंचालक, अंगुली मुद्रा केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग, नागपूर यांनी बुलढाणा व पश्चिम नाशिक या विभागाच्या हजेरीपटातील अंगठ्याचे ठसे जरी नावे वेगळी असली तरी, एकाच व्यक्तीचे आहे अशी पुष्टी दिली होती. त्यामुळे रु.०.३० लक्ष एवढे लबाडीचे प्रदान असा आक्षेप महालेखापालांनी घेतला होता.

५.११ विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये नऊ विभागांमधील ४०३ प्रकरणे निदर्शनास आली होती. यासंदर्भात सीआयडी चौकशी करुन २८४ प्रकरणांमध्ये अंगठ्याचे ठसे एकाच व्यक्तीचे आढळून आले. त्यामुळे इतर ठिकाणी देखील असे प्रकार घडत असण्याची शक्यता महालेखापालांनी व्यक्त केली होती. याप्रकरणी विभागांने १७ कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरु केली व ४ जणांना शिक्षा दिलेली आहे अशी समितीस माहिती मिळाली. **महालेखापालांनी सदरहू बाब ही माहे ऑक्टोबर, २००७ मध्ये उघडकीस आणलेली असून देखील या प्रकरणावर सन २०१० मध्ये चौकशी अहवाल दिला आहे व माहे जून, २०११ मध्ये महालेखापालांना विभागाने केलेल्या कारवाईचे उत्तर प्राप्त झालेले आहे. रकमेच्या अफरातफरीचे प्रकरण असताना विभागाने लेखापरिक्षणामध्ये बाब निदर्शनास आल्यावर संबंधित कर्मचाऱ्यांची त्वरित चौकशी करुन त्यांचेविरुद्ध कारवाई करणे आवश्यक होते. परंतु, या प्रकरणामध्ये तसे घडलेले दिसत नाही. विभागाने साक्षीमध्ये माहिती देताना देखिल ४ जणांना शिक्षा केल्याचे म्हटले होते. परंतु, त्यांच्या शिक्षेचे स्वरुप काय याबाबत माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे दोषी आढळलेल्या ४ कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली याबाबतची माहिती समितीस त्वरित देण्यात यावी तसेच ज्या १७ कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरु आहे. त्याची सद्य:स्थिती काय आहे व विभागीय चौकशी तीन महिन्यात पूर्ण करुन त्याबाबतची माहिती समितीस देण्यात यावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे. कामगारांच्या परिश्रमाचे योग्य वेतन त्यांना विहित कालावधीमध्ये आणि पूर्णपणे मिळण्याच्यादृष्टीने व या पुढील काळात अंगठ्याचे ठसे बनावट करुन हक्कदार असलेल्या व्यक्तीचे वेतन लुबाडण्याचे प्रकार होणार नाहीत त्यादृष्टीने विभागाने योग्य ती दक्षता घ्यावी अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामावरील टाळता येण्याजोगा बोझा.

६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.४.३.३ "रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामावरील टाळता येण्याजोगा खर्च" या परिच्छेदासंदर्भात महालेखाकारांनी पुढील प्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

५०० बिस्तर असलेल्या रुग्णालय इमारतीच्या बांधकामाकरिता पुरेसा निधी न पुरविला गेल्यामुळे तिच्या बांधकामास बेसुमार विलंब झाला आणि टाळता येण्याजोगा रु.५.३६ कोटी इतक्या खर्चाचा बोझा पडला.

धुळे, जळगांव, नंदूरबार आणि नाशिक जिल्ह्यातील आदिवासी आणि गरीब रुग्णांना वैद्यकीय सुविधा पुरविण्याच्या दृष्टिने भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे एक ५०० बिस्तर असलेल्या रुग्णालय इमारतीच्या बांधकामास आणि महाविद्यालयाची क्षमता ५० पासून १०० पर्यंत वाढविण्यासाठी सुध्दा शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने प्रशासकीय मान्यता दिली होती (जानेवारी १९९८). मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम नाशिक प्रदेश यांच्याकडून सदर कामास तांत्रिक मंजूरी मिळाली होती (नोव्हेंबर २००८) आणि ते काम अधिक्षक अभियंत्यांकडून रु.१०.३२ कोटी इतक्या निविदा खर्चासह नोव्हेंबर २००५ पर्यंत पूर्ण करण्याकरता एका कंत्राटदारास देण्यात आले होते. (मे, २००२)

अधिष्ठाता, भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अभिलेख्यांच्या तपासणीतून आणि पाठोपाठ गोळा केलेल्या माहितीतून असे आढळून आले की, सदर काम एप्रिल ते सप्टेंबर २००४ आणि पुन्हा मे २००५ पासून पुढे निधीच्या अभावी थांबविण्यात आले होते. मुख्य अभियंत्याने सदर काम निविदा अटीच्या १५ व्या कलमानुसार कंत्राटदार आजारी पडला होता आणि ह्या कामापासून मुक्त करण्याविषयी त्याने विनंती केली होती म्हणून त्यांच्याकडून काढून घेतले होते. (मे २००६) तोपर्यंत त्या कंत्राटदाराने रु.१.१९ कोटी इतक्या खर्चाचे काम केले होते. २००६-०७ मध्ये निधीची उपलब्धता झाल्यावर अधिष्ठाता यांनी कार्यकारी अभियंता विभाग यांना सदर काम दोन २५० बिस्तर भागांमध्ये विभागून संपूर्ण रुग्णालय इमारतीऐवजी अगोदरच बांधकामात असलेल्या २५० बिस्तरच्या एका भागाचे बांधकाम

निधी मिळण्यातील आश्वाशतेमुळे हाती घेण्याविषयी विनंती केली होती (एप्रिल २००६). मुख्य अभियंत्यांनी रुग्णालय इमारतीचे २५० बिस्तरची एक शाखा अशा दोन भागांमध्ये विभागणी करण्यास मान्यता दिली होती (ऑगस्ट २००६). रुग्णालय इमारतीच्या एका २५० बिस्तर शाखेचे बांधकाम (विभाग-१) रु.६.६० कोटी इतक्या निविदा खर्चासह (रु.५.७९ कोटी इतक्या अंदाजित खर्चापेक्षा १४% जास्त) नोव्हेंबर, २००८ पर्यंत पूर्ण करण्याच्या अटीवर दुसऱ्या कंत्राटदारास दिले होते. २५० बिस्तर असलेल्या रुग्णालय इमारतीच्या दुसऱ्या विभागाचे बांधकाम (विभाग-२) रु.१०.०८ इतक्या निविदा खर्चासह (रु.६.३३ कोटी अंदाजित खर्चापेक्षा ५९.२२% जास्त) जून, २००९ पर्यंत पूर्ण करण्याच्या अटीवर तिसऱ्या कंत्राटदारास देण्यात आले होते. दोन्ही कामे प्रगतीपथावर होती (जून २००८).

ह्याप्रमाणे, ५०० बिस्तरांची सोय असलेल्या रुग्णालय इमारतीच्या बांधकामाकरिता पुरेसा निधी वेळेत पुरविण्याच्या शासनाच्या असमर्थतेमुळे सदर बांधकामास ५ वर्षापेक्षाही जादा काळाकरिता बेसुमार विलंब झाला होता आणि शिवाय खर्चातील वाढीमुळे रु.६.३६ कोटी इतक्या टाळता येण्याजोगा खर्चाचा बोझा सहन करावा लागला होता. शिवाय महाविद्यालयाची क्षमता वाढविता येणे शक्य झाले नव्हते आणि रुग्णालयापासून मिळणाऱ्या फायद्यापासून रुग्ण वंचित राहिले होते.

वरील वास्तव मान्य करुन अधिष्ठातांनी असे म्हटले की, (डिसेंबर २००७) हाती असलेली कामे दोन वर्षात पूर्ण होतील.

महालेखापरीक्षकांच्या वरील अभिप्रायाबाबत विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला आहे.

शा.नि.क्र.सीआएन-१४९४/१२७५/प्र.क्र.९२/प्रशा-१, दिनांक ०३.०१.१९९८ अन्वये श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे या संस्थेतील इमारतीच्या बांधकामासाठी एकूण रु.३०,३७,८५,४९७/- एवढी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये ५०० खाटांच्या रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम याचा खर्च रु.११,४४,२०,७२१/- अंतर्भूत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामाकाजाचे दोन भागांत वर्गीकरण करुन २५० खाटांचे रुग्णालयीन इमारत पहिल्या इमारतीचे बांधकाम सन २००१-०२ मध्ये रु.५७९ लाखांची निविदा प्रसिध्द करुन सुरु करण्यात आले आहे. सन १९९९-२००० ते सन २००७-०८ या कालावधीमध्ये

देण्यात आलेली निधी व खर्च हा खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे. सदर बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करतेवेळी सन १९९७-९८ ची दरसूची वापरण्यात आली होती, परंतु दरवर्षी दरसूचीच्या दरामध्ये वाढ झाल्यामुळे मूळ अंदाजित रक्कमेमध्ये वाढ झालेली आहे.

२५० खाटांच्या दुसऱ्या इमारतीच्या बांधकामासाठी सन २००५-०६ मध्ये एकूण रु.६३३ लाख एवढ्या रक्कमेची निविदा प्रसिध्द करुन बांधकाम विभागाकडून कामकाज सुरु करण्यात आले.

पहिल्या २५० खाटांच्या इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून लवकरच इमारत संस्थेस हस्तांतरीत होणे अपेक्षित आहे. तसेच दुसऱ्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन एक वर्षामध्ये संस्थेस हस्तांतरीत होणे अपेक्षित आहे. दोन्ही इमारतीच्या बांधकामावर आज रोजी रु.२५,७५,१०,०००/- खर्च झालेला आहे. सदर बांधकामाच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक होते. परंतु आजतागायत प्रस्ताव सादर न केल्यामुळे सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. सुधारीत प्रशासकीय मान्यता निर्गमित करुन लवकरच इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यामुळे परिच्छेद निकाली काढण्यात यावा, ही विनंती.

दोन्ही इमारतीवरील झालेला वर्षनिहाय खर्च.

(रु.लाखात)

अ.क्र.	**वर्ष**	**प्राप्त अनुदान**	**खर्च**
१.	१९९९-२०००	१२५.०२	१२५.०२
२.	२०००-२००१	८१.९६	८१.९६
३.	२००१-२००२	४६.२३	४६.२३
४.	२००२-२००३	२१.३०	२१.३०
५.	२००३-२००४	११७.७९	११७.७९
६.	२००४-२००५	३.१५	३.१५
७.	२००५-२००६	२३७.५१	२३७.५१
८.	२००६-२००७	४८.७०	४८.७०
९.	२००७-२००८	४८८.७०	४८८.७०

साक्ष:

६.२ उपरोक्त परिच्छेदांसदर्भात दिनांक १ जून, २०११ रोजी सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील संदर्भ परिच्छेद क्रमांक ४.३.३ "रुग्णालय इमारतींच्या बांधकामावरील टाळता येण्याजोगा बोजा" याबाबत माहिती प्राप्त झालेली आहे. परंतु सदरहू माहिती महालेखाकार यांचेकडून तपासून घेतलेली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

६.३ जर परिच्छेदासंदर्भातील माहिती तपासून (Vetting) झालेली नसेल तर ही बाब प्रलंबित असल्याचा कालावधी किती आहे व सदरहू परिच्छेदांबाबत महालेखाकार यांचेकडून रिकन्सिलिएशन (खर्चमेळ) करण्यात आलेले नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत खुलासा करतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू परिच्छेद धुळे येथील रुग्णालयाच्या संदर्भातील आहे. यासंबंधातील जी काही वस्तुस्थिती आहे, ती दिनांक १२-०५-२०१० रोजी महालेखाकार यांच्याकडे कळविण्यात आली होती. बांधकामाला प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर पुढील वेगवेगळया वर्षामध्ये त्या प्रमाणात निधी उपलब्ध न झाल्यामुळे सदरहू रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम रेंगाळले होते. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागाला प्रत्येक वर्षी किती निधी उपलब्ध होतो, त्यातून सदरहू बांधकामासाठी किती निधी मिळतो आणि त्यापैकी धुळे येथील रुग्णालयाच्या कामासाठी किती निधी दिला होता याबाबतची वस्तुस्थिती गेल्या वर्षीच कळविण्यात आली होती.

६.४ विभागीय प्रतिनिधींनी आताच सांगितल्याप्रमाणे सदरहू परिच्छेदांची माहिती महालेखाकार यांना दिनांक १५/५/२०१० रोजी पाठविण्यात आली आहे. जर विभागाकडून महालेखाकार यांच्या कार्यालयाला माहिती कळविण्यात आली असेल तर त्याची आपल्याकडे पोचपावती किंवा कार्यालयीन प्रत (Office copy) आहे काय ? कारण महालेखाकार यांचे असे म्हणणे आहे की, सदरहू माहिती त्यांना मिळालेली नाही. याबाबत त्यासंबंधातील पोचपावती किंवा कार्यालयीन प्रत (Office copy) नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले. यावर विभागाने महालेखाकार यांच्या कार्यालयाला माहिती पाठविल्याबाबतची पोचपावती किंवा कार्यालयीन प्रत मागवून आता समितीसमोर सादर करावी असे निदेश समितीने विभागास दिले.

६.५ सदर परिच्छेदासंदर्भात महालेखाकार कार्यालयाने स्मरणपत्रे पाठवूनही त्यांच्या कार्यालयास वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून परिच्छेद प्रमाणित (Vetting) करण्यासाठी कोणतीही माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. विधीमंडळ कार्यालयानेही या विषयाच्या अनुषंगाने ६ वेळा स्मरणपत्रे पाठवूनही विभागाकडून कोणतीही दखल घेतली गेली नाही. आर्थिक बाबींमध्ये जी अनियमितता झालेली आहे त्याबाबत महालेखाकार कार्यालयाकडून मुद्दे तयार केले जातात व त्याबाबत लोकलेखा समिती तपासणी करीत असते. समितीसमोर विभागीय सचिव ज्यावेळी साक्षीसाठी येतात तेव्हा त्यांनी त्या त्या विषयाशी संबंधीत सर्व कागदपत्रे बरोबर आणावयास पाहिजेत परंतु विभागीय सचिव बैठक सुरू झाल्यानंतर मंत्रालयातून कागदपत्रे आणावयास सांगत आहेत यावरून विभागीय सचिव लोकलेखा समितीचे कामकाज गंभीरपणे घेत नाही असे दिसते असे मत व्यक्त करून समितीने विभागाच्या कामकाजाबाबत असमाधान व्यक्त केले.

६.६ मागील दोन-तीन वर्षाच्या बाबतीत ऑफीशिअली किंवा अन्-ऑफीशिअली विभाग आणि महालेखाकार कार्यालयाने एक सेल निर्माण करुन जे मुद्दे आहेत, त्याचे रिकन्सीलिएशन करुन समितीला माहिती देणे गरजेचे आहे. ही समिती संसदीय स्वरुपाचे कायदेशीर काम करीत आहे. अशा वेळी जर विभागाकडून दुर्लक्ष होत असेल तर ते बरोबर नाही. ही प्रकरणे किती वर्षे सुरु आहेत. समिती कोणावर ही व्यक्तिगतरित्या जबाबदारी टाकणार नाही पण शेवटी अल्टीमेटली ही जबाबदारी विभागाकडे येते. समितीने विभागाकडे सहा पत्रे पाठविलेली आहेत आणि त्याचा विभागातील इन्वर्ड बुकमध्ये उल्लेख असावयास पाहिजे. मात्र विभागाकडे जी पत्रे येतात त्याची इन्वर्ड बुकमध्ये नोंद होते काय ?जर तसे होत असेल तर ते सुध्दा समितीसमोर सादर करावे. तसेच विधान मंडळाकडून जी पत्रे पाठविण्यात आली होती, ती कोणकोणत्या अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली आहेत? सदरहू पत्रे कार्यालयातच पडून राहिली आहेत काय?त्यावर चर्चा का केली नाही ?याला कोण जबाबदार आहे ?याला जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कोणती ॲक्शन घेण्यात येणार आहे?याची माहिती द्यावी नाहीतर जी काही कारवाई कारावयाची असेल ती समिती करील.असाही निर्णय समितीने घेतला.

६.७ लोकलेखा समितीने पाठविलेल्या लेखापरिच्छेदाबाबत मंत्रालयीन विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सन २००९ मध्ये माननीय मुख्य सचिवांनी एक परिपत्रक निर्गमित केले असून सविस्तर सूचना विभागांना दिलेल्या आहेत. यासंदर्भातील कार्यवाहीसाठी कक्ष अधिकारी, उप सचिव आणि सचिव यांनी किती कालावधी घ्यावा, याबाबत सविस्तर सूचना या परिपत्रकात दिलेल्या आहेत. ही सर्व कार्यवाही झाल्यानंतर महालेखापालांना किती दिवसात खुलासा सादर करावा, वगैरे बाबींचा एक चार्ट त्यामध्ये नमूद केलेला आहे. त्यानंतर सदर परिपत्रक दोन वेळा रिपिट करण्यात आले आहे. तसेच लोकलेखा समितीच्या परिच्छेदांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या मार्गदर्शक सूचना वित्त विभागानेही काढलेल्या आहेत व त्याबाबत मुख्य सचिव, प्रधान सचिव, संबंधित विभागांचे सचिव, महालेखाकार यांचे प्रतिनिधी, सह संचालक, लेखा व कोषागारे, संबंधित विभागांचे उप सचिव, अवर सचिव, विधानमंडळातील लोकलेखा समितीचे कामकाज हाताळणारे उप सचिव, अवर सचिव यांचा समावेश असलेली एक समिती देखील नियुक्त केलेली आहे. या समितीसमोर दर ३ महिन्यांनी प्रलंबित परिच्छेदांबाबत आढावा घेण्यासंबंधीची तरतूद परिपत्रकात करण्यात आलेली आहे. सदरचे परिपत्रक दिनांक ११ मे, २०११ रोजी निर्गमित करण्यात आले असून या परिपत्रकास दिनांक १०-१२-१९८५, दिनांक २१ एप्रिल, १९९२ या तारखांना निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांचा संदर्भ घेतला आहे, असे समितीने सांगितले असता लोकलेखा समितीच्या परिच्छेदाबाबत आढावा घेण्यासाठी एक वेगळा सेल विभागांतर्गत सुरु करण्यात आला असून प्रोसिजर पूर्ण करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ज्या विषयाच्या संदर्भात लेखापरिच्छेद आहे, त्याबाबत इंटेन्सिव्ह ॲक्शन सुरु केली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

६.८ या समितीमध्ये यापूर्वी आणखी एका विषयाबाबत चर्चा झाली होती व तो विषयही वैद्यकीय शिक्षण विभागाशी संबंधित होता. एमबीबीएसची पदवी मिळाल्यानंतर त्या डॉक्टरांनी शासकीय रुग्णालयांमध्ये १ वर्ष इंटर्नशिप केली पाहिजे, अशा प्रकारचा बॉण्ड लिहून घेतला जातो. जर त्यांनी ही सेवा दिली नाही तर त्यांना दंड केला जातो. समितीच्या असे लक्षात आले की, डॉक्टरांकडून सेवाही दिली जात नाही व विभाग त्यांच्याकडून दंडही वसूल करीत नाही. त्यामुळे साधारणपणे सव्वा कोटी रुपये दंडाची वसुली झालेली नाही. वास्तविक पाहता त्या डॉक्टरांनी इंटर्नशिप पूर्ण करणे कायद्याने बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे कायदा

मोडणाऱ्या डॉक्टरांकडून दंड वसूल करणे ही विभागाची जबाबदारी आहे. तथापि, विभागाकडून या बाबीकडे लक्षही दिले जात नाही. ऑल इंडिया मेडिकल इन्स्टिट्यूटकडे या डॉक्टरांविरुध्द तक्रार करुन त्यांची पदवी काढून घेण्याची कारवाई विभागाकडून होणे गरजेचे आहे. हा प्रकार शासनाने थांबविला पाहिजे. याबाबतची सर्व चर्चा समितीमध्ये झाली होती व विभागाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतचे आश्वासनही समितीला दिले होते. विभागाने दिलेल्या आश्वासलना संदर्भात विभागाने काय कार्यवाही केली याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, याबाबतची माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले. परंतू, यासंदर्भात विभागाकडून अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही.

६.९ दिनांक १ जुन, २०११ रोजी लोकलेखा समितीसमोर झालेल्या साक्षीच्या बैठकीच्या वेळी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांकडून भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या नागरी अहवालासंदर्भात महालेखापालांनी उपस्थित केलेल्या लेखापरिक्षण परिच्छेदासंदर्भात समितीला वेळेवर माहिती प्राप्त न होणे, लोकलेखा समिती कक्षाकडुन पाठविलेल्या स्मरणपत्रांची विभागाकडून दखल न घेणे, परिच्छेद प्रमाणित (Vetting) न करता समितीला देण्यात येणे तसेच महालेखाकार कार्यालयाकडून परिच्छेद प्रमाणित (Vetting) करुन घेण्यास विभागाकडून झालेला विलंब याबाबत समितीन तीव्र नापसंती व्यक्त केली होती व विभागास परिच्छेदांसदर्भातील माहिती महालेखाकार यांच्याकडुन तपासून घेऊन समितीस प्राप्त करुन देण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार दिनांक २८ जुन, २०११ रोजी समितीने विभागांची पुन्हा साक्ष घेतली. सदर साक्षीच्यावेळी समितीने सदर परिच्छेदासंदर्भात माहिती देण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीच्या मागील जून महिन्यातील साक्षीच्या वेळी ज्या त्रुटी आढळून आल्या होत्या त्या अनुषंगाने कार्यवाही करुन ताबडतोब दि. २ जूनला महालेखापरीक्षक यांच्याकडे शासनाच्या अभिप्रायाचे स्पष्टीकरणात्मक ज्ञापन पाठविण्यात आले. त्यानंतर १० तारखेला अधिक माहिती मागविण्यात आली होती. त्यानंतर दोन वेळा कम्पायलेशन करुन जास्तीत जास्त उत्तरे दिली आहेत. त्यानंतर महालेखापरीक्षकांच्या सूचनेनुसार ज्ञापनाच्या ५० प्रतीचे वाटप केले आहे. या परिच्छेदातील मुख्य विषय असा आहे की, धुळे शासकीय महाविद्यालय व रुग्णालय या ठिकाणी

२५० खाटांच्या रुग्णालयीन इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात आले होते, सदर बांधकामास विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

६.१० ५०० खाटांच्या रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामाचा खर्च रु. ११.४४ कोटी इतका होता. सन १९९९-२००० पासून प्राप्त अनुदान अनुक्रमे १ कोटी, २५ लाख, ८१ लाख, ४३ लाख, २१ लाख, ११८ लाख, ३ लाख अशा प्रकारे अनुदानाची रक्कम कमी कमी होत गेल्यामुळे या इमारतीचे बांधकाम वेळेवर पूर्ण होऊ शकले नाही. त्यानंतर आता पर्यंत गेल्या ३ वर्षात मोठया प्रमाणात निधी उपलब्ध झाल्यामुळे या वर्षात हे बांधकाम निश्चितपणे पूर्ण होईल अशी या इमारतीच्या बांधकामाची सद्य:स्थिती आहे.

६.११ सन २००४-२००५ मध्ये ३.१५ इतका कमी निधी प्राप्त झाल्याची कारणमिमांसा समितीने विचारली असता, विभागिय सचिवांनी सांगितले की, सन २००४-२००५ ला ३ लाख १५ हजार रुपये एवढा निधी प्राप्त झाला. यासंबंधीचे मागील काही वर्षाचे स्टॅटिस्टिक काढले तर या वर्षी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागासाठी २८४ कोटी रुपये एवढा नियतव्यय मिळाला म्हणजे २५.३० टक्के इतका कमी नियतव्यय मिळाला. या नियतव्ययामध्ये यंत्रसामुग्री, एफडीए, आयुर्वेद इत्यादीचा समावेश आहे त्यामुळे २८४ कोटी पैकी फक्त ४९ कोटी रुपये बांधकामासाठी ठेवू शकलो. १७ वेगवेगळया रुग्णालयाचे बांधकाम करावे लागल्यामुळे या इमारतीच्या बांधकामासाठी या वर्षी जास्त निधी देता आला नाही. हे फक्त एका वर्षाचे उदाहरण दिले आहे. या पूर्वीचे प्रत्येक वर्षाचे स्टेटस काढले काढले तर प्रामुख्याने मागणीच्या ५० टक्क्यापेक्षा कमी निधी प्राप्त होत असल्यामुळे प्रत्येक इमारतीच्या बांधकामानुसार निधी उपलब्ध होऊ शकला नव्हता.

६.१२ आदिवासी भागातील रुग्णालयाच्या बांधकामासाठी खास निधीची तरतूद करण्यात येते काय? धुळे, जळगाव, नंदूरबार हे जिल्हे आदिवासी क्षेत्रात येतात तेव्हा या ठिकाणच्या रुग्णालयाच्या बांधकामासाठी ट्रायबयल सब प्लॅनमधून निधी प्राप्त होण्याच्या दृष्टिकोनातून काही प्रयत्न केले आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागिय सचिवांनी खुलासा या दृष्टिकोनातून विभागाकडून प्रयत्न तथापि, करण्यात आले, आदिवासी भागातील वसतिगृहासाठी ग्रँट देता येईल मात्र यामध्ये रुग्णालयाचे बांधकाम बसत नाही अशा प्रकारचा अभिप्राय देण्यात आला आहे.

६.१३ यवतमाळ जिल्हा आदिवासी भागात येतो. आदिवासी सब प्लॅनकडे भरपूर पैसे शिल्लक आहेत पण या जिल्हयातील मेडिकल कॉलेजच्या बांधकामासाठी ते पैसे वापरता येत नाहीत अशी परिस्थिती आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, धुळयाच्या बाबतीत आता स्पेसिफिक सांगता येणार नाही परंतु यवतमाळ व नंदूरबार येथील नवीन मेडिकल कॉलेजच्या बाबतीत ट्रायबल सब प्लॅनमधून निधी मागितला होता. परंतु सदर रुग्णालये आदिवासीसाठी नसल्यामुळे ट्रायबल सब प्लॅनमधून पैसे देता येणार नाहीत अशा प्रकारचा अभिप्राय देण्यात आला. वास्तविक पहाता सदर रुग्णालये आदिवासी भागात येत असल्यामुळे त्याचा फायदा आदिवासींसाठी होऊ शकतो. धुळे, यवतमाळ, नागपूर या ठिकाणी विदर्भातील आदिवासी भागातील लोक उपचारासाठी येत असतात या अनुषंगाने ट्रायबल सब प्लॅनमधून रुग्णालयाच्या बांधकामासाठी पैसे मिळविण्याचा पुन्हा प्रयत्न करण्यात येईल.

६.१४ परंतु या प्रॉजेक्टला १० वर्षे झालेली आहेत. १० वर्षाच्या काळात कॉन्ट्रॅक्टर सोडून गेला. त्यानंतर पुन्हा एकदा निविदा काढल्या त्यामुळे प्राईस एस्कलेशन किती टक्के झालेले आहे? याबाबत माहिती देताना सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले की, हा विषय ५०० खाटा असलेल्या रुग्णालयाचा आहे. या इमारतीच्या बांधकामासाठी १९९८ मध्ये पहिल्यांदा प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यावेळी या बांधकामाची किंमत ११ कोटी ४४ लाख रुपये होती. आणि १८.५१ टक्के इतक्या कमी दराने १०.३२ लाख रुपये अनुदान प्राप्त झाले होते. त्यामुळे या इमारतीचे बांधकाम ज्या गतीने व्हावयास पाहिजे होते त्या गतीने होत नव्हते. त्यानंतर धुळे मेडिकल कॉलेजच्या डीनने दिनांक २६/६/२००६ रोजी पत्र पाठवून ५०० खाटांचा प्रकल्प एकत्र राबविण्याऐवजी तो २५० बिस्तर भागांमध्ये विभागून संपूर्ण रुग्णालय इमारतीऐवजी अगोदरच बांधकामात असलेल्या २५० बिस्तरच्या एका भागाच्या बांधकामासाठी निधी मिळण्यातील आवश्यकतेमुळे हाती घेण्याविषयी विनंती केली होती. त्यानुसार रुग्णालय इमारतीच्या एका २५० बिस्तर शाखेचे बांधकाम रु.६.६० कोटी इतक्या निविदा खर्चासह रु.५.७९ कोटी इतक्या अंदाजित खर्चापेक्षा १४ टक्के जास्त दराने नोव्हेंबर,२००८ पर्यंत पूर्ण करण्याच्या अटीवर दुसऱ्या कंत्राटदाराला दिले होते. २५० खाटांच्या दुसऱ्या इमारतीच्या बांधकामासाठी सन २००५-२००६ मध्ये एकूण रु. ६६३ लाख रुपयाची निविदा काढली होती या

इमारतीचे बांधकाम रु.१०.०८ इतक्या निविदा खर्चासह रु.६.६३ कोटी अंदाजित खर्चापेक्षा ५९.२२ टक्के जास्त दराने जून, २००९ पर्यंत पूर्ण करण्याच्या अटीवर तिसऱ्या कंत्राटदारास देण्यात आले होते. या दोन्ही इमारतींचे बांधकाम पूर्णत्वाकडे आलेले असून साधारणत: सप्टेंबर महिन्यात दोन्ही इमारतींचे बांधकाम पूर्ण होईल.

६.१५ सुरुवातीची रक्कम आणि आताची रक्कम यामध्ये किती तफावत आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, महालेखापरीक्षकांच्या परिच्छेदामध्ये ५.३६ कोटी इतक्या टाळता येण्याजोग्या खर्चाचा बोझा पडला असाच मुद्दा काढण्यात आलेला आहे. सुरुवातीची रक्कम आणि आताची रक्कम यामध्ये ५.३६ कोटी इतक्या खर्चाचा फरक आहे. रुग्णालयाच्या दोन्ही इमारतीचे बांधकाम सप्टेंबरमध्ये पूर्ण होईल.

६.१६ शासनाच्या अभिप्रायामध्ये असे म्हटले आहे की, "सदर बांधकामाच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक होते. परंतु आजतागायत प्रस्ताव सादर न केल्यामुळे सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत " सुधारित प्रस्ताव सादर केला आहे काय? सुधारित अंदाजपत्रक तयार झालेले असेल तर ते अंदाजपत्रक कधीपर्यंत सादर करणार? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सुधारित अंदाजपत्रक तयार झालेले असून ते पुढच्या महिन्यात म्हणजेच जुलै महिन्यात सादर करण्यात येईल. सुधारित अंदाजपत्रकाला मान्यता मिळाल्यानंतर ऑक्टोबर पर्यंत काम पूर्ण होईल. सध्या इमारतीचे बांधकाम चालू आहे.

६.१७ सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, वैद्यकीय शिक्षण विभागाकडून अनुदान देण्यामध्ये दिरंगाई झालेली आहे याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी सांगितल्याप्रमाणे निधी उपलब्ध नसल्यामुळे ठेकेदाराने काम थांबविले, कामाची गती स्लो झाली. पण त्याला दुसरा इलाज नव्हता. विभाग निधीची मागणी सातत्याने करीत असतो. पुरवणी मागण्यामध्ये सुध्दा निधीची मागणी करण्यात येते. एखाद्या स्टेजला निधी उपलब्ध झाला नाही तर अडचण निर्माण होते.

६.१८ वैद्यकीय शिक्षण विभागाला वित्त विभागाकडून दुय्यम दर्जाची वागणूक मिळते हे मान्य करावे लागेल. समवर्ती सूचीमधील (Concurrent List) हा विषय असताना सुध्दा असे

घडते म्हणून एनआरएचएमचा पैसा वैद्यकीय शिक्षण खात्यामार्फत आदिवासी भागातील रुग्णालयाकडे वळविता आला तर आदिवासी भागातील रुग्णालयाची कामे चांगल्या रीतीने करता येतील तेव्हा या दृष्टीने विभागाने प्रयत्न करावेत.तसेच या संदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने एक प्रस्ताव तयार करुन द्यावा. ग्रामीण भागातील रुग्ण या दवाखान्यात येणार असल्यामुळे आदिवासी भागातील रुग्णालयाच्या बांधकामासाठी एनआरएचएमचे पैसे वळविता येतील. आदिवासी भागातील रुग्णालयाच्या बांधकामासाठी एनआरएचएमचा पैसा वळविण्याच्या दृष्टीने नियमामध्ये काही बदल करावे लागले तर आवश्यक ते बदल करुन एनआरएचएमचा पैसा तिकडे कसा वळविता येईल हे विभागाने पहावे. याबाबत समिती शासनास शिफारस करेल, असे मत समितीने व्यक्त केले.

६.१९ अलिबाग येथील शासकीय रुग्णालयाच्या इमारतीच्या अवस्थेबाबत माहिती देताना समितीने सांगितले की, सदर इमारतीची अवस्था आज अतिशय वाईट आहे. त्या इमारतीचा स्लॅब कोसळला असून दोन रुग्णांची प्रकृती गंभीर आहे. अलिबागला आता चांगले सिव्हिल सर्जन आलेले आहेत. तेव्हा एनआरएचएमचा पैसा रुग्णालयाच्या बांधकामासाठी वळविण्यात आला तर या इमारतीचे बांधकाम चांगल्या रीतीने करता येईल. यावर

६.२० अलिबाग, जि. रायगड येथे आता एक वैद्यकीय कॉलेज प्रस्तावित असून त्यासाठी जागेचे इन्स्पेक्शन झालेले आहे.अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

६.२१ ५०० बेड्सच्या हॉस्पिटलमुळे एमबीबीएस, पोस्ट ग्रॅज्युएट्सच्या सीटस कमी झालेल्या आहेत काय ?याबाबत ५०० बेड्सचे हॉस्पिटल झाल्यानंतर पुढच्या वेळेस १०० सीटस करिता पूर्ण ताकदीने प्रयत्न करता येतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

६.२२ परंतु, केवळ हॉस्पिटल सुरु करुन चालणार नाही. त्याच बरोबर नर्सेस, पॅरामॅडिकल इक्वीपमेंटस या सगळ्या सोयी सुविधा असल्याशिवाय ५०० बेड्स जीवनक्षम (Viable) होणार नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागिय सचिवांनी खुलासा केला की, सन २००७-२००८ नंतर पुढची तीन वर्षे ८ ते १० कोटी रुपये प्रत्येक वर्षी या प्रयोजनार्थ मिळालेले आहेत. या वर्षाच्या बजेटमध्ये मंजूर करण्यात आलेल्या निधीपैकी ३ कोटी रुपये मिळणे बाकी आहेत. ते मिळाल्यानंतर सप्टेंबर अखेरपर्यंत इमारतीचे काम पूर्ण

होईल. इक्वीपमेंट वगैरे रुटीनप्रमाणे आवश्यक असलेल्या इतर गोष्टी सायमलटेनसली केल्या जातील. त्यामुळे १०० सीट्ससाठी आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चर मिळायला हरकत येणार नाही.

६.२३ जी.टी. हॉस्पिटलच्या इमारतीबाबतची वस्तुस्थिती विषद करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत जो डिस्प्युट होता त्यामध्ये शासनाच्या बाजूने निर्णय झालेला आहे. माननीय उच्च न्यायालयाने या इमारतीचे तीन मजले वापरायला मिळाले पाहिजेत असे सांगितले आहे ते वगळता बाकीचे ७ मजले शासनाला मिळतील.

६.२४ विभागास दिनांक ३१ मार्च २०१० रोजी ७ कोटी मिळाले होते. जर विभागाला ७ कोटी ३१ मार्च २०१० पुर्वि मिळाले असते तर त्यांचा वापर करता आला असता असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबतची वस्तुस्थिती सांगताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी सांगितले की, विभागास दिनांक ३१ मार्च, २०१० रोजी रु. ७.०० कोटी मिळाले होते. त्यापैकी रु. ४.७५ कोटी समर्पित केले आहेत. ते पैसे शेवटच्या क्षणाला मिळाल्याने त्यांचे नियोजन करता आले नाही. प्राप्त निधी हा पेंडिग बिले देण्यासाठी खर्च करण्यात आला.

६.२५ अशाप्रकारे मार्चमध्ये शेवटच्या क्षणाला पैसे मिळत असल्याने ते खर्च करता येत नाहीत किंवा फॉरवर्डसुध्दा करता येत नाहीत परिणामी ते समर्पित करावे लागतात. यासाठी, समिती माननीय वित्त मंत्री महोदयांना हे पैसे पुढे फॉरवर्ड करण्याबाबत शिफारस करील असे मत समितीने व्यक्त केले.

६.२६ याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सुरुवातीला उपलब्ध झालेली तरतूद अतिशय डायल्यूट होते. साधारणत: २ कोटी रुपये फेब्रुवारी महिन्यामध्ये मिळाले. त्यानंतर ३१ मार्च, २०१० मध्ये ७ कोटी ८३ लाख रुपये मिळाले त्यामुळे त्याबाबतचा प्लान अगोदर करता आला नाही. कॅश फ्लो हाताशी असेल तर, त्याचे नियोजन करता येते. परंतु, यामध्ये आता सुधारणा झालेली आहे. त्यानुसार ७५ टक्के कॅश फ्लो रिलीज करण्याचा निर्णय झालेला असून डिसेंबर पर्यंतचा कॅश फ्लो रिलिज झालेला आहे.

६.२७ मार्च महिन्यातील अर्थसंकल्पामध्ये किंवा पुरवणी अर्थसंकल्पामध्ये (Supplementary Budget) जी तरतूद केली जाते त्याबाबतची माहिती सभागृहाला देखील सादर केली जाते. कॅश फ्लोप्रमाणे ग्रांट रिलिज होत नाही की, विभागाकडून मागणी केली जात नाही, की मागणी करुनही निधी उपलब्ध होत नाही. मार्च महिन्यामध्ये भार (Burden) येऊ नये या करिता कॅश फ्लोची सिस्टम करण्यात आली. परंतु, तरी देखील दर महिन्याला

पैसे न मिळता मार्च महिन्यामध्येच मिळतात असे का होते ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून डिमांड तर केली जातेच. परंतु, ॲक्चुअल ग्रांट कधी मिळेल हे अंदाजित असते.

६.२८ यासंदर्भात वित्त सचिवांनी समितीस सांगितले की, या साक्षीच्या अनुषंगाने विभागाच्या अधिकाऱ्यांनी जी माहिती दिली त्यातून दोन मुद्दे पुढे आलेले दिसतात. त्यातील पहिला मुद्दा म्हणजे संस्थेचे बजेट झाल्यानंतर पाहिजे तसे पैसे उपलब्ध झाले नाहीत किंवा कमी प्रमाणात उपलब्ध झाले. परंतु, या ठिकाणी ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, विभागाला एकदा बजेट मंजूर झाल्यानंतर त्यातून ते किती अमाऊंटची कामे घेतात यावर देखील ते अवलंबून आहे. सर्वसाधारणपणे जेवढा निधी उपलब्ध असतो त्याच्या मर्यादेतच कामे हाती घेतली जातात. परंतु, तसे येथे झालेले दिसत नाही. त्यामुळे किती निधी उपलब्ध झाला व त्यातून कोणती कामे केली गेली, त्याचे नियोजन कसे केले गेले याची माहिती विभागाने उपलब्ध करुन दिली पाहिजे.

६.२९ दुसरा मुद्दा म्हणजे कामाची प्रायॉरिटी ठरविण्याचे अधिकार देखील अधिकाऱ्यांनाच आहेत. वित्त विभाग कामांची प्रायॉरिटी ठरवून देत नाही. त्यामुळे कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे हा सर्वस्वी विभागाचा निर्णय आहे. विभागाने कोणत्या कामांना कसे प्राधान्य दिले हे सुध्दा स्पष्ट होत नाही. तसेच कॅश कमी उपलब्ध होते, कॅश वेळेवर रिलिज होत नाही यावर ७५ टक्के निधी रिलिज करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तो रिलिज केल्यानंतर दर महिन्याचा कॅश फ्लो कसा असावा किंवा महिन्याचा कॅश फ्लो फॉरवर्ड करावयाचा वगैरे अधिकार अधिकाऱ्यांनाच दिलेले आहेत. याबाबतची फाईल आता वित्त विभागाकडे येत नाही त्यामुळे फारशा अडचणी यामध्ये नाहीत. या अंतर्गत ७४ कोटी रुपये रिलिज करण्यात आले असून त्यातून कोणतीही कामे करण्याचे विभागाला अधिकार आहेत.

६.३० दोन महिन्यात हॉस्पिटलच्या इमारतीचे काम पूर्ण होणार आहे काय ?आणि जरी इमारतीचे काम पूर्ण झाले तरी, बाकी सुविधांबाबत काय केले जाणार आहे ?याबाबत माहिती देताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी सांगितले की,एका इमारतीला रंग लावण्याचे काम सुरु असून दुसऱ्या इमारतीचे स्पायरल फेन्सिंगचे काम सुरु आहे. सप्टेंबर अखेरपर्यंत या २५०-२५० बेड्सच्या दोन्ही इमारतींचे काम पूर्ण होऊ शकेल. यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांनी सांगितले की, सध्या उपलब्ध असलेली यंत्रसामुग्री या इमारतींमध्ये

उपलब्ध करण्याबाबत तरतूद केलेली आहे. परंतु, ५०० बेड्सच्या इमारती उपलब्ध झाल्यानंतर त्यामध्ये नॉर्म्सप्रमाणे डॉक्टर्स, नर्सेस व इतर पॅरामेडिकल इक्विपमेंटबाबत युध्द पातळीवर उपाययोजना करावी लागेल.असे समितीने विभागाच्या निर्दशनास आणून दिले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्या ३०० बेड्सपैकी १०० बेड्स साठीचे इन्फ्रास्ट्रक्चर ॲव्हेलेबल आहे. बाकीचा स्टाफ वाढविण्यास मान्यता मिळाली असून तो मिळाल्यानंतर ३०० बेड्सचे इन्फ्रास्ट्रक्चर पूर्ण होऊ शकेल. पहिल्या २५० बेड्सच्या हॉस्पिटलची इमारत हँडओव्हर करण्यात आल्यानंतर तेथे ओपीडी सुरु करण्यात येईल.

६.३१ सप्टेंबरमध्ये हॉस्पिटलच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतची माहिती महालेखाकारांना व समितीला त्वरित देण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले. तथापि विभागाकडून अद्यापपावेतो माहिती प्राप्त झालेली नाही.

६.३२ हॉस्पीटलमधील पदे भरण्याची जबाबदारी कोणाची आहे? सध्या असलेल्या महाविद्यालयांमध्ये कर्मचारीवर्ग नाही अशी परिस्थिती पाहिल्यावर नवीन महाविद्यालयांचा खटाटोप कशासाठी? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही पदे भरण्याबाबतची जबाबदारी वैद्यकीय शिक्षण विभागाची आहे. परंतु, यामध्ये प्रमुख अडचण अशी जाणवते की, शिक्षकांच्या पदासाठी आवश्यक तो अनुभव असलेले उमेदवार उपलब्ध होत नाहीत. यावर उपाय म्हणून आता विशेष बाब म्हणून अनुभवाची अट रिलॅक्स करुन असिस्टंट प्रोफेसर्सची रिक्त पदे भरण्याचे धोरण स्वीकारले आहे. या खेरीज महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) कडून आपल्या मागणी प्रमाणे जाहीरात देऊन पदे भरण्याची प्रोसेस सुरु आहे. तसेच, ५००० नर्सेसची पदे भरतीची प्रक्रिया देखील प्रोसेसमध्ये आहे. या सर्व गोष्टींमुळे ३-४ महिन्यांमध्ये रिक्त पदांबाबतची परिस्थिती सुधारेल अशी अपेक्षा आहे.

६.३३ पूर्वी एखादे नवीन खाजगी किंवा निमसरकारी वैद्यकीय कॉलेज उघडावयाचे असेल तर वेगळी पॉलिसी होती. आता ही पॉलिसी बदललेली आहे असे वाटते. तर ही बदललेली पॉलिसी नेमकी काय आहे ?याबाबतची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, खाजगी वैद्यकीय कॉलेज काढावयाचे असेल तर, मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाचे काही नॉर्म्स आहेत त्यांचे पालन करावे लागते. जसे की, टोटल जागा, त्या जागेवरील बांधकाम, इतर आवश्यक यंत्रसामुग्री, प्रोफेसर, असिस्टंट प्रोफेसर्स, लेक्चरर या सर्व गोष्टींची पूर्तता झालेली आहे का ते पाहून इन्सेशिॲलिटी सर्टिफिकेट दिले जाते. त्यानंतर इन्पेक्शन घेऊन कोणत्या कोर्ससाठी किती सीटस द्यायच्या याबाबतचा निर्णय घेतला जातो. विभागाने दिलेल्या

या माहितीसंदर्भात समितीने विभागाच्या निदर्शनास आणले की, या गोष्टीं बरोबरच त्या एरियामध्ये अशा कॉलेजचा बॅकलॉग आहे का हे पहावे लागते, त्याबाबत आरोग्य विज्ञान विद्यापिठाची परवानगी घ्यावी लागते.

६.३४ विभागाच्या नॉर्म्सप्रमाणे प्रोफेसर्स, लेक्चररची पदे भरल्याबाबत जरी दाखविले गेले तरी नंतर प्रत्यक्षात ती पदे भरली असल्याचे आढळून येत नाही. आणि काही काही ठिकाणी तर एकच व्यक्ती ४-४ ठिकाणी काम करत असल्याचे आढळून येते. यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, एकंदरच रेडिओलॉजी, ॲनेस्थेसिस्ट या सवंर्गातील जी पदे आहेत त्याबाबत महाराष्ट्रामध्ये वर्षभरात पास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १२ इतकी कमी आहे त्यामुळे काही विशिष्ट पदे भरतीबाबत अडचणी निर्माण होतात. यासंदर्भात समितीने मत व्यक्त केले की, एमसीआय (मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया) मान्यता देत नाही यामागे मुख्य कारण हे आहे की, नॉर्म्सप्रमाणे इन्फ्रास्ट्रक्चर नसते. जर ते डेव्हलप केले तर एमसीआय कडून मान्यता मिळू शकते.

६.३५ अभिमत युनिर्व्हसिटीबाबतची मानके काय आहेत व त्यांना जमीन शासनाकडूनच दिली जाते का ?अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगिमले की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये १४ आहेत तर १७ खाजगी वैद्यकीय महाविद्यालये आहेत. खाजगी वैद्यकीय महाविद्यालये ही आपल्या विद्यापिठाशी संलग्न आहेत. त्यातील परीक्षा, सीईटी, कॉमन घेतल्या जातात. अभिमत विद्यापिठावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसते. त्यांना स्वायत्त विद्यापिठाचा दर्जा आहे. त्यांचे कुलगुरु स्वतंत्र आहेत. सुरुवातीला इन्सेशिॲलिटी सर्टिफिकेट दिले जाते. त्यांची १०० ते २०० सीट्ससाठी प्रवेश देण्याची क्षमता आहे की नाही याबाबतचा एमसीआयला रिपोर्ट पाठविले जातो. सध्या तरी तेथील ॲडमिशन प्रक्रियेवर शासनाचे नियंत्रण नाही. या विद्यापिठांना दिलेली जागा बऱ्याच वेळेस महसूल विभागाने दिलेली आहे. यामध्ये वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सहमतीचा प्रश्न येत नाही. याबाबत केसवाईज वेगळी माहिती मिळू शकते.

६.३६ विभागाने दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, रुग्णालयासाठी जमीन देण्याच्या संदर्भातील बाब वैद्यकीय शिक्षण विभागाकडे नाही. तसेच विधीमंडळ सदनामध्ये लोकप्रतिनीधीमार्फत बऱ्याच वेळा मागणी करण्यात येते की, याबाबतीत नियोजन केले पाहिजे, पण अजून तसे काही झालेले नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत सुप्रीम कोर्टामध्ये केस सुरु असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

६.३७ राज्यामध्ये गेल्या पाच वर्षापासून वैद्यकीय विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या किती महाविद्यालयांची, हॉस्पिटलची बांधकामे सुरु आहेत? त्यापैकी अपूर्ण अवस्थेमध्ये असलेल्या बांधकामांची संख्या किती आहे? तसेच गेल्या पाच वर्षामध्ये निधी न मिळाल्यामुळे किती हॉस्पिटलची बांधकामे अपूर्ण राहिलेली आहेत ? याबाबतची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीला माहिती द्यावी असे निदेश समितीने दिले. यासंबंधातील माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समितीस आश्वासित केले. परंतु सदरहू माहिती अद्याप समितीस प्राप्त झालेली नाही.

६.३८ जे.जे. हॉस्पिटलमध्ये कर्मचारीवर्ग कमी आहे. तसेच टेक्नीकल स्टाफ देखील पुरेसा नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामुळे (एम.पी.एस.सी.) जागा रिक्त आहेत. तेथे १० वर्षापासून जागा भरण्यात आलेल्या नाहीत, असे मत समितीने व्यक्त केले असता गेल्या ३-४ वर्षापासून एम.पीएस.सी.चे काम थंडावलेले आहे.परंतु आता रिक्त जागा भरण्याच्या दृष्टीने विभागाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यामुळे पुढील पाच-सहा महिन्यामध्ये खूप फरक पडेल. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

६.३९ ज्याठिकाणी पदे रिक्त आहेत, तेथे ती भरण्याच्या बाबतीत मागणी करावयास पाहिजे. मध्यंतरी शासनाकडून शासन निर्णयाद्वारे नोकर भरतीसाठी बंदी घालण्यात आली होती. त्यावेळी लोप्रतिनिधींनी विधीमंडळाच्या सदनामध्ये मागणी केली होती की, रुग्णालय ही महत्वाची बाब आहे. त्यामुळे निदान रुग्णालयासारख्या ज्या अत्यावश्यक बाबी आहेत त्यांना नोकर भरतीच्या बंदीमधून वगळण्यात यावे. तेथे रिलॅक्सेशन असावे. तेथील भरतीची प्रक्रिया थांबविण्यात येऊ नये. त्यामुळे रुग्णालयामध्ये ज्या रिक्त जागा भरावयास पाहिजेत. येथे कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने देखील जागा भरता येतील.

६.४० राज्यामध्ये व्होकार्टचा फॉर्म्यूला लागू करण्याचा प्रयत्न करीत आहोत. पण जुनी हॉस्पिटल्स् आहेत, तेथील मॅनेजमेंटची व्यवस्था आऊट सोर्सिंगला देऊ शकत नाही काय? त्या ठिकाणी इमारती बांधून तयार आहेत, पण सर्व्हीस उपलब्ध नाही. आमच्याकडे एम.आर.आय., सी.टी.स्कॅन मशीन आहे. पण तेथे त्याचा वापर करण्यासाठी टेक्नीशिअन उपलब्ध नसतात. त्यामुळे जर कोणी पेशंट आले तर त्यांना यवतमाळ किंवा नागपूरला पाठविण्यात येते. अशा

वेळी व्होकार्ट सारख्या ज्या खाजगी कंपन्या आहेत, त्यांच्याबरोबर एम.ओ.यु.केले पाहिजे, ऑपरेशनल बेसिसवर काहीतरी व्यवस्था करावयास पाहिजे.

६.४१ मेडिकल कॉलेजमध्ये जे लेक्चरर असतात, त्यांना कायम करण्यात येत नाही. त्याचप्रमाणे हॉस्पिटलमध्ये सुध्दा वर्ग ३ व ४ चे जे कर्मचारी आहेत, त्यांना २० वर्षे झाली तरी अजून देखील कायम करण्यात आलेले नाही. त्यामुळे महिन्याच्या शेवटी ३-४ दिवस ते कामावर येत नाहीत आणि त्यांना टेम्पररी म्हणून आदेशही दिले जात नाहीत. १९९७-९८ मध्ये सुप्रीम कोर्टाने याबाबत निर्णय दिलेला आहे. त्यानुसार आता तरी पुरेसे कर्मचारी भरण्यात यावेत.

६.४२ समितीने व्यक्त केलेल्या या सूचनांसंदर्भात सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी खुलासा केला की, लेक्चररच्या बाबतीत सांगावयाचे तर जानेवारी २००९ च्या सुमारास जेवढे तात्पुरते लेक्चरर होते, त्यांना रेग्युलर (नियमित)करण्यात आले आहे. आता गेल्या दोन वर्षातील लेक्चररच्या बाबतीतील मुद्दा आहे. शासन त्यांना सुध्दा कदाचित आदेश देईल. बदली कामगारांच्या बाबतीत सांगावयाचे तर दहा वर्षापासून, २० वर्षापासून एक हजार बदली कामगार काम करीत आहेत. या संबंधातील प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे गेलेला आहे. पण त्याबाबत अजून काही निर्णय झालेला नाही.

अभिप्राय व शिफारशी :-

६.४३ सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.४.३.३. रुग्णालय इमारतीच्या बांधकामावरील टाळता येण्याजोगा बोजा यासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली होती. सदरहू साक्षीच्या वेळी महालेखापाल यांच्या अहवालावरील स्थानिकरणात्मक ज्ञापन तपासून घेण्यासाठी महालेखापाल कार्यालयास माहे मे, २०१० मध्ये पाठविण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदरहू परिच्छेद हा सन २००७-२००८ या वर्षांच्या अहवालातील असून या परिच्छेदाच्या अनुषंगाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखापाल कार्यालयास विहित मुदतीत पाठविण्याचे विभागावर बंधन आहे. महालेखापालांच्या अहवालावरील परिच्छेदाबाबत मंत्रालयीन विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सन २००९ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या, मुख्य सचिवांनी परिपत्रक निर्गमित केले असून सविस्तर सूचना विभागास दिल्या आहे. यासंदर्भातील कार्यवाहीसाठी कक्ष अधिकारी, उप सचिव आणि सचिव

यांनी किती कालावधी घ्यावा याबाबत सविस्तर विवेचन केले आहे. **विभागामध्ये सर्व कार्यवाही झाल्यानंतर महालेखापालांनी किती दिवसात खुलासा सादर करावा या बाबीचा तक्ता देखील नमूद केलेला आहे. सदरहू परिपत्रक पुन्हा-पुन्हा निर्गमित करण्यात येऊन सुद्धा वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अधिकाऱ्यांनी याची दखल घेतलेली समितीस दिसून आलेली नाही, याबाबत समितीने तीव्र शब्दात नापसंती व्यक्त करीत आहे. लोकलेखा समितीच्या बैठकीत वेळोवेळी विभागाकडून विलंब वा दुर्लक्ष होत असल्याच्या बाबी निदर्शनास येत आहेत. त्यामुळे यापुढील काळात अहवालांमधील स्पष्टीकरणात्मक ज्ञापने विहित मुदतीत तपासणी करुन घेण्यासाठी महालेखापाल कार्यालयास पाठविण्याची दक्षता विभागांनी घ्यावी. तसेच याची जबाबदारी उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांवर सोपवून व त्यांचेकडून संबंधित विभागाच्या सचिवांनी वेळोवेळी अहवाल घ्यावा अशी समिती शिफारस करीत आहे. या कामी कुचराई करण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कडक शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी अशी देखिल समिती शासनास शिफारस करीत आहे.**

६.४४ एम.बी.बी.एस. पदवी मिळाल्यानंतर संबंधित डॉक्टरांनी शासकीय रुग्णालयामध्ये एक वर्ष ईंटर्नशीप करण्याबाबत बॉंड लिहून घेतला जातो. या डॉक्टरांनी त्यांना पदवी मिळाल्यानंतर शासकीय रुग्णालयामध्ये एक वर्षाची सेवा न दिल्यास त्यांना दंड आकारला जातो. समितीच्या असे निदर्शनास आले की, या डॉक्टरांनी शासकीय रुग्णालयांमध्ये सेवाही दिलेली नाही व विभागाने त्यांच्याकडून दंड ही वसूल केलेला नाही. **एम.बी.बी.एस. ची पदवी मिळाल्यानंतर डॉक्टरांनी शासकीय रुग्णलयामध्ये एक वर्षांची ईंटर्नशीप पूर्ण करणे बंधनकारक आहे. परंतु, बरेचसे डॉक्टर हे शासनाकडे दंड भरुन सुटका करुन घेतात. दंडाची रक्कम डॉक्टरांना त्यांच्या खाजगी व्यवसायामधील प्रॅक्टिसमध्ये मिळणाऱ्या मानधनापेक्षा अतिशय शुल्लक वाटत असल्याने त्याकडे त्यांचा जास्त कल असलेला दिसून येतो. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टरांकडून दंड वसूल करताना सद्य:स्थितीत त्यांना आकारण्यात येणाऱ्या दंडापेक्षा दुप्पट दंडाची रक्कम आकारण्यात यावी व सदर रक्कम कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टरांकडून वसूल करण्यात यावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे. यासंदर्भात समितीच्या यापूर्वी झालेल्या बैठकीमध्ये देखील हा विषय चर्चेस आला होता. त्यावेळेस त्यादृष्टीने कार्यवाही करण्याचे विभागाने समितीस आश्वासित केले**

होते. परंतु, यासंदर्भात विभागाने कोणती पाउले उचलली आहेत त्याबाबत समितीस अवगत केलेले नसल्याने समिती नापसंती व्यक्त करते व या प्रकरणांच्या सद्य:स्थितीबाबतची माहिती विभागाने तीन महिन्यांच्या आत समितीस कळवावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.

६.४५ शासनातर्फे जिल्हापातळीवर ५००-५०० बेडसच्या रुग्णालयांचे बांधकाम करण्यात येते. या इमारती फक्त बांधून पूर्ण असणे आवश्यक नसून त्यामध्ये यंत्र सामुग्री, डॉक्टर्स, नर्सेस व इतर पॅरामेडिकल कर्मचारीवर्ग यांची वेळीच उपलब्धता करणे आवश्यक असते. बऱ्याच वेळेला आवश्यक मनुष्यबळ व यंत्र सामुग्री अभावी रुग्णालये बंद असतात. सदरहू रुग्णालये वर्षानुवर्षे वापरात येत नाहीत. त्यामुळे शासनाने मोठ्या प्रमाणात खर्च करुन देखील या रुग्णालयाचा लाभ सर्व सामान्य जनतेस घेता येऊ शकत नाही. रुग्णालयांची उभारणी केल्यावर या रुग्णालयांमध्ये डॉक्टर्स, नर्सेस व इतर पॅरामेडिकल कर्मचारीवर्ग व यंत्र सामुग्री यांची चोख व्यवस्था होणे देखील आवश्यक आहे. समितीच्या बैठकीमध्ये धुळे येथील भाऊसाहेब हिरे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे या संस्थेतील इमारतीच्या बांधकामाचा प्रश्न चर्चेस आला होता. **५०० खाटांच्या रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम निधीअभावी पूर्ण न झाल्यामुळे त्या रुग्णालयाची सेवा जनतेस उपलब्ध झालेली नाही. सन १९९८ मध्ये या रुग्णालयाच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळून देखील शासनाकडून या रुग्णाच्या बांधकामासाठी पुरेसा निधी प्राप्त न झाल्यामुळे या इमारतीचे बांधकाम रखडले होते. दहा-दहा वर्षे उलटून देखील रुग्णालयांची बांधकामे पूर्ण होत नसल्याने बांधकामाच्या खर्चात वाढ होते व सर्वसामान्य जनतेस देखील त्याचा लाभ घेणे शक्य होत नाही. त्यामुळे अशाप्रकारचे प्रस्ताव तयार करताना सदरहू बांधकाम पूर्ण करण्याचा कालावधी, त्यास आवश्यक असणारा निधी शासनाकडून मंजूर करुन घेणे, इ. बाबींचे व्यवस्थित नियोजन करणे आवश्यक आहे यापुढील काळात रुग्णालये उभारणे वा मोठ्या स्वरुपाच्या भांडवली खर्चाचे प्रस्ताव करताना विभागाने योग्य ती दक्षता घ्यावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

६.४६ मुंबई येथील जे.जे. रुग्णालय व सेंट जॉर्ज रुग्णालय या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्न चर्चेस समोर आला होता. या दोन्ही रुग्णालयांतील डॉक्टर्स, नर्सेस व इतर पॅरामेडिकल कर्मचारीवर्ग कमी पडत असल्यामुळे रुग्णांना वैद्यकीय उपचार योग्यरित्या व वेळेत मिळत नाहीत अशी माहिती समिती समोर आली. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता, या दोन्ही रुग्णालयांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये रिक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या जागा भरण्यात

आली नसल्याची माहिती मिळाली. **मुंबईसारख्या जास्त व दाट लोकवस्तीच्या शहरामध्ये सर्वसामान्यांसाठी वैद्यकीय सुविधा मिळण्यासाठी जे.जे. रुग्णालय व सेंट जॉर्ज रुग्णालय यामध्ये पुरेशा व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग उपलब्ध असणे आवश्यक आहे. डॉक्टर्स, नर्सेस व इतर पॅरामेडीकल कर्मचारीवर्ग यांची सेवा अत्यावश्यक असल्याने शासनाच्या कर्मचारी भरतीच्या धोरणात नोकरबंदी मधून या पदांना वगळण्यात यावे व आता असलेल्या व भविष्यात रिक्त होणाऱ्या जागा तातडीने भरण्याची विभागाने कार्यवाही करावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

जलसंधारण विभाग

लघु सिंचन तलावाचा बांधकामावर झालेला निष्फळ खर्च

भारताचे नियत्रंक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.४.६ "लघु सिंचन तलावाच्या बांधकामावर झालेला निष्फळ खर्च" याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

चुकीच्या सर्वेक्षण अहवालाचे आधारे कासोळा लघु सिंचन (एम.आय) प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. कार्यकारी अभियंत्यांना हे माहिती असूनही की प्रस्तावित कालव्याचे बांधकाम जागेच्या विषम भूप्रदेशामुळे शक्य नाही. त्यांनी रु. १.६६ कोटी खर्चून लघु सिंचन तलावाचे बांधकाम केले.

शासनाने (जाने.२००१) रू. १.८० कोटीच्या (कालव्याकरिता रु. ४२.४७ लाख अंतर्भूत) प्रकल्पाला ज्यामध्ये मातीचे धरण, सांडवा आणि शिर्ष विनियामकाचे काम असून लघु सिंचन तलावापासून ४.५ ते ७ कि.मी लांब १२२ हेक्टर पाणलोट क्षेत्रामध्ये सिंचन करण्याकरिता प्रशासकीय मान्यता दिली होती. कासोळा नाल्यावरील लघु सिंचन तलावाच्या शिर्ष भागाचे कामाला एप्रिल-२००२ मध्ये सुरुवात झाली व रु.१.६६ कोटी खर्चून मार्च-२००६ मध्ये काम पूर्ण करण्यात आले (सप्टेंबर-२००७) घळभरणीचे काम जून २००६ पर्यंत करण्यात आले.

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, यवतमाळ यांच्याकडील अभिलेख्याची छाननी करता असे उघडकीस आले (जुलै २००७) की प्रशासकीय मान्यतेमध्ये अंतर्भूत असूनसुद्धा कालव्याच्या कामाच्या निविदा काढण्यात आल्या नाहीत. त्या संबंधीचे कारण अभिलेख्यावर नव्हते. असे आढळून आले की, कार्यकारी अभियंता, यवतमाळ पाटबंधारे यांनी केलेल्या सुरूवातीच्या सर्वेक्षण अहवालावर आधारित प्रकल्प अहवालात अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (स्था.स्तर) मंडळ, अमरावती यांनी १९८२ मध्ये ८.१६ कि.मी. लांबीच्या कालव्याची शिफारस केली होती, जी विस्तृत सर्वेक्षण पश्चात ६ कि.मी. (२००२-०३) पर्यंत कमी करण्यात आली. कार्यकारी अभियंत्यांने अधीक्षक अभियंत्यांना (डिसेंबर २००३) असे कळविले होते की, प्रस्तावित कालवा खालील कारणाकरिता तांत्रिकदृष्टया आणि आर्थिक दृष्टया सुसाध्य नाही.

(अ) हा समोच्च रेषीत कालवा होता आणि वेगवेगळया ठिकाणी त्याला १९ नाले आडवे येत होते,

(ब) साखळी क्र.० मी ते ९९० मी. पर्यंत सुरूवातीला पाणलोट क्षेत्र नव्हते आणि

(क) भूप्रदेशावर ६१ भूगवटे होते ज्यामुळे अत्थीत भागामध्ये ४ ते ४.५ मी पर्यंत उत्खननाची आणि खड्डयांमध्ये २ ते २.५ मी. पर्यंत भरावाची आवश्यकता होती. जरी कालव्याचे काम शक्य नव्हते तरी सुद्धा मातीच्या धरणाचे सांडवा आणि शिर्ष विनियामकाचे काम चालू होते आणि मार्च २००६ मध्ये ते पूर्ण झाले. कालव्याच्या विना शिर्ष विनियामकाचे काम पूर्ण केल्यामुळे उद्देशित पाणलोट क्षेत्रामध्ये सिंचन शक्य नव्हते म्हणून चुकीचा प्रकल्प अहवाल व चुकीच्या सर्वेक्षणाचे आधारे केलेल्या कामाच्या अंमलबजावणीमुळे प्रकल्पावर केलेला रु.१.६६ कोटीचा खर्च व्यर्थ ठरला. कार्यकारी अभियंत्याने कालव्याचे व त्याच्या उपकालव्याचे काम हाती न घेता लघुसिंचन तलावाच्या घळीच्या भरावाचे काम केले जे एम.आय. मॅन्युअलच्या तरतुदीचे उल्लंघन करणारे होते.

कार्यकारी अभियंत्याने (जुलै २००७) कबूल केले की, कार्यस्थळावरील विषम भूप्रदेशामुळे कालव्याद्वारे सिंचन शक्य नव्हते आणि शिर्ष विनियामकामधून सोडण्यात आलेल्या पाण्याचा शेतकऱ्यांनी कच्चे बंधारे बांधून वापर केला (नोव्हेंबर २००७).

उत्तर स्विकारण्यासारखे नव्हते कारण १२२ हेक्टर एवढया उद्देशातील पाणलोट क्षेत्राला सिंचन पुरवठा करण्याचा हेतू साध्य झाला नाही.

ही बाब शासनाला मार्च २००८ मध्ये कळविण्यात आली. उत्तर आले नाही (ऑगस्ट २००८).

ज्ञापन :-

७.१ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात जलसंधारण विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे कि,

कासोळा लघु पाटबंधारे तलावाचे कामास शासनाने दि.१८.१.२००१ रोजी मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान केली. मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार मातीचे धरण, सांडवा, मुख्य विमोचक व ८.१६ कि.मी. लांबीचा कालवा याचा समावेश असून या बाबीची किंमत रु.१८० लक्ष आहे. या किंमतीमध्ये कालव्याच्या कामासाठी रु.४२.४७ लक्ष रकमेची तरतूद करण्यात आली

होती. योजनेच्या शिर्ष कामास मे-२००२ मध्ये सुरूवात करण्यात आली व जून २००६ मध्ये पूर्ण करण्यात आले. सप्टेंबर-०९ पर्यंत या योजनेवरील एकूण खर्च रु.१६६ लक्ष आहे. योजनेची घळभरणी जून २००६ मध्ये पूर्ण करण्यात आली.

योजनेच्या कालव्याचे मूळ सर्वेक्षण लघु पाटबंधारे (सर्वेक्षण) उपविभाग, यवतमाळ यांनी केले होते. मूळ कालव्याची एकूण लांबी ८.१६ कि.मी होती व संकल्पित लाभक्षेत्र १२२ हे. होते. कालव्याचे सविस्तर सर्वेक्षण केल्यानंतर कालव्याच्या लांबीत घट होऊन ती ६.०० कि.मी. झाली व संकल्पित लाभक्षेत्र १२२ हेक्टरच राहीले.

उपविभागीय अभियंता, उमरखेड यांनी सादर केलेल्या कालवा संरेखा प्रस्तावास मंजूरी देण्याच्या अनुषंगाने दि.११.११.२००३ रोजी कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, यवतमाळ यांनी प्रस्तावित कालव्याची पाहणी केली. पाहणीत कालवा संरेखा तांत्रिक व आर्थिकदृष्टया खालील बाबीच्या अनुषंगाने असफल आढळून आला.

१. ६ कि.मी.लांबीच्या कंटुर कालव्यामध्ये १९ मोठे नाला क्रॉसिंग
२. सा.क्र. ० ते १९० मी. पर्यंतच्या असिंचित क्षेत्रातील कालवा.
३. उंच सखल भौगोलिक भूरचनेमुळे येणारी तीव्र स्वरुपाची कालव्यावरील वळणे
४. कालव्याची येणारी सरासरी खोली ४.५० मी. व भरावाची सरासरी उंची २ ते २.५० मी.

वरील वस्तुस्थितीमुळे सदर लघु प्रकल्पाचा तलाव व कालव्याऐवजी निम्न बाजूस साखळी बंधारे बांधणे प्रस्तावित करण्याची शिफारस करण्यात आली. ज्यामुळे निर्धारित सिंचन क्षमता निर्माण होऊ शकते व त्यानुसार सदर प्रस्तावास शासनाची मान्यता मिळविली आहे.

सदर प्रस्तावाबाबत अभ्यास सुरू असतांना निम्न भागातील भूधारक लाभार्थी शेतकऱ्यांनी तात्काळ धरण पूर्ण करणेबाबतच्या मागणीनुसार जून २००६ मध्ये घळभरणी पूर्ण करण्यात आली. निम्न भागातील लाभक्षेत्रातील शेतकरी धरणाच्या मुख्य नाल्यावर खाली बाजूस कच्चे बंधारे बांधून सिंचन करण्यास उत्सुक होते. सन २००५-०६ मध्ये घळभरणी पूर्ण झाल्यावर लाभक्षेत्राच्या शेवटच्या टोकापर्यंतच्या शेतकऱ्यांनी स्वखर्चाने नाल्यावर कच्च्या बंधाऱ्यांची साखळी बांधून २५.४० हे. क्षेत्र सिंचित केले. सन २००६-२००७ मध्ये देखील लाभक्षेत्राच्या शेवटच्या टोकापर्यंत २६.४० हे. क्षेत्र सिंचित झाले.

सन २००५-०६ व २००६-०७ मध्ये अनुक्रमे रू.४०३९/- व रु.४१९७ पाणीपट्टी जमा झाली. मुख्य विमोचकाद्वारे कच्चे बंधारे भरण्यासाठी पाणी सोडण्यात आले. सिंचन निर्मितीसाठी मंजूर प्र.मा.नुसार ५.५० कि.मी. लांबीच्या नाल्यात कच्चे बंधारे टप्प्याटप्प्याने बांधण्यात आले. ज्यामुळे मंजूर प्रशासकीय मान्यतेप्रमाणे सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे. याद्वारे मूळ प्रशासकीय मान्यतेमधील लाभक्षेत्र असलेले नाल्याच्या तीरावरील क्षेत्रास पाणी देण्यात आले. सद्यःस्थितीतील अस्तित्वात असलेली, कच्च्या बंधाऱ्यातील पाणी उचलून सिंचन करावयाची योजनाच पुढे कार्यान्वित करण्याचे ठरले असून त्यानुसार कच्च्या बंधाऱ्याऐवजी पक्के सिमेंट बंधारे प्रस्तावित आहेत.

सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये वरील कालव्याऐवजी सिमेंट बंधाऱ्याच्या व्याप्ती बदलाच्या प्रस्तावासहीतचा प्रस्ताव मा.मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्था. स्तर) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पत्र क्र.मुअ/उविअ-३/प्रशा-२/१०२६, दि.२८.२.२००८ अन्वये शासनास सादर करण्यात आला. व्याप्ती बदलाचा प्रस्ताव अर्थ खात्याने विचारात घेतला, शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र./१५०८/२९२/प्र.क.१३५/जल-१ दि.३०.१.२००९ अन्वये व्याप्ती बदलाच्या प्रस्तावासहीत सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव सादर करण्याचे निदेश दिले.

सदर सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावावर काही मुद्दे उपस्थित झालेले होते. त्या मुद्दयांचे निराकरणही मंडळ कार्यालय अमरावती यांनी पत्र क्र.प्रशा-५/१५१५, दि.२०.४.२००९ अन्वये करण्यात आलेले आहे. कायमस्वरुपी साखळी बंधाऱ्याच्या कामांच्या व्याप्तीसह सुधारित प्रशासकीय मान्यता शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई शासन निर्णय क्र.१५०८/८२७/प्र.क्र.३३१/जल-१, दि.२९.७.१० नुसार मिळालेली आहे. सदर साखळी बंधाऱ्याच्या बांधकामांची अंदाजपत्रके तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच सादर करण्यात येते की, कासोळा लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या निम्न बाजूस सिमेंटचे पक्के बंधारे बांधून उपसा सिंचनाद्वारे संकल्पित सिंचन क्षेत्र निर्माण होत असल्यामुळे सफल आहे. पक्क्या साखळी बंधाऱ्यांची अंदाजपत्रकाची प्रचलित दरसूची सन २००७-०८ नुसार येणारी किंमत रु.१५८.४२ लक्ष असून कालवा वितरण व्यवस्थेची किंमत रु.२५८.०१ लक्ष आहे.

सदरील दोन्ही प्रस्तावाच्या किंमतीचा तुलनात्मक अभ्यास करता रु.९९.५९ लक्ष रकमेची बचत दिसून येते.

सदर तलावातील मत्स्य व्यवसायाचा ठेका चेअरमन, गोरखनाथ मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था लि. (ब्राम्ही), ता.महागांव यांना देण्यात आलेला असून संस्थेने शासनाकडे खालीलप्रमाणे रकमा जमा केलेल्या आहेत.

(१) सन २००५-०६ रु.७५००/-

(२) सन २००६-०७ रु.८२५०/-

(३) सन २००७-०८ रु.९०७५/-

(४) सन २००८-०९ रु.१००१०/-

(५) सन २००९-१० रु.१११००/-

एकूण :- **रु.४५९३५/-**

प्रकल्पाचे शिर्षकाम पूर्ण झाल्यानंतर सन २००६ पसून लाभार्थ्यांनी नाल्यावर कच्चे बंधारे बांधून सिंचन केलेले आहे व त्यांच्याकडून पाणीपट्टीची रक्कम खालीलप्रमाणे वसूल करण्यात आलेली आहे.

(१) सन २००५-०६ २५.४० हे. रु.४०३९/-

(२) सन २००६-०७ २६.४० हे. रु.४१९७/-

(३) सन २००७-०८ २२.६० हे. रु.३५९६/-

(४) सन २००८-०९ २२.८५ हे. रु.३६३६/-

एकूण :- **रु.१५४६८/-**

सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार नाल्यावर पक्के सिमेंट बंधारे प्राधान्याने बांधून १२२ हे. सिंचनाचे उद्दीष्ट साध्य करता येईल आणि सहकारी पाणी वापर संस्थेस पुढील देखभालीकरिता हस्तांतरित करता येईल.

त्यामुळे कासोळा लघु सिंचन तलाव सध्या साठवण तलाव म्हणून उपयोगात येत असून उपरोक्त मुद्दयाचा विचार करता कासोळा लघु सिंचन तलावावर झालेले रु.१६६ लक्ष खर्च फलदायी झाल्याचे स्पष्ट निदर्शनास येते.

साक्ष :-

७.२ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासंदर्भात समितीने दि.१५ नोव्हेंबर २०११ रोजी प्रधान सचिव, जलसंधारण विभाग व अन्य विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने लघु सिंचन तलावाच्या बांधकामावर झालेला खर्च निष्फळ ठरला. या महालेखाकार यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतची वस्तुस्थिती समितीसमोर नमूद करण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कासोळा लघुसिंचन प्रकल्पाला सन २००१ साली प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर सदरहू योजना राबविण्यात आली. धरणाचे काम पूर्ण झाले आहे परंतु काही तांत्रिकदृष्टया ही योजना पाहिजे तेवढी सफल होणार नाही असे लक्षात आल्यानंतर सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेली, कच्च्या बंधाऱ्यातील पाणी उचलून सिंचन करावयाची योजनाच पुढे कार्यान्वित करण्याचे ठरले आहे. त्यानुसार कच्च्या बंधाऱ्याऐवजी पक्के सिमेंट बंधारे तयार करण्याचे काम प्रस्तावित असून सिमेंटच्या पक्क्या बंधाऱ्यासाठी जुलै २०१० ला शासकीय मान्यता घेतलेली आहे. महागाव तालुक्यात कासोळा येथे हे धरण आहे. हा प्रकल्प १२२ सिंचन क्षमतेचा होता. आठ किलो मीटरच्या कॅनॉलसाठी १९ पूल क्रॉसिंगसाठी बांधावे लागले असते त्यामुळे आर्थिक भार जास्त परंतु त्या प्रमाणात लाभ कमी प्रमाणात मिळाला असता. कॅनॉलच्या पहिल्या किलोमीटरसाठी कमांड नाही. पहिल्या किलोमीटरसाठी गेट ठेवून खर्च केला तर फारसा उपयोग होणार नव्हता. या अशा दोन तीन कारणांमुळे आपण कॅनॉल करण्याचा संकल्प सोडून दिला, त्याऐवजी आठ सिमेंटचे पक्के बंधारे बांधण्याचा निर्णय घेतला. जेणेकरुन, शेतकरी पाणी लिफ्ट करुन सिंचन करतील. प्रवाही सिंचनाच्या पाण्याचा एव्हरेज ६४ टक्के असतो. हा प्रकल्प पूर्ण केला असता तर १२२ हेक्टर्स जमिनीचे सिंचन झाले असते, त्याऐवजी आता १८० हेक्टर्स इरिगेशन होणार आहे. ही संकल्पना चांगली असल्यामुळे सन २०१० मध्ये सदरहू प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेतली आहे. यासंबंधी सविस्तर अंदाजपत्रक तयार केलेले असून जून २०१२ पर्यंत हे काम पूर्ण होणार आहे. तसेच सदर प्रकल्पास आतापर्यंत १६८.५३ लक्ष रुपये खर्च झाला असून प्रस्तावित खर्च हा रु.३४२ लक्ष इतका आहे आणि ३४२ लक्ष रुपयांमध्ये बंधाऱ्याचे काम पूर्ण होणार आहे. या प्रस्तावित खर्चामध्ये लोकल सेक्टरचे छोटे प्रकल्प पाटबंधारे, जलसंधारण खाते सर्टिफाय करुन देते.

७.२ लघु पाटबंधारे स्तरावर २०० हेक्टर्सच्या आतील प्रकल्प पूर्ण केले जातात. भविष्यकाळात प्रकल्पाचा किती उपयोग होणार, त्यावर किती खर्च होणार, तांत्रिकदृष्टया हा प्रकल्प यशस्वी होईल किंवा नाही याबाबत समितीने विचारणा केली असता खुलासा करताना विभागीय प्रतिनिंधींनी सांगितले की, कॅनॉलचे डिटेल्स सर्वेक्षण केले जात नाही. एखाद्या प्रकल्पाची घळभरणी केल्यानंतर १/३ इरिगेशन व्हायला पाहिजे, अशात-हेने सर्वेक्षण करायास पाहिजे. सन २००३ मध्ये सर्वेक्षणाचे काम हाती घेतले त्यानंतर सन २००६ मध्ये घळभरणी केली. साठवण तलावाचे काम सन २००६ मध्ये पूर्ण झालेले असून साठवण तलाव नाल्यावर बांधलेला आहे.

७.३ यावर सिमेंट बंधाऱ्यांची ८ कामे ३ कोटी ४२ लाख रुपयांमध्ये होणार आहे का? सन २००६ मधील हे काम असून आता सन २०११ साल उजाडले आहे त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये वाढ होणार नाही का असे समितीने विचारले असता याबाबत खुलासा देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, या कामासाठी जुलै २०१० ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

७.४ सदर हा प्रकल्प फिजीबल होणार नाही त्यामुळे हा दोष जलसंधारण विभागाचा आहे की, पाटबंधारे विभागाचा आहे? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कॅनॉल असल्यामुळे प्रवाही सिंचनाचा हा प्रकार आहे. सदरहू कॅनॉल सफल होणार नाही अशातला भाग नाही. केवळ सहा किलोमीटर किंवा आठ किलोमीटरच्या परिसरात कॅनॉल तयार करुन खालच्या भागातील शेतकऱ्यांना पाण्याचा पुरेपूर फायदा होणार नव्हता म्हणून तांत्रिकदृष्टया हा प्रस्ताव बदलला गेला. एखादा प्रकल्प तयार करीत असतांना विभागाकडून त्याचे तपशिलवार अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता देण्यात येते. त्यासाठी ३ कोटी ४२ लाख रुपयांची तरतूद केली. निविदा काढून सर्व प्रोसेस पूर्ण करण्यात आली. कॅनॉल बांधण्याचा निर्णय झाला. त्यानंतर विभागाच्या लक्षात आले की, या प्रकल्पाचे पाणी खालच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचू शकत नाही. या प्रकल्पामुळे केवळ १२२ हेक्टर्स जमीन सिंचनाखाली आली असती. याऐवजी नाल्यावर सिमेंट बंधारे बांधले तर १८० हेक्टर्स जमीन सिंचनाखाली येऊ शकते. म्हणजेच प्रकल्प तयार करीत असतांना अशा प्रकारे निर्णय बदलविला गेल्यामुळे जवळपास १०० एकर जमिनीचे जास्तीचे क्षेत्र ओलिताखाली येणार

असल्यामुळे समितीने समाधान व्यक्त केले. परंतु या प्रकल्पाची मेरी बोर्डाकडून तपासणी करुन घेतली होती का? अशी विचारणा समितीने केली असता सदर प्रकल्पाची मेरी बोर्डाकडून तपासणी केली नाही त्यांची तपासणी न केल्यामुळे अशी तांत्रिक बाब नंतर लक्षात आली. तसेच मेरी बोर्डाकडून तपासणी न केल्यामुळे तांत्रिक बाब नंतर लक्षात आली असा हा एकच प्रकल्प आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

७.५ अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यात २५० हेक्टर्सपर्यंतचे असे किती लघु सिंचन प्रकल्प आहेत? या प्रकल्पांसाठी पंतप्रधान पॅकेजमधून निधी मिळाला होता काय? याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यात असे एकूण १२० प्रकल्पांचे काम सुरु आहे. २० प्रकल्पांसाठी पंतप्रधान पॅकेजमधून निधी मिळाला होता.

७.६ अमरावती जिल्ह्यात शेतकरी हा केंद्रबिंदू मानून, तसेच या जिल्ह्यात मोठया प्रमाणावर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या त्यामुळे पंतप्रधान पॅकेज दिले गेले. त्यामागे रोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा असाही उद्देश होता. या निधीमधून जवाहर विहिरी, शेततळी, गावतळी, लघु पाटबंधाऱ्याचे प्रकल्प काही ठिकाणी जलसंधारण विभागामार्फत "पाणी अडवा, पाणी जिरवा" या मोहिमेखाली पाण्याची पातळी वाढविण्यासाठी पंतप्रधान पॅकेजमधून पैसे मिळाले आहेत. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अमरावती, वर्धा हे आत्महत्याग्रस्त जिल्हे असल्यामुळे पंतप्रधान पॅकेजमधून या जिल्ह्यातील कृषी विभागाला निधी मिळालेला आहे. शून्य ते २५० हेक्टर्स पर्यंत ४९२ प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी ३५४ प्रकल्प पूर्ण केले आहेत. यात पाझर तलाव, के.टी.वेअर प्रकल्प, मायनर इरिगेशन असे ९१ कोटी रुपयांचे सिंचन प्रकल्प माझ्या मंडळाकडे देण्यात आले आहेत. त्यापैकी १०० प्रकल्पांची कामे अजून सुरु आहेत.

७.७ मागील वर्षी पंतप्रधान पॅकेजमधून निधी मिळाला नाही. परंतु या जिल्ह्याला पंतप्रधान पॅकेजचा निधी मिळालेला आहे अशी माहिती समितीने दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ९१ कोटी रुपये आले होते. त्यानंतर गेल्या पाच वर्षात उर्वरित कामांच्या किंमती वाढत गेल्या. आता त्याची किंमत १४० कोटी रुपयांपर्यंत गेली आहे.

७.८ जवळपास दहा हजार कोटी रुपयांचा निधी पंतप्रधान पॅकेजमधून दिला गेलेला आहे. कोणतेही प्रकल्प असोत, ते जलसंधारण विभागाचे असोत किंवा अन्य कोणत्याही विभागाचे प्रकल्प असोत ते ताबडतोब तयार होत नाहीत. जमिनीवर उभे करावयाचे हे प्रकल्प असतात. यासाठी जमीन संपादन करणे यासाठी वेळ लागणारच आहे. सिमेंट बंधाऱ्यांसाठी तरतूद ९१ कोटी रुपयांची केली गेली. यामध्ये वाढीव किंमत ग्राह्य धरली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता वाढीव किंमत ग्राह्य धरली नाही असे विभागाकडून सांगण्यात आले.

७.९ या संदर्भात समितीने असे मत व्यक्त केले की, एक वर्षात तयार होणारा प्रकल्प आपण समजू शकतो. परंतु पुढच्या काळात किंमती वाढणारच आहेत. सन १९९०-९२ चे काही प्रकल्प अद्यापही अपूर्ण आहेत. एखाद्या प्रकल्पाचे अंदाजपत्रक पाच लाख रुपये असेल तर भविष्यात वाढणारे सिमेंटचे भाव, तद्नुषंगिक इतर सर्व बाबींचा विचार करता त्या प्रकल्पाची किंमत वाढत जाणारच आहे.

७.१० गोसीखूर्द येथे पुनर्वसनाची अडचण आहे. कृष्णा खोऱ्याचे पाणी अडविण्यावर बंधन घालण्यात आले आहे. नदीवर एक टी.एम.सी. च्या वर बंधारा बांधावयाचा नाही, अशा प्रकारचे बंधन घालण्यात आले आहे. समितीने गोसीखूर्दची पाहणी केली. हा मूळ प्रकल्प ३०० कोटी रुपयांचा होता, परंतु आता तो पंधरा हजार कोटी रुपयांवर गेला आहे. केंद्राकडून त्यासाठी राज्याला पैसे मिळतात, परंतु राज्याला त्या दृष्टीकोनातून त्या निधीचा वापर करुन घेता येत नाही. यात काही अडचणी आहेत. उजवा, डावा कालव्याच्या अडचणी, धरणाची क्षमता, धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित गावाचा पुनर्वसनाचा प्रश्न अशा बऱ्याच अडचणी येतात. चार गावांचे पुनर्वसन झाल्यानंतर पहिला टप्पा पूर्ण होणार आहे. पावसाळ्यात पडणारे पावसाचे पाणी पैनगंगा नदीतून वाहत जाऊन चंद्रपूर, गडचिरोली जिल्हा तसेच आंध्र प्रदेश राज्यामध्ये जाते, परंतु ते पाणी अडविता येत नाही. कृष्णा खोरे पाणी वाटपाचा वाद लवादाकडे नवी दिल्ली येथे सुरु आहे. पुणे जिल्ह्यातील पवना नदीवर पवना डॅम बांधलेला आहे, परंतु त्या नदीवर एकही कॅनॉल नाही. नदीतील पाणी झिरपत असल्यामुळे तळेगाव ते कामशेत या भागात चांगल्या प्रकारची बागायती शेती आहे. म्हणून पाटबंधारे, जलसंधारण विभागाने छोटे छोटे बंधारे बांधावे, यासाठी एक धडक कार्यक्रम हाती घ्यावा. फार मोठे बंधारे

बांधण्याची गरज नाही. छोट्या छोट्या बंधाऱ्यातून पाणी सोडले तर गाव पातळीवर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. जे शेतकरी पाणी लिफ्ट करु शकतात त्यांच्या सिंचनाचा प्रश्न सुटू शकतो.

७.११ अमरावती जिल्ह्यातील २५० हेक्टर्सच्या आतील सर्व सिंचनाचे प्रकल्प, त्यासाठी खर्च केलेला निधी, प्रकल्पाची अवस्था, किती प्रकल्प कार्यान्वित आहेत, किती पूर्ण करणार आहात, किती पूर्ण केले आहेत तसेच लोअर वर्धा प्रकल्पातील पाणी, अमरावती जिल्ह्यात कॅनॉल आणण्याकरिता किती निधीची अडचण आहे ? याबाबतची माहिती समितीला देण्याबाबतचे निदेश समितीने विभागीय सचिवांनी दिले.

७.१२ चांदूर रेल्वे विभागात येणारे पाणी छोट्या गांवाना देऊन तेथील १००-१५० एकरांचे जे प्रकल्प आहेत त्यांना चांगल्या प्रकारची मदत होऊ शकते असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, याबाबत पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची अडचण येते. अधीक्षक अभियंता हे विभागीय स्तरावरील प्रकल्पाचे काम पाहतात, पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची खरी अडचण येते. पश्चिम विदर्भात तापीचे, पूर्णा, पैनगंगेचे कॅचमेंट आहे, परंतु जलसंपदा विभागाकडे त्यांचे पाणी बुक झालेले आहे. शून्य ते २५० हेक्टर्स पर्यंत प्रकल्प बुक झालेले आहेत. येथे जलसंपदा विभागाकडून प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहेत. ० ते २५० हेक्टर क्षमतेपर्यंतचे प्रकल्प या भागामध्ये राबविण्यात आलेले आहेत. नवीन प्रकल्प हाती घेण्यासाठी पाणी उपलब्ध प्रमाणपत्राची आवश्यकता असते. मात्र ते प्रमाणपत्र उपलब्ध होत नाही. हे प्रमाणपत्र जलसंपदा विभागाकडून दिले जाते. साधारणपणे ० ते २५० हेक्टर क्षमतेच्या योजनांकरिता १ द.ल.घ.मी पाणी साठयाची आवश्यकता असते. या परिसरामध्ये मोठ्या व मध्यम प्रकल्पासाठी पाणलोट प्रकल्प तयार करावयाचे ठरविल्यास केवळ १५ ते २० प्रकल्प होऊ शकतील. तसेच ० ते १५० हेक्टर पर्यंत केवळ ४ ते ५ योजना राबविता येतील. ही संख्या ५ टक्क्यांच्या मर्यादेपेक्षा देखील कमी आहे. यामुळे ० ते २५० हेक्टर क्षमतेच्या प्रकल्पांकरिता पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची जी अट निश्चित करण्यात आलेली आहे, ती रद्द करण्यात यावी. विभागीय सचिवांनी दिलेल्या उपरोक्त माहिती संदर्भात समितीने एक टिप्पणी देण्यात यावी असे निदेश दिले.

७.१३ यंदाच्या वर्षी अमरावती विभागामध्ये जलसंधारण विभागाला किती निधी प्राप्त झालेली आहे ? हा निधी खर्च करण्यात आला काय? एनजीओ मार्फत काम केले जाते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यंदा ४८ कोटी रुपये उपलब्ध झाले असून मागील वर्षी ४३ कोटी रुपये उपलब्ध झाले होते. संपूर्ण निधी योग्य कामावर खर्च करण्यात आलेला आहे. एका जर्मन प्रकल्पावर एनजीओ मार्फत काम सुरु आहे.

७.१४ समितीने पुढे अशी विचारणा केली की, अनेक ठिकाणी वाळूचे पोते टाकून नाल्यांमधील पाणी अडविणे, सिमेंट प्लगचे बंधारे अशा प्रकारच्या लहान योजना राबविल्या जातात. या लहान योजना योग्य प्रकारे राबविल्या जातात काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सिंचन प्रकल्प योग्य प्रकारे राबविले जातात. पावसाळयामध्ये साचणारे पाणी जमिनीमध्ये जिरविण्याचे काम प्रामुख्याने जलसंधारण विभागाचे असते. जलसंधारण विभागाचे ३ प्रमुख भाग आहेत. एका विभागामार्फत ० ते २५० हेक्टर पर्यंत मायक्रो इरिगेशन केले जाते. ० ते १०० हेक्टर पर्यंत जिल्हा परिषद व १००ते २५० हेक्टर पर्यंत स्थानिक विभागांमार्फत योजना राबविल्या जातात. जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंते मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अंतर्गत काम केले जाते. दुसऱ्या भागामध्ये संचालक, कृषी विभाग, मृद व जल संधारण आहे. तसेच तिसरा भाग सामाजिक वनीकरण संचालक, पुणे येथे आहे. नरेगा मार्फत देखील जलसिंचनाची काही कामे केली जातात. या योजनांचा एकूणच चांगला परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

७.१५ साधारणपणे असे दिसून येते की, जलसंधारणाच्या कामाचे पैसे योग्य प्रकारे वापरले जात नाहीत. निधी खर्च केल्याचे केवळ रेकॉर्डवर दाखविले जाते. मात्र प्रत्यक्षात कामे होत नाहीत. सामाजिक वनीकरण, पाणी साठवणे,लहान बंधारे तयार करणे इ. कामांमुळे गावातील पाण्याचा प्रश्न फार मोठया प्रमाणात सुटणार आहे. मात्र आपल्याकडे लहान गोष्टींकडे जास्त लक्ष दिले जात नाही. सध्या विदर्भामध्ये सिंचनाचे प्रमाण खूप कमी आहे. अनेक चांगल्या पाणी योजना सध्या बारगळल्याचे दिसून येत आहे असे मत समितीने खेदाने व्यक्त केले व सध्या अमरावती विभागामध्ये किती प्रकल्पांची कामे सुरु आहेत, सदर प्रकल्पांना किती निधी प्राप्त झाला आहे त्यापैकी किती निधी खर्च झाला आहे तसेच अमरावती जिल्ह्यामध्ये मागील १० वर्षामध्ये एकूण किती निधी खर्च झाला याबाबतची माहिती समितीला

देण्यात यावी कारण या माहितीमुळे तेथिल अडचणी सोडविण्यास मदत होऊ शकेल असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, अमरावती विभागामध्ये सध्या एकूण २३४६ प्रकल्प असून त्यामुळे ९९ हजार ९०० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. यामुळे साधारणपणे अपर वर्धा प्रकल्पाइतके सिंचन होत आहे. शेततळयाचे काम कृषी विभागामार्फत केले जाते. लघु सिंचन, कोल्हापुरी बंधारे, पाझर तलाव, एमआरइजीएस कडून बांधले जाणारे तलाव अशा प्रकारे सिंचन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने अनेक कामे हाती घेतली जात आहेत. साधारणपणे १० लाखांपेक्षा कमी खर्चाचे काम इजीएस मार्फत केले जाते. तसेच कच्चा बंधारा, वनीकरण इ. कामे देखील केली जातात. तसेच प्राप्त झालेला सर्व निधी योग्य प्रकारे खर्च केले जातो. मागील वर्षी मायनर इरिगेशन करिता २५८ कोटी रुपये प्राप्त झाले होते. ही रक्कम पूर्णपणे खर्च करण्यात आली. तसेच जिल्हा परिषदेला जलसंधारणांच्या कामांसाठी काही निधी शासनाकडून प्राप्त होत असतो.

७.१६ जिल्हा परिषदांना आतापर्यंत किती निधी मिळालेला आहे, याबाबतची माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले. कासोळा लघु सिंचन प्रकल्पाचे काम कधी पूर्ण होणार आहे व प्रकल्पाच्या ड्रॉइंगचे काम पूर्ण झालेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, प्रकल्पाच्या डिझाईनमध्ये सुधारणा करावयाची असून जून २०१२ पर्यंत सदर काम पूर्ण केले जाईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :-

७.१७ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षण यांच्या सन २००७-२००८ या वर्षांच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.४.४.६ लघुसिंचन तलावाच्या बांधकामावर झालेला निष्फळ खर्च यासंदर्भात जलसंधारण विभागाची सचिवाची साक्ष घेण्यात आली होती. महागांव तालुक्यात कासोळा लघुसिंचन प्रकल्प ज्यामध्ये मातीचे धरण, सांडवा आणि शीर्ष विनियामकाचे काम यांचा समावेश असलेल्या योजनेस शासनाने सन २००१ साली प्रशासकीय मान्यता दिली होती. यात ८.१६ कि.मी.चा कालव्याचा समावेश असून त्याची किंमत रु.१.८० कोटी होती. सदरहू योजनेच्या शीर्ष कामास माहे मे, २००२ मध्ये सुरुवात करण्यात आली व माहे जून, २००६ मध्ये पूर्ण करण्यात आले.

७.१८ योजनेच्या कालव्याचे मूळ सर्वेक्षण लघुपाटबंधारे (सर्वेक्षण), उप विभाग, यवतमाळ यांनी केले होते. मूळ कालव्याची लांबी एकूण ८.१६ कि.मी. होती व संकल्पीत लाभ क्षेत्र १२२ हेक्टर होते. कालव्याचे सविस्तर सर्वेक्षण केल्यानंतर कालव्याच्या लांबीत घट होऊन ती ६ कि.मी. झाली. उप विभागीय अभियंता उमरखेड यांनी सादर केलेल्या कालवा संरेखा प्रस्तावास मंजूरी देण्याच्या अनुषंगाने दिनांक ११ नोव्हेंबर, २००३ रोजी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, यवतमाळ यांनी प्रस्तावित कालव्याची पाहणी केली. या पाहणीत कालवा संरेखा तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या खालील बाबींच्या अनुषंगाने असफल आढळून आला :-

१) ६ कि.मी. लांबीच्या कंटूर कालव्यामध्ये १९ मोठे नाला क्रॉसींग

२) सा.क्र.० ते १९० मीटर पर्यंतच्या असंचित क्षेत्रातील कालवा

३) उंच सखल भौगोलिक भूरचनेमुळे येणारी तीव्र स्वरुपाची कालव्यावरील वळणे

४) कालव्याची सरासरी खोली ४.५० मीटर व भरावाची सरासरी उंची २ ते २.५० मीटर

७.१९ तांत्रिक दृष्ट्या ही योजना पाहिजे तेवढी सफल होणार नाही असे लक्षात आल्यानंतर सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेली कच्च्या बंधारातील पाणी उचलून सिंचन करावयाची योजनाच कार्यान्वीत करावयाचे ठरविले. ६ कि.मी. च्या कॅनॉलसाठी १९ पूल क्रॉसिंगसाठी बांधावे लागल्यास जास्त आर्थिक भार लागून या प्रमाणात सिंचन लाभ कमी मिळाला असता, कॅनॉलच्या पहिल्या किलोमीटरसाठी कमांड नसल्याने गेट देऊन देखील फारसा उपयोग होणार नव्हता. त्यामुळे कॅनॉल बांधण्याचा संकल्प सोडून देऊन ८ सिमेंटचे पक्के बंधारे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. अशाप्रकारे सन २००१ च्या प्रकल्पास पुन्हा सन २०१० मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

७.२० कासोळा लघुसिंचन योजनेच्या अनुषंगाने समितीस सादर झालेल्या माहितीवरुन असे निदर्शनास आले की, लघुपाटबंधारे प्रकल्प उभारताना शासनाने भविष्यकाळात या प्रकल्पांपासून किती लाभ होणार आहे, त्यावर येणारा अंदाजित खर्च, तांत्रिकदृष्ट्या हा प्रकल्प यशस्वी होईल किंवा कसे ? या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना व तेथील स्थानिक जनतेला किती

फायदा होणार आहे याचा सर्वांकषाने विचार होणे आवश्यक असताना या प्रकल्पासंदर्भात अशाप्रकारे कोणताच भविष्यकालीन विचार केला गेला नाही. **सदरहू लघुसिंचन प्रकल्प उभारताना महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था यांच्याकडून मातीच्या प्रतीची तपासणी केली नाही. दरम्यान योजनेचे काम सुरु केले त्यामुळे या तांत्रिक बाबी उद्‌भवल्या आहे त्यामुळे सन २००१ साली प्रशासकीय मान्यता मिळालेला प्रकल्प विविध तांत्रिक कारणामुळे रेंगाळला व त्याचा लाभ शेतकऱ्यांना व स्थानिक जनतेला होऊ शकला नाही. कालपव्ययामुळे खर्चात देखील वाढ झालेली आहे. सदरहू सिंचन प्रकल्प उभारताना तांत्रिक गोष्टींकडे दुर्लक्ष करण्यात शासनाचे नुकसान झालेले असल्यामुळे या प्रकल्पाच्या नियोजनामध्ये जे अधिकारी दोषी आहेत त्यांची सखोल चौकशी करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

७.२१ समितीने गोसीखुर्द प्रकल्पाची पहाणी केली होती, हा मुळ प्रकल्प रु.३०० कोटी एवढ्या खर्चाचा होता. परंतु, ढिसाळ नियोजन, भूसंपादनात आलेले अपयश व प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण करुन घेण्यासंदर्भात असलेली अपुरी इच्छाशक्ती यामुळे प्रकल्पाचा खर्च रु.१५ हजार कोटींवर गेलेला आहे. **मोठ्या प्रकल्पाची उभारणी विहित कालमर्यादेत करण्यास शासनास येत असलेले अपयश विचारात घेता, जलसंधारण विभागाने छोटे छोटे बंधारे बांधण्याचा धडक कार्यक्रम हाती घेणे अतिशय आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. छोट्या छोट्या बंधाऱ्याच्या उभारणीने गाव पातळीच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. शेतकरी बंधाऱ्यांमधून पाणी घेवून शेती सिंचनाचा प्रश्न देखील मार्गी लावू शकतो. याचा विचार करता शासनाने आगामी काळात छोटे बंधारे बांधण्याचा उपक्रम हाती घ्यावा अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

आदिवासी विकास विभाग

शासनाच्या निधीची अडवणूक

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र.४.४.९ "शासनाच्या निधीची अडवणूक" याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

घरकुल योजना कार्यान्वित करण्यासाठी सविस्तर प्रमाणके आणि कार्यान्वयन आराखडा निर्गमित न करण्याचा परिणाम रु.४.४५ कोटींची अडवणूक होण्यात तसेच आदिवासी समूहाला उद्देशित लाभांपासून वंचित ठेवण्यात आला.

शासनाने (मार्च २००४) अनुसूचित जमातींचा जीवनस्तर उंचावण्यासाठी, इंदिरा आवास योजना जी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेद्वारे कार्यान्वित केली जाते आणि ज्यामध्ये प्रत्येक घरकुलाकरिता रु.३०,००० चे किंमत प्रमाणाक विहित होते त्या केंद्र शासनाच्या योजनेच्या धर्तीवर अनुसूचित आणि आदिम जमातीकरिता घरकुल योजना कार्यान्वित केली. शासनाच्या प्रत्येक घरकुलाचे किंमत प्रमाणक रु.६०,००० पर्यन्त वाढविले (जून २००६) आणि असे अनुदेश दिले की योजनेची सविस्तर प्रमाणके आणि आराखडा निर्गमित केल्यानंतर खर्च केला जाईल. तथापि शासनाच्या आदिवासी विकास विभागाने लेखापरिक्षेच्या तारखेपर्यन्त सविस्तर प्रमाणके आणि आराखडा निर्गमित केला नाही.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी (जि.गडचिरोली), जव्हार (जि.ठाणे) नंदूरबार आणि तळोदा (जि.नंदूरबार) आणि यावल (जि.जळगांव) यांच्या अभिलेखांच्या छाननीत (मार्च-एप्रिल २००८) असे उघडकीस आले की, प्रकल्प अधिकाऱ्यांना ५६८ घरकुले बांधण्यासाठी मार्च २००७ मध्ये रु. ४.४५ कोटीची रक्कम प्राप्त झाली. घरकुलाची किंमत रु. ३०.००० पासून रु. ६०.००० पर्यंत सुधारित केल्यामुळे आणि योजना कार्यान्वित करण्यासाठी सविस्तर प्रमाणके आणि आराखडा शासनाकडून प्राप्त न झाल्यामुळे रु.४.४५ कोटीची रक्कम प्रकल्प अधिकाऱ्यांकडे वापराविना राहिली. याप्रकारे शासनाने योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रमाणके आणि आराखडा निर्गमित न करण्याचा परिणाम रु. ४.४५

कोटी इतक्या रक्कमेची अडवणूक होण्यात आणि आदिवासी समूहाला घरकुलांच्या लाभापासून एक वर्षाहून जास्त काळासाठी वंचित ठेवण्यात आला.

प्रकल्प अधिकाऱ्यांनी नमूद केले (मार्च-एप्रिल २००८) की योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रमाणके आणि आराखडा प्राप्त झाल्यानंतर निधीचा वापर केला जाईल. ही बाब शासनाच्या सचिवांना मे २००८ मध्ये कळविण्यात आली. उत्तर आले नाही (ऑगस्ट २००८)

ज्ञापन :-

८.१ उपरोक्त अभिप्रायासंदर्भात आदिवासी विकास विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले की, शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. जीओआय-२००५/प्र.क्र.९६/का.१७, दिनांक ३०-७-२००८ अन्वये केंद्र शासनाच्या विशेष केंद्रीय सहाय्य, संविधान अनुच्छेद २७५ (१) खाली मिळणारे अनुदान व आदिम जमाती विकास कार्यक्रमाखाली मिळणाऱ्या निधीतून घ्यावयाच्या आदिवासी/आदिम जमातीच्या लाभार्थ्यांसाठी राबवावयाच्या घरकुलाची सविस्तर प्रमाणके प्रमाणभूत नकाशा (टाईपप्लॅन) मंजूर करण्यात आला आहे.

याबाबत महालेखापाल-दोन (लेखा परिक्षा) नागपूर यांना या विभागाच्या पत्र क्र. ऑडीट-२००८/प्र.क्र.९९/कार्या-१७ च्या दिनांक ४-८-२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

सदर कार्यवाहीनंतर या विभागाच्या शासन निर्णय क्र. घरकुल २००८/प्र.क्र.१८०/का-१७, दिनांक २-१-२००९ अन्वये घरकुलाची वित्तीय मर्यादा व प्रमाणके व प्रमाणभूत नकाशा (टाईपप्लॅन) उपरोक्त योजनेसाठी सुधारित करण्यात आला आहे.

साक्ष-

८.२ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २ फेब्रुवारी, २०११ रोजी प्रधान सचिव, आदिवासी विकास यांची साक्ष घेतली.

८.३ उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सन २००७-२००८ मध्ये ५६८ घरकुलांचे बांधकाम करण्यासाठी ४.४५ कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यात आली होती, ही रक्कम पूर्णपणे वापरली आहे काय ? नसल्यास त्यासाठी कोण जबाबदार आहेत, त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली व या रकमेची सद्य:स्थिती काय ? यावर

विभागीय सचिवांनी प्रतिप्रादन केले की, अहेरी, जि.गडचिरोली, जव्हार, जि.ठाणे, नंदुरबार आणि तळोदा, जि.नंदुरबार आणि यावल, जि.जळगाव या ठिकाणी घरकुलांचे काम करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने डी.आर.डी.ए.कडे निधी जमा केला. सदरहू घरकुलांचे बांधकाम डी.आर.डी.ए.मार्फत केले जात आहे. त्यात ४४३ घरकुले बांधणे अपेक्षित होते त्यापैकी १४३ घरकुलांची कामे पूर्ण झाली. ११७ घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत त्या घरकुलांची कामे शेवटच्या टप्प्यात आहेत. तसेच १८३ घरकुलांची कामे अजून सुरु झालेली नाहीत. या संदर्भात धुळे, नंदुरबार जिल्हद्यात घरकुलांची यादी तयार आहे. त्या ठिकाणी सर्व प्राथमिक कामे झालेली आहेत. परंतु या संदर्भात घरकुलांना कामांना उशीर झाला ही बाब मान्य आहे.

८.४ ४.४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर असतानाही घरकुलांची कामे अपूर्ण राहिली आहेत. तसेच अजूनही १८३ घरकुलांची कामे सुरु झालेली नाहीत, इतका कालावधी उलटून सुध्दा घरकुलांची कामे पूर्ण न होणे ही बाब योग्य नाही. आदिवासी विकास विभागाने डीआरडीएकडे निधी जमा केल्यामुळे आदिवासी विकास विभागाने त्यांच्याकडे घरकुलांची कामे पूर्ण होण्यासाठी पाठपुरावा करणे अत्यावश्यक आहे. यासंबंधी आदिवासी विकास विभागाची जबाबदारी आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी समितीच्या मताशी सहमती दर्शवली व समितीस सांगितले की, या संदर्भात विभागाकडून पाठपुरावा सुरु आहे. परंतू नंदुरबार जिल्ह्यातील कार्यरत असलेल्या एक महिला अधिकारी निलंबित झाली व त्यानंतर त्यांना अटक सुध्दा झाली. त्यामुळे त्या ठिकाणी घरकुलांची कामे होण्यास अडचण निर्माण झाली.

८.५ विभागाने दिलेले उपरोक्त उत्तर हे समितीला संयुक्तिक वाटत नाही. कारण शासनाचे काम कधीही कोणावाचून अडून राहत नाही. ही बाब विभागाने लक्षात घ्यावी असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

८.६ याप्रकरणी आदिवासी विभाग विभागाच्या सचिवांनी स्वतः संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी चर्चा करून या प्रकरणी जे कोणी जबाबदार असतील त्यांच्याविरुध्द केली जाईल.असे आश्वासन समितीला दिले. यासंदर्भात तातडीने पाठपुरावा करुन येत्या ८ ते १५

दिवसांच्या कालावधीत त्याबाबतची माहिती समितीकडे सादर करावी.असे निदेश समितीने विभागास दिले परंतू विभागाकडून अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही.

८.७ अनेक वेळा घरकुलांसंबंधी आदेश पारित होतात. परंतु ते आदेश प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नाही ही वस्तुस्थिती समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली व साधारणपणे एका घरकुलासाठी किती खर्च येतो ? याबाबतची माहिती समितीने विचारली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आदिवासींसाठी २२५ चौरस फुटाचे घरकुल बांधण्यासाठी ७०,००० रक्कम पुरेशी पडत नसल्यामुळे शासनाने घरकुलाची किंमत प्रमाणक ७०,००० रुपयांवरुन एक लक्ष रुपयांपर्यंत सुधारित केली आहे.

८.८ जळगाव जिल्ह्यात यावल तालुक्यातील आदिवासींच्या घरकुलांच्या संदर्भात महसूल विभागाकडे दिलेली फाईल गायब झाली. या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी स्वःता प्रत्यक्ष संबंधित प्रांत अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली होती. त्यांनी ही बाब मान्य केली असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आदिवासींना संरक्षण देण्याच्या संदर्भात १३ डिसेंबर, २००५ रोजी कायदा मंजूर केला. त्यानुसार जे आदिवासी जमीन कसत असतील त्यांना त्या जमिनीची मालकी द्यावयाची. या संदर्भात ९८ टक्के केसेस डिस्पोझ झालेल्या आहेत. या संदर्भात ग्राम पातळीवर कार्यरत असलेली समिती केसेस तपासते. त्यानंतर सब डिव्हीजनल पातळीवर असलेल्या समितीकडून केसेसची तपासणी केली जाते., त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असते. या समितीने केसेससंबंधी घेतलेला निर्णय अंतिम असतो. यासंदर्भात चौकशी सुरु आहे.तसेच या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्रातील जवळपास ९८ टक्के केसेस डिस्पोझ म्हणजे निकाली काढलेल्या आहेत. अशा प्रकारच्या जवळपास ५० टक्के केसेस सब डिव्हीजनल पातळीवर रिजेक्ट केलेल्या आहेत. अशा प्रकारे रिजेक्ट झालेल्या केसेस प्रकरणी जिल्हाधिकारी समितीकडे अपील करता येते. तसेच ज्या केसेसमध्ये स्पीकिंग ऑर्डर पास न करता निकाली काढलेल्या आहेत. अशा केसेस रिव्ह्यू कराव्यात अशा प्रकारे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिलेले आहेत. तसेच अशा केसेसमध्ये अपील केले नसले तरी त्याबाबत सु-मोटो अपील घेता येईल काय, याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला असून त्यांचा याबाबत अभिप्राय मागविण्यात आला आहे. त्यामुळे या संदर्भात

संबंधित जिल्हाधिकाऱ्यांसमवेत आदिवासी विकास विभागाचे सचिव स्वत: चर्चा करतील असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

८.९ व्यक्तिगत व सामुहीक जमिनीच्या पट्टे वाटपामध्ये फार तफावत आहे, ही तफावत कमी करणे गरजेचे आहे.अशी सूचना समितीने विभागास केली असता यासंदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

८.१० उपरोक्त परिच्छेदासंदर्भात महालेखाकारांनी सांगितले की, As per our record, an amount of Rs. 4.45 crores was received for consturction of 568 gharkuls but now while giving information to the committee, you said that the 443 gharkuls were expected to be constructed. There is a conflict between our record and information given by you to the committee यासंदर्भात विभागिय सचिवांनी सांगितले की, I will get it reconcile वभागाने हा विषय गांभीर्याने घेतला असून यासंदर्भात तातडीने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

. **८.११** उपरोक्त परिच्छेदामध्ये महालेखाकारांनी अशी विचारणा केली की, As per our record, an amount of Rs. 4.45 crores was received for consturction of 568 gharkuls but now while giving information to the committee, you said that the 443 gharkuls were expected to be constructed. There is a conflict between our record and information given by you to the committee.

८.१२ यावर कम्प्लायन्स लवकरात लवकर करण्याबाबतचा विषय विभागाने गांभीर्याने घेतला आहे. तातडीने योग्य ती कार्यवाही विभागाकडून करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

अभिप्राय व शिफारशी :-

८.१३ अनुसूचित जमातींचा जीवनस्तर उंचावण्यासाठी, इंदिरा आवास योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेद्वारे कार्यान्वीत केली जाते. ग्रामीण भागातील घरे नसलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुंटुंबांसाठी घरे बांधण्यासाठी ही योजना राबविली जाते. शासनाने माहे जून, २००६ मध्ये प्रत्येक घरकुलाचे किंमत प्रमाणक रु.६०,०००/- पर्यंत वाढविले आहे. महालेखापालांनी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी (जिल्हा गडचिरोली), जव्हार (जिल्हा ठाणे), नंदूरबार आणि तळोदा (जिल्हा नंदूरबार) आणि यावल (जिल्हा जळगांव) यांच्या अभिलेख्यांची माहे मार्च-एप्रिल, २००८ मध्ये छाननी केली होती.

प्रकल्प अधिकाऱ्यांना ५६८ घरे बांधण्यासाठी माहे मार्च, २००७ मध्ये रु.४.४५ कोटी रक्कम प्राप्त झाली होती. घरकुलाची किंमत रु.६०,०००/- पर्यंत सुधारित केल्यामुळे आणि योजना कार्यान्वीत करण्यासाठी सविस्तर प्रमाण हे आराखडा शासनाकडून प्राप्त न झाल्यामुळे सदरहू रक्कम विनावापर राहिली त्यामुळे आदिवासी समूहाला घरकुलांच्या लाभांपासून एक वर्षांहून अधिक काळ वंचित रहावे लागले असा आक्षेप महालेखापालांनी त्यांच्या अहवालात घेतला होता.

८.१४ समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता, उपरोक्त ठिकाणी घरकुलांचे काम जिल्हा ग्रामीण विकास प्राधिकरणाकडून (D.R.D.A.) करण्यात येत असून ४४३ घरकुले बांधणे अपेक्षित होते त्यापैकी १४३ घरकुलांची कामे पूर्ण झाली आहेत. ११७ घरकुलांची कामे प्रगतीपथावर असून १८३ घरकुलांची कामे अद्याप सुरु झाल्याची नसल्याचे समितीस माहिती प्राप्त झाली. **प्रकल्प अधिकाऱ्यांना ५६८ घरकुले बांधण्यासाठी निधी प्राप्त झाला होता. विभागाच्या म्हणण्याप्रमाणे फक्त ४४३ घरकुलांचा उल्लेख असल्यामुळे महालेखापालांच्या निष्कर्षामध्ये विभागाच्या संख्येमध्ये १२५ घरकुलांच्या फरकाचा समितीच्या साक्षीमध्ये उल्लेख झालेला नसल्याने याबाबतची वस्तुस्थिती काय आहे हे स्पष्ट करुन सद्य:स्थितीची माहिती समितीस द्यावी.**

८.१५ सन २००७-२००८ मध्ये आदिवासींकरिता ५६८ घरकुले बांधून द्यावयाची होती. समितीने माहे जून, २०११ मध्ये घेतलेल्या साक्षीमध्ये फक्त ११७ घरकुलांची कामे प्रगतीपथावर असून १८३ घरकुलांची कामे अद्यापही सुरु झाली नसल्याची माहिती मिळाली. या प्रकल्पाकरिता निधी मंजूर होऊन चार-चार वर्षे उलटून देखील कामे पूर्ण होत नाही ही अतिशय खेदाची बाब असून समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. आदिवासी विकास विभागाने जिल्हा ग्रामीण विकास प्राधिकरणाकडे ही कामे व त्याकरिता निधी सोपविला होता. **जिल्हा ग्रामीण विकास प्राधिकरणाकडे ही जबाबदारी सोपविली असली तरी या प्राधिकरणाकडून कामे पूर्ण करुन घ्यावयाची संपूर्ण जबाबदारी आदिवासी विकास विभागाची होती. विभागाने या कामांच्या सद्य:स्थितीबाबत जिल्हा ग्रामीण विकास प्राधिकरणाकडे सतत पाठपुरावा करुन कामे पूर्ण करुन घेणे आवश्यक होते. आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी**

स्वत: संबंधित जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी चर्चा करुन अपूर्ण राहिलेल्या कामांच्या घरकुलासंदर्भात जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध कार्यवाही करुन त्यासंबंधिची माहिती समितीस तात्काळ सादर करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. परंतु, यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची कोणतीही माहिती समितीस प्राप्त झालेली नसल्याने समिती तीव्र नापसंती व्यक्त करते व आदिवासी समूहांच्या घरकुलाकरिता शासनाने निधी उपलब्ध करुन देखील घरकुलांच्या लाभांपासून आदिवासी समूहाला वंचित ठेवण्यास कारणीभूत असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात द्यावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.

८.१६ समितीस प्राप्त झालेल्या अधिक माहितीमध्ये राज्य शासनाने आदिवासींकरीता २२५ चौ.फू. घरकुल बांधण्यासाठी असलेली प्रत्येक घरकुलाची किंमत प्रमाण रु.७०,०००/- यावरुन वाढवून रु.१ लक्ष इतकी केली आहे. शासनाकडून वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करण्यात येत असतात. परंतु, हे निर्णय ज्यांच्या हितासाठी घेतलेले आहेत त्या लाभार्थ्यांपर्यंत या निर्णयांची माहिती पोहोचतही नाही. **जळगांव जिल्ह्यातील यावल तालुक्यामधील आदिवासी घरकुलासंदर्भात आदिवासी विकास विभागाकडून महसूल विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रकरण सादर करण्यात आले होते अशी माहिती विभागाच्या सचिवांनी दिली. तथापि, यासंदर्भातील नस्तीच महसूल विभागाकडून गायब झाल्याची माहिती समितीच्या निदर्शनास आली. सदरहू बाब अत्यंत आक्षेपार्ह व गंभीर असून जळगांव जिल्ह्यातील यावल येथिल घरकुलांच्या प्रकरणाची नस्ती गायब होण्यास जे संबंधित अधिकारी / कर्मचारी दोषी आहेत त्यांची त्वरित चौकशी करावी व याप्रकरणी जे दोषी आढळून येतील त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात द्यावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

परिशिष्ट - अ

परिशिष्ट - ब

सोमवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी ४.१५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.
(३) श्री. ए. टी. पवार, वि.स.स.
(४) श्री. विलास लांडे, वि.स.स.
(५) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
श्री. रा.रा.काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्री.निर्मलकुमार, उपमहालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री.राजेश अग्रवाल, सचिव, (लेखा व कोषागरे)

साक्षीदार :

आदिवासी विकास विभाग, मंत्रालय

(१) श्री. उत्तम खोब्रागडे, प्रधान सचिव
(२) श्री. टी.के.बागूल, व्यवस्थापकीय संचालक
(३) श्री. डी.एस.राजुरकर, आयुक्त

पर्यावरण विभाग, मंत्रालय

(१) श्रीमती वल्सा नायर-सिंह, सचिव
(२) श्री. राधेशाम मोपलवार, सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.१.६, ३.१.७, ३.१.८, ३.१.११.२, ३.१.११.३, ३.१.११.४, ३.१.११.६, ३.१.१७ संदर्भात सचिव, पर्यावरण विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली. आणि परिच्छेद क्र.४.४.९ संदर्भात प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

सोमवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(२) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(३) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(८) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(९) श्री. ए. टी. पवार, वि.स.स.
(१०) श्री. नवाब मलिक, वि.स.स.
(११) श्री. विलास लांडे, वि.स.स.
(१२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(१३) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(१४) श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(१५) श्री. सुरेश देशमुख, वि.स.स.
(१६) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(२) श्री. एस.एस.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(४) श्री. रा.रा.काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्री. के.सी.कुरुविल्ला, महालेखाकार

वित्त विभाग :

श्री. राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय

(१) श्री. ममदापुरे, सह सचिव
(२) श्री.तामसेकर, मुख्य अभियंता
(३) श्री. श्रीमाळ, उप सचिव

नियोजन विभाग, मंत्रालय

श्री. सुधीर श्रीवास्तव, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, नियोजन विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

सोमवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.५५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.
(४) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(५) श्री. ए. टी. पवार, वि.स.स.
(६) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(९) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(१०) श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(११) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(१२) श्री. बाळा नांदगांवकर, वि.स.स.
(१३) श्री. भाई जगताप, वि.प.स.
(१४) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(२) श्री. एस.एस.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्री. के.सी.कुरुविल्ला, उप महालेखापाल

वित्त विभाग :

श्री. राजेश अग्रवाल, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

नियोजन विभाग, मंत्रालय

श्री. सुधीर श्रीवास्तव, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.२ संदर्भात प्रधान सचिव, नियोजन विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

बुधवार, दिनांक १ जून, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १ जून, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.२५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

समिती प्रमुख

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.
(४) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
(५) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(७) श्री. बाळा नांदगांवकर, वि.स.स.
(८) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(३) श्री.रा.रा.काठे - अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्री. के.सी.कुरुविल्ला, उप महालेखापाल

वित्त विभाग :

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय

(१) श्री.मिलिंद म्हैसकर, सचिव,
(२) श्री.प्रवीण शिनगारे, संचालक,

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.३.३ संदर्भात सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

मंगळवार, दिनांक २८ जून, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २८ जून, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.२५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) डॉ. दीपक सावंत, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख.

समिती प्रमुख

(२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स
(४) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(५) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री.गिरिष महाजन, वि.स.स.
(७) श्री.बाळा नांदगांवकर, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार
श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
श्री.रा.रा.काठे - अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय,
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार
वित्त विभाग
श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय
(१) श्री.मिलिंद म्हैसकर, सचिव,
(२) श्री.प्रवीण शिनगारे, संचालक

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.३.३ संदर्भात सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

बुधवार, दिनांक ६ जुलै, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ६ जुलै, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १२.४५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

समिती प्रमुख

(३) डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स.
(४) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(५) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(६) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.
(७) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(८) श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(९) श्री. बाळा नांदगांवकर, वि.स.स.
(१०) श्री. भाई जगताप, वि.प.स.
(११) श्री.सुरेशदादा देशमुख, वि.प.स.
(१२) श्री.विनोद तावडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(२) श्री. एस.एस.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(४) श्री. आर.आर.काठे,अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय,

श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार
श्री. सुरेश जगताप, उप महालेखाकार

साक्षीदार :

गृहनिर्माण विभाग, मंत्रालय

श्री. गौतम चटर्जी, प्रधान सचिव, गृह निर्माण विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ३.४, ४.२.२, ४.२.५ संदर्भात प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली व पुर्ण झाली.

मंगळवार, दिनांक १२ जुलै, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १२ जुलै, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.१५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

समिती प्रमुख

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) श्री. रामप्रसाद कदम-बोर्डीकर, वि.स.स.
(४) श्री. रवि राणा, वि.स.स.
(५) श्री. नवाब मलिक, वि.स.स.
(६) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(९) श्री. भाई जगताप, वि.प.स.
(१०) श्री.विनोद तावडे, वि.प.स.
(११) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. एस.एस.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(२) श्री. रा.रा.काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय,
श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, मुंबई
श्री.जे.एस.करपे, महालेखाकार, नागपूर
श्री.टी.एस.आर.गुप्ता, उप महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग
श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

सार्वजनिक बांधकाम विभाग
श्री.धनंजय धवड, सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.१.३, ४.१.४, ४.२.७, ४.२.८, ४.३.४, ४.४.२, ४.४.३, ४.४.४, ४.४.५ संदर्भात सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली व पुर्ण झाली.

बुधवार, दिनांक १३ जुलै, २०११

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १३ जुलै, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.२५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

समिती प्रमुख

(२) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(४) श्री. नवाब मलिक, वि.स.स.
(५) श्री. विलास लांडे, वि.स.स.
(६) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(७) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री. गिरिष महाजन, वि.स.स.
(९) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(१०) श्री. भाई जगताप, वि.प.स.
(११) श्री.विनोद तावडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री. रा.रा.काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय,
(१) श्री.पी.के.सोलंकी, उप महालेखाकार, मुंबई
(२) श्री.जे.एस.करपे, महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग
श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव (लेखा व कोषागारे)

साक्षीदार :

महसूल व वन (वन) विभाग, मंत्रालय, मुंबई
श्री.प्रविणसिंह परदेशी, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.१.५ संदर्भात प्रधान सचिव, महसूल व वन (वन) विभाग यांची साक्ष घेतली व पुर्ण झाली.

मंगळवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.२० वाजता सुरु होऊन दुपारी १.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. ए.टी.पवार, वि.स.स.
(३) प्रा. राम शिंदे, वि.स.स.
(४) श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(५) श्री. बाळा नांदगांवकर, वि.स.स.
(६) श्री.विनोद तावडे, वि.प.स.
(७) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(३) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(४) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय,

(१) श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, मुंबई.
(२) श्री.टी.एस.आर. गुप्ता, उप महालेखाकार, नागपूर

साक्षीदार :

ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग

श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या नागरी अहवालातील परिच्छेद क्र. ४.४.६ संदर्भात प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग यांची साक्ष घेतली व पुर्ण झाली.

गुरुवार, दिनांक २५ जुलै, २०१३
लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक २५ जुलै, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
(५) श्री.राहूल बोंद्रे, वि.स.स.
(६) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(७) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
(९) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(१०) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(११) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१२) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(१३) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
(१४) श्री.मनिष जैन, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. यु.के.चव्हाण, अतिरिक्त सचिव
(२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(४) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)
(५) श्री. सोमनाथ सानप, कक्ष अधिकारी

समितीने तेरावा प्रारुप अहवाल विचारात घेतला व काही सुधारणांसह तो संमत केला.